म. ग्रं. सं. ठाणें.
विषय भू-प्रवास
सं. क्र. ८३५

REFBK-0026488
REFBK-0026488

# बारा जुलै ते अकरा जुलै

फिरोझ रानडे

मौज प्रकाशन

REFBK-0026488
REFBK-0026488

मौज प्रकाशन ३८५

पहिली आवृत्ती
सप्टेंबर १९९१

© १९९१ फिरोझ रानडे

मुखपृष्ठ
बाळ ठाकूर

मुखपृष्ठावरील छायाचित्र
दिनेश दलाल

किंमत सत्तर रुपये

प्रकाशक
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

बारा जुलै
ते
अकरा जुलै

फिरोझ रानडे

आमचे विमान सुटायला अजून थोडा अवकाश होता. विमानाच्या मागल्या भागातल्या – म्हणजे एकॉनॉमी क्लासमधल्या – प्रवाशांना त्यांच्या त्यांच्या सीट्स दाखवल्या जात होत्या. ज्यांच्या सीट्स दाखवल्या गेल्या होत्या ते आपआपल्या बायकामुलांना बसवण्याची व हातांतले सामानसुमान, हवाई पिशव्या वगैरे ठेवण्याची तजवीज करत होते.

हे गल्फ-एयरवेजचे भव्य विमान होते. पेट्रोलच्या पैशावर काही वर्षांत श्रीमंत झालेल्या देशाने आवश्यकतेपेक्षासुद्धा, इभ्रत वाढावी म्हणून सुरू केलेली ही विमानसेवा. श्रीमंती आली, की जशी एखादी बाई प्रथम सोन्याचे ठसठशीत मंगळसूत्र करून घेते तसेच काही नवीनचपणे स्वतंत्र झालेल्या वा अनपेक्षितपणे श्रीमंत झालेल्या देशांनी अशा महागड्या विमानसेवा सुरू केल्या होत्या. त्यांच्या सगळ्याच गोष्टी महागड्या. पायलट विलायती, तशाच हवाई सुंदरीही विलायती. सेवाव्यवस्था ही तशीच महागडी व अलीशान होती.

जवळजवळ सर्वच प्रवासी भारतीय होते. भारतातले विमान-प्रवासी म्हणजे जरा वरच्या वर्गाचे असे असतात. पण इथे तसे नव्हते. कोणी सुतार, कोणी गवंडी, कोणी कचेरीतले कारकून तर कोणी दुकानांतून काम करणारे – असे ते सगळे. त्यांचा विमानप्रवास तातडीने कुठे पोचावे म्हणून वा हौसेमौजेकरता म्हणून होत नव्हता. मसकत, बहारीन वगैरे त्यांची कामाची ठिकाणे अशी होती, की विमानाने जाण्याशिवाय दुसरा काही मार्गच नव्हता.

विलायती हवाई सुंदऱ्या ह्या सगळ्या प्रवाशांची कुवत ओळखून होत्या. त्यामुळे त्यांचे प्रवाशांशी वागणे मोठे उद्धटपणाचे होत होते. त्यांच्या सगळ्या वागण्यात-बोलण्यात करडेपणा होता. बसायच्या जागा वगैरे दाखवल्या जात होत्या पण त्यात प्रवाशांशी वागताना जी आदब लागते ती बिलकुल नव्हती.

अर्थात मला ह्या सगळ्या गोष्टींचा ताप नव्हता. मी विमानात शिरता शिरताच गोऱ्या हवाई सुंदरीने हस्तांदोलन करून स्वागत केले होते व मला माझ्या आसनापर्यंत नेऊन बसवले होते. काही झाले तरी मी पहिल्या वर्गाचा प्रवासी होतो. ओमान सुलतानीयतमधल्या बांधकाम मंत्रालयात चांगल्या मोठ्या हुद्यावर जात होतो. लठ्ठ पगार मिळणार होता. राहायला चांगली जागा मिळणार होती. हे सर्व होते म्हणून तर मी भारत सरकारची पंचवीस वर्षे करत असलेली चांगल्या हुद्याची नोकरी सोडून दिली होती. तशी मला निवृत्त व्हायला अजून पाच-सहा वर्षे बाकी होती. पण ओमानमधे एका वर्षात होणारी आमदानी भारत सरकारमधे पाच वर्षांत होणाऱ्या आमदानीपेक्षा जास्त असणार होती.

हे सगळे होते तरी माझ्या मनात उत्सुकता किंवा फार मोठा उत्साह असा काही नव्हता. मन अगदी निरभ्र होते. पूर्वीची नोकरी सोडण्याचे काही वाटत नव्हते, तसेच ह्या नव्या नोकरीबाबत काही कौतुक वाटत नव्हते. उमेदीचे व कर्तृत्वाचे आयुष्य अगदी संपले जरी नव्हते तरी उतरणीला नक्कीच लागले होते. आता काही मोठ्या लढाया मारायची व मोठी कामगिरी बजावायची हौस राहिली नव्हती. आतापर्यंत जे काही सरकारी वा स्वतःचे असे काम हाती घेतले होते ते काही ना काही कारणाने तडीस जाण्याचे राहून गेले होते. यशाचे दर्शन तर राहू द्या, पण त्याची चाहूलसुद्धा लागली नव्हती.

एकटा चाललो होतो व तिथे एकटाच राहणार होतो. आपल्या कुटुंबातून, आपल्या देशातून, मित्रमंडळींतून इतकी वर्षे नोकरी करत होतो. त्या माणसांतून परागंदा झाल्यासारखा जात होतो. पण त्याचेही काही दुःख वाटत नव्हते किंवा त्याच्याकरता उसासे टाकले जात नव्हते.

अंगात ज्वर असला, की कसे सगळे बेचव लागते! तसेच काहीसे झाले होते. पण बेचव लागले तरी आयुष्य पुढे ढकलण्याकरता दोन वेळा खावे-प्यावे लागतेच की! नित्य व नैमित्तिक कामे करायला लागतातच की! त्याच हिशोबाने मी भारत सरकारची नोकरी सोडली होती व ही ओमानी नोकरी धरली होती.

ज्या वेळी ओमानच्या बांधकाम मंत्रालयातल्या अधिकाऱ्यांशी मुंबईत बातचीत झाली होती त्या वेळी ही नोकरी प्रथम जरी एका वर्षाकरता म्हणून असणार होती तरी मी साधारणपणे पाच वर्षांकरता राहीन असे सांगण्यात आले होते. अर्थात ते पुढचे पुढे. तूर्त मी एक वर्षाकरता म्हणून जात होतो. मी निघत होतो तो दिवस होता बारा जुलै. त्या हिशोबाने पुढल्या वर्षाच्या जुलैपर्यंत ओमानमधे राहणार होतो.

ही बातचीत होण्याच्या वेळी मी त्या ओमान सरकारच्या अधिकाऱ्यांवर चांगला प्रभाव पाडला होता. माझ्या मनाची ही काय ठेवण आहे कळत नाही. एका बाजूला सगळ्या गोष्टी बेचव लागत असल्या तरी तसा काही वेळप्रसंग येताच मी अगदी सर्व शक्तिनिशी त्यांना सामोरा जातो. अगदी अहमहमिकेने प्रसंगांना तोंड देत असतो. जशी मला नोकरीची गरज आहे तशी त्यांनाही चांगल्या माणसांची गरज आहे, अशी माझी भावना होती. माझा त्यांना चांगला उपयोग होणार आहे, हे मी त्यांच्या मनावर बिंबवले होते. त्यामुळेच त्यांनी माझ्या एवढ्या चढ्या पगाराची मागणी मान्य केली होती.

खरे तर मला त्या वेळी कोणतीच नोकरी करायची नव्हती. गेली चारपाच वर्षे मला कमानकलेच्या म्हणजे आर्किटेक्चरच्या अभ्यासाने पछाडले होते. आतापर्यंत मी कमान-कलेच्या ज्ञानाचा दररोजच्या कामात उपयोग करून घेत होतो. पण आता मी कमानकलेचा एक कला म्हणून अभ्यास सुरू केला होता. तसा अभ्यास सुरू करताच माझ्यासमोर जणू काही एखाद्या संग्रहालयाचे दालनच उघडल्यासारखे झाले होते; आणि काय बघू आणि काय नको अशी मनःस्थिती झाली होती. कला म्हणून कमानकलेचा अभ्यास किती रसपूर्ण आहे ह्याची मला प्रखरतेने जाणीव झाली. तसा अभ्यास पुढे जास्त खोलात जाऊन करण्याकरता मी सरकारकडे काही महिन्यांची रजा मागितली होती. पण अभ्यासाकरता रजा वगैरे गोष्टी आपल्या नोकरशाहीच्या आकलनाच्या पलिकडल्या आहेत. त्यामुळे माझी रजा नामंजूर झाली. मी चांगलाच हवालदिल झालो. नोकरी सोडून देण्याचे विचार मनात येत होतेच.

आतापर्यंत भारत सरकारच्या बांधकाम खात्यात सीनियर आर्किटेक्ट म्हणून मी बरीच

महत्त्वाची कामे केली होती. चांगला अधिकारी, कल्पक आर्किटेक्ट व चांगल्या योग्यतेचा प्रशासक म्हणून मी नाव कमावले होते. त्याच बळावर भारत सरकारने उच्च शिक्षणाकरता इंग्लंडला स्कॉलरशिप देऊन मला पाठवले होते. नंतर काही वर्षांनी 'इंडियन टेक्निकल ॲण्ड एकॉनॉमिक को-ऑपरेशन' ह्या कार्यक्रमाखाली माझी अफगाणिस्तानाकरता निवड झाली होती. मी काबूलला चार वर्षे राहून आलो होतो.

मला कमानकलेच्या अभ्यासाचे वेड लागले ती काबूलला जाण्याच्या आधीची गोष्ट. एक दिवस मी असाच राष्ट्रपतिभवनाच्या बाजूने जात असता माझ्या मनात विचार आला, की ही अत्यंत भव्य व तेवढीच मनोहारी वास्तू कधी बांधली गेली असेल? कोणी बांधली असेल? काय खर्च आला असेल? त्या आर्किटेक्टच्या मनात ही अशी प्रचंड व नमुनेदार वास्तू बांधताना काय काय विचार आले असतील? त्याला कोणकोणत्या अडचणींवर मात करायला लागली असेल?

राष्ट्रपतिभवन म्हणजे एका काळचे व्हाईसरिगल लॉज. ही काही सर्वसामान्य इमारत नव्हे. कधीही सूर्य न मावळणाऱ्या ब्रिटिश साम्राज्यातल्या सगळ्यांत महत्त्वाच्या अंमलदाराचा म्हणजे व्हाईसरॉयचा तो राजवाडा होता. ब्रिटिश साम्राज्याच्या गौरवाचे ही वास्तू म्हणजे एक अलीशान प्रतीक होते. ही इमारत एडवीन लचिन्स ह्या ब्रिटिश आर्किटेक्टने डिझाईन केली आहे एवढेच मला माहीत होते.

आपण एवढे शिक्षणाने व नोकरीने आर्किटेक्ट असून आपल्याला ह्या इतक्या महत्त्वाच्या इमारतीबद्दल इतकी थोडी माहिती, तर सर्वसामान्यांना काय माहिती असणार? आणि त्यांना तशी माहिती करून देणे हे आपले काम नाही आहे का? ह्या विचाराने मला इतके पछाडले की मला दुसरे काही म्हणून काही सुचेना. योगायोगाने त्याच वेळी मला कचेरीत काम असे नव्हते.

काम नसण्याचे असे झाले होते :

भारत सरकारच्या आय०ए०एस०, आय०एफ०एस० वगैरे वरिष्ठ सेवांकरता निवडल्या गेलेल्या अधिकाऱ्यांकरता मसुरीला एक प्रशिक्षण संस्था आहे. ती 'शार्ले व्हिला हॉटेल'च्या जुन्या इमारतीत आहे. पण प्रशिक्षण घेणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत जाऊ लागली. त्यांच्या राहण्याकरता, जेवणाखाण्याच्या जागांकरता, शिक्षणाची व्यवस्था करण्याकरता नवीन इमारतींची गरज होती. त्या नव्या इमारतींचे नकाशे बनवण्याकरता खास आर्किटेक्ट म्हणून माझी नेमणूक झाली. हे फार मोठे, थोड्या जिकिरीचे पण फार महत्त्वाचे प्रोजेक्ट असल्यामुळे मला दुसरे काही काम देण्यात आले नव्हते.

मी मोठ्या उत्साहाने सहाआठ महिने खपून एक प्राथमिक योजना तयार केली.

काम महत्त्वाचे होते. मसुरीसारख्या रम्य डोंगराळी भागात होते. पंतप्रधान इंदिराजींना स्वतः ह्या कामात फार रस होता. त्या मसुरीला आल्या होत्या त्या वेळी मी माझी योजना त्यांना विवरण करून दिली होती. राष्ट्रपती वराहगिरी व्यंकटगिरी मसुरीला आले असता त्यांना पण माझी योजना दाखवली होती. भारत सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकरता ही योजना असल्यामुळे वरिष्ठ आय०सी०एस० व आय०ए०एस० अधिकाऱ्यांशी संबंध येणार होता. गृहमंत्रालयाच्या रामनिवास मिर्धा ह्या राज्यमंत्र्यांकडे हे काम होते. त्यांच्याशी बऱ्याच वेळा भेट झाली होती. ह्या सगळ्या लोकांना आपली हुषारी पटली पाहिजे अशी माझी स्वतःची इच्छा होती व त्याबाबत तितकीच मला खात्री पण होती.

मोठ्या उत्साहाने मी पुढील कामाला सुरुवात केली. मी नाना तऱ्हेचे नकाशे बनवले. त्याबरहुकूम इमारतींची मॉडेल्स बनवून घेतली. तेवढ्यात खर्च कमी करण्याकरता म्हणून पुष्कळ इमारत-योजना भारत सरकारने रद्दबातल केल्या. त्यांत माझ्या मसुरीच्या योजनेचा पण समावेश होता. झाले, माझे काम ठप्प झाले.

एखाद्या योजनेवर इतके मन लावून, चांगले नाव मिळेल, खूप प्रशंसा होईल अशी अपेक्षा ठेवून काम केलेले असावे व ते कामच रद्द व्हावे ह्याचे मनाला किती दुःख होते, किती मनस्ताप होतो, किती निराश व्हायला होते हे कलावंतच जाणू शकेल. इतरांना कळणार नाही.

मला ते अगदी प्रखरतेने जाणवले होते. ह्या वेळी आणि पुढेही पुष्कळ वेळा.

मसुरीचे काम थांबले तरी माझी दुसरीकडे बदली केली गेली नाही वा मला दुसरे काही काम दिले गेले नाही. आमच्या मुख्यांना वाटत होते, की सरकारचे मन केव्हाही फिरेल व परत मसुरीचे काम करायला लागेल तेव्हा मी मोकळा असेन तर बरा. सांगण्याचा हेतू हा, की मी कामाशिवाय पण भर पगारी दिवस काढत होतो.

त्याच वेळी राष्ट्रपतिभवनावर काही अभ्यास करावा – राष्ट्रपतिभवन कधी बांधले गेले? ते बांधण्यात त्या वेळी ब्रिटिश सरकारचा काय हेतू होता? आर्किटेक्ट एडवीन लचिन्स्च्या मनात काय होते? एवढ्या मोठ्या बलाढ्य ब्रिटिश सत्तेला शोभेल असा राजवाडा बांधायचा हे काही सोपे काम नव्हते. दिल्लीत मोगलांनी बांधलेला लाल किल्ला व इतर इमारती होत्या. त्यांची मोगली पद्धतीची ढब होती. त्याचा लचिन्सच्या विचारावर काय परिणाम झाला? हे सगळे ज्यात येईल असे छोटेखानी पुस्तक लिहावे असे माझ्या मनाने घेतले.

एकदा मनाने घेतल्यावर मी दररोज दहा दहा तास त्यावर काम करायला लागलो. वेगवेगळ्या पुस्तकालयांतून गेलो. विसाव्या शतकाच्या सुरवातीची पुस्तके वाचून काढली. व्हाईसरिगल लॉज बांधायला १९१२ मधे सुरुवात झाली. त्या वर्षापासून तो थेट १९४७ सालापर्यंतच्या सगळ्या महत्त्वाच्या इंग्रजी दैनिकांची प्रत्येक दिवसाची सोळा सोळा पाने व्हाईसरिगल लॉजबद्दल काही छापून आले आहे का हे पाहावे ह्या हेतूने काळजीपूर्वक वाचून काढली. त्या काळातले व्हाईसरॉय, पत्रकार, भारतात आलेले परदेशी पाहुणे वगैरेंनी लिहिलेली पुस्तके वाचून काढली. सरकारी फोटो-खात्यात जाऊन भवनाची व तिथे झालेल्या घडा-मोडींची छायाचित्रे मिळताहेत का हे बघण्याकरता पाच ते सहा हजार निगेटिव्ह्ज डोळ्यां-खालून घातल्या. प्रसिद्ध पत्रकार सरदार खुशवंतसिंग ह्यांचे वडील राष्ट्रपतिभवनाचे एक कंत्राटदार होते. मी भेटलो त्या वेळी त्यांचे वय पंचाऐंशी वर्षांचे होते. त्यांनी पुष्कळ माहिती दिली. ह्या सगळ्या खटाटोपाची गोळाबेरीज म्हणजे दोन वर्षांच्या शेवटी दीडशे पानांचे हस्तलिखित तयार झाले.

सोमय्या पब्लिकेशन्सचा दिल्लीतला कृष्णन म्हणून संपादक होता. त्याला माझी मूळ कल्पना आवडली होती. तसेच माझे लिखाण पण आवडले होते. पिलू मोदींना त्याने ते हस्तलिखित दाखवले. मोदी त्या वेळी चढ्या राजकारणात होते तरी ते मूळचे आर्किटेक्ट. त्यांनी 'श्री० रानडे यांनी खूप कष्ट करून मिळवलेली माहिती फार चांगल्या प्रकारे मांडली आहे' असे सर्टिफिकेट दिले. कृष्णनने ते हस्तलिखित त्यांच्या मुंबईच्या मुख्य संपादकाला पाठवले. मुंबईच्या संपादकाला ते फार काही भावले नसावे. त्याने खूप चालढकल केली व वर्षा-दोन वर्षांनी ते माझ्याकडे परत पाठवून दिले.

त्यानंतर मी त्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी मुलीच्या लग्नाकरता वेगळी वेगळी स्थळे

पाहताना जोडे झिजवतात तसे केले. पण ते पुस्तक प्रकाशित झाले नाही ते नाहीच. त्यामुळे मन उदास झाले, फार उदास झाले. कमानकलेचा पुढे काही अभ्यास करावा अशी उमेदच राहिली नाही. मनाला चढलेली काजळी जास्त गहिरी होत चालली.

काळ्या रंगात आणखी कितीही काळा रंग मिसळला तरी तो जास्त काळा होत नाही. पण मनाचे तसे नाही. आधीच्या उदासपणात आणखी उदास होण्यासारखी कारणे घडली, की ते जास्तच उदास होते. आपण हाती घेतलेले कोणतेही काम यशस्वी होणार नाही, मग उगाच धावपळ व जिवाची ओढाताण तरी कशाला करून घ्या अशी मनाची भावना होऊ लागली.

त्यामुळे मसकतला चांगल्या पगारावर व मोठ्या हुद्यावर जात होतो तरी फार काही उत्साह नव्हता. मन अगदी निरभ्र होते. अशा मनःस्थितीत केलेला प्रवास, मग तो बैलगाडीचा असो नाहीतर अगदी अलीशान विमानाचा असो, त्याचे कौतुक ते काय वाटणार ?

हवाई सुंदरीने बरोबर येऊन दाखवलेल्या थोराड आसनावर जाऊन बसलो. त्या पंचवीस-तीस आसने असलेल्या पहिल्या वर्गात आम्ही फक्त तिघे जण होतो. एक अरब मुलगी, एक सुट्टीवर असलेला विलायती वैमानिक व एक मी, हिंदुस्तानी. तीन टोकांची आम्ही तीन माणसे अगदी तीन टोकांना बसलो होतो.

अजून विमान सुरू व्हावयाचे होते. तेवढ्यात हवाई सुंदरीने शेवाळी रंगाचा ओला गरम टर्कीश टॉवेल आणला. त्याला इडी कोलनचा नाजूक वास येत होता. त्या नाजूक वासाबरोबर जानकीची तितकीच नाजूक आठवण आली. जानकी...जानकी...बघता बघता आकाश ढगांनी भरून यावे तसे आतापर्यंत निरभ्र असलेले मन जानकीच्या आठवणींनी भरून आले.

माझी काहीच हालचाल होत नाही आहे हे पाहून हवाई सुंदरी "प्लीज" असे पुटपुटली व तिने टॉवेलचा ट्रे पुढे केला. टॉवेल घेतला व त्याने तोंड पुसले. गरम टॉवेलने तोंड पुसल्यावर खूप तजेलदार वाटले. आतापर्यंत मनावर आलेला ताण वितळून गेला.

टॉवेल न्यायला आलेल्या सुंदरीने काही ड्रिंक घेणार का म्हणून विचारले तेव्हा तिला व्हिस्की आणायला सांगितले. थोडी व्हिस्की पोटात गेल्यावर विमान जमिनीवर आहे की आकाशात ह्याला महत्त्व उरले नाही. नंतर अरबी पद्धतीचे सामिष जेवण घेतले. मग जो डोळा लागला तो "पट्टे बांधून कमरा कसा, आपलं विमान मसकतला उतरत आहे" असे हवाई सुंदरी कानाशी येऊन कुजबुजली तेव्हा उघडला.

रात्रीचे काहीतरी अकरा-साडेअकरा वाजले असावेत. बाहेर विमानतळ सोडून बाकी सगळीकडे अंधारच अंधार होता. जुलैचा महिना म्हणजे आपल्याकडला पावसाळी हवेचा. पण ओमान म्हणजे राजस्थानसारखा कोरडा प्रदेश. तिथे कसला आला आहे पाऊस ? विमानातून बाहेर पडलो तर अगदी भट्टीत पडल्यासारखे भाजायला झाले. अगदी धावतपळत विमानतळाच्या इमारतीत घुसलो आणि एकदम थंड थंड वाटायला लागले. कारण ती इमारत वातानुकूल केलेली होती.

हॉलमधे आलो. मला न्यायला म्हणून एक उंच व काळा ओमानी अधिकारी आला होता. खरे म्हणजे त्याला 'काळा' म्हणायचा मला काहीही अधिकार नव्हता. पण मला वाटले, की काळे लोकच इतर काळ्यांना 'काळे' म्हणतात.

त्या ओमानीने बगळी पांढरा शुभ्र पायघोळ झगा घातला होता. बाकी अरबांचा असतो

ना, तसा. पण ह्याचे डिझाईन थोडे वेगळे होते व डोक्याला रंगीबेरंगी टॉवेल गुंडाळला होता. तो बरोबर असल्यामुळे ओळखपत्र, परवाना-तपासणी वगैरे गोष्टी अगदी बिनबोभाट पार पडल्या.

बहुतेक भारतीयांना सगळ्या देशांतून कस्टमचा फार त्रास होतो. ह्याचे कारण भारतीयांचा खाण्याचे जिन्नस आणायचा सोस! बहुतेक जण लोणची, पापड वगैरे गोष्टी आणतात. त्याचबरोबर हशीश, अफू वगैरे आणण्याची पण भीती असते. त्यामुळे त्यांचे सामान अगदी कसून तपासतात.

माझ्याकडे असे खाण्याचे काहीही नव्हते तरी मला त्रास झाला. कारण माझी बॅगच काही केल्या उघडेना. त्या ओमानीने कस्टमवाल्यांकडे खूप रदबदली केली. मीही बॅगेत काहीही भलतेसलते नाही आहे असे सांगत होतो. पण तो हबशी अधिकारी काही विरघळला नाही. मग माझ्या मागे उभ्या असलेल्या प्रवाशांनी गलका सुरू केला. तेव्हा कस्टमवाल्यांनी माझ्या-बरोबरच्या ओमानी अधिकाऱ्याचे नाव व खाते लिहून घेतले व आम्हांला सोडले. घरी येऊन प्रयत्न केला तर ती बॅग अगदी सहजपणे उघडली. आता ह्याला काय म्हणावे?

त्या ओमानी अधिकाऱ्याने भली लांबडी जपानी गाडी आणली होती. अशा भारी जपानी गाड्यांच्या रांगाच्या रांगाच लागलेल्या होत्या. ओमान हा चांगलाच सधन देश असल्याचे जाणवत होते.

आपल्या नातेवाइकांना वा मित्रमंडळींना आणण्याकरता आलेली हिंदी व पाकी मंडळी इमारतीच्या बाहेर घोळक्याघोळक्यांनी उभी होती. कारण खास परवाना असल्याशिवाय विमानतळाच्या इमारतीत कोणालाही जाऊ देत नाहीत. पण मला त्यांच्याकडे लक्ष देणे शक्य नव्हते. फार गरम होत होते, तेव्हा लवकरात लवकर गाडीत जाऊन बसणे आवश्यक होते.

आम्ही गाडीत बसलो व खानदेशी शब्दांत सांगायचे म्हणजे भिन्नाट निघालो. इथले सगळे लोक भिन्नाट पद्धतीनेच गाडी चालवतात. गाड्या जबरदस्त, रस्ते मोठे लंबेचवडे व अगदी मुलायम. मग गाड्या भिन्नाटपणे चालवायला काय हो?

तीसएक मिनिटांत लखलखीत रस्त्यावरून हॉटेलवर पोहोचलो. हॉटेल तीन तारांकित असावे. आर्किटेक्टने जमिनीच्या उंचसखलपणाचा फायदा घेतला होता. म्हणजे जिथे जमीन खोलगट होती तिथे तीन मजले होते. त्या भागात तळमजल्यावर वेगवेगळी दुकाने होती. एक छोटे सिनेमागृह होते. हॉटेलमधे साठएक खोल्या असतील. उंच भागात इमारत दोन मजली होती व तिला फिक्कट शेवाळी रंग दिला होता. त्यामुळे इमारत टुमदार व घरगुती वाटत होती. नाहीतर काही हॉटेल्सच्या इमारती वसकन अंगावर येणाऱ्या असतात. त्यामुळे ह्या हॉटेलबद्दल प्रथमदर्शनीच आपुलकी वाटू लागली.

सरकारी कामाकरता कुठे बाहेरगावी गेलो तर माझी राहण्या-खाण्याची व्यवस्था सरकारी डाक बंगल्यांतून किंवा सर्किट हाउसेसमधून केली जात असे. त्यामुळे त्यांच्या पद्धती मला चांगल्या ठाऊक होत्या. तेथल्या खानसाम्यांना व बेऱ्यांना पण सरकारी अधिकारी म्हणजे काय ते माहीत असे. पण हॉटेलची संस्कृती व डाक बंगल्यांची संस्कृती ह्या अगदी वेगवेगळ्या गोष्टी आहेत.

तसा मला हॉटेल संस्कृतीचा अगदीच अनुभव नव्हता असे नाही. थोडा इंग्लंडमधला, थोडा काबूलमधला होता. त्यामुळे अशा हॉटेलमधून राहावे कसे, वागावे कसे ह्याची माहिती झाली होती. भीड चेपली गेली होती.

गाडीतून येताना मनात विचार येत होते, कोण कुठला सामान्य माणूस मी आणि जगाच्या पाठीवर कुठे कुठे गेलो होतो! हिंदुस्थानातल्या हिंदुस्थानातच दिल्ली, कलकत्ता, इम्फाल, शिलाँग वगैरे ठिकाणीतर काही वर्षे राहिलो होतो. शिलाँगला असताना कामानिमित्त तिकडचा हिमालय पायी पालथा घातला होता. अगदी तिबेटात व ब्रम्हदेशात पण जाऊन आलो होतो.

कामानिमित्त श्रीनगर, जम्मू, जयपूर, अजमेर, बरेली, अलाहाबाद, लखनौ, मद्रास — किती गावे म्हणून सांगावीत? तिथे दोनचार दिवस राहिलो होतो. गावे पाहिली होती. प्रदेश हिंडलो होतो.

आणि आता हे मसकत! इथे निदान एका वर्षाकरता तरी राहणार होतो. गाडी भरधाव चालली होती. विचार त्यापेक्षा वेगाने चालले होते. बाहेर जशी झाडेझुडपे व इमारती वेगाने डोळ्यांसमोर येत होत्या व मागे पडत होत्या, त्याचप्रमाणे मनात जुन्या आठवणी येत होत्या व मागे पडत होत्या.

तो ओमानी काहीतरी सांगत होता, काहीतरी विचारत होता. त्याला इंग्रजी जुजबी पण हिंदी चांगले येत होते. पण एकंदरीत तो भरडाच वाटत होता. म्हणजे सगळे ओमानी असेच असणार आहेत की काय? मग ह्या लोकांबरोबर एक वर्ष तरी कसे काढायचे?

काबूलला चांगली चार वर्षे होतो. तिथे गेलो त्या वेळी गजनीचा मुहम्मद सोडून दिला तर अफगाण लोकांबद्दल विशेष काही माहिती नव्हती. त्यामुळे त्यांच्याविषयी काही विचारही मनात आला नव्हता व काही भावना पण नव्हत्या. बायको-मुलांबरोबर चांगली चारपाच वर्षे परदेशात राहायला मिळेल. — पगार, भत्ता मिळून काही हजार रुपये मिळतील — ह्यावरच मी खूष होतो.

तेव्हा नव्हता अफगाणांबद्दल विचार ना अफगाणिस्तानाबद्दल. पण आवर्तात सापडलेला माणूस जसा त्यात जास्तीत जास्त अडकत जातो तसेच काबूलच्या राहण्याचे झाले होते. प्रथम कचेरीच्या कामामुळे, नंतर राजकीय घडामोडींमुळे व नंतर स्वतःच्या आयुष्यातल्या काही गोष्टींमुळे.

काबूल म्युनिसिपालटीतले काम प्रथम वाटले होते तसे नुसतेच कचेरी-काम राहिले नाही. तिथे जसा आम्हा हिंदी लोकांचा एक ग्रुप होता तसाच शौरवी म्हणजे रशियन आर्किटेक्ट्स-इंजिनियर्सचा पण एक ग्रुप होता. (फारसी भाषेमधे रशियनांना शौरवी म्हणतात.) मी काबूल म्युनिसिपालटीत जाण्याआधी तिथे रशियनांचा फार वरचष्मा होता. ते म्हणतील ती पूर्व अशी स्थिती होती. अर्थात ह्याचा अर्थ त्यांना आपल्या विषयात फार कळत होते असे नाही; तर त्यांच्या गुर्मीमागे त्यांच्या राजकीय सत्तेचा वरदहस्त होता. अगदी टाउन-प्लॅनिंगसारख्या तांत्रिक विषयातही त्यांची मक्तेदारी चाले. त्यांच्याविरुद्ध कोणाचीही काही बोलण्याची हिंमत नव्हती.

मी हिंदी ग्रुपमधला टाउन-प्लॅनर-आर्किटेक्ट होतो. बाकी सगळे इंजिनियर्स होते. मला रशियन लोकांची विचार करण्याची पद्धत कळेना; व वागणे तर बिलकुल सहन होईना. मी शौरवी आर्किटेक्ट्सना कसून विरोध केला. नुसता विरोधच केला नाही तर अफगाण लोकांची राहण्याची पद्धत, त्यांची आर्थिक परिस्थिती व हवामान वगैरे गोष्टींचा विचार करून नकाशे बनवले. मी रशियनांना ठामपणे विरोध केलेला पाहून अफगाण सहकाऱ्यांना माझे कौतुक वाटायला लागले. त्यांच्या-माझ्यात जवळीक निर्माण झाली. जे आतापर्यंत कोणी केले नव्हते — म्हणजे रशियन लोकांना विरोध — तो मी केला होता!

पुढे अफगाणिस्तानात राजकीय उलथापालथ झाली. डाव्या विचारांच्या लोकांची राजवट आली. आणि सगळीकडे भयाचे व अस्थिरतेचे वातावरण पसरले. बरोबर काम करणारे जवळजवळ सगळे कामावरून काढले गेले. त्यांतले बरेचसे तुरुंगात टाकले गेल व काही जिवानिशी मारले गेले. मराठीत म्हणतात तशी जिथे फुले वेचली तिथे गोवऱ्या वेचण्याची वेळ आली होती.

ह्या सगळ्यामुळे अफगाणिस्तानाबद्दल व अफगाणांबद्दल एक् तऱ्हेची आपुलकी निर्माण झाली होती; प्रेम व जवळीक वाटू लागली होती.

माझ्यासारखे भारत सरकारच्या कार्यक्रमाखाली जवळजवळ शंभरसव्वाशे हिंदी अधिकारी आले होते. बहुतेक सहकुटुंब राहत होते. त्यांच्यातल्या काही कुटुंबांशी आमची खूप मैत्री जमली. काही तर फार पक्के मित्र झाले. त्यांच्यातल्या काही जणांशी हिंदुस्थानात परत आल्यावरही जवळचे व मैत्रीचे संबंध राहिले. जिवाला जीव लावणारी काही मंडळी मिळाली.

अफगाणांबद्दल जसे प्रेम निर्माण झाले, तसे ह्या ओमानी लोकांबद्दल वाटेल का? ह्यांच्याबद्दल जवळीक व प्रेम निर्माण होईल का? व तसे झाले तर ते योग्य होईल का? तसे झाले तर अफगाण मित्रांशी प्रतारणा केल्यासारखे तर होणार नाही?

माझे मलाच हसू आले. ह्या विचारांना तसा काही अर्थ नव्हता. कसली प्रतारणा आणि कसले काय? इथे येण्यात अगदी सरळ साधा व्यवहार होता. काबूलसारखे इथले आयुष्य जाईल अशी अपेक्षा करणेही चुकीचे होते. पण तसे विचार मनात येत होते हे मात्र अगदी खरे.

हॉटेल आले तसा खाली उतरून गरम हवेच्या फवाऱ्यातून हॉटेलच्या स्वागतकक्षात गेलो. अत्याधुनिक हॉटेल होते ते. कक्ष कसे थंड-थंड होते. रिसेप्शन काउंटरवर गोव्याकडली एक काळीसावळी, चुटचुटीत तरुणी व तेवढाच काळासावळा व काळा सूट व टाय लावलेला गोव्याचाच तरुण बसला होता. बरोबर आलेल्या ओमानीने त्यांच्याकडे कागदपत्रे दिली. त्यांवरून मी हिंदी आहे व आडनावावरून मी मराठी आहे हे त्यांच्या लक्षात आले. गोव्याचेच ते.

त्या वेळी पाहिले व नंतरही लक्षात आले, की ही गोव्याकडली चाकरमाणसे स्वतःला 'गोव्या'ची म्हणवतात, हिंदी नाही. स्वतःला हिंदी म्हणवण्यात त्यांना थोडा कमीपणा, मागासपणा वाटत असावा. त्यांच्या बोलण्यातून ते जाणवायचे. हिंदी लोक गावंढळपणे वागतात – त्यांना मॅनर्स नसतात – अशी त्यांची भावना होती; व ती ते बोलून दाखवत. त्यांच्या बोलण्यात अगदीच तथ्य नव्हते असे नाही. आपले लोक पुष्कळ वेळा गावंढळपणे वागतात हेही खरेच.

मी मोठ्या सरकारी पदावर आलो असल्याने असेल कदाचित, पण इतर सामान्य भारतीयांशी वागत त्यापेक्षा माझ्याशी ते त्या वेळी तर चांगले वागलेच; आणि पुढे मी अगदीच 'हिंदी' नाही आहे हे कळल्यावर तर फारच चांगले वागू लागले. मी रजिस्टरमधे नाव-गाव वगैरे माहिती लिहीत असता त्या गोवानीज तरुणाने माझ्याच खात्यात नेमणूक झालेला एक सरदारजी दोनचार दिवसांपूर्वी तिथे उतरलेला आहे वगैरे माहिती दिली.

मी रिसेप्शन काउंटरवर त्यांच्याशी बोलत असतानाच, एक पस्तीस-छत्तीस वर्षांचा गोरापान, नाकीडोळी नीटस सरदारजी डुलत डुलत येताना दिसला. होता तो जाडा अन्

उंचीला कमी असाच, पण लालभडक पगडीमुळे चांगला उंचनिंच वाटत होता.

''सत् श्री अकाल'' मी म्हणालो. दिल्लीत बरीच वर्षे राहिलो असल्यामुळे सरदारांचे स्वागत कसे करायचे असते ते मला चांगले माहीत होते.

सरदारजीने मी कोण आहे ते ओळखले होते. मी आज येणार आहे वगैरे माहिती त्याला ऑफिसमधून कळली असणारच. मी हात पुढे केला होताच. माझा हात हातात घेत त्याने शुद्ध मराठीत ''नमस्कार. माझं नाव देवेंदरसिंग, तुमचं रानाडे ना? तुम्ही कुठले?'' म्हणून विचारले.

म्हणजे बघा! मी मराठी असून त्याच्याशी पंजाबीत बोलण्याचे म्हणत होतो तर तो पठ्ठा माझ्याशी शुद्ध मराठीत बोलत होता. आणि त्यात आश्चर्य काय? त्याचा जन्मच मुळी मुंबईचा.

आता त्या ओमानी माणसाचे काम संपले होते. तो 'बाय-बाय' करून निघून गेला. मी म्हटले, की हा काय तऱ्हेचा मुसलमान आहे? अफगाण निरोप घेताना 'बामाने खुदा' किंवा आपल्याकडले मुसलमान' खुदा हाफीज' म्हणजे 'खुदा तुम्हांला साथ करो' म्हणतात. अगदी दुकानात काही खरेदी करायला म्हणून गेलात तरीसुद्धा तेथून निघताना दुकानदार तुम्हांला 'बामाने खुदा' करणारच. हीच गोष्ट ऑफिसमधल्या लोकांची व इतरांची. माझ्या मसकत-मधल्या मुक्कामात मला कोणी 'बामाने खुदा' वा 'खुदा हाफीज' म्हटल्याचे आठवत नाही. अगदी पाकिस्तानीसुद्धा म्हणत नाही. म्हणजे असे काही म्हणणे त्यांना मागासलेपणाचे वाटते की काय? कारण तथाकथित सुधारलेल्या लोकांत जुन्या चालीरीती सोडून देण्याची वृत्ती जाणवते.

''चला, थोडी बिअर पिऊ या व मग जेवू.'' सरदारजीने निमंत्रण दिले. मी अशा निमंत्रणाची वाटच पाहत होतो. विमानात चांगले जेवण मिळाले होते. पण तसले खाणे भरपेट थोडेच असते? व त्यालाही आता चारपाच तास होऊन गेले होते. स्वागतकक्षाला जोडूनच बार होता. बार तसा काही फार मोठा नव्हता. एका बाजूला पेय देण्याकरता काउंटर व ज्यांना तिथे बसायचे आहे, त्यांच्याकरता तिपाया होत्या. काउंटरच्या पलिकडल्या बाजूच्या भिंतीवर बारमधे नेहमी असतो तसा लांबच लांब आरसा होता. ज्यांना खुर्च्यांवर बसून पान करायचे असेल त्यांच्याकरता चार-चार खुर्च्यांची व दोन-दोन खुर्च्यांची टेबले होती. सगळीकडे अगदी अंधूक प्रकाश पड़ावा अशी योजना केली होती.

आजकाल बहुतेक बार्समधून असे दृश्य असते. ह्या बारचा विशेष म्हणजे सगळ्या भिंतींना व छतालाही काळाभोर रंग दिला होता. त्यामुळे गूढतेची छाया पडली होती. गूढतेचे वातावरण दारू प्यायला फारच उत्तेजकता आणणारे होते. ही त्या आर्किटेक्टची वा इंटीरियर डिझाइन करणाऱ्याची करामत होती. सर्वसामान्य कोणी असता तर त्याने रंगांची रेलचेल करून टाकली असती व पुष्कळ जण तसे करतातही. ह्याचा अर्थ सगळ्या बार्सना काळाच रंग दिला पाहिजे असे नाही. पण तिथे दिलेला तो काळाभोर रंग मनाला फार भावला.

प्रवासाने, विचाराने व नंतरच्या खाण्यापिण्याने डोळ्यांवर अगदी लहान मुलासारखी झोप आली होती. तेव्हा सरदारजीची संगत सोडली व आपल्या खोलीत गेलो. कपडे बदलण्याचे-सुद्धा त्राण नव्हते. अंगावर होते ते कपडे काढून टाकले व अगदी लहान मुलासारखा झोपलो. अगदी गाढ!

डोळे उघडले. ओमानमधली पहिली सकाळ उजाडली होती.

गादीवर पडल्या पडल्या लंडनमधली पहिली सकाळ आठवली. तेव्हासुद्धा असा प्रवासाने दमूनभागून मध्यरात्री लंडनला पोहोचलो होतो. हॉटेलात आलो आणि अगदी लाकडी ओंडक्यासारखा ठार झोपून गेलो होतो. सकाळी डोळे उघडले. पहिला विचार आला तो हाच, की आलो एकदाचे इंग्लंडला! 'गंगेत घोडं न्हाल्या'च्या चालीवर.

तडातडी उठलो. खिडकीचे पडदे बाजूला केले. सप्टेंबर महिना होता. बाहेर धूसर इंग्लिश वातावरण होते. लांबच लांब, एका छापाच्या व एकाच उंचीच्या इमारती पोलिसांसारख्या रांगेत उभ्या होत्या. त्यांच्या छतांवर असलेल्या एकाच तऱ्हेच्या चिमण्यांतून एकाच तऱ्हेचा धूर एकाच बाजूने बाहेर पडत होता.

हे सगळे दृश्य तसे काही फार उत्साहवर्धक नव्हते. पण आपण इंग्लंडला आलो आहोत ही कल्पनाच मोठी उत्साहवर्धक होती. भावना उचंबळून आल्या. त्या भावनेच्या भरात काय केले असेन? तर चक्क बारा सूर्यनमस्कार घातले! का, ते सांगणे अवघड आहे, पण तसे सूर्यनमस्कार घातले खरे.

ह्या सगळ्या गोष्टींना आता जवळजवळ वीस वर्षे होत आली होती. ह्या काळात मी निबर झालो होतो; अनुभवाने भावनाही निबर झाल्या होत्या. ओमानला येण्याबद्दल भावना वगैरे उचंबळून येण्याचा प्रश्नच नव्हता. तोंड धुतले व खोलीत असलेल्या दूरध्वनीवरून चहा मागवला. कचेरी किती वाजता असते वगैरे सरदारजींनी मला सांगितले होते. पण पहिला दिवस असल्यामुळे कचेरीतून मला कोणी तरी न्यायला येणार होते. म्हणून मी थांबून राहणार होतो. आंघोळ केली, कपडे केले. तेवढ्यात रिसेप्शन काउंटरवरून कोणीतरी मला न्यायला आले आहे अशी वर्दी मिळाली.

न्यायला आलेला माणूसही कालच्या माणसासारखा 'काळा' व बगळी पायघोळ झगा घातलेला होता. त्याच्याबरोबर बाहेर पडलो. जेमतेम सकाळचे नऊ-साडेनऊ झाले होते. तरी पण गरम वाऱ्याचा असा काही झोत आला, की त्यात आपण कापरासारखे जळून जाणार अशी भावना झाली. जुलैचा मध्य होता. तापमान ४५°-४६° सेल्सियस असावे. पण तो बेटा हसतमुखाने पुढे चालला होता. बाहेर भारी लांबड्या गाड्यांची लांबच लांब रांग होती. म्हटले, हा माणूस ह्या गाडीशी थांबेल – त्या गाडीशी थांबेल – पण कुठले काय? तो आपला पुढेच चाललेला. पहिलाच दिवस होता म्हणून मी चांगला सूट-बूट घातला होता. त्यामुळे उन्हाचा काच जास्तच जाणवत होता.

''आपण टॅक्सीनं जायचं आहे का?'' माझा धीर आता सुटला होता. मी इकडे उष्म्याने हवालदिल झालो होतो व तो कोणत्याही गाडीपुढे थांबायला तयार नव्हता.

माझ्या प्रश्नाला उत्तर देण्याकरता म्हणून तो मागे वळला व छानपैकी हसला. ह्या काळ्या लोकांचे दात किती पांढरे शुभ्र व एकसारखे एक असतात नाही!

''रस्त्याच्या पलीकडं तर आहे ऑफिस, त्याला टॅक्सी कशाला हवी? चालत जाऊ!'' असे म्हणून तो आणखी झपाझपा पुढे जाऊ लागला.

''रस्त्याच्या पलीकडं तर आहे'' हे म्हणणे सोपे असले तरी तसे पलीकडे जाणे तितके सोपे नव्हते. तो रस्ता चांगला दीड-दोनशे फुटी रुंद, बाजूला दहा-दहा फुटांचे फूटपाथ! सगळा आसमंत गरमाईने वखवखलेला. सूर्याच्या तळपणाऱ्या उन्हांत तो पार करणे म्हणजे भवसागर तरून जाणे म्हणजे काय असेल ह्याची कल्पना आली.

कचेरीच्या इमारतीत गेल्या गेल्या, अगदी उत्साही व आनंददायी वाटू लागले. कचेरी वातानुकूल केलेली होती. इथल्या सगळ्याच इमारती वातानुकूल केलेल्या.

अनवर अली हा इथल्या ॲडमिनिस्ट्रेशनचा मुख्य. अर्थात त्याला प्रथम भेटायचे होते. त्याप्रमाणे त्याला भेटलो. अनवर इंग्लंडमधे शिक्षण घेतलेला, गोरा, उंच, सडसडीत व चपळ असा होता. त्यांच्या घराण्याचा चांदीसोन्याचा व्यापार होता. ही सगळी पार्श्वभूमी व तरुण वयात डायरेक्टर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन हा हुद्दा मिळालेला. मग त्याच्या रुबाबाला काय ?

ओमान बराचसा आपल्या हिंदुस्थानसारखा आहे. आपल्याकडे कसे काश्मिरी, पंजाबी यांसारख्या गोऱ्या व सुरेख लोकांपासून दक्षिणेतल्या काळ्या व हेंगाड्या लोकांपर्यंत सगळ्या तऱ्हेचे लोक आहेत ! तसेच इथे पण आहे.

माझी ज्या ओमानी अधिकाऱ्यांनी मुंबईच्या ओबेरॉय हॉटेलमध्ये मुलाखत घेतली होती, त्यांत अनवर अली होता. पगाराबद्दल वगैरे ह्याच बोलला होता. "विमानतळावर माणूस आला होता ना ? हॉटेलमधे राहण्याची व्यवस्था ठीकपणे झाली ना ?" वगैरे जुजबी प्रश्न त्याने विचारले.

अनवरची सेक्रेटरी एक अतिशय गोरी, सुरेख, उंचीपुरी, गोड इजिप्ती बाई म्हणा, तरुणी म्हणा अशी होती. मश्रफा नाव तिचे. अनवर अलीला भेटण्याकरता कधी कधी थांबायला लागायचे ते हिच्याच खोलीत. आधीच मला गप्पांची हौस, तीही लाघवी व बोलण्यात चतुर. आमच्या चिक्कार गप्पा व्हायच्या.

दुसरा महत्त्वाचा माणूस म्हणजे अब्बास जाफर. हा डायरेक्टर जनरल ऑफ वर्क्स होता. हा अनवर अलीच्या अगदी उलट. उंच, धिप्पाड, काळाकभिन्न. आपण हबशी म्हणू तसा. इथे बद्दू नावाची टोळी आहे. त्यांच्यातला तो. त्याने मॉस्कोला इलेक्ट्रिकल इंजिनियरची डिग्री घेतली होती. त्याची पहिली बायको रशियन होती. तिच्याशी त्याने तलाक घेतला व दुसरे लग्न केले होते. आता दुसरी कुठली कोण होती कोणास ठाऊक !

हा अब्बास जाफर सोडून रशियात शिक्षण घेतलेला दुसरा कोणी भेटला नाही. आता तर रशियात जायला कोणाला परवानगीच नाही. शिक्षणाकरता सगळेजण अमेरिका, इंग्लंड, पाकिस्तान किंवा हिंदुस्थानात जातात.

प्राथमिक बोलणी झाल्यावर अब्बास जाफर म्हणाला, "उद्या तुम्हां दोघांना – म्हणजे तुला आणि सरदारजीला वैद्यकीय तपासणीकरता पाठवतील. त्यात पास होऊन आल्यावर मग तुम्हांला कोणत्या सेक्शनमधे नेमायचं ते ठरवू."

आता आली का पंचाईत ? जर का मी ह्या वैद्यकीय तपासणीत नापास झालो असतो तर ती केवढ्या मुश्किलीची गोष्ट झाली असती !

"तुम्ही आमची मुंबईलाच तपासणी का नाही करून घेतलीत ?" मी थोडे कुरकुरत म्हटले.

"काळजी करू नको," अब्बास मला धीर देत म्हणाला, "ही अगदी नावाची तपासणी असते."

"अरे शहाण्या," मी, अर्थातच मनातल्या मनात म्हटले, "तपासणी ती तपासणी. त्यात नापास झालं की नापास. म्हणजे मुंबईला परत हात हलवत जायला लागणार."

पण वरवर काही म्हटले नाही. आता कचेरीत थांबायचे काही कारण नव्हते. कारण वैद्यकीय तपासणीनंतरच कामाला सुरुवात होणार होती. परत उकळता भवसागर पार करून हॉटेलात गेलो. जाईजाईपर्यंत डोके अगदी आउट होऊन गेले. त्यानंतर हॉटेलचा थंडावा.

दुःखानंतर सुख मिळाले की कसे थंड थंड वाटते नाही?

सुखरूप पोहोचल्याचे घरी कळवायचे होते. प्रथम, पोहोचल्याची तार करावी असे मनात आले. पण त्याला बरेच पैसे पडणार होते. 'चित्पावनी' वृत्ती असे पैसे खर्च करू देईना. आणि पैशापेक्षासुद्धा इतके तातडीने घरी कळवावे असा उचका नव्हता. मी बाहेरगावी जाण्याचे आता फारसे कौतुक राहिले नव्हते. आणि मसकत तर काय? फक्त दोन तासांचा प्रवास. मुंबईहून दिल्लीइतका.

जेवण झाल्यावर रिसेप्शन काउंटरवरून हवाई-पत्र घेतले व खोलीत येऊन लिहायला सुरुवात केली. पत्र फक्त बायकोच्या नावे नव्हते. बी० ए० करणारी थोरली मुलगी व तिच्यानंतरची दोन मुले, ह्यांची नावे मायन्यात होती.

'मी पहिल्या वर्गाचा प्रवासी असल्यामुळे सासूबाई जावयाचे जसे कौतुक करतात तसे माझे प्रवासात कौतुक झाले'...अशी पत्राची सुरुवात केली. पुढचे काही लिहिणार तोच मुंबईच्या विमानतळावरच्या प्रसंगाची आठवण झाली आणि मन अपराधीपणाने भरून आले.

विमानतळावर बायको, मेव्हणा, एक पक्का मित्र व मुले असे सगळे आले होते. नियमाप्रमाणे माझ्याशिवाय कोणालाही इमारतीत येऊ देईनात. त्यामुळे ते सगळे बाहेरच उभे राहिले. काही वेळाने मेव्हणा व बायको आत घुसले पण मुले तशीच ताटकळत बाहेर उभी राहिली. नंतर कळले की दरडोई पंचवीस-तीस रुपये दिले तर मुलांना व मित्राला आत सोडतील. पण लगेच एवढे पंचाहत्तर-शंभर रुपये खर्च करायचा का? असा विचार आला. तो खर्च करायला काही मन तयार होईना. परिणामी बिचाऱ्या मुलांना तसेच चांगले अर्धा-पाऊणतास बाहेर ताटकळत उभे राहायला लागले.

आता पत्र लिहिताना ते सगळे मनात आले. थोड्याशा पैशांकरता आपण त्यांच्या भावनांची पर्वा केली नाही हे त्या मुलांच्या मनात कुठे खुपले असेल का? त्या सगळ्याबद्दल आता अपराधी वाटू लागले होते. पत्रात तसा उल्लेख केला.

बायकोकरता खूप महागाईचा सेंट घेतला होता. त्याची किंमत अमेरिकन डॉलर्समधे सांगितली गेल्यामुळे विकत घेताना फार काही जाणवले नव्हते. जर का रुपयांत सांगितली असती तर? पत्राला तो सेंट लावला व पत्र पाठवून दिले.

वैद्यकीय तपासणीत यशस्वी झालो तरीसुद्धा ते सगळे प्रकरण मोठे त्रासदायक झाले. जुलैचा महिना. आधीच जीवघेणा उन्हाळा. त्यातून ह्या मुसलमान लोकांचे रोझे. रोझे म्हणजे रमजानच्या महिनाभर चालणारे उपवास. ह्या उपवासांचा नियम असा, की जे काही खायचे-प्यायचे असेल ते सगळे सूर्योदय होण्याच्या आधी वा नंतर सूर्यास्त झाल्यावर. अधेमधे काही म्हणून काही खायचे नाही की काही प्यायचे नाही. जे कर्मठ मुसलमान असतात ते तर तोंडात आलेली लाळसुद्धा गिळत नाहीत.

आता त्यांच्या धर्मात तसे सांगितले आहे तर त्यांनी खुशाल तसे करावे व वागावे. पण ते लोक तेवढ्यावरच थांबत नाहीत. ते स्वतः तर खातपीत नाहीतच पण त्यांच्यादेखत दुसऱ्या कोणी खाल्लेलेसुद्धा त्यांना चालत नाही. का तर म्हणे त्यांच्या खाण्याच्या भावना उत्तेजित

होतात आणि त्यांच्या धार्मिक भावनांचा अपमान होतो!

सगळ्या मसकतमधे फक्त ह्याच इस्पितळात सरकारात नेमणूक झालेल्यांची तपासणी व्हायची; आणि तपासणी एक डॉक्टर थोडाच करणार होता? एक जण रक्तदाब पाहणार — एक जण डोळे तपासणार — एक जण एक्स-रे घेणार. आपल्याकडे असते तशी मोठ्या अधिकाऱ्यांकरता इथे काही खास सवलत नव्हती. आणखीही पेशंट होतेच. प्रत्येक तपासणीच्या आधी अर्धा-पाऊण तास थांबायला लागायचे. त्यामुळे जीव वैतागून जायचा. रोझे असल्यामुळे साधे पाणी पिण्याचीही सोय नव्हती. ह्यात आनंदाची गोष्ट म्हणजे सहा-साडेसहा फुटी उंच पंजाबी-पाकिस्तानी डॉक्टरने मी ह्या वयात उत्तम प्रकृती ठेवल्याचे कौतुक केले.

बाहेर रस्त्यावरची खाण्यापिण्याची दुकाने व हॉटेल्स अगदी कडीकुलपात बंद होती. त्यांतली कित्येक हिंदूंची, हिंदी वा पाकिस्तानी मुसलमानांची असणार. पण त्यांनाही तोच नियम लागू होता. आपआपल्या देशांत तरी हे हिंदी आणि पाकिस्तानी लोक इतक्या कडकपणे उपास करत असतील का? अफगाण पण मुसलमानच. तेथे पण रोझे पाळले जायचे. पण तेथला अनुभव अगदी वेगळा होता. हॉटेल्स व चहाची दुकाने बंद ठेवत असले तरी चोरूनमारून बरेच अफगाण, त्यातल्या त्यात तरुण अफगाण चहापाणी करत असत.

पहिल्या दिवशीची गोष्ट. काही तपासण्या आटोपून मी हॉस्पिटलच्या बाहेर आलो. हाशूहुश करत गाडीत बसलो. तीही उन्हामुळे तापल्या तव्यासारखी गरम झालेली. हवा थंड करण्याचे यंत्र होते. तरी ते सुरू करून गाडी थंड व्हायला थोडा वेळ लागणारच की!

गाडीचा चालक हा आपल्या मालवणचा का रत्नागिरीचा मुसलमान. खालिद नावाचा. फक्कड मराठी बोलणारा. म्हणजे मराठीच होता तो.

त्याने माझ्या 'हाशूहुश'चे कारण ओळखले. "साहेब, माझ्या रूमवर चला," तो म्हणाला. "आता ऑफिसात गेलो तरी तिथं काही खातापिता यायचं नाही. माझ्या रूमवर सगळी आपलीच माणसं आहेत. तिथं चहापाणी करू या."

त्याची रूम म्हणजे एका मोठ्या शेडमधे लाकडी पार्टिशन घालून तयार केलेल्या दहा-बाय-बाराच्या खोल्या. प्रत्येक खोलीत चार-चार कॉट्स टाकलेल्या. त्यांच्याखाली त्यांच्या ट्रंका, बाजूला टेबल, त्यावर टी०व्ही० वगैरे. चांगली गोष्ट म्हणजे साधी शेड असूनही प्रत्येक खोलीत एअर-कंडिशनर लावला होता. त्यामुळे खोलीत शिरताच जीव नुसत्या भांड्यातच नाही तर अगदी 'थंड' भांड्यात पडला!

खालिदच्या खोलीतल्या चार कॉट्सपैकी दोन कॉट्सवर लुंगी लावलेले दोन तरुण झोपले होते. ते कदाचित रात्रपाळीचे गाडीवान असतील. शेजारच्या खोल्यांतून जे कोणी जागे होते ते कोणीतरी बाहेरचा माणूस आला आहे हे कळल्यावर उत्सुकतेने खालिदच्या खोलीत आले. कोणी नवीन माणूस येणे हीच इथे मोठी कौतुकाची गोष्ट होती. माझे एकंदर रंगरूप व दाढी वगैरे पाहून त्यांना मी प्रथम 'त्यांच्या'तलाच वाटलो असल्यास नवल नाही. नंतर माझे नाव कळल्यावर त्यांना अगदी वाईट जरी वाटले नाही तरी थोडा हिरमुसलेपणा आलाच. चहापाणी झाले. बिस्किटे खाऊन झाली. त्यामुळे पुष्कळ तकवा आला.

मी आयुष्यात प्रथमच कोकणी मुसलमानांना भेटत होतो. हे सगळे मुसलमान असूनही गावरान मराठीत बोलताहेत ह्याचेच मला फार कौतुक वाटत होते. ही तर आम्हांला आमच्या मुस्लिम बांधवांबद्दल माहिती!

मग परत हॉस्पिटल, ऑफिस व हॉटेल. अल्लाच्या दयेने हॉटेलवर रोझा नव्हता. बहुधा तेथे

बरेच गोरे साहेब राहत असत म्हणूनही नसेल, पण नव्हता खरा. हेच जर हॉटेल हिंदी, पाकिस्तानी वा सिलोनी लोकांकरता असते तर ते नक्की 'रोझा' नियमात आले असते.

गोऱ्या साहेबाचे राज्य गेले तरी त्यांना आपण म्हणजे सगळे आशियाई टरकून असतो हेच खरे. कचेऱ्यांतून, पोलिसचौकीवर व इतर ठिकाणीसुद्धा हाच अनुभव आला.

नंतरच्या वर्षी आलेल्या रोझ्यातली गोष्ट. आमच्या सेक्शनचा मुख्य एडवर्ड कार नावाचा एक ब्रिटिश साहेब होता. तो रोझ्यामधे सिगारेट पीत होता. धर्माज्ञेप्रमाणे उपवासामधे सिगारेट प्यायला पण बंदी आहे. साहेब सिगारेट पितो आहे बघून माझा अनवर नावाचा पाकिस्तानी सहकारी मला म्हणाला, "यार, ये सिगरेट पी रहा है. ये ओमानी देखेंगे तो बडा गहजब हो जायेगा."

"कोई गहजब नही होगा." मी त्याला म्हणालो, "यह सब कानून कालों के लिये है. गोरे साहब को बोलनेकी किसकी हिंमत हो सकती है? लेकिन यहाँ ओमानी की क्या जरूरत है? तुम मुसलमान हो, तुमही बोलो कार साहब को."

अनवरचा चेहरा जाम पडला. स्वतःला तो कडवा मुसलमान समजत होता. पण साहेबापुढे कडवेपण काय चालणार? आणि खरे सांगायचे म्हणजे तो तसा कडवाबिडवा काहीही नव्हता. पण तसे समजत वा निदान दाखवत तरी असे. हे अनवरच्या बाबतीतच नाही तर बहुसंख्य मुसलमानांबद्दल म्हणता येईल. ते आपण फार कडवे आहोत असे समजतात – निदान दाखवतात तरी.

एकदाची वैद्यकीय तपासणी संपली. नंतर अब्बास जाफरकडे गेलो तर त्याने एमेल नावाच्या त्याच्या डेप्युटीला भेटायला सांगितले. एमेल हा बेरूटचा. धर्माने ख्रिश्चन. अतिशय गोरा, सडसडीत बांध्याचा, अतिशय चांगल्या कपड्यांत राहणारा. हुशार. काहीतरी चाळीस-एक वर्षांचा. डायरेक्टर जनरलचा डेप्युटी म्हणून एमेल फार भाव खाऊन असे.

एमेल किंवा बाकी अधिकाऱ्यांशी बोलताचालताना मला फार अवघड व्हायचे. हे सगळे लोक बुद्धीने माझ्यापेक्षा फार वरचढ नव्हते. अनुभवाने तर माझ्यापेक्षा फारच कमी. पण ते लोक अधिकारी – उच्च पदावरचे. मी त्यांचा अगदी सहायक जरी नसलो तरी थोड्या खालच्या पदावरचा. त्यामुळे मनाला फार यातना व्हायच्या.

पुढे माझे व एमेलचे फार चांगले जमले. शिक्षणखात्याकरता काही इमारती बांधायच्या होत्या. त्याच्यावर मी बरेच काम केले होते. मिटिंगांना मी एडवर्ड कारबरोबर जात असे तरी बहुतेक बोलण्याचे व योजना समजावून सांगण्याचे काम मीच करत असे. ह्या मीटिंग्ज एमेलच्या खोलीतच होत असत. त्यामुळे कामातले माझे नैपुण्य त्याच्या लक्षात आले होते. माझी वर्षाची मुदत संपली व माझे परत येण्याचे घाटू लागले त्या वेळी मी तिथे आणखी राहावे म्हणून एमेलने फार खटपट केली. पण माझ्याइतक्या मोठ्या पगाराची जागाच त्या वेळी उपलब्ध नव्हती. तेव्हा एमेलने मी कमी पगारावरच्या जागेवर राहावे असे सुचवले होते. मी अर्थातच त्याला 'नाही' म्हटले. नाही म्हणण्यात स्वाभिमान तर होताच. शिवाय इथे राहण्याची माझी इच्छाच करपून गेली होती.

तर हा गोरा, स्मार्ट डेप्युटी एमेल मला प्रथम वेगवेगळ्या विभागात घेऊन गेला. कार्यालयाचे तीन विभाग होते. पहिल्या विभागातच मोठी मजेची गोष्ट झाली. त्या विभागाचा

मुख्य हनीफ हा माझा लंडनमधला शाळासोबती निघाला! जग किती लहान होत चालले आहे नाही? सोळा वर्षांपूर्वी आम्ही लंडनच्या स्कूल ऑफ ट्रॉपिकल आर्किटेक्चरमधे एक वर्ष बरोबर शिक्षण घेत होतो.

हनीफ हा सुदानी. पंचेचाळीसएक वर्षांचा. फार उंच नाही पण भरल्या अंगाचा. गव्हाची पोती कशी भक्कम असतात तसा. काळारोम. जुन्या आफ्रिकेतल्या टोळ्यांच्या पद्धतीप्रमाणे त्याच्या तोंडावर डागून पट्टे पाडलेले होते. हे डागाचे पट्टे म्हणजे त्यां त्या टोळीच्या खुणा असत. लंडनला आम्ही एकाच कोर्सला होतो. आमच्या वर्गात दहाबारा देशांतले मिळून पस्तीसएक विद्यार्थी होते. खरे म्हणजे हनीफ काही माझ्या मित्रांपैकी नव्हता. फक्त 'हॅलो, हॅलो' करण्यापुरती ओळख. पण एका प्रसंगामुळे आम्ही जवळ आलो. दुर्दैवाने तो प्रसंग फार काही आनंददायी नव्हता. पण म्हणूनच की काय, त्या गोष्टीला आता सोळासतरा वर्षे झाली तरी मी ती विसरलो नव्हतो.

मला मिळालेल्या स्कॉलरशिपच्या नियमाप्रमाणे पुस्तके विकत घेण्याकरता मला वीस ब्रिटिश पौंड मिळणार होते. मी विचार केला, की आपण सरकारी नोकरीत – आपल्या खात्याची भली मोठी लायब्ररी. तिथे पाहिजेत ती पुस्तके मागवता येतात. मग वीस पौंड उगाच पुस्तकात का घालवा?

त्या वेळी स्लाईड-प्रोजेक्टरची टूम नुकतीच निघाली होती. तसा एखादा प्रोजेक्टर घ्यावा असे माझ्या मनात होते. तेव्हा कोणा विद्यार्थ्याला पुस्तके हवी असतील तर मी त्याला देईन व त्या बदल्यात त्याने मला प्रोजेक्टर द्यावा अशी मी कल्पना काढली व त्याप्रमाणे वर्गातल्या चारपाच मित्रांना सांगून ठेवले.

एक दिवस हा हनीफ माझ्याकडे आला व म्हणाला, "माझ्याकडे कोडॅकचा प्रोजेक्टर आहे. स्क्रीन, स्टँडसहित. हवा आहे का तुला? मला पुस्तकांची गरज आहे."

"अरे, हेच तर मी शोधत होतो." मी त्याला म्हटले.

आमचे बोलणे पक्के झाले. येणाऱ्या शनिवारी दुपारी मी त्याच्याकडे जाऊन प्रोजेक्टर पसंत करायचा व सोमवारी त्याला हवी ती पुस्तके घेऊन द्यायची असे ठरले.

तो दक्षिण लंडनमधे एका ब्रिटिश कुटुंबात राहत होता. ह्या भागात सगळे 'रंगीत' लोक राहतात. मी उत्तर लंडनमध्ये राहत होतो. पण बरोबर लंडनची माहिती देणारे 'ए टु झेड' हे पुस्तक असल्यामुळे त्यांचे घर शोधायला त्रास पडला नाही.

मी गेलो त्या वेळी तो एकटाच होता. थोडा वेळ त्याच्या दिवाणखान्यात बसलो. तेवढ्यात त्याची घरमालकीण आली. हनीफने माझी ओळख करून दिली. हात मिळवताना "तुझ्या भेटीनं आनंद झाला" असे जरी ती म्हणाली तरी तिला फारसा आनंद झाला आहे असे तिच्या चेहऱ्यावरून काही वाटले नाही. तिने आपल्या खोलीत जाता जाता हनीफला बोलावून घेतले.

त्यांचे बोलणे मला स्पष्टपणे ऐकू येत नव्हते. कारण ते फार हळू आवाजात बोलत होते. पण जे काही ऐकू आले त्यावरून मी अंदाज केला की मी तिथे आलो हे त्या घरमालकिणीला आवडले नसावे. मला मोठे कानकोंडे झाले. आणि हनीफचा रागही आला. जर घरमालकिणीला आवडणार नव्हते तर त्याने मला घरी बोलवावे तरी कशाला? प्रोजेक्टर काय कॉलेजातही आणता आला असता.

थोड्या वेळाने अगदी पडक्या चेहऱ्याने हनीफ दिवाणखान्यात आला व म्हणाला, "चल, आपण माझ्या खोलीत बसू."

"काय हलकट बाई आहे." खोलीत गेल्या गेल्या दार लोटून घेऊन हनीफ चिडचिडीनं सांगू लागला. "कुत्री साली. मला नेहमी म्हणायची, की तुझ्या मित्र-मैत्रिणींना घरी अगदी मोकळेपणी आणत चल. अगदी संकोच करत जाऊ नकोस. आणि आज तू आला आहेस तर किती वथवथली बघितलंस ना तू?"

लंडनला येऊन मला आता सात-आठ महिने झाले होते. ह्या साहेबलोकांची बोलण्याची पद्धत एक असते व वागण्याची पद्धत एक असते, ह्याचा मलाही चांगला – खरे म्हणजे वाईट अनुभव आला होता. लंडनला असतानाच माझी एका बर्मीज डॉक्टरिणीची ओळख झाली. तिला माझ्या भागातच राहायला खोली हवी होती. तेव्हा एका रविवारी आम्ही बाहेर पडलो व ज्या घरांवर 'जागा भाड्याने देणे आहे' असे बोर्ड होते तिथे चौकशी करू लागलो. सगळ्या ठिकाणी "तुम्हांला जागा द्यायला मला फार आनंद झाला असता. पण काय करू? कालच जागा दिली गेली आहे." म्हणून उत्तर मिळायचे. मग, "अजून बोर्ड कसा?" म्हणून विचारले की "मीसुद्धा अशी वेंधळी आहे की नाही! बोर्ड काढायचं माझ्या लक्षातच राहिलं नाही." हे उत्तर मिळायचे...ह्यावरून त्यांना आम्हां 'काळ्यां'ना जागा द्यायची नाही आहे हे आमच्या लक्षात आले. मी त्या भागातच राहत असल्याने त्यांतल्या काही घरांवरून मी जात येत असे. नंतरसुद्धा पुष्कळ दिवस ते बोर्ड लटकलेले असत. तेव्हा मी इंग्लिश बायकांच्या 'वेंधळेपणा'ची कीव करत असे.

तर तो लंडनमधला हनीफ त्या दिवशी बरोबर सोळासतरा वर्षांनी भेटत होता. मी त्याला ओळखले तरी त्याने मला ओळखले नव्हते. मी दाढी वाढवली होती म्हणून असेल! तो फक्त थोडा जाडा झाला होता व त्याच्या चष्म्याचा नंबर वाढला होता.

हनीफ मसकतमधे गेली सातआठ वर्षे नोकरी करत होता. इथे सुदानी पुरुष व स्त्रिया फार मोठ्या संख्येने आहेत. सुदानी व हिंदुस्थानी लोकांत खूप साम्य आहे. त्यांनाही गरिबी व वाढती लोकसंख्या हे प्रश्न भेडसावताहेत. अरब असले तरी ते गरीब अरब आहेत. त्यामुळे अरब राष्ट्रकुलात त्यांना फारसे मानाचे स्थान नाही.

जुन्या पद्धतीच्या सुदानी बायकांचा पोषाख पाच वारी साड्यांचा असतो. त्यांची साड्या नेसण्याची पद्धत आपल्यापेक्षा वेगळी आहे एवढेच. नवीन वृत्तीच्या तरुण सुदानी स्त्रिया पायघोळ झगे किंवा स्कर्ट्स घालतात. मात्र सगळ्या जणी अगदी कटाक्षाने आपले डोके रुमालाने वा स्कार्फने झाकतात.

हनीफ इथे आपल्या कुटुंबासहित आहे हे कळल्यावर त्याचे कुटुंब किती मोठे आहे त्याची मी चौकशी केली.

"खूप मोठं." हनीफ हसून म्हणाला. "एकूण मला अकरा मुलं आहेत, डझनाला एक कमी."

"उत्तम, असंच चालू ठेव" असे मी त्याला उत्साहवर्धक म्हणालो.

माझे ते म्हणणे फारच उत्साहवर्धक निघाले. कारण त्यानंतर सातआठ महिन्यांतच त्याने बाराव्या मुलाची मिठाई म्हणजे केक दिली.

हनीफच्या विभागातल्या सगळ्यांशी एमेलने माझी ओळख करून दिली. काही पाकिस्तानी, काही सुदानी, काही इजिप्ती, हॉटेलातला सरदारजी व दोन ब्रिटिश इंजिनियर्स त्या

विभागात होते.

मग मला एमेल दोन नंबरच्या विभागात घेऊन गेला. तिथल्या लोकांशी ओळख करून दिली व म्हणाला, "तुला ह्या विभागात नेमायचं ठरलं आहे." नंतर आम्ही तिसऱ्या विभागात गेलो. तिथेही हा ओळखीचा कार्यक्रम झाला. नंतर एमेल आपल्या केबिनमधे गेला व मी आमच्या विभागात.

आमचा विभाग एका मोठ्या हॉलमध्ये सामावला होता. आत शिरले, की डाव्या हाताला काचेचे पार्टिशन घातलेली केबिन होती. त्यात युसुफ अली बसत असे. तो आमच्या विभागाचा मुख्य. हा ओमानी असाच तीसएक वर्षांचा, काळासावळा.पण एकदम तरतरीत. ह्या लोकांना विलायती कपडे घालून कचेरीत यायला मनाई होती. त्यामुळे त्याचा नेहमी पांढरा पायघोळ झगा व डोक्याला रंगीत रुमाल असा वेष असे. हा इंजिनियरिंग ग्रॅज्युएट होता. तरी अनुभवाने फारच कमी असल्यामुळे तो माझ्याशी काही चर्चा वगैरे करायचे टाळत असे. त्याच्याशी इतर बाबतींतही कधी काही बोलणे होत नसे. त्यामुळे ओमानी लोकांविषयी, त्यांच्या राजकीय व इतर विषयांसंबंधीच्या विचारांबद्दल कधी काही माहिती होऊ शकली नाही.

बाकी हॉलमधे भिंतीला लागून बाकीच्यांची टेबले होती. प्रथम बसायचा एडवर्ड कार. हा पोलिश ब्रिटिश आर्किटेक्ट. नंतर शौखी नावाचा एक तरुण व तापट डोक्याचा इजिप्ती, तोही आर्किटेक्ट होता. नंतरच्या टेबलावर अनवर पाशा हा पस्तीसएक वर्षांचा पाकिस्तानी ड्राफ्टस्मन. फाळणीनंतर काही हजारो उत्तरप्रदेशीय पाकिस्तानात गेले. त्यांतले काही कराचीत स्थायिक झाले. त्यांतले पाशाचे वडील हे एक. पाशा हे आडनाव काही भारतीय नाही हे मला माहीत होते. त्याबद्दल मी त्याला विचारले. असे कोणी कधी विचारील असे त्याला वाटले नव्हते. त्यामुळे तो थोडा चरकलाच. पण नंतर सांगू लागला, "हमारे पिताजी तो दूसरा नाम लगाते थे। उनकी डेथ हो गई, फिर हमने मामाजी का नाम लगाना शुरू किया!"

अर्थात ह्या सगळ्या थापा. त्याच्या मामाजींचे नावही पाशा असण्याचा संभव नव्हता. खरी गोष्ट अशी, की पाशा ह्या नावाला मध्यपूर्वेमधे फार वजन आहे. कमी वजनाचे लोक दुसरे वजनदार नाव घेऊन आपले वजन वाढवायचा प्रयत्न करतात, त्यातलाच हा प्रकार!

अनवर पाशाच्या नंतरच्या टेबलावर प्रथम एक सुदानी बसत असे. नंतर तिथे दत्ता नावाचा बंगाली इंजिनियर बसू लागला. दत्ताच्या टेबलाला काटकोन करून जे टेबल होते त्यावर अमानुल्ला म्हणून एक पंजाबी पाकिस्तानी इंजिनियर बसत असे. तो रजेवर असल्यामुळे ते टेबल रिकामे होते. त्या टेबलाला काटकोन करून दोन नकाशे काढायची टेबले होती. एकावर चंद्रा नावाचा बौद्धधर्मीय सिलोनी बसत असे व दुसरे टेबल रिकामे होते. चंद्रा हा ड्राफ्टस्मन होता.

अमानुल्ला रजेवर असल्यामुळे तूर्त मी त्याच्या जागेवर बसावे, काही दिवसांनंतर पक्की व्यवस्था करण्यात येईल असे ठरवले गेले.

ओमान हा काही सुधारलेला देश नाही. तो श्रीमंत असा देश कधीच नव्हता. पूर्वीच्या काळी ओमानीचा, ज्यांना आपण हबशी म्हणत असू त्यांचा उद्योग म्हणजे हिंदुस्थानातल्या राजे-नबाबांकडे नोकरी करायची किंवा समुद्रावर चाचेगिरी करायची. शेतीला जमीन अगदी

थोडी. त्यात पाऊस नाही. बाकी सगळे नुसते वाळवंट. सगळे डोंगर आपले उघडेबोडखे, नावालासुद्धा झाड-झुडूप नसलेले.

अशा प्रदेशात कोणतीही कला काय मुळे धरणार व वाढणार? चांगल्या इमारती असाव्यात – चांगली गावे असावीत – अशी कल्पनासुद्धा नाही. त्यातल्या त्यात नौका-नयनाची प्रगती झालेली. वाहतूक मुख्यतः गुजराथच्या द्वारका ह्या बंदराशी. त्यामुळे इथल्या लोकांवर गुजराथचा फार प्रभाव. नंतर मसकत शहरात व दक्षिणेच्या गावांतल्या जुन्या इमारती पाहिल्या. त्या सगळ्या गुजराथी धर्तीच्या. एक मजली, फार फार तर दोन मजली. मधे चौक असलेल्या. लाकूडकाम मात्र उत्तम प्रतीचे. तोही उत्तर गुजराथचा परिणाम.

पण तेल मिळायला लागल्यापासून ह्यांच्या हाती जणू काही परीस लागला होता. परिसाने लोखंडाचे सोने होते तर आता हे जिथे लोखंड वापरतात तिथे सोने वापरू लागले होते. ही अतिशयोक्ती नाही किंवा गडकरी पद्धतीची काही शाब्दिक कसरतही नाही. खरेच एका ओमानी सुलतानाने आपल्या वाड्याचे सगळे कड्या-कोइंडे, दारांना असतात त्या मुठी सोन्याच्या करून घेतल्या होत्या!

तेलामुळे ह्यांचे राहणीमान उंचावले आहे. सगळ्या कचेऱ्या वातानुकूल केलेल्या. सगळीकडे फरशीवर गालिचेच गालिचे. अगदी साध्या कारकुनापासून सगळ्यांचे फर्निचर उत्तम प्रतीचे. मंत्री महोदयांची व वरिष्ठ अधिकाऱ्यांची चेंबर्स तर विचारू नका. आपल्या सरकारची व सरकारी अधिकाऱ्यांची दृष्टी चांगल्या, देखण्या फर्निचरबाबत किती मेलेली असते हे वेगळे सांगायला नकोच. आपल्याकडल्या खाजगी कंपन्यांतली परिस्थितीही ह्यापेक्षा फार चांगली नसते. ह्याचे कारण आपला देश गरीब आहे हे नाही तर आपल्याला ती दृष्टीच नाही, असे मला वाटते. चांगले फर्निचर, कार्पेट्स ह्यांना काही महत्त्व आहे, काम चांगले व लवकर होण्यात, कचेरीत चांगले वातावरण निर्माण होण्यात ह्या गोष्टींचा हातभार लागतो, ह्याची कल्पनाच नाही. म्हणजे निदान आतापर्यंत तरी नव्हती. आता त्यात सुधारणा होत आहे ही आनंदाची गोष्ट.

इथली दुसरी लक्षात आलेली गोष्ट म्हणजे ह्यांनी बांधकाम खात्याचा म्हणजे पी० डब्ल्यू० डी०चा फापटपसारा बिलकुल वाढवलेला नाही. कचेरीत कमीत कमी माणसे ठेवून, तीसुद्धा वरच्या हुद्यावरची, बाकी सगळी प्रोजेक्ट्स खाजगी आर्किटेक्ट्स, इंजिनियर्स, खाजगी कंत्राटदारांकडून करून घेतात. एकदा असे कोणाला काम दिले, की सरकारी अधिकाऱ्यांचे काम म्हणजे ती प्रोजेक्ट्स ठरल्याप्रमाणे, ठरावीक वेगाने, होत आहेत की नाहीत हे फक्त पाहायचे, एवढेच राहते.

आपल्याकडे अजून इंग्रजांनी घालून दिलेली पद्धतच चालू आहे. शेकडो इंजिनियर्स, डझनांनी आर्किटेक्ट्स. मग त्यांचे मोठ्या संख्येचे मदतनीस. ह्यांचीच मोठी यंत्रणा होते. आणि ही यंत्रणा चालवणे, तिची देखभाल करणे हे मोठे जिकिरीचे काम होऊन बसते व मुख्य बांधकाम करण्याचे काम बाजूलाच राहते. आपल्याकडे वेळच्या वेळी कामे होत नाहीत, ती वर्षोनुवर्षे रेंगाळतात, ठरलेला पैशात होत नाहीत, हे आपण नेहमी पाहतोच. ह्या अवाढव्य यंत्रणेमुळे पंचवार्षिक योजनेतली कित्येक कामे पुरी तर होत नाहीतच पण हातीसुद्धा घेतली जात नाहीत. आणि वर कितीतरी पैसा ती यंत्रणा चालवण्यापायीच जात असतो.

वर सांगितलेल्या ओमानी पद्धतीमुळे काम चटाचटा होत असते. ही पद्धत आपल्याकडे कधी आणता येईल का? कशी आणता येईल? असा साधा प्रश्नसुद्धा माझ्या मनात आला

नाही. आपल्या सरकारी यंत्रणेत काही बदल शक्य आहेत व तसे केले पाहिजेत असे आम्हा तंत्रज्ञांच्यासुद्धा लक्षात येत नाही, मग आय० ए० एस० वगैरे मुलकी अधिकाऱ्यांची तर गोष्टच नको.

इथे सरकारी नोकरांची पत चांगली आहे. त्यांना खाजगीतल्यापेक्षा जास्त पगार असतो. ओमानी सरकारी नोकरांना खाजगी नोकरी किंवा उद्योगधंदा करायची परवानगी असते. सरकारी कचेऱ्या सकाळी आठ ते दुपारी दोनपर्यंत असतात. खाजगी सकाळी आठ ते बारा व परत दुपारी दोन ते सातपर्यंत. त्यामुळे ओमानी सरकारी नोकरांना खाजगी उद्योगधंदा करता येतो. अर्थात आमच्यासारख्या बाहेरून आलेल्यांना दुसरी नोकरी करायला बंदी होती. असा जर कोणी चोरून नोकरी करताना सापडला तर त्याची ताबडतोब मायदेशी पाठवणी होत असे.

सगळ्यांच्या ओळखीपाळखी होईपर्यंत पहिला दिवस संपला. म्हणजे दुपारचे दोन वाजले. हॉटेलवर गेलो. माझ्या राहण्याच्या जागेची व्यवस्था कचेरीचे लोक करणार होते व करत होते. तोपर्यंत मी हॉटेलात राहणार होतो.

हॉटेलात आलो. जेवणखाण केले. राहिलेला दिवस लांबच्या लांब रस्त्यासारखा समोर दिसत होता. काहीतरी लिहावे असे मनात येत होते. विषयही सुचले होते पण अजून तसा मूड लागत नव्हता. विषय सुचला व वेळ आहे म्हणून लिहिता थोडेच येते?

मी लिहायला सुरुवात केली ती एका मजेशीर प्रसंगाने. काबूलला असताना मी आणि माझे वैद्य नावाचे मित्र गप्पा मारत होतो. म्हणजे मी बोलत होतो व ते ऐकत होते. ऐकता ऐकता माझ्या बोलण्याला कंटाळून म्हणा वा अगदी मनापासून म्हणा, ते म्हणाले, ''रानडे, तुम्ही एखादी गोष्ट किती इंटरेस्टिंग करून सांगता! तुम्ही काही लिहीत का नाही?''

मी एकदम चपापलो. आपल्याला लिहिता येईल किंवा आपण लिहू शकू असे कधी वाटलेच नव्हते. राष्ट्रपतिभवनावर मी जवळ जवळ दीडशे पानांचे लिखाण केले होते. पण ते सगळे माहितीपूर्ण व वर्णनात्मक असे होते. मराठी व त्यातही ललित लिखाण करता येईल असे कधी मनातही आले नव्हते.

मनाशी म्हटले, प्रकृतीबाबतीत, जेवण्याखाण्याबाबतीत आपण वैद्य लोकांचा सल्ला मानतो, तर लिहिण्याबाबतही एका वैद्याचा सल्ला का मानू नये? झाला तर फायदाच होईल. पण लिहायचे काय? मी काही वर्षांपूर्वी इंग्लंडला गेलो होतो. तेव्हा पुलंच्या पावलावर पाऊल टाकून त्या विलायतच्या प्रवासावर काही लिहावे असा विचार मनात आला. तो नंतर बळावला व त्यावर दोनतीन लेख लिहिले.

पु० भा० भाव्यांवर माझा फार राग. भाषा अतिशय प्रगल्भ पण विचार तेवढेच मागास असलेला असा हा लेखक आहे, असे माझे मत. जॅकलिन केनेडीने दुसरे लग्न केले म्हणून हा गृहस्थ ओक्साबोक्शी रडला होता. व तेवढ्याच ओक्साबोक्शी पद्धतीने त्या संदर्भात त्यांनी लिहिले होते. पश्चिमी लोकांना आपल्या हिंदुत्व-विचारसरणीतून तोलण्याच्या त्यांच्या वृत्तीबद्दल मला विचित्र वाटले होते. त्यावर एकदोन लेख लिहिले. त्याच वेळी 'श्याम-राधा' ह्या काल्पनिक मध्यमवर्गीय जोडप्यावर विनोदी पद्धतीचे काही लिहावे असे सुचले. त्यानुसार 'श्यामचे लग्न होते', 'श्यामचा संसार' असे काही लेख लिहिले.

त्या वेळी हिंदुस्थानात जनता पक्ष गडगडला होता. नंतर आलेले चरणसिंगांचे सरकार पण गेले होते आणि सार्वत्रिक निवडणुका घेण्याचे जाहीर झाले होते. निवडणुकांबद्दलच्या वेगवेगळ्या बातम्या येत होत्या. भगवान कृष्ण जर निवडणुकीला उभा राहिला तर काय मजेच्या गोष्टी घडतील ह्याची कल्पना करून 'भगवान कृष्ण खडे है।' हे पाऊण तासाचे तमाशा-नाट्य लिहिले.

काही दिवसांपूर्वी बायकोने काबूलच्या हिंदी लोकांवरच्या जीवनावर एक हलकाफुलका तमाशा लिहिला होता. तो आमच्या चमूने बसवला होता. त्याची फार वाहवा झाली होती. तोच चमू माझाही तमाशा बसवत होता. निवडणुकीचा विषय ताजा व चविष्ट होता. काम करणाऱ्यांत बायको, दुसऱ्या एक मराठी व एक बंगाली बाई होत्या. कृष्णाचे काम चांगले गुबगुबीत असलेले नागपूरचे छत्रे करणार होते. तर वैद्य पेंद्याचे. माझा ट्रिपल रोल होता. म्हणजे मी लेखक, दिग्दर्शक व प्रॉम्प्टरचे काम करत होतो. भारतीय वकिलातीत दर एक जानेवारीला नव्या वर्षाचे विविध कार्यक्रम होत असत. माझा तमाशा त्या कार्यक्रमात ठेवला गेला, तो दिवस भारतात होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकींच्या तीन दिवस आधीचा होता. व तो कार्यक्रम तसा आधी होण्यातच मजा होती.

पण कसली मजा अन् कसले काय! नेमके सत्तावीस-अठ्ठावीस डिसेंबरच्या रात्री सोविएट रशियाने आपल्या फौजा अफगाणिस्तानात घुसवल्या. तमाशाची रात्र कत्तलची रात्र ठरली. नंतर जो काही गोंधळाचा पूर आला त्यात माझा तमाशा वाहून गेला. माझ्या अपयशाच्या गोष्टींत आणखी एकाची भर पडली.

राष्ट्रपतिभवनावरचे माझे पुस्तक प्रसिद्ध होऊ शकले नाही ह्याचा मला फार धक्का बसला होता. त्या पुस्तकावर मी माझ्या फार आशाआकांक्षा केंद्रित केल्या होत्या. ते प्रसिद्ध झाल्यावर मी पुढे हिंदुस्थानच्या आर्किटेक्चरवर लिहायचे ठरवले होते. आत्तापर्यंतचे लेखक हिंदू, इस्लामी, बुद्धिस्ट अशी विभागणी करत आले आहेत ती चुकीची आहे. धर्मावर आधारलेली विभागणी करून चालायचे नाही असे मला वाटायचे. पण राष्ट्रपतिभवनावरचे लिखाण प्रसिद्ध झाले नाही, तेव्हा त्या विषयावर पुढले काही करायला उत्साह राहिला नाही.

मी लिहिलेला तमाशा झाला नाही. आपण हाती घेतलेले काम यशस्वी होत नाही ह्याची मला परत एकदा प्रचीती आली. त्याचे दुःख माझे मीच भोगायचे होते. अगदी जवळचे म्हटले जाणारेसुद्धा त्यात सहभागी झाले नाहीत, मग इतरांचे काय?

अपयश पचायला फार जड असते. मला तर ते कित्येक वेळा प्यायला लागले. सुदैवाने त्या अपयशांचा माझ्यावर कायमचा असा परिणाम झाला नाही. नवीन काही कल्पना सुचल्या, की मी परत पूर्वीच्याच उत्साहाने त्यांच्या मागे लागत असे.

आईला जाऊन वर्ष झाले होते. तिची आठवण अशीच धूमकेतूसारखी यायची. दररोजच्या जीवनाच्या रगाड्यात बुडालेल्या माणसाला काय कमी व्यवधाने असतात? पण आठवण आली की फार तीव्रतेने येई — आपण तिच्याशी जास्त चांगले वागायला हवे होते असेही वारंवार मनात येई. तिच्या मृत्यूचा व्रण अजून भरला गेला नव्हता. केव्हातरी काहीतरी कारणाने तो व्रण दुखावला जायचा व दुःख असे गळ्यापर्यंत भरून यायचे.

आईच्या मृत्यूनंतर नाशिकच्या गंगेवर पिंडदान वगैरे धार्मिक विधी यथासांग करायचे

आम्ही ठरवले होते. बराच वेळ झाला तरी पिंडाला काही केल्या कावळा शिवेना. आम्हा बहीणभावांत आईची काय इच्छा अपुरी राहिली असेल ह्याची चर्चा सुरू झाली. मला हे सगळे हास्यास्पदच वाटत होते. आमची आई अगदी कालपरवापर्यंत जिवंत होती. आम्ही तिची मुले. पण तिच्या अपुऱ्या राहिलेल्या इच्छेबद्दल आम्हांला काही माहिती नसावी किंवा आम्हांला साधा अंदाज करता येऊ नये? त्याच्याकरता आम्हांला कावळ्यांची मदत लागावी?

हा विचार त्या दिवसापासून माझ्या मनात वरचेवर येत होता. 'कावळे आले आहेत आज जेवायला' ह्या मथळ्याची मी काहीतरी कविता केली. आता काव्य म्हणून ती काय लायक़ीची होती कोणास ठाऊक! पण त्या वेळी उत्तम वाटली होती हे खरे.

लगोलग ती कविता बायकोला पाठवली. पत्रात ती 'सत्यकथे'च्या लोकांना पाठवावी असे सुचवले होते. व त्यांना ती आवडेल असा विश्वास प्रगट केला होता.

स्वतःबद्दल व 'सत्यकथे'बद्दल माणसाचा किती गैरसमज असावा! सूचनेप्रमाणे बायकोने कविता सत्यकथेकडे पाठवली. अर्थातच ती काही प्रसिद्ध झाली नाही.

'सत्यकथा' बंद करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल नंतर कळले. त्याला काही प्रमाणात तरी माझ्यासारख्यांचे समज वा गैरसमज कारणीभूत झाले नसतील ना? असा विचार मनाशी येऊन गेला.

असे लिखाणाबद्दल चालले होते. कचेरीत जाणे-येणे, काम करणे वगैरे चालले होते. पण ते वरवरचे होते. त्यात तसे मन नव्हते. मनात एक वेगळाच ध्यास होता. आणि प्रत्येक श्वासाबरोबर तो मला जाणवत होता. मनातल्या मनात. आपले नाही का नेहमीचे आयुष्य चालू असते – नेहमीचे व्यवहार चालू असतात – पण त्याच वेळी नकळत हृदयाचे ठोके पडत असतात. तसेच माझे झाले होते. जानकीच्या आठवणीचे ठोके दर मिनिटाला साठ की सत्तर असे पडत होते. तिचाच विचार सारखा मनात असे. एखाद्याचा विचार मनातून जात नाही म्हणजे किती जात नाही!

जानकी, जानकी, जानकी...अशा वेळी वाटायचे, की आपल्याला चांगले लिहिता यायला हवे होते. इतकी योजने ती माझ्यापासून दूर; पण जशी काही ती सावलीसारखी बरोबर बरोबर आहे. सावली रात्री तरी साथ सोडते पण जानकीची आठवण रात्रीच काय, स्वप्नातसुद्धा बरोबर असे. हे सगळे कसे लिहायचे?

माझ्यासारखे कित्येक भारतीय अधिकारी भारत सरकारच्या प्रोग्रामखाली काबूलला आले होते. त्यांत सतीश म्हणजे जानकीचा नवरा पण होता. मध्यप्रदेश सरकारच्या बांधकाम-खात्यात तो इंजिनियर होता व इथल्या बांधकाम मंत्रालयात आला होता. त्याचे कुटुंब मूळचे काश्मिरी ब्राह्मण. इंदूरला घर बांधून स्थायिक झाले होते.

जानकीचे मूळचे कुटुंबसुद्धा काश्मिरी ब्राह्मण. तिचे वडील दिल्लीला स्थायिक झाले होते. वडील डॉक्टर, चांगले मालदार होते. जानकीचे सगळे शिक्षण सिमल्याला कॉन्व्हेंटमधे झालेले.

जानकी काश्मिरी सौंदर्याचा नमुना होती. अतिशय स्वरूपवान. लाखांतली एक. श्रीमंता-घरची. त्यातून सिमल्यासारख्या ठिकाणी कॉन्व्हेंटमधे शिकलेली. त्यामुळे त्या सौंदर्याला श्रीमंतीचा व चांगल्या शिक्षणाचा भरजरी काठ लागला होता. भरजरी रेशमी साडीला कसा त्याच तोलामोलाचा काठपदर असतो, तसा.

काबूलमधला एक महत्त्वाचा सांस्कृतिक कार्यक्रम म्हणजे आपण कोणाकडे तरी जायचे किंवा आपल्याकडे कोणीतरी येणार. असे जाणे-येणे कधी, तुम्ही ज्या प्रांतातून आलेले असता वा ज्या खात्यात काम करता यावर वा तुमच्याशी जुळणाऱ्या आवडीनिवडीवर अवलंबून असायचे. कधी ब्रिज खेळणाऱ्यांचा ग्रुप जमतो, तर कधी टेनीस खेळणाऱ्यांचा.

आमचे जानकी-सतीशशी कसे जमले कोणास ठाऊक. बायकोपेक्षा सतीश सातआठ वर्षांनी लहान. जानकी सतीशपेक्षा चारपाच वर्षांनी लहान. म्हणजे आमच्यांत एका पिढीपेक्षा जास्त अंतर होते. ते मध्यप्रदेशी काश्मिरी. तर आम्ही मराठी. अर्थात आता आम्ही तितके 'मराठी' राहिलो नव्हतो. गेली जवळजवळ वीस-बावीस वर्षे आम्ही उत्तर हिंदुस्थानात वेगवेगळ्या गावी राहिलो होतो. जसे ते आमच्यापेक्षा लहान तशीच त्यांची मुले. आमची मुले चवदा-पंधरा वर्षांपेक्षा मोठी तर त्यांचा मोठाच मुळी आठ वर्षांचा व नंतरचा सहा वर्षांचा होता.

थोडक्यात म्हणजे, नाही सारखी भाषा. नाही सारखे व्यसन. नाही सारखे वय. असे कोणतेही 'सख्यम्' नसतानाही त्यांचे व आमचे चांगले सख्य जमले. आमची मैत्री जमली. फारच चांगली मैत्री जमली. मी जानकीपेक्षा वयाने बराच मोठा. त्यातून मला जातायेता सल्ले देण्याची हौस. अशाच एके वेळी दिलेल्या सल्ल्यामुळे जानकीचा माझ्यावर विश्वास बसला असावा.

गोष्ट साधीच होती. ते सगळे जण आमच्याकडे एका संध्याकाळी आले. चहा, गप्पा वगैरे झाल्यावर ते जायला निघाले तर बर्फ पडायला लागले. मी जानकीला आमच्याकडली काही शाल वगैरे घेऊन जाण्याविषयी सुचवले. ''मी सिमल्यासारख्या ठिकाणी राहिलेली आहे, मला ह्या फुटकळ बर्फाचं काही वाटत नाही.'' असे म्हणून ती तशीच गेली. त्याच रात्री तिला ताप आला व चांगला सातआठ दिवस राहिला.

''तुम्हारा कहना मानती तो अच्छा होता.'' आजारी असताना आम्ही तिला भेटायला गेलो त्या वेळी ती मला म्हणाली.

''अभीभी कुछ बिगडा नही. आयंदासे मेरी बात मानती जाना.'' मी उत्तरलो.

''अच्छा जी. ऐसेही करूंगी!''

जानकी सुस्वरूप तर तिचा नवराही चांगला उंचापुरा व देखणा. चांगले आनंदी व उत्साही व्यक्तिमत्त्व असलेला. गोरापान, अवखळ वृत्तीचा व बाया मंडळीत फार प्रिय.

पण हे सगळे प्रवासवर्णनासारखे सांगण्याची गरज आहे का? जानकीचे, त्या 'लाखांतल्या एक' सुंदरीचे माझ्यावर मन जडले हेच ह्या सगळ्याचे सार. हे सगळे अघटित होते. काही रूप वा गुण नसलेला मी आणि जानकी ही अशी!

आणि मी तरी कसा? तिचे मन मला काबूलला असेपर्यंत कधी कळलेच नव्हते. ती मला मानते, फार मानते हे माझ्या लक्षात आले होते. पण मन जडण्यापर्यंतचा तिचा प्रवास झाला असेल असा कधी संशयही आला नव्हता.

आम्ही त्यांच्याकडे बऱ्याच वेळा जात असू. बायको सुट्टीत हिंदुस्थानात गेली असली, की जानकी मला व मुलांना जेवायला बोलवायची. त्यांचे घर आमच्या घरापासून तसे दूर होते. मी गाडी पण घेतली नव्हती. त्यामुळे अर्धा दिवस सुट्टी असेल त्या दिवशी म्हणजे गुरुवारी जेवायला जायला जमत असे. पण आम्ही दररोज दोन्ही वेळा त्यांच्याकडे जेवायला जावे असा जानकीचा आग्रह असे. जानकीच सिनेमाला जाण्याचे, आइस्क्रीम वगैरे खाण्याचे कार्यक्रम

आखत असे. वाटायचे, ठीक आहे, हिला आपल्याबद्दल आत्मीयता आहे – मित्रत्व वाटते; पण त्यापेक्षा तिच्या काही वेगळ्या भावना असतील असे कधी मनातसुद्धा आले नाही.

मसकतला जाण्याआधी मी भारत सरकारच्या नोकरीतून निवृत्त व्हायचे ठरवले होते. त्या बाबतची कागदपत्रे 'पुढे' ढकलण्याकरता म्हणून मी दिल्लीला गेलो. येताना इंदूरला दोन दिवस जानकी-सतीशच्या घरी राहायचे ठरवले होते; व त्याप्रमाणे तिकिटाची व्यवस्था केली होती.

दिल्लीच्या आमच्या कचेरीत गेलो तेव्हा तिथे काबूलचा एक सहकारी भेटला. त्याने कदाचित मुद्दाम, कदाचित सहजच असेल, विचारले, "अरे जानकी इथं आईकडे आली आहे. भेटलास तिला तू?"

"ती इथं आहे हेच मला ठाऊक नाही. मी मुंबईला परत जाताना इंदूरहून जायचं ठरवलं होतं. इथंच आहे तर इथंच भेटेन. कुठं राहते ती?"

"ते मला नाही माहीत. पण माझ्याकडं तिचा फोन नंबर आहे." असे म्हणून त्याने मला नंबर दिला.

जानकीला फोन केला तर ती घरी नव्हती. तिच्या पोरवयाच्या भाच्याने की पुतण्याने फोन घेतला. मी त्याला पत्ता विचारला व मी संध्याकाळी येतो आहे म्हणून जानकीला निरोप दे म्हणून सांगितले.

संध्याकाळी गेलो तर जानकीनेच दार उघडले. मला पाहताच तिला इतका आनंद झाला, की माझे दोन्ही हात तिने घट्ट पकडले. काबूलला असताना ती थोडी जाडी झाली होती, ती आता वाळली होती. आधीच गोरीपान, सुंदर: त्यातून दुपारची झोप झाली असल्यामुळे चेहऱ्यावर तृप्त भाव होते. सकाळी सकाळी पाऊस पडून गेल्यावर परत कोवळे ऊन पडले, की जग कसे दिसते? तशी. साधा हात धरण्या-धरण्यात माणूस किती गोष्टी सांगून जातो! माझे दोन्ही हात तिने घट्ट पकडले होते. जसे काही आता ती मला सोडणार नव्हती – कधीच सोडणार नव्हती.

माझे हात तसेच धरून तिने मला सोफ्यावर नेऊन बसवले. स्वतः माझ्याजवळ बसली व मोहकपणे हसू लागली.

"काय झालं एवढं हसायला?" म्हणून मी विचारले.

"मुझे सब सपना लग रहा है. आप सचमुच मुझे मिलने आये?"

सकाळी मी टेलिफोनवर दिलेला निरोप तिला मिळाला नव्हता. मी दिल्लीत आहे व त्या संध्याकाळी तिला भेटायला येणार आहे हे तिच्या गावी पण नव्हते. त्यामुळे माझ्या भेटीचा आनंद कितीतरी पटीने गुणित झाला होता. आणि तो मला चांगलाच जाणवला. तिला निरोप मिळाला नव्हता ते एका दृष्टीने चांगलेच झाले होते म्हणायचे.

दिल्लीतले काम संपायला तीनचार दिवस लागले. त्या काळात जवळजवळ दररोज जानकीला भेटत होतो. रविवार पडला त्या दिवशी दुपारी कॅनॉट प्लेसला जेवायला गेलो. लहानमोठी खरेदी केली. त्यात खरेदी थोडी आणि हिंडणेफिरणे जास्त होते. गप्पागोष्टी जास्त होत्या. आम्ही एवढे काय बोलत होतो कोणास ठाऊक! माझी दिल्ली सोडण्याची वेळ आली. जानकी आणखी दहाबारा दिवस राहणार होती.

ह्या दिल्ली-भेटीत मला एका भाषणाचे आमंत्रण मिळाले. त्याची तारीख ह्या आठ दिवसांतच जमावी अशी इच्छा होती. भाषणाच्या आयोजकांना तसे सांगितले. त्यांनी प्रयत्न करतो म्हणून म्हटले. त्या बळावर 'मी सातआठ दिवसांत परत येतो' म्हणून जानकीला

दिलासा दिला व दिल्ली सोडली.

मुंबईला विमानाने आलो. विमान जमिनीला लागले तरी मी आपला आकाशातच होतो. आपण कोणाला तरी आवडतोय ही कल्पनाच अतिशय सुखद होती. आपल्याला कोणी असे चाहेल, आपल्या जीवनात काही किंमत देईल असे कधी वाटले नव्हते, आणि तेसुद्धा जानकीसारखे कोणी. ह्याचा अर्थ ह्यापूर्वी कोणी स्त्रिया माझ्या मैत्रिणी झाल्या नव्हत्या असे नाही. पण जानकीच्या बाबतीत मैत्रीण वगैरे शब्दप्रयोगसुद्धा योग्य वाटत नव्हता. ती माझी नुसती मैत्रीण नव्हती, तर सखी होती. ती माझ्यात पार गुंतली होती.

कदाचित तिच्या सौंदर्याने मी कधीही भारलो गेलो नाही हे कारण असेल. तिच्या सौंदर्याबद्दल मी सावध होतो पण फार प्रभावित असा झाला नव्हतो. हे तिला आत्तापर्यंतच्या अनुभवांपेक्षा वेगळे वाटले असावे.

कदाचित मी तिच्या नवऱ्यापेक्षा चौदापंधरा वर्षांनी मोठा होतो. त्यामुळे त्याच्यापेक्षा जास्त परिपक्व वाटलो असेन. काही तरी कारणाने तिचा माझ्यावर विश्वास बसला व त्याचे रूपान्तर हे असे झाले होते. आता हळहळ वाटत होती, की हे आपल्या लक्षात कधी कसे आले नाही? तिला आपल्यात रस निर्माण झाला आहे. ती आपल्याकडे जवळचा मित्र म्हणून पाहते आहे हे कधी कसे जाणवले नाही? कितीतरी तऱ्हेने तिने आपले मन मला दाखवायचा प्रयत्न केला होता. चहाला बोलावून, जेवायला बोलावून, पार्टीजमधे माझ्याबरोबर राहून...हं...म्हणून आता निःश्वास टाकायचा! भिकाऱ्याला परीस मिळाला तरी त्याला परीस मिळण्याइतके आपले नशीब भारी आहे असे कसे वाटावे? तेव्हा आता निःश्वास टाकणे आले. खरेच, निःश्वास टाकायची सोय नसती तर माणूस वेडा झाला असता.

मी आठ-एक दिवसांत दिल्लीला परत येतो म्हणून जानकीला सांगून गेलो होतो खरा; पण तसा काही जाऊ शकलो नाही. चांगला पंधरा-वीस दिवसांनी गेलो. तोपर्यंत ती इंदूरला गेली होती. तेव्हा येताना इंदूरला उतरलो. सगळी जणे मला न्यायला विमानतळावर आली होती. मग बरोबर खाणेपिणे झाले.

जेव्हा थोडी मोकळीक मिळाली तेव्हा ती अगदी हळू आवाजात म्हणाली, "आप आये ही नही?" बस, इतकेच. जास्त काही बोलण्याची गरजच नव्हती. तिच्या प्रश्नाला काय उत्तर होते माझ्याकडे? उगाचच कारणावली देत बसण्यात अर्थ नव्हता. आणि जानकीने उत्तराकरता तो प्रश्न विचारला नव्हता. भेट न झाल्याची ती हळहळ होती.

ज्या अमानुल्लाच्या जागेवर मी बसत होतो, तो आज सुट्टीवरून परत आला. हा उंचापुरा, पंजाबी पाकिस्तानी इंजिनियर होता. ह्याच्या नावाविषयी मला प्रथमपासून कुतूहल होते. अफगाणिस्तानात १९२०च्या सुमाराला होऊन गेलेल्या अमीराचे अमानुल्ला असे नाव होते. अमानुल्ला हा मोठा सुधारक विचारांचा. सगळे जग पुढे जात असता, आपला देश मात्र अजून काही शतके मागे आहे, त्याला खेचून पुढे नेले पाहिजे अशा विचारांचा.

अमीर अमानुल्लाने दारुलामान नावाची काबूलच्या जवळच नवीन राजधानी वसवली. कित्येक चांगल्या इमारती उभारल्या. काबूलपासून काही मीटर्सवर 'पागमान' नावाचे हिल-स्टेशन होते, त्याची सुधारणा केली. तिथे गाण्याबजावण्याच्या कार्यक्रमांकरता हॉल बांधला. त्याचबरोबर त्याने स्त्री-शिक्षण, बुरखाबंदी, जुने आचारविचार बदलण्याकरता नवे कायदे-

कानू केले.

त्यामुळे जुन्या विचाराची अफगाण मुस्लिम जनता चिडून उठली. त्याच्याविरुद्ध उठाव झाला, त्याला देश सोडून जायला लागले. लोकांनी त्याच्यावरचा राग त्याच्या इमारतींवर काढला. त्याने बांधलेला पागमानचा हॉल लोकांनी पेटवून टाकला. छप्पर वगैरे सगळे जळून गेले. फक्त भिंती राहिल्या. योगायोगाने मी काबूलला गेलो त्या वेळी ह्या हॉलची पुनर्बांधणी करायची कल्पना निघाली व त्या संबंधीची ड्रॉइंग्ज मी बनवली.

त्या पाकिस्तानी अमानुल्लाला मी म्हटले की, ''तू इथे नव्हतास तेव्हा मी काही दिवसांपुरता तुझ्या जागेवर बसलो होतो. एकदोन दिवसांत काहीतरी व्यवस्था होईल, चालेल ना?''

''की फरक पेंदा है जी?'' अमानुल्लाने आपल्या खास पंजाबी ढंगाने व पंजाबी ढंगाचे उत्तर दिले.

'त्याने असा काय मोठा फरक पडतोय', असा त्याच्या उत्तराचा अर्थ. मी दिल्लीला कित्येक वर्षे राहिलो होतो. त्यातून मी अनुभवले होते : काय वाटेल ते होवो, लहान वा मोठे, पंजाबी माणूस 'की फरक पेंदा है जी' असे म्हणून वेळ निभाऊन नेतो.

हे त्यांचे नुसते उत्तरच नसते तर तशी त्यांची वृत्ती पण आहे. ह्याच वृत्तीमुळे पंजाबी लोक परकीयांच्या आक्रमणापुढे टिकले, तग धरून राहिले – एवढेच नव्हे तर फाळणीनंतर आपआपले बस्तान चांगल्या तऱ्हेने बसवू शकले.

''नाहीतरी आता दोनतीन दिवस मी इकडेतिकडे फिरून सगळ्यांच्या गाठीभेटी घेणार आहे. मुलखावरून आले की पहिले काही दिवस कामात मनच लागत नाही.'' तो पुढे म्हणाला.

हे मात्र अगदी खरे होते. सुट्टीच्या जाण्याच्या आधी दोनचार दिवस आणि परत आल्यानंतरचे दोनचार दिवस काही कामधाम म्हणून सुचत नाही. म्हणून तर पहिले काही दिवस ह्याला भेट, त्याला भेट असे चालायचे. हे सगळे मन रिझवण्याकरता. खरे म्हणजे मुलखाच्या भेटीचा हँग-ओव्हर चांगला सातआठ दिवस झाले तरी उतरत नाही.

एक दोन दिवसांतच माझ्या टेबलाची व्यवस्था केली गेली. चंद्राच्या शेजारचे ड्रॉइंग टेबल उचलून तिथल्या खिडकीच्या जवळच्या जागी माझे टेबल मांडले गेले. एका हाताला पाकिस्तानी अमानुल्ला व एका हाताला सिलोनी चंद्रा. अगदी भारतासारखी माझी स्थिती झाली. मला खिडकीच्या जवळ जरी जागा मिळाली तरी बाहेरची गंमत पाहण्याच्या दृष्टीने त्या जागेचा काहीच फायदा नव्हता, कारण बाहेर पाहण्यासारखे काही नव्हते. एक तर माझी खिडकी इमारतीच्या मागल्या बाजूची होती. आमच्या इमारतीची मागली बाजू, शेजारच्या गल्फ-एयरलाइन्सच्या इमारतीची मागची बाजू व लेबर ऑफिसची पुढली बाजू असा खिडकीतून देखावा दिसे. मागल्या मोकळ्या जागेत एक थंड पेयांचा स्टॉल होता.

नाही म्हणायला मसकतमधली थोडी दूरवर नवीनच बांधली गेलेली भव्य मशीद दिसायची. ह्या मशिदीची वेगळी गोष्ट म्हणजे ह्या मशिदीला सुलतानाचे नाव दिले होते. साधारणपणे गावातल्या सगळ्यांत मोठ्या मशिदीला 'जुम्मा-मशीद' म्हणजे शुक्रवारची मशीद म्हणतात, किंवा ती ज्या भागात असेल त्या भागावरून ओळखतात. पण ही भव्य, खर्चिक

व एका इंग्रज आर्किटेक्टने बनवलेली मशीद सध्याच्या सुलतानाच्या नावाची होती. 'काबूस मसजीद !'

हे व्यक्तीच्या नावाचे प्रस्थ सगळीकडेच वाढत आहे. आपल्याकडे नाही का दिल्लीच्या लक्ष्मी-नारायण मंदिराला चक्क बिर्ला मंदिर म्हटले जात ? नाशिकला बिटको मंदिर, कानपूरला जे० के० मंदिर तसाच हा मसकतचा प्रकार. पूर्वी हे असे नसे. हिंदुस्थानातली कोणतीही मशीद वा मंदिर राज्यकर्त्यांच्या नावाने ओळखले जात नसे. क्वचित एखादी बाबरी मशीद असेल. पण ती बाबराने बांधली की नाही ही शंका आहेच. अकबर-औरंगजेबांच्या नावाने एकही मशीद नाही वा पेशव्यांच्या वा अहल्याबाईंच्या नावाचे एकही मंदिर नाही.

बाकी खिडकीतून 'बघण्या'सारख्या गोष्टी मसकतसारख्या मुस्लिम गावी काय असणार ? ह्याचा अर्थ मसकतमधे बायका अजिबात नव्हत्या असे नाही. बँकांतून, एयरलाइन्सच्या ऑफिसांतून कचेऱ्यांतून मोठ्या प्रमाणात स्त्रिया असत. बहुतेक इजिप्ती वा सुदानी. हिंदी म्हणजे केरळाच्या. बहुतेक नर्सेस वा घरी आया म्हणून. इजिप्ती दिसण्यात गोऱ्या, सुंदर व राहण्यात तर अगदी अद्ययावत व पश्चिमी पद्धतीच्या. सुदानी आपल्या काळ्यासावळ्या, ओबडधोबड, बहुधा लांब झग्यात व रुमालाने डोके झाकलेल्या.

पण पुढारलेल्या इजिप्ती असोत की सुदानी वा हिंदी असोत, कोणीही स्त्रिया साधारणपणे दिवसाच्या वेळात रस्त्यांवर दिसत नसत. कचेरीच्या वेळात तर नाहीच नाही. कचेरीत काम करणाऱ्या वा घर पाहणाऱ्या स्त्रिया शॉपिंगला वगैरे आपआपल्या नवऱ्यांबरोबर संध्याकाळी बाहेर पडायच्या. तेव्हा त्या माझ्या टेबलाजवळच्या खिडकीतून दिसणाऱ्या थंड पेयांच्या स्टॉलवर कोणी बायका-मुली येण्याचा प्रश्नच नव्हता.

अगदी साधी व क्षुल्लक गोष्ट. पण अशा गोष्टीचे आपसांतले संबंध दाखवणारे थर्मामीटर्स असतात की काय ? मसकतला येताना बायकोने चिवडा दिला होता. जाता-येता खाऊन खाऊन एक दिवस तो संपला. मनात आले, की एका तऱ्हेने आता आपला व घराचा संबंध संपला. लगोलग मनात आलेले कागदावर उतरवले व बायकोला पाठवून दिले. बायकोचे पण त्या चिवड्याइतकेच तिखट उत्तर आले : "असे चिवडा असेपर्यंत जगात संबंध राहिले असते व चिवड्याबरोबरच ते संपले असते तर काय बघायला हवे होते ?"

राहण्याच्या जागेचे अजून पक्के होत नव्हते. वेगवेगळ्या जागा दाखवल्या जात होत्या. पण प्रत्येकीत काहीतरी खोड असे. तोपर्यंत हॉटेलात राहणे भाग होते. हॉटेल कचेरीच्या जवळ होते. राहण्याचा व खाण्यापिण्याचा खर्च सरकार करणार होते. त्यामुळे ती पण चिंता नव्हती. इतरही काही ताप नव्हता.

कचेरीतून दोन वाजता परत यावे. चांगले भरपेट जेवावे. मस्तपैकी तण्णावून द्यावी व संध्याकाळी बाजारातून फिरून यावे. रोझे होते त्या वेळी दिवसभर खाण्याची दुकाने बंद असली तरी संध्याकाळी सूर्यास्त झाला, की ती उघडत व खाण्यापिण्याची मोकळीक असे. रोझे चालू असताना ओमानी, इजिप्ती वगैरे लोक संध्याकाळचे मित्रमंडळींना जेवायला बोलावतात किंवा स्वतः मित्रांकडे जातात व मग सहकुटुंब सहपरिवार फिरायला बाहेर पडतात. तोपर्यंत

बाहेरचे वातावरणही बरेचसे थंड झालेले असे. हॉटेले व खाण्यापिण्याची दुकाने रात्री चांगली बारा-साडेबारापर्यंत उघडी असत. सिनेमाचे दिवसाचे खेळ बंद असले तरी पहिला खेळ काहीतरी रात्री नऊच्या सुमारास सुरू होई तो बारा-साडेबारापर्यंत चाले. अशा ह्या महिनाभर उपास पाळण्याने मुसलमान समाजातला कडवेपणा वाढायला मदत होत असेल ?

आज कचेरीत गेलो तर अमानुल्ला अगोदरच आला होता. त्याच्या शेजारीच माझे टेबल होते. सलाम-आदाब वगैरे झाल्यावर मी त्याला विचारले,

"मियाँ, हे अमानुल्ला नाव जरा वेगळं आहे, नाही ? हे नाव कसं ठेवलं रे तुझं ?" साधारणपणे हे नाव पाकिस्तानी वा हिंदी मुसलमानांत ठेवले जात नाही हे मला माहीत होते.

आतापर्यंत त्याला असा कोणी प्रश्न विचारला नसावा. त्यामुळे त्याने मोठ्या उत्साहाने अमानुल्ला नावाचा एक अफगाण अमीर होऊन गेला वगैरे सांगून त्याचे हे नाव त्याच्या मोठ्या आत्याने ठेवले होते म्हणून सांगितले. तो सांगत होता — मधे मी काही प्रश्न विचारत होतो. काही वेळा मीच त्याला माहिती देत होतो.

तेवढ्यात कृष्णन नावाचा सहकारी 'इंडियन एक्सप्रेस'चा अंक घेऊन आला. हा खास मद्रासी म्हणता येईल असा. उंच, हडकुळा, डोळ्याला जाडा चष्मा, चेहऱ्यावर बुद्धिमत्तेचे तेज. हा तिसऱ्या विभागात काम करायचा. हातातला अंक दाखवत तो म्हणाला, "तुझ्या मिसेसचा अफगाणिस्तानवरचा लेख आला आहे, बघ." व तो अंक ठेवून गेला.

"तुम्हारी बिबी जर्नालिस्ट है ?" अमानुल्लाने थोड्या आश्चर्याने विचारले.

"हाँ, जी. लिखती है कभी कभी," मी उत्तरलो.

"म्हणूनच तुला अमीर अमानुल्लाबद्दल इतकी माहिती." अमानुल्ला म्हणाला. अमीर अमानुल्ला व अफगाणिस्तानबद्दल मला असलेल्या माहितीचे रहस्य आपल्याला कळले, ह्या आनंदात तो होता.

अमानुल्ला हा पस्तीसएक वर्षांचा. त्याची मोठी आत्या जवळजवळ साठीच्या वयाची होती. लहानपणी तिने अमीर अमानुल्लाबद्दल, त्याने केलेल्या सुधारणांबाबत, बुरखा हटवण्याच्या त्याच्या कृतीबाबत कदाचित काही वाचले असावे वा मोठ्यांत झालेली बोलणी तिच्या कानावर पडली असावीत. कुठेतरी तिला अमीर अमानुल्लाबद्दल आदर वाटला असावा. तो करतोय ते स्त्रियांच्या दृष्टीने चांगले करतोय असे तिला जाणवले असावे. त्याचा परिपाक म्हणून तिने आपल्या भाच्याचे नाव अमानुल्ला ठेवले असावे. कोणाबद्दल आदर वाटल्याशिवाय क़ा कोणी त्याचे नाव ठेवते ? त्या मुस्लिम बाईची अमीर अमानुल्लाला ही आपली साधीभोळी श्रद्धांजली असावी.

एडवर्ड कार हा मूळचा पोलिश. पण दुसऱ्या महायुद्धाच्या आधीपासून इंग्लंडात स्थायिक झालेला. गोरा, जाडा, गिड्डा. डोक्यावरचे केस विरळ झालेला. इंग्रजांचे गुण व वाण लागलेला. सगळे इंग्रज आपण कोणीतरी खास आहोत असे समजतात, तसे स्वतःला समजणारा.

दुसऱ्या दिवशी त्याची भेट झाली तेव्हा तो विचारता झाला, "आर यू क्वालिफाईड ?"

हा प्रश्न फार उद्दामपणाचा होता. एक तर मी काही शिकलेला आहे की नाही ह्याच्याशी

त्याचा काही संबंध नव्हता. त्याच्या प्रश्नातच मी शिकलासवरलेला नसणार हे गृहीत धरलेले होते.

"यस, दॅट मच, व्हिच इज रिक्वायर्ड टु प्रोड्यूस गुड्‌ आर्किटेक्चर," मी उत्तरलो.

मी नाराज झालो आहे हे त्याने ओळखले.

"नाही, नाही, मी तशा अर्थी नाही म्हटलं. हिंदुस्थानातून व पाकिस्तानातून बरेच शिक्षण न घेतलेले लोक येतात म्हणून विचारलं."

मग मी त्याला हिंदुस्थानातला अनुभव, इंग्लंडमधले शिक्षण, अफगाणिस्तानातले काम वगैरेंबद्दल सांगितले. मला मिळणारा पगार पण सांगितला. तो इथे असलेल्या एकदोन ब्रिटिश अधिकाऱ्यांपेक्षा जास्त होता.

हे थोडे अघटितच झाले होते. एका 'काळ्या'ला 'गोऱ्यां'पेक्षा जास्त पगार? काही दिवसांतच त्या गोऱ्यांनी खटपट केली. त्यात त्यांना त्यांच्या वकिलातीने मदत केली व त्या कमी पगारवाल्या साहेबांचा पगार माझ्यापेक्षा जास्त करून घेतला!

आमच्या विभागातले कामाचे वाटप हा एडवर्ड कारच करणार होता. पण अजून नवीन कामाची यादी आली नव्हती. तेव्हा आम्ही काहीतरी जुजबी काम करत होतो. इथल्या शिक्षणमंत्र्यांच्या चेंबरच्या इंटिरियरचे काम मला देण्यात आले. मी, कार व चंद्रा – तो सिलोनी ड्राफ्टस्‌मन मंत्रालयात जाऊन मंत्री महोदयांची खोली काळजीपूर्वक पाहिली. काही मापे वगैरे पण घेतली.

कचेरीत परत आल्यावर 'हे असं कर, ते तसं कर' वगैरे कारने सांगितले आणि अशा अशा दोनतीन पर्यायी योजना बनव असे म्हणाला.

"माझ्या कल्पनेप्रमाणं काही पर्यायी नकाशे बनवू का?" मी विचारले. तेव्हा तो खास ब्रिटिश पद्धतीने खांदे उडवून म्हणाला, "वेल्, बघ जमलं तर. पण मी सांगितल्यापेक्षा वेगळं काही करता येईल असं मला वाटत नाही."

मी कारच्या कल्पनेवर आधारलेले दोन नकाशे तर तयार केलेच पण माझ्या कल्पनेप्रमाणे आणखी चार पर्यायी नकाशे बनवले. ते पाहून कार चांगलाच चक्रावला. ह्या माणसाशी थोडे सांभाळूनच वागले पाहिजे अशी त्याने मनाशी खूणगाठ बांधली.

कारण ज्या तऱ्हेने नंतर काही दिवसांनी नव्या वर्षाच्या कामाची वाटपे झाली त्यावरून ते माझ्या लक्षात आले. मला अगदी छोटीछोटी व कमी महत्त्वाची कामे देण्यात आली. जी एकदोन मोठी व महत्त्वाची कामे मला देण्यात आली ती बहुधा सरकार हाती घेणार नाही अशा वर्गाची होती. कारच्या तोडीस तोड, मीच एकटा होतो तेव्हा मला बाजूला टाकायचा हा मार्ग त्याने अवलंबला होता. आताच त्याच्याविरुद्ध मी काही तक्रारही करू शकत नव्हतो. माणसाने तक्रार आपली पत जमल्यावर करावी, तरच त्याचा परिणाम होतो आणि मी तर इथे अजून नवीन होतो.

मनाशी म्हटले, लहान काम तर लहान काम. त्यातही मला हुशारी दाखवता येईल. आणि अजून पुढं वर्ष पडलं आहे.

मध्यपूर्वेत, निदान मसकतमधे तरी मी असे पाहिले, की इथे येणारे बहुतेक ब्रिटिश अगदी दुसऱ्या वा तिसऱ्या प्रतीचे, कामात यथातथा, व बुद्धिमत्तेत सर्वसाधारण. त्यांचे मुख्य काम

म्हणजे आपल्या देशाचा माल खपवणे! कोणत्याही गोष्टीची खरेदी करण्याबद्दल सल्ला देताना ते नेहमी ब्रिटिश माल, ब्रिटिश यंत्रसामुग्री विकत घ्यावी असा सल्ला देतात. मग इतर देशांपेक्षा तो कितीही महाग व कमी प्रतीचा का असेना! अशा व्यापारापोटी आणि पगारापोटी ते लाखो ओमानी रियाल आपल्या देशी नेत असतात.

सारखे वाटायचे, की काबूलला जसा रशियनांविरुद्ध झगडलो तसे इथे ह्या लुच्च्या ब्रिटिशांविरुद्ध झगडावे. ह्यांची लबाडी ओमानींच्या लक्षात आणून द्यावी. त्यांचे काय डावपेच चाललेले असतात ते ह्या ओमानी अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून द्यावे. पण माझे, एका हिंदी माणसाचे इथे ऐकणार कोण? माझीच नव्हे तर माझ्या देशाची इथे काय पत होती?

सकाळी उठावे, गॅलरीत येऊन पाहावे तर कोणी हिंदी माणूस चक्क आपला रस्ता झाडतोय. रस्त्यावरचे कागदाचे कपटे व सिगारेटची थोटके अगदी हाताने उचलतो आहे. ऑफिसच्या अलीकडे असलेल्या काबूस मशिदीच्या अवतीभवती छान बाग होती. हिरवेगार गवत होतं. कचेरीला जाताना दिसायचे, की आपला कोणी 'बांधव' वा सरदारजी बागेला पाणी देतो आहे वा गवत कापतो आहे.

ह्या संबंधात एका खाजगी कंपनीच्या मुख्य इंजिनियरने सांगितलेली गोष्ट मोठी जीवघेणी होती:

त्याची नोकरीकरता मुलाखत चालली होती तेव्हा एक ओमानी डायरेक्टर म्हणाला, "तुम्ही हिंदी माणसं कामाला फार चांगली व विश्वासू असता." ते ऐकून त्या हिंदी इंजिनियरला फार बरे वाटले, थोडा अभिमानही वाटला. साहजिकच आहे. आपल्या देश-बांधवांचे कौतुक कोणाला आवडणार नाही? पण त्या ओमान्याने पुढे जे सांगितले त्याने त्या हिंदी इंजिनियरचा अभिमान पत्त्यांच्या बंगल्यापेक्षाही लवकर कोसळला.

"मला चांगलं माहीत आहे ना. माझा ड्रायव्हर हिंदी आहे. स्वैपाकी हिंदी आहे. मुलांना सांभाळणारी आया हिंदी आहे. सगळे कामात व्यवस्थित. घरात इतके पैसे व मूल्यवान गोष्टी पडलेल्या असतात पण कोणी एका पैशाला हात लावत नाहीत. आणि ड्रायव्हर? तो तर बोलवलेल्या वेळेच्या आधीच पंधरा मिनिटं हजर असतो."

हिंदी लोकांचे हे व असे कौतुक ऐकल्यावर त्या मुख्य इंजिनियरला हसावे, की रडावे हेच कळेना. तो त्या ओमानी लोकांच्या समोर हसला व घरी येऊन मनोमनी रडला!

इथले सगळे ड्रायव्हर हिंदी, घरातले व दारातले काम करणारे हिंदी, घरातल्या नोकरांप्रमाणेच बाहेर दुकानावरचे गडी हिंदी, आया हिंदी, इमारत-बांधकामातले कामगार मजूर हिंदी. हिंदी लोकांना अशा पेशांत व वेषांत पाहण्याची इथल्या लोकांना सवय झालेली. तेव्हा ते सगळ्या हिंदी लोकांना त्याच मापाने तोलणार. ब्रिटिशांविरुद्धच्या एका हिंदी माणसाच्या सल्ल्याला ते काय किंमत देणार? त्याने कितीही चांगला सल्ला दिला तरी तो 'काळा' सल्लाच राहणार.

ह्या सगळ्याचा मनाला फार त्रास होत असे. पण हात चोळत बसण्याशिवाय काही करता येत नसे.

आता बायकोची पत्रे नियमितपणे येऊ लागली होती. पूर्वी बायकोच्या पत्राची ओढ असे. आता ती ओढ आणखी एका कारणामुळे जास्त गडद झाली होती. गेले काही महिने पुण्याच्या

एका साप्ताहिकात दर आठवड्याला माझे लिखाण छापून येत होते. मी एक लेखमाला लिहीत होतो. त्या आठवड्याचा लेख छापून आला आहे की नाही ? आला असल्यास तो कसा उतरला आहे हे कळून घेण्याची फार उत्सुकता असे. पण नेमके माझ्या लिखाणाबद्दलच बायकोच्या पत्रात काही म्हणून काही नसे. जणू काही तो विषय सेन्सॉरच झाला होता. तिच्या पत्रात फक्त घरगुती व बिगर घरगुती गोष्टींबद्दलचा मजकूर असे. त्यामुळे जीव फार कासावीस होत असे.

माझ्या लिखाणाला अशीच सहजपणे सुरुवात झाली होती. त्या साप्ताहिकाचे संपादक बायकोच्या चांगल्या ओळखीचे झाले होते. ते एकदा आमच्याकडे आले असता काबूलला असताना मी लिहिलेले लेख त्यांना दाखवले. त्यांनी ते वरवर असे चाळले. आपल्या कामातले चतुर गृहस्थ ते. म्हणाले,

"तुमच्या लिखाणात स्पार्क आहे. पण तुम्ही लिहिलेले सगळे विषय आता जुने झाले आहेत. सध्याच्या विषयांवर काही लिहिता येईल ?"

"ते सहज शक्य होईल." मी मोठ्या आत्मविश्वासाने म्हणालो.

"दर आठवड्याला पाठवायला लागेल."

"ते मात्र अशक्य आहे," मी पूर्वीच्याच आत्मविश्वासाने म्हणालो, "अहो, मी आयुष्यात कधी 'लिहिलं' असं नाही. एखाददुसरा लेख लिहिता येईल पण दर आठवड्याला कसं लिहिता येईल ?"

"हे पाहा" संपादक महाशय म्हणाले, "लोकांच्या मनावर काही ठसावं असं वाटत असेल तर दर आठवड्याला लिहायला लागेल. लोकांना आवडलं तर त्याची ते वाट पाहतात. त्याची चटक लागते. लिहायला सुरुवात तर करा."

त्याप्रमाणे सुरुवात केली आणि आश्चर्य म्हणजे एकामागून एक विषय सुचत गेले. एकदा विषय सुचला, की तो दोनचार दिवस मी मनात घोळवत ठेवी. एकदा शेवट कसा करायचा ते पक्के झाले की लेख लिहून टाकत असे. आता 'लिहिणं' फार सोपे वाटू लागले होते.

चिं० वि० जोशी यांच्या लिखाणाचा माझ्यावर फार पगडा होता. माझा तो आदर्श होता म्हणा ना. माझे लिखाण वाचून वाचकांना चिं० विं०ची पुसटती आठवण जरी झाली तरी मिळवली अशी माझी भावना. अर्थात त्यांच्या वेळचे विषय वेगळे, कुटुंबव्यवस्था वेगळी, परिस्थिती वेगळी होती, ह्याचे मला भान होते. चिं०विं०च्या वृत्तीचे मध्यम वर्गातल्या, मध्यम प्रतीच्या कुटुंबाचे आयुष्य खुसखुशीतपणे रंगवताना मनाशी ही भावना ठेवून लिहायला लागलो.

काही छापून आले की स्वतःचे नाव व तो लेख आपलाच असला तरी परत वाचायला मजा वाटायची. तो वाचता वाचताच नवीन नवीन विषय सुचत, नवीन नवीन कल्पना मनात येत. अर्थात हे सगळे काही जाणीवपूर्वक होत नसे. आपोआप घडत असे. प्रेमात पडले की कसे होते ? प्रेयसीशी काय काय बोलायचे ते आपण ठरवून थोडेच ठेवलेले असते ? तरी तासंतास बोलतोच की नाही ? विषय सुचत जातातच की नाही ?

प्रेमात जशी नेहमी नुसती मजाच असते असे नाही, तर त्यात काही वेळा जीव होरपळून निघतो, कासावीस होतो, लिहिण्यात पण तसेच होते ह्याची त्या वेळी कल्पना नव्हती. अगदी साध्यासाध्या गोष्टींनी मन स्वैरभैर होत असे आणि अगदी वेड लागायची वेळ येत असे. कदाचित मी तिथे एकटा असल्यामुळे सगळ्या गोष्टी जास्त तीव्रतेने जाणवत असतील.

मुंबई सोडून आता तीन आठवडे झाले आहेत. बायकोला तीनचार पत्रे पाठवली. त्यांच्याकडली पण तेवढीच पत्रे आली. कचेरीत थोडे थोडे काम सुरू झाले आहे. अजून राहण्याच्या जागेचे जमले नाही. पण त्याची काळजी ऑफिसचे लोक करताहेत.

नवऱ्याच्या नावे जानकीला पत्र लिहिले आहे. त्याचे काय झाले ते कळत नाही. जानकी पत्र लिहील ? लिहिणार नाही ? ह्या झोक्यावर मन हेलकावे खातेय.

इथून हिंदुस्थानात इंदूरला टेलिफोन होऊ शकतो. तसा फोन करावा आणि जानकीशी बोलावे अशी भावना वेळोवेळी उचंबळून येई. मुंबईहून मी बऱ्याच वेळा जानकीशी टेलिफोनवर बोललोय. पूर्वीच्या ट्रंक कॉलपेक्षा ही एस०टी०डी०ची पद्धत फार छान आहे. ट्रंक कॉलमधे फोन कुठून आलाय ते कळते. त्यामुळे टेलिफोनवर कोण बोलतेय ते आधीच समजते. एस०टी०डी०चे तसे नाही. त्यामुळे बोलण्यातली खुमारी वाढते. जानकीशी टेलिफोनवर बोलायचे म्हणजे इंग्रजीत ज्याला 'एक्सपीरियन्स' म्हणतात तसा अनुभव असतो.

कितव्यांदाही टेलिफोन केलेला असो, मी टेलिफोनवर आहे हे कळताक्षणी ती "ओऽऽऽ-होऽऽऽ" म्हणून इतका छान साद द्यायची. मग काही बोलणे झाल्यावर तिचे नेहमीचे एक म्हणणे असे :

"आप बडे खराब लोग है."

"ये अच्छी रही. मै दसबार चिठ्ठी लिखू, मै ही दसबार टेलिफोन करू. और मै ही खराब आदमी ?"

ह्यावर जानकी खुसूखुसू मोठेच्या मोठे हसायची. ती फार छान हसणारी. हसताना तिच्या लांबड्या व मधे वर आलेल्या नाकाला छानपैकी घड्या पडत. हरिणी-डोळे किलकिले होत. हे सगळे मला आठवे.

"तो क्या हुवा ? कितनी भी चिठ्ठी लिखो, कितने भी टेलिफोन करो, खराब आदमी तो खराबही रहेगा ना ?" हे आणि वर नेहमीचे हसणे.

"अच्छा बाबा, हम खराब लोग है. अब तो खुश हो ?"

"आपका टेलिफोन आनेसे मै हमेशा खुश हो जाती हूं."

एकदा मला सोडायला म्हणून ती बस-स्टॉपपर्यंत आली. "काही पैसे खर्च करायला नको आहेत," असे म्हणून तिने रिक्षा करून जायला मला विरोध केला. रिक्षा काय लगेच मिळाली असती. बसला वेळ लागणार होता. आणि बस आल्यावरसुद्धा काहीतरी महत्त्वाचा विषय काढून तिने माझी बस चुकवली होती. अशा कितीतरी जानकी-कथा. मेरी-गो-राउंडसारख्या एकीमागून एक. नाही त्यांना काही सुरुवात, नाही त्यांना कधी अंत.

पुण्याच्या साप्ताहिकाकरता दर आठवड्याला लिहीत होतोच. इकडे आलो तेव्हा असे वाटले होते, की इथून लिहायला जमेल की नाही ? संपादकांनी पण तसा संशय व्यक्त केला होता. पण ते चांगले जमले होते. नवीन जागी नवीन विषय सुचत होते. लिखाणाला गती व धार येत चालली होती.

आता ऑगस्ट महिना संपत आला होता. दिवाळी अंकाकरता काहीतरी लिहिणे सुरू करायला हवे होते. एक कल्पना ओमानला यायचे ठरल्यापासूनच मनात होती. सगळ्या परदेशी प्रवाशांना 'पुलसाथ' होते. म्हणजे 'पुलं'सारखे विनोदपूर्ण प्रवासवर्णन लिहावे अशी

भावना होते. मीही त्यांतलाच 'साथी'दार होतो. ती प्रवासवर्णनाची कल्पना मनात घोळवत होतो.

रोझे म्हणजे उपवास संपले होते. कचेरी सकाळी आठ ते दुपारी दोनची झाली. रमझानमधे म्हणजे उपवासाच्या महिन्यात कचेरी सकाळी सात ते एक वाजेपर्यंत असे. रमझान संपल्याची हीच फक्त खूण. बाकी काही नाही.

काबूलची गोष्ट वेगळी होती. रमझान संपण्याच्या दिवशी तिथे मोठ्ठाले समारंभ होत. काबूल शहरवालीत — म्हणजे नगरपालिकेत 'शहरवाल' म्हणजे महापौर मोठी मेजवानी देत असे. नगरपालिकेच्या मोठ्या हॉलमधे लांबच्या लांब टेबले टाकली जात. त्यांवर मिठाईचे व खाण्याचे पदार्थ, मुख्यतः फळफळावळ, बदाम, मनुका, पिस्ते मांडले जात. टेबले वेगवेगळ्या फुलदाण्यांनी सुशोभित केलेली असत. शहरवाल व इतर अधिकारी टेबलाच्या एका टोकाला उभे राहत. ह्या समारंभांना मुद्दाम निमंत्रण असे नसे. सगळ्यांनी यायचे हे ठरल्यासारखे होते.

प्रत्येकाने यायचे, मेयरशी हस्तांदोलन करायचे, त्याला हलकीशी मिठी मारून त्याच्या गालाचे चुंबन घ्यायचे, नंतर टेबलावर ठेवलेल्या खाण्याच्या गोष्टींपैकी काहीतरी तोंडात टाकायचे आणि निरोप घ्यायचा.

हे जसे काबूल शहरवालीत होत असे, तसेच बाकीच्या खात्यांतून व मंत्रालयातून होत असे. असलाच समारंभ 'सदर-इ-रियासत' म्हणजे राज्यप्रमुखांच्या वाड्यावरसुद्धा होत असे. त्याला देशोदेशीचे वकील, सैन्यातले व इतर वरिष्ठ अधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, मुल्ला-मौलवी वगैरे जात असत.

मसकतमधे तसे काही नव्हते. म्हणजे आम्हांला तरी तसे काही जाणवले नाही किंवा त्याबद्दल कोणी काही बोलले पण नाही. हा प्रदेश सांस्कृतिक दृष्ट्या किती मागासलेला आहे हे अशा प्रसंगाने जाणवायचे. ह्यांच्या मागासलेपणाबद्दल व एकंदर वृत्तीबद्दल अमानुल्लाने जे सांगितले त्यावरून थोडी कल्पना येईल.

आमच्याच ऑफिसमधला एक हिंदी इंजिनियर आपल्या बायको-मुलांसह राहत असे. त्याच्या घरी काही फर्निचर पोहोचवायचे होते. त्याने संबंधित ओमानी माणसाला घरचा पत्ता दिला व मुले जरी शाळेत गेली असली तरी बायको नक्की घरी असेल म्हणून घरी फर्निचर पोचवायला सांगितले.

ते ऐकून अमानुल्ला म्हणाला, "कैसा बेहुदा आदमी है ये साहाब? इथल्या लोकांच्या विश्वासावर गाई-म्हशीसुद्धा सोडू नयेत असे म्हणतात आणि बायको एकटी घरी असताना ह्या लोकांना घरी पाठवतो आहे, ह्याला काय म्हणावं? आमच्या धार्मिक समजुतीप्रमाणं ह्या अरबस्तानात दोन ते अडीच हजार फरिश्ते म्हणजे देवदूत होऊन गेले असं मानतात. तरी ह्यांचा रानटीपणा काही कमी झाला नाही आहे."

ओमानी लोकांचा सांस्कृतिक मागासलेपणा वेळोवेळी काही ना काही कारणाने जाणवायचा. भले ह्यांनी मोठाल्या इमारती बांधल्या असतील — त्या वातानुकूल केलेल्या असतील — मोठाल्या महागड्या गाड्या ते ठेवत असतील — चांगले फर्निचर वापरत असतील; पण ती सगळी पेट्रो-डॉलर्समुळे आलेली सूज. लोकांची प्रकृती सुधारली आहे असे म्हणता यायचे नाही.

आता इथे येऊन चांगले सहा आठवडे झाले आहेत. मुक्काम अजून हॉटेलवरच आहे. कार्यक्रम पण एका ठरावीक पद्धतीने व गतीने चालू आहे. गावातल्या रस्त्यांची, दुकानांची पुष्कळ माहिती झाली आहे.

दररोजचा क्रम असा, की दुपारी दोन वाजता कचेरी सुटली, की हॉटेलवर येऊन भक्कम बिअर वा रम प्यायची. मग भरपेट जेवायचे व जी वामकुक्षी ठोकून द्यायची ती संध्याकाळी साडेसहा-सातपर्यंत! नाहीतरी तोपर्यंत बाहेर इतके भयाण गरम असे की बाहेर पडण्यात अर्थ नसे. तेव्हा वामकुक्षी हा उत्तम मार्ग. तो मार्ग अवलंबून झाला की मग बाजारभ्रमंतीला बाहेर पडायचे. पहिल्या चारआठ दिवसांत असाच मार्केटमधे गेलो असता एका दुकानावर चक्क मराठीत 'लावण्या-पवाड्यांच्या कॅसेट्स मिळतील' बोर्ड पाहिला. त्याचा किती आनंद झाला होता म्हणून सांगू!

काबूलप्रमाणेच इथलीही मार्केट्स परदेशी वस्तूंनी खचाखच भरलेली असतात. टी०व्ही०, ट्रान्झिस्टर्स, विजेवर चालणारी स्वैपाकघरातली उपकरणे, बूट, चामड्याच्या पर्सेस...काही विचारू नका. फरक एवढाच, की तिथे सगळे दुकानदार, विक्रेते वगैरे अफगाण असत. काही सरदारजी असत, नाही असे नाही; पण तेही अफगाणच. काही दोनशे-अडीचशे वर्षांपूर्वी इथे आलेले व स्थायिक झालेले.

पण ह्या मसकतच्या बाजारात सगळे विक्रेते, दुकानांत काम करणारे, सगळे बाहेरचे. हिंदी, पाकिस्तानी किंवा फार तर सिलोनी. अगदी न्हावी, धोबी लोकसुद्धा. सरकारी नोकर असला तरी ओमानी माणसाला खाजगी धंदा करता येतो. त्यामुळे कोणीही ओमानी वाण्याचे, शिंप्याचे वा धोब्याचे दुकान काढतो. त्यावर कोणी हिंदी वा पाकी माणूस नेमतो. मग त्याला आपले घरबसल्या पैसे मिळत राहतात. हे ओमानी महिनान्‌महिना त्या दुकानांकडे फिरकतही नाहीत. त्यांना माहीत असते, की दुकानावरचे हिंदी वा पाकी अफरातफर करणार नाहीत; किंवा कामाकडे दुर्लक्ष पण करणार नाहीत. कारण त्या हिंदी वा पाकिस्तानी माणसाचे ओमानमधले राहणे त्या ओमानी मालकाच्या मर्जीवर अवलंबून असते. त्या ओमानी मालकाने सरकारात नुसते कळवले तरी त्या माणसाची नुसती नोकरीच जात नाही तर त्याची देशाबाहेर रवानगी होते.

इथे कोणी ओमानी पार्टनर असल्याशिवाय कोणत्याही बाहेरच्या माणसाला कोणताही उद्योगधंदा करता येत नाही. लहान ओमानींचे लहान व्यवसाय असतात, मोठ्यांचे मोठे. वरिष्ठ सरकारी अधिकारी, मंत्री, मोठाल्या कंत्राटदारांचे, कंपन्यांचे भागीदार असतात. त्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणात पैसा मिळतो व तोसुद्धा अगदी काही न करता. त्याचप्रमाणे ह्या कंपन्यांच्या हालचालींवर ओमान सरकारची नजर राहते. मुंबईच्या शापूरजी पालनजी ह्या प्रसिद्ध कंत्राटदाराची 'ओमान शापूरजी' नावाची फार मोठी कंपनी आहे. त्याचे दोन डायरेक्टर्स सरकारात मंत्री आहेत.

ह्या सगळ्याला अपवाद म्हणजे टॅक्सीवाले. टॅक्सी चालवायचा परवाना मात्र फक्त ओमानी माणसालाच मिळतो. टॅक्सी चालवण्याच्या कामाबरोबरच त्याला प्रवाशांवर नजर ठेवायची, काही संशयास्पद वाटले तर पोलिसांना ताबडतोब खबर करायची, ही कामे पण असतात. त्यामुळे खालच्या दर्जाचे का होईना, खबऱ्यांचे एक विश्वासू जाळेच विणले गेले आहे. बाजारात शेकड्यांनी हिंदी, पाकी, सिलोनी, इजिप्ती, सुदानी लोक दिसतात. पण सडे. फक्त मोठ्या हुद्याच्या जागेवर असणाऱ्यांनाच आपली बायकामुले आणायची परवानगी

असते. त्यांतलेसुद्धा बहुतेक जण मुलांच्या शिक्षणाची आबाळ होईल म्हणून आपल्या बायका-मुलांना आणत नाहीत.

तेव्हा बहुतेक बाप्ये-लोकच राहतात. मुंबईत कसे भय्ये लोक राहतात, तसेच. वर्षातून एकदा गावाकडे जाऊन यायचे व त्या आठवणींवर दिवस काढायचे!

मीही आता तसाच 'भय्या' झालो होतो. साडेआठ-नऊपर्यंत बाजारात फिरायचे. कचेरीतला सरदार कधी बरोबर असे, कधी नसे. रस्त्यात सगळे पुरुषच पुरुष. अगदी क्वचित नवऱ्याबरोबर कोणी इजिप्ती, सुदानी, हिंदी बाई दिसे. अगदी नाही असे नाही.

इतका 'पुरुषी' रस्ता पाहण्याची सवय नसल्यामुळे प्रथम प्रथम अगदी विचित्र, अनैसर्गिक वाटे. बुरख्याचे बाकी काय परिणाम होत असतील ते होत असतीलच; पण स्त्री नसलेल्या समाजाची नैसर्गिक वाढ तरी होत असेल का? बुरखा पाळणाऱ्या समाजाची मनोवृत्ती काहीशी एकाकी व रोगट होत नसेल? म्हणजे झाली नसेल का? ह्या 'बुरखा' समाजाचे लोक ज्या वेळी हिंदुस्थानसारख्या 'मोकळ्या' वातावरणाच्या देशात आले, तेव्हा त्यांची वागणूक वाकडी, कुटिल म्हणून तर झाली नसेल? हिंदू व मुसलमानांचे संबंध निरोगी होऊ शकले नाहीत त्याला हा 'बुरखा' किती आड आला असेल?

समाजात बाई नाही, घरात बाई नाही, शेजारीपाजारी बाई नाही असे शेकडो नव्हे हजारो लोक इथे राहतात. वर्षोनुवर्षे राहतात.

परत हॉटेलवर आले की जेवायचे; व्हिडियोवर चांगला सिनेमा असला तर तो पाहायचा व झोपी जायचे. हॉटेलात दररोज नवीन सिनेमा असतो. कालच 'फॉल ऑफ रोमन एंपायर' हा भारी सिनेमा होता. त्यात सोफिया लॉरेन, अलक गेनीस, वगैरे मातब्बर मंडळी होती.

हॉटेलवर *असेपर्यंत हे व्हिडियोवर*चे व नंतर सिनेमागृहातले चित्रपट हा जिवाला फार मोठा विरंगुळा ठरला. तसे बघितले तर सिनेमाइतकी निष्पाप करमणूक नाही. ते बघून वेळ तर चांगला गेला. कधी उदास, कधी रागावलेले मन शांत झाले. त्याचबरोबर विचार करायला सवड आणि नवीन विषय पण सुचले.

आमच्यातल्या प्रत्येकाला एकदोन खाती दिली होती. आमचे काम म्हणजे प्रथम त्या खात्यांच्या इमारतीबाबत काय गरजा आहेत? त्यांच्याकडे पैसा आहे का? किती? त्यांच्याकडे जमीन आहे का? ते पाहायचे; व ते सगळे नेमलेल्या आर्किटेक्टला सांगायचे. आर्किटेक्टने बनवलेले नकाशे खात्याच्या गरजा पुऱ्या करतात की नाही? त्यांत काही त्रुटी राहिल्या असतील तर त्या दुरुस्त करून घ्यायच्या हे आमचे नंतरचे काम. त्यानंतर टेंडर्स तपासून पाहायची. योग्य त्या कंत्राटदाराला काम द्यायचे व एकदा काम सुरू झाले, की कामाची प्रगती ठीकपणे होते आहे की, नाही हे पाहण्याचे काम पण आम्हीच करत असू. आम्हां स्वतःला इमारतींची डिझाईन्स वगैरे बनवायला लागत नसत.

सांगण्याचे तात्पर्य असे, की कचेरीत त्या मानाने आम्हांला काम कमी असे. बरेच लोक इकडेतिकडे जाऊन चकाट्या पिटत. मला त्या गोष्टींत रस नसे. मी आपला काहीतरी लिहीत बसे. कामाची पर्वा अशी कोणालाच नव्हती. सगळ्यांचा रस व मन दामात होते. खरेच, फक्त

पैशाकरता म्हणून जमलेली व एकत्र आलेली नाना देशांची ही माणसे म्हणजे एक अजब ग्रुप होता.

बायकोची पत्रे येत होती. मुलांचे पण एक पत्र आले होते. इथे पोस्टमन नावाची संस्था नाही. फक्त रजिस्टर्ड पत्र असले किंवा एखाद्या पत्राला पोस्टेज कमी लागले गेले असले तर पोस्टातला कोणी माणूस ते पत्र घेऊन ऑफिसात येत असे.

सगळ्या मंत्रालयांचे, कंपन्यांचे, हॉटेलांचे, दुकानांचे पोस्टबॉक्स असत. त्यांच्या त्यांच्या पोस्टबॉक्समधे पत्रे टाकली जायची. मग ती प्रत्येक ऑफिसच्या माणसाने पोस्टात जाऊन गोळा करायची अशी पद्धत असे. कचेरीचा माणूस साधारणपणे अकरा-साडेअकरा वाजता पोस्टऑफिसात जात असे व सगळ्या कचेरीतल्या लोकांची पत्रे घेऊन येत असे. मग आमच्या विभागातला कोणीतरी मुख्य कचेरीत जाऊन आमच्या विभागातल्या लोकांची पत्रे आणी व ज्याचे असेल त्याला देत असे. ज्याचे पत्र आले असेल तो फार खूष होऊन जात असे. पत्र हाती पडण्यापूर्वी चहा, बिस्किटे सगळे काही कबूल करत असे.

साधी पत्रे. पण इथल्या वैराण आयुष्यात किती आनंद निर्माण करतात, जिवाला किती दिलासा देतात, हे कळायला स्वतःचाच अनुभव हवा. जेलमधल्या कैद्यांच्या पत्रांबाबत काय भावना असतील ह्याची थोडी कल्पना आली. प्रत्येक पत्र आशा-निराशेच्या झोक्यावर काही क्षण झुलवते. मन अगदी अधीर व गाभुळलेले असते! इतके की काही वेळा तर पत्र फोडायलासुद्धा नीटपणे जमत नाही.

पहिल्या वाचनात तर पत्र जवळजवळ काही कळतच नाही. म्हणजे तसा शब्दांचा अर्थ कळतो, पण ओळींचा कळत नाही. आलेल्या पत्राप्रमाणे मूड बदलतो. सारा दिवसच का, सारा आठवडा त्या पत्राबरहुकूम चांगला किंवा वाईट जातो.

आपल्याकडली पत्रे मुख्यतः काहीतरी घटना कळवणारी म्हणजे बातमी देणारी ह्या स्वरूपाची असतात. बातमी कधी आनंदाची तर कधी दुःखाची; पण शेवटी बातमीच. पत्र लिहिण्यासारखे काही घडले नाही म्हणून पत्र लिहिले नाही असे आपण स्वतःही बऱ्याच वेळा म्हणतो व दुसऱ्यांनी म्हटल्याचे ऐकतो. ह्या सगळ्यामागे काहीतरी कारण असल्याशिवाय पत्र कशाला लिहायचे? ही भावना असते. त्यामुळे फक्त पत्र लिहिण्याकरता म्हणून पत्र फार क्वचितच लिहिले जाते.

ह्याला पत्र-संस्कृती म्हटले तर ती पाश्चिमात्य देशांत फार पुढारलेली आहे असे लक्षात येते. कार्डावर भागत असेल तर आंतर्देशीय कशाला?' असा आपल्याकडला प्रश्न. तर कागद चांगला असला पाहिजे, त्याला शोभेल असे पाकीट असले पाहिजे, एवढेच काय पत्राला सुगंध लावलेला असला पाहिजे, वगैरे प्रकरण विलायतेत फार. पत्र जपून ठेवण्याच्या बाबतीतही आपण लोक फारसे उत्साही नसतो. काम झाले, की पत्रे टाकून दिली जातात. क्वचित 'एकतारी'वर लावली जातात व काही वर्षांनंतर फेकून दिली जातात.

पश्चिमी राष्ट्रांत ही पत्र-संस्कृती उभारून येण्याचे कारण तिथले लोक जगाच्या चारही कोपऱ्यांत आपली माणसे, आपला देश सोडून प्रथम व्यापाराकरता, नंतर वसाहती स्थापण्याकरता व नंतर वसाहती सांभाळण्याकरता जात असत, हे असावे. कधी एकटे, कधी सहकुटुंब. त्याचबरोबर त्यांना युद्धाकरता म्हणून परदेशांत जावे लागायचे. त्यामुळे त्यांच्याकडे पत्रांना

असते. त्यांतलेसुद्धा बहुतेक जण मुलांच्या शिक्षणाची आबाळ होईल म्हणून आपल्या बायका-मुलांना आणत नाहीत.

तेव्हा बहुतेक बाप्ये-लोकच राहतात. मुंबईत कसे भय्ये लोक राहतात, तसेच. वर्षातून एकदा गावाकडे जाऊन यायचे व त्या आठवणींवर दिवस काढायचे!

मीही आता तसाच 'भय्या' झालो होतो. साडेआठ-नऊपर्यंत बाजारात फिरायचे. कचेरीतला सरदार कधी ब़रोबर असे, कधी नसे. रस्त्यात सगळे पुरुषच पुरुष. अगदी क्वचित नवऱ्याबरोबर कोणी इजिप्ती, सुदानी, हिंदी बाई दिसे. अगदी नाही असे नाही.

इतका 'पुरुषी' रस्ता पाहण्याची सवय नसल्यामुळे प्रथम प्रथम अगदी विचित्र, अनैसर्गिक वाटे. बुरख्याचे बाकी काय परिणाम होत असतील ते होत असतीलच; पण स्त्री नसलेल्या समाजाची नैसर्गिक वाढ तरी होत असेल का? बुरखा पाळणाऱ्या समाजाची मनोवृत्ती काहीशी एकाकी व रोगट होत नसेल? म्हणजे झाली नसेल का? ह्या 'बुरखा' समाजाचे लोक ज्या वेळी हिंदुस्थानसारख्या 'मोकळ्या' वातावरणाच्या देशात आले, तेव्हा त्यांची वागणूक वाकडी, कुटिल म्हणून तर झाली नसेल? हिंदू व मुसलमानांचे संबंध निरोगी होऊ शकले नाहीत त्याला हा 'बुरखा' किती आड आला असेल?

समाजात बाई नाही, घरात बाई नाही, शेजारीपाजारी बाई नाही असे शेकडो नव्हे हजारो लोक इथे राहतात. वर्षोन्‌वर्षे राहतात.

परत हॉटेलवर आले की जेवायचे; व्हिडियोवर चांगला सिनेमा असला तर तो पाहायचा व झोपी जायचे. हॉटेलात दररोज नवीन सिनेमा असतो. कालच 'फॉल ऑफ रोमन एंपायर' हा भारी सिनेमा होता. त्यात सोफिया लॉरेन, अलक गेनीस, वगैरे मातब्बर मंडळी होती.

हॉटेलवर असेपर्यंत हे व्हिडियोवरचे व नंतर सिनेमागृहातले चित्रपट हा जिवाला फार मोठा विरंगुळा ठरला. तसे बघितले तर सिनेमाइतकी निष्पाप करमणूक नाही. ते बघून वेळ तर चांगला गेला. कधी उदास, कधी रागावलेले मन शांत झाले. त्याचबरोबर विचार करायला सवड आणि नवीन विषय पण सुचले.

आमच्यातल्या प्रत्येकाला एकदोन खाती दिली होती. आमचे काम म्हणजे प्रथम त्या खात्यांच्या इमारतींबाबत काय गरजा आहेत? त्यांच्याकडे पैसा आहे का? किती? त्यांच्याकडे जमीन आहे का? ते पाहायचे; व ते सगळे नेमलेल्या आर्किटेक्टला सांगायचे. आर्किटेक्टने बनवलेले नकाशे खात्याच्या गरजा पुऱ्या करतात की नाही? त्यांत काही त्रुटी राहिल्या असतील तर त्या दुरुस्त करून घ्यायच्या हे आमचे नंतरचे काम. त्यानंतर टेंडर्स तपासून पाहायची. योग्य त्या कंत्राटदाराला काम द्यायचे व एकदा काम सुरू झाले, की कामाची प्रगती ठीकपणे होते आहे की, नाही हे पाहण्याचे काम पण आम्हीच करत असू. आम्हां स्वतःला इमारतींची डिझाईन्स वगैरे बनवायला लागत नसत.

सांगण्याचे तात्पर्य असे, की कचेरीत त्या मानाने आम्हांला काम कमी असे. बरेच लोक इकडेतिकडे जाऊन चकाट्या पिटत. मला त्या गोष्टींत रस नसे. मी आपला काहीतरी लिहीत बसे. कामाची पर्वा अशी कोणालाच नव्हती. सगळ्यांचा रस व मन दामात होते. खरेच, फक्त

पैशाकरता म्हणून जमलेली व एकत्र आलेली नाना देशांची ही माणसे म्हणजे एक अजब ग्रुप होता.

बायकोची पत्रे येत होती. मुलांचे पण एक पत्र आले होते. इथे पोस्टमन नावाची संस्था नाही. फक्त रजिस्टर्ड पत्र असले किंवा एखाद्या पत्राला पोस्टेज कमी लागले गेले असले तर पोस्टातला कोणी माणूस ते पत्र घेऊन ऑफिसात येत असे.

सगळ्या मंत्रालयांचे, कंपन्यांचे, हॉटेलांचे, दुकानांचे पोस्टबॉक्स असत. त्यांच्या त्यांच्या पोस्टबॉक्समधे पत्रे टाकली जायची. मग ती प्रत्येक ऑफिसच्या माणसाने पोस्टात जाऊन गोळा करायची अशी पद्धत असे. कचेरीचा माणूस साधारणपणे अकरा-साडेअकरा वाजता पोस्टऑफिसात जात असे व सगळ्या कचेरीतल्या लोकांची पत्रे घेऊन येत असे. मग आमच्या विभागातला कोणीतरी मुख्य कचेरीत जाऊन आमच्या विभागातल्या लोकांची पत्रे आणी व ज्याचे असेल त्याला देत असे. ज्याचे पत्र आले असेल तो फार खूष होऊन जात असे. पत्र हाती पडण्यापूर्वी चहा, बिस्किटे सगळे काही कबूल करत असे.

साधी पत्रे. पण इथल्या वैराण आयुष्यात किती आनंद निर्माण करतात, जिवाला किती दिलासा देतात, हे कळायला स्वतःचाच अनुभव हवा. जेलमधल्या कैद्यांच्या पत्रांबाबत काय भावना असतील ह्याची थोडी कल्पना आली. प्रत्येक पत्र आशा-निराशेच्या झोक्यावर काही क्षण झुलवते. मन अगदी अधीर व गाभुळलेले असते! इतके की काही वेळा तर पत्र फोडायलासुद्धा नीटपणे जमत नाही.

पहिल्या वाचनात तर पत्र जवळजवळ काही कळतच नाही. म्हणजे तसा शब्दांचा अर्थ कळतो, पण ओळींचा कळत नाही. आलेल्या पत्राप्रमाणे मूड बदलतो. सारा दिवसच का, सारा आठवडा त्या पत्राबरहुकूम चांगला किंवा वाईट जातो.

आपल्याकडली पत्रे मुख्यतः काहीतरी घटना कळवणारी म्हणजे बातमी देणारी ह्या स्वरूपाची असतात. बातमी कधी आनंदाची तर कधी दुःखाची; पण शेवटी बातमीच. पत्र लिहिण्यासारखे काही घडले नाही म्हणून पत्र लिहिले नाही असे आपण स्वतःही बऱ्याच वेळा म्हणतो व दुसऱ्यांनी म्हटल्याचे ऐकतो. ह्या सगळ्यामागे काहीतरी कारण असल्याशिवाय पत्र कशाला लिहायचे? ही भावना असते. त्यामुळे फक्त पत्र लिहिण्याकरता म्हणून पत्र फार क्वचितच लिहिले जाते.

ह्याला पत्र-संस्कृती म्हटले तर ती पाश्चिमात्य देशांत फार पुढारलेली आहे असे लक्षात येते. कार्डावर भागत असेल तर आंतर्देशीय कशाला?' असा आपल्याकडला प्रश्न. तर कागद चांगला असला पाहिजे, त्याला शोभेल असे पाकीट असले पाहिजे, एवढेच काय पत्राला सुगंध लावलेला असला पाहिजे, वगैरे प्रकरण विलायतेत फार. पत्र जपून ठेवण्याच्या बाबतीतही आपण लोक फारसे उत्साही नसतो. काम झाले, की पत्रे टाकून दिली जातात. क्वचित 'एकतारी'वर लावली जातात व काही वर्षांनंतर फेकून दिली जातात.

पश्चिमी राष्ट्रांत ही पत्र-संस्कृती उभारून येण्याचे कारण तिथले लोक जगाच्या चारही कोपऱ्यांत आपली माणसे, आपला देश सोडून प्रथम व्यापाराकरता, नंतर वसाहती स्थापण्याकरता व नंतर वसाहती सांभाळण्याकरता जात असत, हे असावे. कधी एकटे, कधी सहकुटुंब. त्याचबरोबर त्यांना युद्धाकरता म्हणून परदेशांत जावे लागायचे. त्यामुळे त्यांच्याकडे पत्रांना

फार महत्त्व आले. ज्या गोष्टी आपल्याला महत्त्वाच्या वाटतात त्यांच्याकडे आपण जास्त लक्ष पुरवतो व त्यांची काळजी घेतो. कितीतरी इंग्रंज अधिकाऱ्यांची व अगदी सैनिकांचीसुद्धा पत्रे पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली आहेत. आपल्याकडेही तशी पत्रे व त्यांची पुस्तके आहेत, पण ती इंग्रजी अंमलानंतरचीच. तीही फार थोडी.

आता अमानुल्लाशी चांगली घसट झाली आहे. तो पस्तीसएक वर्षांचा. त्याची बायको त्याच्यापेक्षा पाचसहा वर्षांनी लहान. त्याला दोन मुले. मोठी मुलगी चार वर्षांची व मुलगा दीड-एक वर्षांचा. त्याने त्याच्या घरच्यांचे – अर्थात बायकोचे सोडून – फोटो दाखवले.

मी आज मुलांचे पत्र आल्याचे सांगितले. त्यावर त्याने किती मुले आहेत, काय वयाची आहेत वगैरे चौकशी केली. मोठी मुलगी चोवीस वर्षांची व दुसरा मुलगा वीस वर्षांचा आहे हे सांगितल्यावर "क्या बच्चे इतने बडे हो जाते है?" म्हणून त्याने आश्चर्याने सवाल केला. तो आपली चार वर्षांची मुलगी व दीड वर्षाचा मुलगा बावीस-चोवीस वर्षांचे होणार याची कल्पनासुद्धा करू शकत नव्हता.

परक्या माणसालाच का? आपले आपल्यालाही आपली मुले इतकी मोठी झाल्याचा विस्मय वाटतो. माझ्या मुलीचे लग्न झाले होते पण अजून असे वाटायचे, की अरे आत्ता-आत्तापर्यंत ही चारपाच वर्षांची होती – हातात मळकटकळकट भावली घेऊन घरभर फिरायची. टेलिफोनवर "काय करते आहेस?" विचारले तर "टेलिफोनवर बोलते आहे" म्हणून सांगायची. तिचे आता लग्नसुद्धा झाले!

मी आपल्या मुलांबद्दल सांगत होतो पण अमानुल्लाच्या डोळ्यांसमोर त्याची स्वतःची मुले येत होती. बघता बघता त्याच्या डोळ्याला पाणी आले.

तो म्हणाला, "साहाब, पैसेके लिये हम इतने गिर गये है के बच्चोंको छोडकर इधर चले आते है. लानत हो हमपर."

अमानुल्ला व त्याचे कुटुंब जुन्या पद्धतीचे. त्याची वयस्क आईच काय, पण तरुण बायकोसुद्धा बुरखा घेणारी. बोलताना मी त्याला विचारले,

"का रे, तुझी मुलगी पण बुरखा घेणार का?"

"बिलकुल नही साहाब, कैसी बाते कर रहे है आप?"

म्हणजे बुरखा ही फार चांगली गोष्ट नाही, ह्याची त्याला जाणीव होती. पण त्याबाबतची सुधारणा बायकोपासून करायला त्याची तयारी नव्हती. मात्र मुलीबाबत त्याच्या भावना वेगळ्या होत्या. अगदी कडव्या विचाराचे लोकही आपल्या मुलीबाबत नवीन विचार आत्मसात करायला खळखळ करणार नाहीत असा विचार माझ्या मनात आला. अर्थात हा विचार काही तसा नवीन नाही, पण त्या वेळी अगदी नव्यासारखा वाटला हे खरे.

हॉटेलमधे किती दिवस राहायचे आहे कळत नाही. खरे म्हणजे सातआठ दिवसांत जागा शोधून राहण्याची व्यवस्था करतात. पण अजून आमची काही व्यवस्था होत नाहीं आहे. पण खात्याला त्याची काळजी नाही तर आपणच त्याच्याकरता जीव का थोडाथोडा करा? असा मी स्वतःला प्रश्न करी. पण हॉटेलात घरच्यासारखे वाटत नाही, उटंगळ वाटत राहते, म्हणून

तर लवकर घर मिळावे ही इच्छा.

लेखनाला नवीन नवीन विषय सुचताहेत. Love in LUTYEN'S DELHI – म्हणजे लचिन्सच्या दिल्लीतल्या प्रेमकहाणीची कल्पना सुचली.

नव्या दिल्लीच्या राजधानीचा आर्किटेक्ट व नगररचनाकार एडवीन लचिन्स नावाचा इंग्रज होता. नव्या दिल्लीच्या शहररचनेचे जगभर कौतुक झाले व अजून होत आहे. जगातली ती एक उत्तम गार्डन-सिटी म्हणून प्रसिद्ध आहे. जगात कोणाही आर्किटेक्टला जो कधी मान मिळाला नाही तो लचिन्सला मिळाला. नवी दिल्ली 'लचिन्सची दिल्ली' म्हणून ओळखली जाऊ लागली व अजून ओळखली जाते.

राष्ट्रपतिभवनावर लिहिताना मी ज्या वेळी ती वास्तू बांधली गेली त्या काळाचा – म्हणजे पहिल्या महायुद्धाच्या काळाचा – सामाजिक, राजकीय परिस्थितीचा खूप सखोल अभ्यास केला होता. हिंदुस्थानची पार्श्वभूमी असलेल्या शेकडो इंग्रजी कादंबऱ्या आतापर्यंत लिहिल्या गेल्या आहेत व अजून लिहिल्या जाताहेत. त्यांतल्या पुष्कळ गाजल्या. पण कोणा आर्किटेक्टच्या आयुष्यावर कादंबरी लिहिली गेली नाही. तेव्हा तशी एक कादंबरी लिहावी अशी कल्पना सुचली. त्या सगळ्यावर मी अगदी मनोमनी खूष होऊन गेलो. माझा रथ जमिनीपासून काही अंगुळे वर धावू लागला.

पण थोड्या वेळातच तो जमिनीवर आला. तेव्हा लक्षात आले, की ही कादंबरी माझ्या हातून लिहून होणार कधी ? ती प्रकाशित कोण करील ? तिला प्रसिद्धी कधी व कशी मिळणार ? सगळेच अविश्वसनीय. म्हणजे ह्यांतले काही होणार नाही ह्याबद्दल विश्वास. त्यामुळे त्या कादंबरीचा आराखडा तयार होईपर्यंत ती कल्पना विरून गेली. अशा वेळी मला आमच्या नाशकाच्या ज्योतिषाची प्रखरतेने आठवण होत असे.

माझे राष्ट्रपतिभवनावरचे पुस्तक दोनतीन कारणांमुळे प्रसिद्ध होऊ शकले नव्हते. एकतर हा विषय असा होता, की प्रकाशकांना राष्ट्रपतिभवनावर काही लिहिलेले लोकांना आवडेल की नाही ह्याची शंका होती. आपल्याकडे लिहिण्यासंबंधीच्या इमारती व विषय ठरल्यासारखे झाले आहेत. एकतर ताजमहालवर लिहा वा दक्षिण हिंदुस्थानातल्या देवळांवर. त्याला पुष्कळ प्रकाशक मिळतात. खजुराहोवर चित्रे वगैरे देऊन लिहिलेत तर प्रकाशकांना तोटाच नसतो. पण ब्रिटिश अमदानीतल्या इमारतीवरच्या पुस्तकाची कल्पनासुद्धा त्यांना समजून घेता येत नसे.

दुसरे कारण म्हणजे आर्किटेक्चरच्या पुस्तकांच्या प्रकाशनाचा खर्च फार असतो. एकतर त्यात काळे-पांढरे व रंगीत फोटो असायला लागतात. कागद उत्तम व छपाई सुबक असायला लागते. हे सगळे जमेला धरले तर प्रकाशनाचा खर्च फार होतो. त्यामुळे कोणीही प्रकाशक ते प्रकाशित करायला तयार होत नसे.

सुदैवाने एक तरुण गुजराथी प्रकाशक तयार झाला. पण त्याने अट घातली, की मी निदान पंधरा हजार रुपये त्यात गुंतवावे. काबूलला पैसा चांगल्यापैकी मिळत होता. बँकेत थोडी माया जमली होती. त्यामुळे पंधरा हजार मला काही जास्त वाटत नव्हते. त्या वर्षीच म्हणजे १९७९ मधे पुस्तक प्रसिद्ध झाले तर फार चांगले होणार होते. कारण त्या वर्षी राष्ट्रपतिभवन पुरे व्हायला व लॉर्ड आयर्विन तिथे राहायला गेला त्याला पन्नास वर्षे पूर्ण होणार होती. त्या वर्षी

दिल्लीच्या स्कूल ऑफ आर्किटेक्चरतर्फे राष्ट्रपतिभवनाचा सुवर्णमहोत्सवी कार्यक्रम होणार होता. त्यात ब्रिटिश सरकार सहभागी होणार होते. ह्या घडीला माझे पुस्तक प्रसिद्ध झाले तर ज्याला इंग्रजीत 'ब्रेक मिळणं' म्हणतात तसा मला ब्रेक मिळाला असता. कदाचित माझ्या आयुष्याला वेगळे वळण लागले असते.

ह्या सगळ्या गोष्टींकरता पंधरा हजार रुपये म्हणजे काही फार नाहीत असे मला वाटले. ते खर्च करायला बायको संमती देईल असे वाटले होते; पण तसे काही झाले नाही. पुस्तकाबद्दलची मी जी स्वप्ने पाहत होतो, ती तिला कदाचित अनाठायी वाटत असावीत. काही महिन्यांनी बायको पैसे खर्च करायला तयार झाली. पण तोपर्यंत प्रकाशकाचे मन बदलले होते. परिणामतः त्या पुस्तकाचे प्रकाशन राहूनच गेले. आता प्रकाशनच नाही तर कुठला 'ब्रेक' अन् कुठले काय! ह्या सगळ्यापुढे मी मोठा खिन्न व उदास होऊन गेलो.

ह्या मनःस्थितीत काबूलहून एकदा सुट्टीवर आलो असता नाशकाला गेलो होतो. ह्या पुस्तकाच्या चिंतेमुळे मी उदास होतो. कोणा मित्राला उदासीनतेचे कारण सांगितले तेव्हा त्याने ह्या ज्योतिषाचे नाव सांगितले.

हा काही खराखुरा ज्योतिषी नव्हता. हा मारवाडी गुळा-तांदळाचा व्यापारी, पण ज्योतिष ही त्याची हौस.

"देवाच्या दयेनं मला काही कमी नाही." मी त्या व्यापारी कम ज्योतिषाला भेटलो, त्या वेळी म्हणालो, "बायको आहे, मुलगी, मुलगा आहेत. चांगली सरकारी नोकरी आहे. प्रकृती चांगली ठणठणीत आहे. तसे काही प्रश्न नाहीत. पण मी एक इंग्रजीत पुस्तक लिहिलं आहे ते काही प्रकाशित होत नाही आहे. ते केव्हा होईल व त्याकरता काय करावं?"

दोनचार मिनिटे माझी पत्रिका अभ्यासून तो म्हणाला, "तुमचं इंग्रजी पुस्तक काही प्रकाशित व्हायचं नाही, पण कदाचित मराठी होतील." परत दोन मिनिटे थांबून तो म्हणाला, "नाहीतरी इंग्रजी पुस्तक लिहिणं जरा अवघडच असतं."

त्या उदास मनःस्थितीतही मला हसू आले. मला बघूनच मला इंग्रजी पुस्तक लिहिण्याचे अवघड काम जमणार नाही हे त्याने ओळखले होते. शेवटी त्याच्या भविष्याप्रमाणेच झाले. राष्ट्रपतिभवनावरचे पुस्तक प्रसिद्ध झाले नाही तशी दिल्लीवरची ती कादंबरी पण प्रसिद्ध झाली नाही.

झपाटून टाकल्याप्रमाणे काही लिहायचे नव्हते त्यामुळे वेळही भरपूर होता. सिनेमा हा त्यातल्या त्यात कमी खर्चाचा व एकट्याने एंजॉय करता येण्याजोगा. मसकतमधे चारपाच चित्रपटगृहे होती. त्यांतल्या फक्त एकात विलायती चित्रपट दाखवले जात. ह्या चित्रपटांची मोठी मजा होती. एका तिकिटावर दोन सिनेमे पाहायला मिळत. एक हाणामारीचा असे व एक गंभीर किंवा चांगला असा. पण त्यांतला कोणता आधी दाखवणार हे जाहीर करत नसत. त्यामुळे प्रथम जर हाणामारीचा लागला तर पुढल्या चांगल्या सिनेमाकरता तो पाहावा लागत असे. हाणामारीचा सिनेमा असला, की त्यात प्रेक्षकांचा पण खूप सहभाग असे. शिव्या, शिट्टया, आरडाओरडी करत जनता आपला राग-लोभ दाखवत असे. एक बरे होते, की चांगला सिनेमा सुरू झाला, की ही जनता तातडीने बाहेर निघून जात असे. त्यामुळे चांगला सिनेमा शांतपणे पाहायला मिळे. हे थिएटर आमच्या कचेरीपासून जवळच होते. दोन वाजता

कचेरी सुटली, की कुठल्या तरी हॉटेलात जेवायचे व सिनेमाला जायचे हे व्रत मी ठेवले होते. पुढे राहायला जागा मिळाल्यावरसुद्धा हाच कार्यक्रम मी चालू ठेवला होता. आणखी एक मजेची गोष्ट म्हणजे इथे दररोज सिनेमा बदलत असे.

ह्या सिनेमागृहात मी पुष्कळ चांगले अमेरिकन, ब्रिटिश, फ्रेंच, इटालियन, ग्रीक वगैरे सिनेमे पाहिले. त्याचबरोबर कराटे-किंग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्रूस लीचे पण पुष्कळ सिनेमे पाहिले. हे सगळे सिनेमे डब केलेले असत. इथे सेन्सॉर हे प्रकरण नसल्यामुळे बहुतेक चित्रपट चविष्ट लागत.

आपण कितीतरी चित्रपट पाहत असतो; जसा कितीतरी माणसांशी आपला परिचय होतो तसे. पण त्या कित्येकांतली काही अगदी थोडीच आपल्या मनात राहतात. तसेच सिनेमांचे पण होते. गोष्ट साधी, त्यातले काम करणारे फार नावाजलेले नसतात, तरी पण ते चित्रपट मनावर कायमचा ठसा उमटवून जातात.

आजचा 'डेथ ऑफ इनोसन्स' नावाचा चित्रपट त्यांतलाच. प्रेमाकरता काही त्याग करणे ही काही आगळी गोष्ट नाही. पण त्या त्यागाचे वेगवेगळे प्रकार असतात. हा चित्रपट एका वेगळ्या तऱ्हेच्या त्यागाचा; व मनाला चटका लावून जाणारा.

एका कोवळ्या व अतिशय छान मुलीच्या प्रियकराला कोणाचा तरी खून केल्याच्या आरोपावरून पकडतात. खून करण्याच्या वेळी त्या प्रियकराबरोबर कोणी मुलगी असते व सगळे पुरावे असे असतात, की ती हीच मुलगी -- जी त्याची प्रेयसी होती.

मुलीचे आई-वडील म्हणतात, की आमची मुलगी निष्पाप आहे.

"कोर्टात नुसतं निष्पाप असून चालत नाही. निर्दोष आहे हे सिद्ध व्हायला लागतं." वकील कायद्याची भाषा सांगतात, "तुमची मुलगी तर मी त्याच्याबरोबर होते म्हणून सांगते आहे. आम्ही काय करणार?"

आपल्या प्रियकराबरोबर दुसरी कोणीतरी मुलगी होती हे कळल्यावर प्रियकराने आपल्याला फसवले आहे हे त्या मुलीच्या लक्षात आलेले असते. आता जगण्यात काही अर्थ नाही म्हणून ती आपणच त्या प्रियकराबरोबर होतो म्हणून सांगत असते. शेवटी त्या दोघांना फाशी देतात.

सिनेमा पाहून मन फार विषण्ण झाले. प्रेम म्हणजे काय? हा जगाच्या सुरवातीपासूनचा प्रश्न जगाच्या अंतापर्यंत अनुत्तरित राहणार आहे. माणूस इतके निष्पापपणे प्रेम का करतो? प्रियकराने आपल्याला फसवले आहे हे कळल्यावरसुद्धा ती मुलगी त्याच्यावर सूड घेण्याऐवजी आपण न केलेला गुन्हा कबूल करायला तयार होऊन आपला जीव गमावायला का तयार होते?

शेवटी एकदाची माझ्या राहण्याची व्यवस्था झाली. कचेरीपासून दोनतीन किलोमीटर्स अंतरावर एक फूटबॉल खेळण्याचे चांगले तयार केलेले मैदान होते. बाजूला छोटासा प्रेक्षकांकरता स्टँड होता.

ओमानी तरुणांत वर्ल्ड-कपमुळे हॉकी खेळण्याची फार हौस निर्माण होते आहे. फूटबॉलसुद्धा फार लोकप्रिय होतोय. त्या भरीला सुलतान फार नवीन विचाराचा आहे. ओमानी तरुणांनी सर्व खेळांत पुढे यावे म्हणून तो फार प्रयत्नशील आहे. पाकिस्तानी, इंग्लिश, स्पॅनिश, इटालियन वगैरे देशांच्या कोचेसना भक्कम पगारावर नेमून त्याने ह्या तरुणांच्या शिक्षणाची

व्यवस्था केली आहे. माझ्या घरासमोरचे मैदान हे सुलतानाच्या विचारांचे प्रतीक होते. ओमानमधेच नव्हे तर अगदी लहान लहान गावीसुद्धा खेळण्याची मैदाने असावीत अशी त्याची ताकीद आहे.

त्या फुटबॉलच्या मैदानासमोरच्या तळमजल्यावर दुकाने असलेल्या एका चार मजली इमारतीत मला जागा मिळाली होती. दर मजल्यावर दोन बेडरूम्सचे चार फ्लॅट्स होते. प्रत्येक गाळा प्रशस्त होता. दिवाणखाना, जेवणाची खोली, दोन बेडरूम्स, दोन टब असलेल्या बाथरूम्स असा संच होता. पहिल्या मजल्यावर काही ऑफिसे होती. दुसऱ्या मजल्यावर माझ्याबरोबरचा सरदारजी, एक इंजिनियर व दुसरे कोणी तरी होते. आमच्या म्हणजे तिसऱ्या मजल्यावर मी, माझ्याच विभागात काम करणारा दत्ता नावाचा हिंदी इंजिनियर, मसकत युनिव्हर्सिटीत काम करणारी एक अमेरिकन मुलगी व दोन लहान मुले असलेला एक तुर्की इंजिनियर असे चौघे होतो. माझा व दत्ताचा फ्लॅट पुढल्या बाजूला होता तर त्या तुर्कीचा व अमेरिकन मुलीचा मागल्या बाजूला.

राहण्याची जागा बदलली त्यामुळे राहण्याची तऱ्हासुद्धा थोडी बदलली. पूर्वी हॉटेलमधून बाहेर पडून रस्ता ओलांडला, की कचेरी. आता टॅक्सीने कचेरीला जायलायायला लागायचे. इथे तशा बसेस आहेत पण माझ्या सोयीची एकही नव्हती. टॅक्सीज मात्र ठरावीक रस्त्याने खेपा करायच्या. पुढे ड्रायव्हरजवळ दोन जण व मागे तिघे असे प्रवासी घेत. ठरावीक ठिकाणी सोडायचा दर सरकारने ठरवून दिला होता.

ह्या टॅक्सीतून केलेल्या लहानशा अंतराच्या प्रवासातही मजेमजेच्या गोष्टी घडत. गाडीत काही वेळा पाकिस्तानी असत. माझी हिंदी भाषा दिल्लीला व काबूलला राहिल्यामुळे इतर मुंबईच्या लोकांपेक्षा खूपच वेगळी व उत्तर हिंदुस्थानी. त्यामुळे व माझ्या दाढीमुळे मी पाकिस्तानी नाहीतर हिंदी मुसलमान तरी वाटायचा. त्या दृष्टीने ते पाक प्रवासी माझ्याशी बोलायला सुरुवात करत. पण नंतर त्यांचा उत्साह आटून जात असे.

एकदा मी ड्रायव्हरजवळ पुढे व मागे तीन जण असे बसलो होतो. वाटेत कचेरीला जाणाऱ्या एका इजिप्ती बाईने टॅक्सी थांबवली. कदाचित तिची ऑफिसची बस चुकली असेल. टॅक्सीवाल्याने टॅक्सी थांबवली. आता तिने बसायचे तर पुढेच बसायला लागणार होते. ड्रायव्हरने त्या बाईला माझ्याजवळ बसायला लागेल असे थोडे संदेहानेच सांगितले. कोणी इजिप्ती बाई कोणा परपुरुषाबरोबर बसायला तयार होईल असे त्याला वाटले नाही. त्यातून त्या बाईला माझ्या अंगाशी अगदी खेटून बसावे लागणार होते. बुरखा घेणाऱ्या समाजात असे परपुरुषाला खेटून बसणे म्हणजे त्या ड्रायव्हरच्या दृष्टीने महाभयंकर गोष्ट होणार होती. पण त्या बाईला त्याचे काही वाटले नाही. ती माझ्याजवळ बसायला तयार झाली. तशी ती बसली व कचेरी येताच आम्ही उतरलो व तीही उतरली.

जुन्या कल्पनांचे कौतुक कितपर्यंत ? त्या आपल्या सोयीच्या आड येत नाहीत तोपर्यंत. त्या बाईला वेळच्या वेळी कचेरीत जाणे हे जास्त महत्त्वाचे वाटत होते.

खरे म्हणजे माझ्या हुद्दाप्रमाणे मला स्वतंत्र गाडी मिळायला पाहिजे होती. माझे खाते त्याप्रमाणे गाडी द्यायला तयार होते. इथे सरकार गाडी वापरायला देते. तुम्ही विकत घ्यायची म्हणालात तर बिनव्याजी सगळी रक्कमही देते. व्याज घेत नाहीत ह्याचे कारण इस्लाम धर्मात

व्याज घ्यायला बंदी आहे. पण गाडीचा ड्रायव्हर देत नाहीत. माझे गाडी चालवण्याचे लायसेन्स तर काही वर्षांपूर्वीच रद्द झाले होते. नवे करून घ्यायचे म्हणजे त्याला कमीत कमी सहा महिने लागले असते. पोलिसांचा पैसे करण्याचा हा एक मोठा मार्ग होता. मी सरकारी अधिकारी. माझ्याकडून त्यांना पैसे मिळण्याचा संभव नव्हता, म्हणून एवढे सहा महिने. तेव्हा तो नाद सोडला व कधी मित्रांच्या गाड्यांतून तर कधी टॅक्सीतून फिरू लागलो.

एकदा मी व माझा सुटीला म्हणून आलेला मुलगा एका टॅक्सीत बसलो. मला जाता-येता, उठत-बसता "हे भगवान" म्हणायची सवय. त्यानुसार मी "हे भगवान" म्हणालो. हिंदी सिनेमांमुळे व इथे येणाऱ्या भारतीयांमुळे अल्लाला हिंदू लोक भगवान म्हणतात हे टॅक्सी-वाल्याला माहीत असावे. मी हिंदू आहे कळताच त्याचा पारा चढला. मी मुलाला "दार लॉक कर" म्हणून सांगताच "ह्या गाड्या हिंदुस्थानातल्या नाहीत, ह्यांची दारं लॉक करायची गरज नसते" वगैरे म्हणून त्याने दार अनूलॉक केले. मी त्याला म्हटले, की "नाहीतरी ह्या गाड्या ओमानमधे कुठे बनलेल्या आहेत? व लॉक करण्यात नुकसान तर काही नाही." ह्यावर तो आणखी भडकला, जास्तच अद्वातद्वा बोलू लागला. एकदा वाटले होते, की त्याला पोलीस-ठाण्यावर घेऊन जावे. पण "हे भगवान" ऐकल्यावर पोलिसांचे डोकेही फिरले तर काय घ्या? म्हणून तो विचार रद्द केला.

आमच्या ओमानी बांधकाम मंत्र्यांनी नवीनच फतवा काढला. ऑफिसमधल्या प्रत्येक बिगर ओमानीने एकतर सफारी घालायचा वा शर्ट-पॅन्ट घातली असेल तर टाय लावायचा. ओमानी पांढरा पायघोळ झगा व डोक्याला टॉवेलासारखे फडके बांधून येत. इथे जीवघेणे उकडायचे आणि टाय लावून आले पाहिजे हा हुकूम!

घरात एयरकंडिशनर्स होते. कचेऱ्याही वातानुकूल केलेल्या होत्या. त्यामुळे तिथे टाय लावण्याचे इतके जाणवत नसे. पण टॅक्सीकरता उभे राहायचे, टॅक्सीतून यायचे-जायचे म्हणजे फार त्रास होत असे. कारण टॅक्सीज काही वातानुकूल केलेल्या नसत. त्यामुळे फार चिडचिड होत असे. पण म्हणतात ना, सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. चिडचिड होई ती फक्त टाय लावण्यामुळे होणाऱ्या त्रासाकरता नसे, तर हे लोक आपल्याला पगार देतात त्याचा हे गैरफायदा घेताहेत, असे वाटत राही. ह्यापेक्षा त्यांनी चक्क ओमानी छब्बे घालायला सांगितले असते तर बरे झाले असते असे वाटायचे.

तसेच कार्डपंच करण्याबाबतही वाटत असे. एकतर ही पद्धत हिंदुस्थानात फक्त फॅक्टऱ्यां-तून आहे. मध्यवर्ती सरकारात राजपत्रित अधिकारी म्हणून रुजू झालो असल्यामुळे मी आयुष्यात कधी मस्टरवरदेखील सही केली नव्हती. कारण भारतात राजपत्रित अधिकाऱ्यांना मस्टरवर सही करण्याची गरज नसते. उलट, इथे आल्यावर दररोज कामगारांसारखे कार्ड पंच करायला लागणार कळल्यावर फार चीड आली. मग आम्ही हिंदी, पाकी, सुदानी सगळे जमलो व ह्याबाबत काय करता येईल ह्याचा विचार करू लागलो.

"हे गोरे साहेब पण पंच करतात का?" मी विचारले.

"हो, ओमानी लोक सोडून बाकी सगळ्यांना कार्ड पंच करायला लागतात."

"मग आपल्याला काही बोलायचा अधिकारच नाही आहे." मी त्या चर्चेचा समारोप करत म्हटले.

नंतर त्या कार्डपंच करण्याच्या गोष्टीची सवय झाली. एवढेच नाही तर त्याबाबत मन अगदी कोडगे झाले. त्या कार्ड पंच करण्याच्या नियमाचा फायदा कसा करून घेता येईल, त्यातून पळवाट कशी काढता येईल ह्या गोष्टीचा विचार करू लागलो.

पंच करून झाल्यावर ती कार्डे ऑफिसात नेऊन देण्याच्या कामावर आपल्या रत्नागिरी-कडला कोणी मुसलमान तरुण होता. प्रथम मराठी म्हणून त्याची ओळख झाली. पुढे मी त्याला एकदोनदा माझ्या लायसेन्सवरच्या दारूच्या बाटल्या दिल्या. त्यामुळे ओळख पक्की पण झाली. आता मला उशीर झाला तरी तो माझे कार्ड बिनबोभाट पंच करून साहेबाकडे पाठवून देई. अर्थात असे क्वचितच होत असे.

म्हणजे मन नुसते कोडगेच नाही तर भ्रष्ट पण आहे. प्रथम कार्ड पंच करायला लागणार म्हटल्यावर त्याविरुद्ध माझा स्वाभिमान जागृत झाला होता. ते मला अपमानास्पद वाटत होते. पण ओळखीच्या बळावर परस्पर कार्ड पंच करून घेण्यात माझ्या मनाला काही वाटले नाही.

भा टाइम-कीपरला दारूच्या बाटल्या दिल्या व इतरही हिंदी मित्रांना देत असे. ह्याचा अर्थ मी त्या त्यांना फुकट देत होतो असा नाही. फक्त माझ्या लायसन्सवर मी त्यांना बाटल्या मिळवून देत होतो. हे दारूकरता लायसन्स प्रकरण 'खास ओमानी' असावे.

ओमान हा मुसलमान देश. त्या धर्मात मद्य पिण्याला बंदी आहे. सौदी अरेबियात वगैरे ती फार कडकपणे पाळतात. कारण ते मुसलमानांचे धर्मक्षेत्र आहे. तिथे स्वदेशी माणसाला तर नाहीच पण परदेशांतल्यांनाही पिण्याची सक्त मनाई आहे. ओमानमधली बंदी तितकी कडक नाही. परदेशी लोकांची सोय व्हावी म्हणून दारू विकण्याची दुकाने आहेत. दारू खरेदी क़रायला परवाना लागतो. तो पोलीसखात्याकडून मिळतो.

असा परवाना ओमानी माणसाला मिळत नाही. पाकिस्तानी वा हिंदी, मग ते मुसलमान असले तरी परवाना मिळतो. पण असा परवाना काढायला ते लोक लाजत असतात. कारण आपण मुसलमान असून दारू पितो – अधर्माचे काम करतो हे मान्य करण्यासारखे होते. असे उघडपणे कोण मान्य करील ? पण प्यायची तर असते, त्याशिवाय राहवत तर नाही, त्या वेळी आमच्यासारखे लोक मदतीला येतात.

परवाना मिळण्याची पद्धत अशी, की तुम्ही जिथे काम करत असता तिथून पगाराचे प्रमाणपत्र घ्यायचे. ते फोटोबरोबर पोलिसांत द्यायचे. बरोबर पाचशे रुपये म्हणजे ओमानी वीस रियाल फी. मग पोलीस तुम्हांला तुमच्या पगाराच्या एक पंचमांश रकमेइतकी दारू दर महिन्याला विकत घेण्याचा परवाना देतात. असा परवाना एका वर्षाचा असतो. कुठल्याही दुकानातून दारू विकत घेता येते. पण ती फक्त परवान्यावर फोटो असेल त्यालाच मिळते. त्या त्या महिन्याला त्या त्या महिन्याचा कोटा संपवावा लागतो.

ही सगळी नियमावली झाली. खरी मजा व बारकावे तसा परवाना काढल्यावरच कळायला लागतात. पाक, हिंदी मुसलमान असा परवाना काढायला 'धार्मिक' कारणाकरता लाजतात व हिंदू असा परवाना घ्यायला फारसे उत्सुक नसतात.

एकतर परवान्याकरता लागणारी पाचशे रुपयांची रक्कम लोकांना जास्तीची वाटते, न परवडणारी वाटते. पण त्याहीपेक्षा जास्त न परवडणारी गोष्ट म्हणजे तुमच्याकडे परवाना आहे हे कळल्यावर सगळे जण तुमच्या कोट्यातली दारू मागतात. अगदी ओमानी अधि-कारीसुद्धा. बाकी बाबतींत कचेरीचे लोक चालढकल करत असले तरी परवान्याच्या बाबतीत ते फार तत्पर असतात. तुम्हांला लवकरात लवकर परवाना मिळणे हे त्यांच्या दृष्टीने फार

नफ्याचे असते. कचेरीतल्या लोकांना कोणाला किती रियालचे परवाने मिळाले आहेत ह्याची माहिती असते. कारण त्यामुळे त्यांची दारू मिळायची सोय होते.

अर्थात हे दारू देणे चोरूनमारूनच होते. कारण जर हे सरकारला कळले तर ज्याने दारू दिली त्याची व ज्याने दारू घेतली त्या दोघांची त्यांच्या त्यांच्या मायदेशी पाठवणी होते. ओमानींना त्यांच्या धर्माज्ञेप्रमाणे शिक्षा होते. अर्थात आत्तापर्यंत अशी शिक्षा झालेली कधी कोणी ऐकले नाही. होणार कशी ? मंत्र्यांपासून अगदी चपराश्यांपर्यंत सगळे अशा प्रकारे दारू मिळवत असतात. पण नियम आहे खरा व लोक त्याला वचकून असतात.

परवान्याचा आणखी एक नियम म्हणजे तुम्ही दुकानातून दारूच्या बाटल्या घेऊन जाताना चांगल्या झाकून नेल्या पाहिजेत. अगदी दिसता कामा नयेत. कारण काय, तर लोकांच्या धार्मिक भावना दुखावतात.

आपल्या धार्मिक भावनांची हे लोक खूप जपणूक करतात. निदान त्याचा बाऊ तरी करतात. आणखी एक नियम असा, की पुरुषांनी घराबाहेर असता अर्ध्या चड्ड्या घालायच्या नाहीत. का ? तर ह्यांच्या बायका ते पाहतील.

आणि ह्याच लोकांना दुसऱ्या धर्माच्या लोकांच्याही काही धार्मिक भावना असतात ह्याची खबरही नसावी ? हिंदू लोक गाईला पवित्र मानतात. ते योग्य की अयोग्य हा प्रश्न नाही. पण मानतात हे खरे. निदान त्यांच्यादेखत वा खुलंखुले गाईला मारू नये म्हणून तशा मारण्यावर बंदी आणावी म्हटले, की ह्यांच्या हक्कावर गदा येते. त्याबद्दल ते आरडाओरडी करतात. मी काही जुन्या विचाराचा नाही. अगदी गाईचे मांस पण खातो. मला म्हणायचे आहे ते ह्या लोकांच्या मनोवृत्तीबद्दल. पण हिंदुस्थानातसुद्धा आपण त्याबद्दल काही करू शकत नाही तर इथे काय करणार ?

ह्या ओमानी लोकांचे धर्मभावना-प्रकरण खरेच मनापासूनचे आहे का ही ह्यांना नव्याने मिळायला लागलेल्या पेट्रो-डॉलर्सची मस्ती आहे ? अगदी गोऱ्या साहेबापासून ते काळ्या सिलोनी लोकांपर्यंत ह्यांचे नोकरदार आहेत. पैशाकरता कोणतेही काम करायची त्यांची तयारी असते, तेव्हा त्यांना आपल्या म्हणण्याप्रमाणे वाकवायची आपल्याला पूर्ण मुभा आहे अशी तर ह्यांची भावना झाली नाही आहे ना ?

एकदा मी व अमानुल्ला असेच त्यांच्या धर्मातल्या दारू पिण्याच्या बंदीबद्दल बोलत होतो. अशा बंदीचा काहीही उपयोग होत नाही हे माझे म्हणणे त्याने मान्य केले. पण नंतर थोडा वेळ विचार करून तो म्हणाला, "नाही साहेब, आमच्या धर्मात दारूला बंदी आहे तेच चांगलं आहे. दारूबंदी नसती तर ह्या रानटी आणि जंगली अरब लोकांनी काय केलं असतं, ते सांगणं अवघड आहे."

सगळे अरब अतिशय असंस्कृत व मागास आहेत असे पाकिस्तानी व भारतीय मुसलमानांचे मत; तर भारतीय मुसलमान व पाकिस्तानी हे खरे मुसलमानच नाही आहेत, असे अरबांचे मत.

बायकोचे पत्र आले आहे. नेहमीप्रमाणे निळ्या रंगाचे एयर-लेटर आहे. मला अशा एयर-लेटर्सचा फार राग आहे. कामाची पत्रे, निघतो आहे, सुखरूप पोहोचलो अशा अर्थाची पत्रे फार तर एयर-लेटर्सवर लिहावीत.

चांगले पॅड घ्यावे, तेही शक्यतो हलक्या रंगाचे, त्याला साजेशा रंगाचे पाकीट असावे, पत्राला चांगला समास सोडलेला असावा, पत्र पाठपोट लिहू नये हे मी तिला कितीतरी वेळा सांगितले आहे. त्याच्याकरता चिडचिड केली आहे. पण तिच्या वृत्तीत काही फरक पडत नाही, आणि ह्यापुढे कधी पडेल असे वाटत नाही.

ती म्हणते, ह्या सगळ्या देखाव्याची काय गरज आहे? पत्र कोणत्या व कशा कागदावर लिहिले आहे, पाकीट कसले आहे, ह्या गोष्टींना किती महत्त्व द्यायचे? पण मला वाटते, की ह्या सगळ्या गोष्टींना फार महत्त्व आहे. ज्याला तुम्ही पत्रे लिहिता, त्याची तुम्ही किती पर्वा करता, त्याच्याबद्दल तुम्हांला काय वाटते, ते ह्याच अशा बारीकसारीक गोष्टींनी अगदी संपूर्णपणे कळले नाही तरी उलगडत जाते.

आपल्याकडे कुणी जेवायला येणार असले म्हणजे आपण फक्त चांगले जेवणाचे बनवून थांबत नाही. आपण आपले घर चांगले आवरून तर ठेवतोच पण फुलदाणीत ताजी फुले वगैरे ठेवून घर सुशोभित करतो.

मग फक्त पत्रांबद्दल इतकी अनास्था का? त्यांत सौंदर्य व सुशोभितपणा ह्यांचे इतके वाकडे का? पत्र हीसुद्धा एक प्रकारची मेजवानी नाही? एक तऱ्हेची भेट नाही? मग त्याला महत्त्व द्यायला नको? पण का कोणास ठाऊक, बायको नेहमी आपले एयर-लेटरच पाठवते.

ज्या पत्राची आपण इतकी वाट पाहत होतो ते असे एयर-लेटर आलेले पाहूनच माझी चिडचिड होत असे. त्या चिडचिडीतच ते पत्र वाचले जात असे. आता कितीही चांगले पत्र असले तरी अशा मनःस्थितीत वाचलेले पत्र गोड कसे लागावे?

पत्रात बायको घरातल्या इतर सगळ्या गोष्टींबाबत, नातेवाइकांबाबत अगदी भारंभार लिहीत असे. मला ह्या सगळ्या गोष्टींपेक्षा माझ्या लिखाणाबद्दल तिने काहीतरी लिहावे, त्याबाबत काही कळवावे असे वाटत असे आणि त्याबद्दल एक शब्दही नसे.

हे सगळे अनपेक्षित होते. त्यामुळे मनाला फार यातना होत. इतकी वर्षे लग्नाला होऊन, सुखदुःखाच्या प्रसंगांत एकमेकांना साथ देऊन, आलेल्या अडीअडचणींना बरोबर सामोरे जाऊनसुद्धा एकमेकांच्या भावना एकमेकांना कळू नयेत? जे एकाला सतत टोचते आहे त्याची जाण दुसऱ्याला इतकीही नसावी? आमचे आगगाडीतल्या प्रवाशांसारखे का व्हावे? म्हणजे ते सगळे जण बरोबर प्रवास करत असले तरी प्रत्येकाचे उतरण्याचे स्टेशन वेगळे! गाडीला उशीर झाला किंवा अगदी अपघात झाल्यावर काय समभावना निर्माण होतील तेवढ्याच. बाकी प्रत्येकाचे आपआपले वेगळे व्यवधान.

आजच्या पत्रात बायकोने प्रभाकरच्या लग्नाची खबर दिली आहे. खबर म्हणजे लग्न कधी झाले, कसे झाले, कोण कोण आले होते वगैरे कळवले होते. त्याचे लग्न होणार होते, ते मला ठाऊक होते. किंबहुना ते होण्यात व तेही लवकरात लवकर होण्यात मी हातभार लावला होता.

ह्या प्रभाकरचा व माझा गेल्या पंचवीस वर्षांचा परिचय. माझ्या खात्यात व माझ्यासारख्याच हुद्यावर हा होता. मुंबईच्या मध्यवर्ती सरकारच्या अधिकाऱ्यांच्या कॉलनीत जवळजवळच्या इमारतींत आम्ही राहत होतो. बुद्धिबळाच्या डावाला चुकीची सुरुवात करणाऱ्याच्या खेळाची जशी थोड्या वेळात शोचनीय स्थिती होते तशी प्रभाकरच्या आयुष्याची झाली होती.

ह्या चुकीच्या खेळामुळे बहुतेक सोंगट्या मारल्या गेलेल्या असतात. वझीरही गेलेला असतो. एखादा उंट, एकदोन प्यादी, एखादा हत्ती राहिलेला असतो. राजा आपला कायम

चेक' झालेला व त्यातून बाहेर पडण्याचा केविलवाणा प्रयत्न करत असलेला. त्याचा आयुष्यपट पण असाच तिरपागडा झालेला.

माझ्याच वयाचा, मध्य प्रदेशात गेली काही शतके राहत असलेल्या मराठी कुटुंबातला, सडसडीत, उंच, बुद्धिमान पण थोडा तडक माथ्याचा प्रभाकर उगाच सगळ्या जगाशी वितंडवाद घाली. बरे, हा वाद स्वतःच्या काही फायद्याकरता असावा तर तेही नाही. कोणा तिसऱ्याकरता चौथ्याशी भांडणारा! पण मनाने फार उमदा, कोणालाही मदत करायला कायम तत्पर. कधीही स्वतःच्या फायद्यातोट्याचा विचार न करणारा.

बाकी त्याचे चरित्र म्हणजे शरदबाबूंच्या कादंबऱ्यांतल्या नायकांसारखे.

त्याचे लग्न मोठे दुःखाचे ठरले. परदेशात असताना हा आजारी पडला. हॉस्पिटलच्या वास्तव्यात तिथल्या नर्सचे व ह्याचे प्रेम जमले. ती परभाषी, वयाने मोठी, दिसायला बेताची. लग्न झाले. चांगला मुलगा झाला. नंतर त्यांचे काय बिनसले, कळले नाही. पण अगदी जाम बिनसले. आपसांत पटेना म्हणजे बिलकुल पटेना. तिने ह्याला खूप छळले. ती ह्याला धड तलाक देईना, धड प्रेमाने त्याच्याबरोबर राहीना.

काही दिवसांनी प्रभाकरची कलकत्त्याला बदली झाली. आतापर्यंत मनाने दूर गेले होते, आता शरीराने पण कित्येक योजने दूर गेले. प्रभाकरचे दारू पिणे सुरू झाले. पुढे ते वाढत गेले. हा बायकांकडे जायला लागला. काही दिवसांनी बायकांना घरी आणायला लागला. तशाच एका आभा नावाच्या मुलीची व ह्याची ओळख झाली. जास्त जवळीक निर्माण झाली.

मुंबईला बदली झाली तशी प्रभाकर आभाला घेऊन मुंबईला आला व तिच्यासह सरकारी अधिकाऱ्यांच्या वसाहतीत राहायला लागला. त्या वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांच्या वसाहतीत ही एक अजब व अनहोनी गोष्ट घडली होती. एका मराठी अधिकाऱ्याच्या घरात एक बंगाली मुलगी 'तशीच' राहत होती. प्रभाकरला त्याचे काही वाटत नव्हते किंवा त्या गोष्टीचा जाचही होत नव्हता. जी काय मानहानी व्हायची ती त्या बिचाऱ्या आभाला सहन करायला लागायची. अधिकाऱ्यांच्या बायका तिला 'आपल्यातली' मानायला तयार नसत. आपल्यात घेत नसत. घरच्या कोणत्याही समारंभाला बोलवत नसत. जणू त्यांनी तिला वाळीतच टाकले होते. अशी त्यांची दोन-अडीच वर्षे गेली.

माझी काबूलहून बदली झाली ती मुंबईला. मलासुद्धा त्या वसाहतीत जागा मिळाली. प्रभाकरला मी आणि माझी बायको कित्येक वर्षांपासून ओळखत होतो. तेव्हा आमची मैत्री मागील पानावरून पुढे सुरू झाली.

प्रभाकरबरोबरच्या त्या बंगाली मुलीला — म्हणजे आभाला — आम्ही प्रथमच भेटत होतो. बंगाली काळेपण काही वेगळे असते, तशी ती काळीसावळी, उंचीला फार नाही. खास काळेभोर मोठ्ठाले डोळे व तेवढेच काळेभोर बंगाली लांबसडक केस. अतिशय चलाख व बुद्धिमान. आमच्याकडे आम्ही तिला मोकळेपणी बोलवत असू. ती प्रभाकरची मिसेस नव्हती ह्याला आमच्या दृष्टीने काही किंमत नव्हती. काही दिवसांतच आभा आम्हा दोघांची मैत्रीण झाली.

तिला कॉलनीतल्या बायका वाळीत टाकून होत्याच. आता तिच्याबद्दल वाईटसाईट बोलू लागल्या. ते आता तिला सहन होईना. तेव्हा ती प्रभाकरच्या "लग्न करा" म्हणून मागे लागली. पहिल्या लग्नाच्या गरम दुधाने प्रभाकरचे तोंड भाजले होते. त्याची दुसऱ्या लग्नाच्या ताकाकडे नुसती पाहण्याचीसुद्धा इच्छा नव्हती; तर पिण्याची गोष्ट बाजूला.

एकदा मी त्यांच्याकडे असाच गप्पागोष्टी करायला गेलो. तेव्हा आभाने आपली बाजू माझ्यासमोर मांडली. मला तिचे म्हणणे योग्य वाटत होते. ह्यापुढे लग्नाशिवाय त्याच्याकडे राहायची तिची तयारी नव्हती. लग्न झाल्यासारखे राहणे आणि लग्न झाल्यावर राहणे ह्यांत तिच्या दृष्टीने फार मोठा फरक होता.

"लग्न करा काय ?" प्रभाकर आपल्या कडक आवाजात म्हणाला, "मी आत्ता पंचावन्नीला पोहोचलोय. ही तेवीस वर्षांची. आमचं निभणार कसं ?"

"त्याची तुम्ही काळजी करू नका. मी ते पाहून घेईन." आभाचे ठाम उत्तर. "पणं मी ह्यापुढं अशीच राहणार नाही."

ज्यांना कॉलगर्ल म्हणतात त्यांपैकी ती एक. लग्न होऊन मानाने राहण्याकरता तिचा जीव आसुसला होता. त्यातून प्रभाकर हा बाकी फार चांगला व गुणी होता. आभावर त्याचा जीव होता. इतका, की तिच्याकरता त्याने दारू प्यायचे पण सोडले होते.

मग आमचे बरेच बोलणे झाले. लग्नाशिवाय त्याच्याकडे राहण्यामुळे आभाची फार कुचंबणा होते आहे हे प्रभाकरला मान्य होते.

"हे तुला मान्य आहे तर मग तुझी अडचण तरी काय आहे ?" मी विचारले.

"माझ्याकडे सध्या पैसे नाहीत, लग्नाला." प्रभाकर म्हणाला.

ते खरं होते, की त्याने सांगितलेल्या सगळ्या अडचणींवर मात करण्याची तयारी आभाने दाखवल्यामुळे प्रभाकरने हा मार्ग काढला होता, कोणास ठाऊक ? कारण पैशाच्या अडचणीवर त्या मुलीकडे उपाय नव्हता.

"ही मात्र अडचण आहे खरी." मी म्हणालो व सहज विचारतो आहे असे भासवून विचारले, "साधारण किती खर्च येईल ?"

"हे बघ, लग्न रजिस्टर केलं, तरी हिला मंगळसूत्र तरी करायला लागेल. निदान दहा-बारा जणांना हॉटेलमधे जेवायला न्यायला लागेल."

ह्यावर मी "हो, हो" म्हणत होतो.

थोडा विचार करत तो म्हणाला, "निदान चार हजार तरी लागतीलच."

"मग तेवढे मी तुला एकरकमी देतो." मी म्हणालो.

हे ऐकून आभाच्या तोंडावर जे हास्य चमकले व जो आनंदाचा तरंग उमटला, तो बघून माझे पैसे सार्थकी लागले असे वाटले. हा पैशाचा प्रश्न असा अचानकपणे सुटेल असे तिला वाटले नव्हते.

प्रथम प्रभाकरला काय बोलावे ते कळेना. मग त्याने "मी जवळजवळ वर्षभर पैसे परत देऊ शकणार नाही. दर दोन महिन्यांनी दोनशे परत देईन." वगैरे अटी घालायला सुरुवात केली. मी अर्थातच त्या ताबडतोब मान्य केल्या. आता मी मसकतला जाणार होतो तिथे चांगला पैसा मिळणार होता. आणि मला असे वाटायचे, ह्या सगळ्यांपेक्षा वेळेवर जर पैसा स्वतःच्या व मित्रांच्या कामी आला नाही तर त्या पैशाचा उपयोग काय ?

मी मसकतला जाण्याकरता मुंबई सोडण्याआधी बायकोला सांगून प्रभाकरला पैसे देण्याची व्यवस्था केली होती. त्याप्रमाणे ते लग्न पार पडले. बायको रजिस्ट्रारच्या ऑफिसात गेली. तिने साक्षीदार म्हणून स्वाक्षरी केली. नंतर ते सगळे हॉटेलात जेवले. हे सगळे बायकोने पत्रात लिहिले होते. आपल्या घरचेच एखादे कार्य पार पडले असे मला वाटले व मी समाधान पावलो.

नंतरच्या आठवड्यात आलेल्या पत्रातही एक आनंदाची व समाधानाची बातमी होती.

बायकोला तिच्या लिहिण्याच्या संदर्भात 'टाटा'मधले एक उच्च मराठी अधिकारी भेटले. बोलताना माझा विषय निघाला तेव्हा त्यांनी माझ्या लिखाणाचे खूप कौतुक केले. आपण त्या लेखांची कात्रणे अमेरिकेत असलेल्या मुलाकडे पाठवतो वगैरे पण सांगितले. 'अरे, मला हेच तर हवं असतं.' मी मनाशी मोठा आनंदित होऊन म्हणालो व दिवाळी अंकाकरता जेठा मारून लिहायला बसलो.

कोणी ते आता लक्षात नाही, पण बहुधा अनवर पाशाने असावे, आज एक लहानसे पांढरे फूल आणून दिले. त्याचे मला ना नाव ना गाव माहिती. मग अनवरनेच मला माहिती दिली. उर्दूत त्या फुलाला 'सदाबहार' म्हणतात म्हणून. कारण ते वर्षभर येत राहते. फूल तर छान होतेच पण त्यांचे नाव तर त्याहून सुंदर होते. सदाबहार!

सदाबहारचे फूल पाहून अर्थातच जानकीची तीव्रतेने आठवण होणे साहजिक होते. दिसायला सुंदर, स्वभावानं सुंदर, नावानं सुंदर, जणू सदाबहार फूलच.

ते फूल पारदर्शक टेपने डायरीच्या पहिल्या पानावर चिटकवून दिले. त्यामुळे ते खराब होणार नाही. गहाळ होणार नाही. आणि सतत दिसत राहील.

राहायला जागा मिळाल्यामुळे स्थिरता आली. आता सांस्कृतिक कामाकडे लक्ष द्यायला हरकत नव्हती. ह्या बाबतीत माझा पहिल्यापासून उत्साह होता. कलकत्त्याला असताना महाराष्ट्र-मंडळाचा मी एक वर्ष चिटणीस होतो. इंफाल-शिलाँगला अगदी हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी मराठी मंडळी होती. तिथे मंडळ वगैरे बनवायची काही शक्यता नव्हती तरी पण आम्ही एकत्र जमून चहापाणी करत असू. काबूललाही अगदी मोजकीच मराठी मंडळी होती. तरी पण तिथे आम्ही गणपतिउत्सव साजरा केला होता.

इथे इंडिया क्लब नावाचा क्लब आहे. वर्षातून त्यांचे चारपाच कार्यक्रम होत असतात असे ऐकले होते. त्याबद्दल चौकशी करायला प्रथम लागलो. इथे गेली आठदहा वर्षे राहणाऱ्या बंगाल्याला पकडला. आमच्या खात्यात तो कारकून होता.

''इंडिया क्लब ?'' एखाद्याला भुताबद्दल विचारले तर तो माणूस ज्या तऱ्हेने चमकून उत्तर देईल त्याप्रमाणे त्या बंगाल्याने उत्तर दिले. ''हॉ, हॉ, इथं एक इंडिया क्लब आहे असं ऐकलं आहे खरं. पण आपण त्या भानगडीत नसतो बुवा कधी.''

मग हाच किंवा असाच प्रश्न लहानापासून थोरापर्यंत जे भेटतील त्यांना विचारायला लागलो. खेदाची गोष्ट अशी, की बहुतेकांची उत्तरे त्या बंगाल्यासारखीच होती. आपण हिंदी आहोत व हिंदुस्थानी क्लबशी आपला काही संबंध आहे हे मान्य करायला लोकांना इतके कानकोंडे का वाटत होते कळत नाही. अशा तऱ्हेचा क्लब आहे हेच आपल्याला माहीत नाही म्हणून बहुतेक जण सांगत. काही जण क्लब माहीत आहे पण आपल्याला पत्ते खेळायला आवडत नाही किंवा चकाट्या पिटायला जाणे आवडत नाही म्हणून सांगत. काही जण आपल्याला क्लबात जायला आवडते पण कामामुळे जमत नाही म्हणून सांगत. भाषा व वाक्ये वेगळी पण अर्थ तोच, की आमचा इंडिया क्लबशी काही संबंध नाही आहे, हा.

शेवटी एकदाचा इंडिया क्लब कुठे आहे ते कळले. तो बराच दूर व गाडीशिवाय जाता

येणार नाही अशा जागी होता. माझ्याकडे गाडी नव्हती तेव्हा इंडिया क्लबचा सभासद होणे मला फारसे सोयीचे नव्हते म्हणून मी ती कल्पना बाद केली.

पण आता मी मला आत्तापर्यंत मिळालेल्या उत्तरांचे उट्टे काढून घेऊ लागलो. कोणी ''इंडिया क्लब कुठं आहे?'' वगैरे विचारले तर मी पण 'भूत पाहिले आहे का?' म्हणून विचारलेल्या प्रश्नासारखा चेहरा करू लागलो. चेहऱ्यावर गंभीर भाव आणून ''इंडिया क्लब? हॉ, हाँ, इथं एक तसा क्लब आहे म्हणून ऐकलंय खरं'' म्हणून 'बंगाली' उत्तर देऊ लागलो.

आमची आई जाऊन आता वर्ष होऊन गेले होते. अशी मधेच तिची आठवण यायची, पण आली की फार तीव्रतेने यायची. अगदी गडबडून जायला व्हायचे. एकदा अगदी विश्वास वसणार नाही असा प्रसंग घडला

माझ्या ह्या जागेची रचना अशी होती, की आल्याबरोबर समोर पॅसेज, डाव्या बाजूला दिवाणखाना व जेवणाची खोली आणि उजव्या बाजूला स्वैपाकघर. जरा पुढे दोन बाथरूम्स. डाव्या बाजूला लहान बेडरूम. जरा पुढे गेले, की मोठी बेडरूम. मी हीच बेडरूम वापरत असे.

एकदा असाच बऱ्याच रात्री लिहीत बसलो होतो. एयरकंडिशनर असल्यामुळे पॅसेजचे दार वंद होते. लिहिता लिहिता मला असे वाटले, की आई पॅसेजमधे उभी आहे. खरे म्हणजे आता ह्या वाटण्याला काय अर्थ होता? आईला माझ्या थोरल्या भावाने अग्नी दिला होता. अगदी माझ्या समक्ष. तरी पण परत परत आई पॅसेजमधे उभी आहे असे प्रखरतेने जाणवायला लागले. शेवटी ते इतके झाले, की मी खरेच ती पॅसेजमधे आहे का म्हणून ते दार उघडून बघून आलो!

परत लिहायला बसलो पण मन अस्थिर झाले होते. मग मनात हे आईचे भूत तर नसेल ना? असा प्रश्न येऊन नुसता चमकलोच नाही तर अगदी डळमळून गेलो.

मग मनाशी शांतपणे विचार केला, की भूत असले तरी ते आईचेच असेल ना? मग त्याला एवढे भ्यायचे काय? तेव्हा कुठे मन शांत झाले.

माझ्या आईचे अगदी वेगवेगळ्या अर्थाने चाकोरीबाहेरचे आयुष्य होते. लहानपणी तिला देवी, प्लेग यांच्यासारखे जीवघेणे आजार येऊन गेले होते. त्यांतून वाचली तर वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी तिचे लग्न आपल्यापेक्षा वयाने दुप्पट मोठ्या असलेल्या आमच्या वडलांबरोबर झाले. आमच्या वडलांचे ते तिसरे लग्न. पहिल्या दोघी बायका आजारपणात वा बाळंतपणात वारल्या होत्या. अर्थात हे सगळे माझ्या आईच्या काळात सर्रास घडणारे होते.

अघटित होते ते, आमचे वडील वारल्यानंतरचे माझ्या आईचे आयुष्य. त्यांच्या मृत्यूच्या वेळी मी दहा वर्षांचा होतो. माझ्यापेक्षा मोठी, लग्न न झालेली बहीण व एक भाऊ होता. तर माझ्यापेक्षा लहान तीन बहिणी होत्या. पण आई अश्रू ढाळत न बसता आल्या प्रसंगाला तोंड देऊन तिने आमचे शिक्षण व मुलींची लग्नकार्ये केली. हे तर केलेच, पण तिने समाजकार्यात भाग घेतला. कॉंग्रेस महिला समाज, दारूबंदी वगैरे कामांत तिने कसोशीने भाग घेतला. सगळ्या गावात व विशेषतः जुन्या गांधीवादी कार्यकर्त्यांकडून तिच्या कामाचे फार कौतुक झाले. कौतुक झाले नाही ते फक्त आमच्याकडून, त्यांतल्या त्यात माझ्याकडून असे मला नेहमी वाटायचे.

आई गेल्यानंतर तिचे सगळे करून आम्ही आपआपल्या गावी परतलो होतो. सिनेमात

कसा एकच प्रसंग परत परत दाखवतात तसा तिच्या मरणाचा प्रसंग माझ्या डोळ्यांसमोर येत असे.

एकदा संपादक मजकुरांशी बोलताना मी म्हटले होते, की चिं०विं०च्या पायाशी जाजमावर जरी मला बसायला मिळाले तरी मी स्वतःला धन्य समजेन. आज त्यांचे पत्र आले. त्यात त्यांनी म्हटले होते : "चिं०विं०जवळ खुर्ची जरी नाही तरी स्टूल टाकून तुम्हांला बसता येईल असे तुम्ही लिहिता."

ह्या प्रकारामुळे माझी छाती अगदी दडपून गेली. मला आयुष्यात प्रथमच काहीतरी पसंती मिळाली होती. जरी एका बाजूला छाती दडपली गेली तरी त्याच वेळी दुसरीकडे 'ओमानची सफर' हा लेख दिवाळी अंकाकरता म्हणून लिहिण्याला उत्साह आला.

---

मला येताजाता "हे भगवान तूही सहारा है" असे म्हणायची सवय आहे हे मागे सांगितले आहेच. काबूलमधले माझे अफगाण सहकारी पण माझ्याबरोबर तसे म्हणू लागले होते. त्यांना 'भगवान' म्हणजे हिंदू लोकांचा अल्ला ही कल्पना होती; पण त्याबद्दल त्यांच्या काही खास भावना होत्या असे नाही. अल्लाला इंग्रजीत गॉड म्हणतात तसे हिंदीत भगवान. पण इथे पाकिस्तानी वा ओमानी लोक भगवानाचे नाव काढले की चिडतात. भगवान वगैरे प्रकरण ओमानी लोकांना आपल्या हिंदी सिनेमांमुळे माहीत आहे.

आज मी "भगवान तूही सहारा है" म्हटल्यावर अमानुल्ला थोड्या खडूसपणे म्हणाला, "कोणत्या भगवानाला बोलावतो आहेस? तुमच्यात तर शेकडो भगवान आहेत."

"मग त्यानं काय फरक पडतो?" मी त्याला उलट विचारले, "ज्याचा भाव असेल तसा त्याचा देव."

माझ्या जवळच बसणाऱ्या चंद्राला आमच्या बोलण्यात रस निर्माण झाला. मी त्या दोघांना आपले वेगवेगळे देव, त्यांच्या मूर्तींमागच्या आपल्या धार्मिक भावना व विचार समजावून सांगितले. "एका गावाहून दुसऱ्या गावाला जायला तुम्ही कधी विमान, कधी आगगाडी, मोटार, टांगा कसा वापरता? मग अल्लाकडे जायला एकच एक मार्ग वा एकच एक धर्म कसा असेल? त्या त्या माणसाच्या कल्पनेप्रमाणं व श्रद्धेप्रमाणं ज्याला पाहिजे त्यानं तो धर्म अनुसरला तर काय हरकत आहे?"

त्याचप्रमाणे वेगळ्या-वेगळ्या मूर्तींबद्दलही मी त्यांना भाषण दिले. ते सगळे ऐकून अमानुल्ला विचार करू लागला. पण चंद्रा म्हणाला,

"तू हे मूर्ती वगैरेबद्दल म्हणतो आहेस ते ठीक आहे. पण मला ह्या मुसलमानांचं मूर्तीविषयीचं म्हणणं पटतं. आपण मूर्तींची आबाळ करतो. त्यांचा मान राखत नाही. आता आमच्या भगवान बुद्धाच्या मूर्तीचंच पाहा ना. ती मूर्ती डेकोरेशन म्हणून वापरलेली पाहिली की फार राग येतो."

ह्यावर मी काय बोलणार? कारण आमच्या घरात आम्हीच गणपतीची मूर्ती डेकोरेशन म्हणून वापरली होती.

इथे घरगड्यांचा प्रश्न फार तापदायक आहे. कारण इथे मुळी घरगडीच नाहीत. आणि जे आहेत ते ओमानी श्रीमंतांनी बाहेरून खास त्या कामाकरता आणलेले आहेत.

बाकी कोणाला वेळ असला व इच्छा असली तरी त्यांना कोणाच्या घरी पार्टटाइम असे काम करता येत नाही.

त्यामुळे भांडी घासणे, स्वैपाक करणे, केर काढणे वगैरे बायकांची म्हणून म्हटली जाणारी कामे इथे पुरुषांनाच करायला लागतात. आता बायकांची कामे काय फक्त इतकीच आहेत? ह्याच्या व्यतिरिक्त कितीतरी व कितीतरी महत्त्वाची कामे त्या करत असतात. ती कामें कोण करणार? पण त्याला काही इलाज नव्हता.

इथे शेकड्यांनी नव्हे तर हजारोंनी लोक सडे असे राहतात. त्यांची स्थिती तर केविलवाणी असतेच; पण कित्येक असे आहेत, की त्यांची बायकामाणसे इथे असूनसुद्धा त्यांना सडे राहावे लागते. त्यांची स्थिती तर केविलवाणेपणापलिकडली असते.

होते काय, की नर्सेस वा घरांतल्या आयांना इथे नोकरी मिळाली, की त्या नंतर आपल्या नवऱ्यांना बोलावून घेतात. ह्या नर्सेस वा आयांच्या राहण्याची सोय हॉस्टेल्स वा मालकांच्या घरी केलेली असते. तिथे त्यांच्या नवऱ्यांची राहण्याची सोय नसते. मग ते लोक दुसरीकडे राहतात.

इथे शहरात काही पार्क्स आहेत. त्यांत फक्त लहान मुलांना व बायकांना येण्याची परवानगी आहे. त्या घरकाम करणाऱ्या आया मालकांच्या मुलांना तिथे घेऊन येतात. तिथे त्यांचे नवरे त्यांना भेटायला येतात. पण त्यांना पार्कात जाता येत नाही. तेव्हा कुंपणाच्या बाहेर नवरा व आत बायको अशा गप्पागोष्टी करतात. ही सगळी जोडपी मुख्यतः केरळी असत. त्यांना तसे बघितले की अमानुल्ला म्हणायचा, "पैशाकरता माणूस किती तऱ्हेच्या तडजोडी करतो. किती तरी सुखांना वंचित होऊन घेतो!"

इथली सुलतानशाही कशी चालते ह्याची वानगी आज मिळाली. कोणा ओमानी कंत्राटदाराचा जॉन नावाचा एक केरळी साईट इंजिनियर आमच्या ऑफिसात येत असे. चारपाच वेळा येऊन गेल्यामुळे त्याची चांगली ओळख झाली. तो सांगत होता, की त्याच्या ओमानी मालकाचा म्हातारा बाप गेली अकरा वर्षे तुरुंगात आहे. म्हणजे हा सध्याचा सुलतान गादीवर आल्यापासून.

ओमानचा सध्याचा सुलतान छोटा कू — म्हणजे छोटी राज्यक्रांती — करून गादीवर आला. गादीवर येता येताच त्याने आपल्या म्हाताऱ्या बापाला व त्याच्याशी एकनिष्ठ असलेल्या लोकांना तुरुंगात टाकले. काही वर्षांतच म्हातारा सुलतान तुरुंगात वारला. पण त्याचे पाठीराखे अजून तुरुंगातच खितपत पडले आहेत. ह्या कॉन्ट्रॅक्टरचा बाप त्यांतला एक. नवीन सुलतानाला इंग्लंड-अमेरिकेचा पाठिंबा होता व अजून आहे. ओमानी छोटे राष्ट्र आहे म्हणून असेल कदाचित, ह्या 'कू'ची फारशी आरडाओरडी झाली नाही.

त्यामानाने ह्या सुलतान काबूसमध्ये 'सुलतानी'पणा खूप कमी आहे. बाकी देशांतून म्हणजे पाकिस्तान, अफगाणिस्तान वगैरे देशांतून पूर्वीच्या राज्यकर्त्यांना तर जिवानिशी मारतातच पण त्यांच्या कुटुंबीयांना, इतर नातेवाइकांना, एवढेच काय पण पाठीराख्यांना पण जिवाला मुकायला लागते. बांगला देशाच्या मुजिबूर रहिमानला तर मारलेच पण त्याच्या दहा वर्षांच्या

मुलीलाही सोडले नव्हते. हा ह्यांच्या संस्कृतीचा भागच झाला आहे की काय कळत नाही!

ओमानमधे कितीही महिनेच काय पण कितीही वर्षे राहिले तरी इथल्या लोकांबद्दल कधी आपलेपणा वाटणे शक्य नाही.

गेल्या दहाबारा वर्षात पेट्रोलमुळे श्रीमंत झालेला हा देश. पूर्वी खाण्याची भ्रान्त असलेल्या ह्या लोकांना सोन्याचा झरा लागला आहे. त्यामुळे अमाप श्रीमंती व सुखवस्तूपणा आला आहे.

आता हाताखाली अगदी इंग्लंड, अमेरिकेपासून तर पाकिस्तान, हिंदुस्थान आदी देशांपर्यंतचे गोरे आणि काळे लोक ह्यांच्याकडे कामाला असतात. सैन्यातले व पोलिसातले अधिकारी, इंजिनियर्स, डॉक्टर्स व बाकी एक्सपर्ट्स वयाने, अनुभवाने ह्यांच्यापेक्षा कितीतरी मोठे. पण ह्या ओमानींची भावना अशी, की ह्या सगळ्या लोकांचे इथे राहणे आपल्या मर्जीवर अवलंबून आहे, तेव्हा त्यांच्याशी कितीही उर्मटपणे वागले तरी त्यांनी चालवून घ्यायला पाहिजे.

एकदा एडवर्ड कार, आमचा ओमानी चीफ इंजिनियर व कोणी एक केरळी इंजिनियर काही कामाबद्दल चर्चा करत होते. बोलता बोलता त्या केरळी इंजिनियरने काही तांत्रिक मतभेद मांडला. ओमानी चीफ इंजिनियरचे मत काही वेगळे होते. पण त्याला आपले मत बरोबर व केरळीचे चूक कसे आहे हे सांगता येईना. तेव्हा तो भडकला, "तुला इथं काम करायचं असेल तर माझ्या म्हणण्याप्रमाणं करावं लागेल, नाहीतर मी तुला परत पाठवीन."

हे सगळे कचेरीच्या हॉलमधेच चालले होते. तिथे असणाऱ्या आम्हा ब्रिटिश, पाकिस्तानी, हिंदी, सुदानी, इजिप्ती अधिकाऱ्यांचा त्या बोलण्याशी काही संबंध नव्हता. पण त्या केरळी इंजिनियरला मारलेला फटका आपल्यालाच मारला आहे असे आम्हां सगळ्यांना वाटले. कारण हेच वाक्य कोणीही ओमानी कोणाही बाहेरच्या माणसाला म्हणू शकला असता. एवढेच नाही तर त्याची मायदेशी पाठवणी करू शकला असता.

सध्या मी मायकेल एंजेलोचे चरित्र वाचतो आहे. एंजेलो हा सगळ्या जगातल्या कलावंतांचा प्रतिनिधी ठरावा. कोणाही कलावंताला हवे असते आपल्या आवडीचे काम. पण बहुतेकांच्या नशिबी ते नसते. कधी पोटापाण्याकरता, कधी राज्यसत्तेकरता, कधी धर्मसत्तेकरता कलावंताला आपल्या नावडीचें काम करायला लागते. मायकेल एंजेलो हा मूर्तिकार. पण त्याच्या नशिबी आले भिंतीवर चित्रे काढण्याचे काम. त्याचा जीव मूर्ती बनवण्याकरता तडफडायचा पण त्याच्या तडफडण्याकडे कोण लक्ष देतो?

गेली पंचवीस वर्षे मी आर्किटेक्चरची कला राबवत होतो. सरकारी नोकरीत होतो तरी नुसती नोकरी म्हणून ते काम मी कधीच केले नाही. आर्किटेक्चरमधे मला रस होता. माझे ड्रॉइंगवर्क पण चांगले होते. पण त्या बाबतीतसुद्धा मला विशेष यश मिळाले नाही. यश म्हणजे नुसता पैसा, परदेशची स्कॉलरशिप वा परदेशाला पाठवणी वगैरे गोष्टी मिळाल्या असल्या तरी चांगले, मोठे प्रोजेक्ट असे काही माझ्या हातून शेवटपर्यंत झाले नाही. कधी माझी त्या जागेवरून बदली व्हायची. कधी ते काम मुळातच बाद व्हायचे. तरी पण माझा आर्किटेक्चरमधला रस कमी झाला नव्हता.

मला लिहायचे जमायला लागल्यापासून मात्र मी अगदी बदलून गेलो. वाटायचे, सतत लिहीत राहावे. मला कल्पना तर डझनांनी सुचतात. त्यामुळे त्यांचीही वाण नव्हती. वाटायचे, गोष्ट, नाटक, कादंबरी सगळे लिहिण्याचे प्रकार हाताळावेत. पण भाकरी मिळवण्याकरता नकाशे काढणे भाग होते.

ह्या देशाला ब्रिटिश लोक अगदी सगळ्या तऱ्हेने लुबाडत आहेत. पण त्या लुबाडण्यातही एक ब्रिटिश शिस्त आहे. एक पद्धत आहे. इथे आला रे आला की प्रत्येक ब्रिटिश अरबी भाषा शिकण्याचा प्रयत्न करतो. तशी शिकण्याची व्यवस्था ब्रिटिश वकिलात करते. हे झाले वैयक्तिक स्तरावर. सरकारी स्तरावर पुष्कळ गोष्टी केल्या जातात.

ब्रिटिश सरकारने मध्य आशियातील गल्फ देशांकरता एक अरबी-इंग्लिश डिरेक्टरी तयार केली आहे. तीत इथे काम करणाऱ्या सगळ्या ब्रिटिश कंपन्यांची, तंत्रज्ञांची, इंजिनियर्स, आर्किटेक्ट्सची संपूर्ण माहिती दिली आहे.

त्याचबरोबर ह्या देशांतल्या ब्रिटिश वकिलातींतून एक एक विशेष अधिकारी असतो. त्याचे काम हेच, की कुठे कुठे ब्रिटिश माल खपवता येईल, कुठली कुठली कामे ब्रिटिश कंपन्यांना देता येतील, कुठे कुठे ब्रिटिश तंत्रज्ञ, आर्किटेक्ट्स, इंजिनियर्स घुसवता येतील हे पाहायचे. तो अधिकारी वेळोवेळी ओमानी मंत्र्यांना, उच्च अधिकाऱ्यांना व वेगवेगळ्या खात्यांतून काम करणाऱ्या ब्रिटिशांना भेटत असतो. इथल्या मंत्रालयातून असलेले ब्रिटिश अधिकारी वकिलातीला सर्व तऱ्हेची मदत करत असतात.

ह्या ब्रिटिश धर्तीवर आपली वकिलात चालणे अगदी अशक्य. वकिलातीने काय किंवा बाकी हिंदी लोकांनी काय, भारतीय माल खपवणे, उच्च जागी आपल्या लोकांची भरती करून घेणे वगैरे गोष्टी अगदी असंभवनीय. ह्याचे साधे कारण म्हणजे ती आपली वृत्ती नाही. ते आपल्या रक्तातच नाही. आपले राजदूत त्या त्या वेळी पडलेल्या प्रश्नापुरते पाहतात. दूरदृष्टी ठेवून काही योजना आखायच्या असतात व त्याप्रमाणे हालचाली करायच्या असतात हे त्यांच्या गावीही नसते. आणि हे फक्त राजदूतांवर अवलंबून नाही. ही सगळ्या राष्ट्राची जबाबदारी आहे.

भारतीयांची वृत्ती तर आपल्याला बदलणे शक्य नाही. तेव्हा मला स्वतःला काही करता येईल का ह्याचा मी विचार करू लागलो.

हिंदुस्थानातून आलेले शेकडो लोक वेगवेगळ्या क्षेत्रांत व वेगवेगळ्या हुद्यांवर काम करत आहेत. ओमानच्या प्रगतीला त्यांनी फार मोठा हातभार लावला आहे. पोलीस व सैन्य सोडून असे एकही क्षेत्र नसेल की ज्यात भारतीय महत्त्वाची कामगिरी बजावत नाही आहेत.

तेव्हा ह्या भारत-ओमानच्या सहकारावर एक चांगले ब्रोशर काढावे असा विचार मनात आला.

झाले ! कल्पना आली की तिच्यामागे कडाडून लागायचे हा माझा पहिल्यापासूनचा खाक्या. इंग्रजीत म्हणतात त्याप्रमाणे प्रत्येक दगड हलवून पाहायचा. त्याप्रमाणे चारदोन मोठ्या भारतीय कंत्राटदारांना भेटलो. त्यांना कल्पना समजावून सांगितली. ह्या ब्रोशरमधे त्यांच्या कंपन्यांची कामे, त्यांबद्दलची तांत्रिक माहिती, कामांची व काम करणाऱ्यांची छायाचित्रे येणार होती. आपल्या कंपनीची जाहिरात ह्या ब्रोशरमुळे अनायासे होणार आहे हे त्यांनी ताबडतोब

हेरले व सगळे सहकार्य देण्याचे कबूल केले. ब्रोशर काढायला मोठा थोरला खर्च होणार होता. त्या खर्चातला आपला वाटा उचलण्याची पण त्यांनी तयारी दाखवली.

परदेशात असताना अशी नुसती चांगली कल्पना वा खर्चाची तयारी असून भागत नाही. आपल्या राजदूतांचे आशीर्वाद, सहकार्य व मदत पण लागते. तसे असले म्हणजे त्या कामाला पत येते — वजन येते. एक दर्जा प्राप्त होतो. त्याचप्रमाणे ओमानी सरकारकडून मदत व सहकार्य मिळणे सोपे होते.

प्रथम इथल्या राजदूतांना भेटणे आवश्यक होते. तेव्हा त्याच्या मागे लागलो. राजदूतसाहेब कोणी नागा, खासी किंवा आसामकडले आदिवासी आहेत. त्यांचे नाव 'लालडेंगा'सारखेच काहीतरी वेगळे होते. त्यांच्याकडे भेट घेण्याची वेळ ठरवली.

मग ब्रोशरचा मुखवटा व कच्चा ढाचा तयार केला. मुखपृष्ठावर इंदिराजींचा व सुलतानाचा कोठल्यातरी वर्तमानपत्रात छापून आलेला फोटो कापून चिकटवला. चारपाच प्रकरणे पाडली. दोन्ही देशांचे ऐतिहासिक संबंध, उद्योगधंद्यातला सहयोग, शिक्षण व आरोग्य-विभागात हिंदी लोक करत असलेली मदत आणि काम, त्याचबरोबर मोठ्या मोठ्या प्रॉजेक्टवर काम करत असलेले तंत्रज्ञ व त्यांच्या कंपन्या वगैरे माहिती ठिकठिकाणाहून गोळा केली. रंगीत व काळीपांढरी चित्रे जमवली. ह्या सगळ्यामुळे ब्रोशर माहितीपूर्ण व चुटचुटीत झाले.

आतापर्यंत कोणी असा प्रयत्नसुद्धा केला नव्हता. तेव्हा राजदूतसाहेब अगदी खूष होऊन जातील अशी खात्री वाटू लागली.

अशा गोष्टींबाबत माझा काबूलचा अनुभव चांगला होता. सत्याहत्तर साली इंदिराजी काबूलला भेट देणार होत्या. ते कळताच मी तातडीने तिथल्या राजदूतांना भेटलो.

"इथं आम्ही जवळजवळ शंभर-सव्वाशे भारतीय तंत्रज्ञ अफगाणिस्तानच्या वेगवेगळ्या खात्यांतून कामं करतो आहोत, तर त्यांची कामं दाखवणारं एक छोटंसं प्रदर्शन का भरवू नये ? त्यायोगे भारत अफगाणिस्तानाकरता काय करतो आहे ते कळेल. पंतप्रधान काही नेहमी नेहमी येत नाहीत. ह्या संधीचा आपण फायदा घेतलाच पाहिजे." मी म्हटले.

काबूलच्या राजदूतांना ही छोट्या प्रदर्शनाची कल्पना फार आवडली. मी पुढाकार घेऊन ती अमलात आणली. ती फार यशस्वी झाली. राजदूत तर खूष झालेच पण स्वतः इंदिराजी पण खूष होऊन गेल्या व त्यांनी तसे प्रेस कॉन्फरन्समधे बोलून दाखवले.

ह्या अनुभवामुळे, ओमानमधल्या राजदूतांना भेटायला जाताना फार उत्साह होता. त्यांनी एका दिवशी अकरा वाजता भेटायला बोलावले. तेव्हा मी आणि माझ्या कचेरीतला मद्रासी सहकारी त्यांना भेटायला आपल्या वकिलातीवर गेलो.

वकिलात एका दुमजली साध्या इमारतीत होती. भारतीयपणाच्या खुणा जागोजागी दिसत होत्या. आत शिरल्यावर लोकांना थांबण्याकरता म्हणून मोठा हॉल होता. तिथे जुन्यापुराण्या मोठ्या टेबलांवर तितकीच जुनीपुराणी वर्तमानपत्रे पडली होती. बाकी फर्निचर अगदी दुय्यम प्रतीचे व जुनाट असे होते. कार्पेट्स किती मळखाऊ असू शकतात त्याचा जणू नमुनाच जमिनीवर अंथरला होता. पंतप्रधानांचा व राष्ट्रपतींचा फोटोसुद्धा फक्त सोय बघून लावला होता. एक लहान व एक मोठा, एक वाकडा तर एक तिकडा. हे सगळे बघून जिवात जीव आला. आपण भारतीय कुठेही गेलो तरी 'भारतीयपणा' सोडत नाही हे बघून हायसे वाटले. राजदूत पहिल्या मजल्यावर बसत. तेव्हा 'भारतीय' जिना चढून त्यांच्या सेक्रेटरीसमोर उभे

राहिलो.

सेक्रेटरी कोणी गोरी, बुटकी व जरा स्थूल म्हणता येईल अशी बाई होती. तिने साडी नेसली होती. पण मजेची व विचित्र वाटणारी गोष्ट म्हणजे साडीवर चामड्याचे जर्किन घातले होते. त्या वेळी तशी थंडी नव्हती असे नाही, पण चामड्याचे जाकीट हे कचेरीत घालून बसण्याची गोष्ट नाही हे त्या बाईच्या गावीही नव्हते. तिला वाटत होते, की आपण ह्या जर्किनमधे काय छान दिसतो आहोत! आम्हांलाही बघायला दुसरे काही नव्हते तेव्हा आम्ही तिला पाहत राजदूतसाहेबांच्या बोलावण्याची वाट पाहत थांबून राहिलो.

राजदूत आसामकडले कोणी आदिवासींपैकी आहेत हे मला माहीत असल्यामुळे ते दिसायला कसे असतील ह्याचा मी अंदाज केला होता. आनंदाची गोष्ट म्हणजे ते अंदाजाप्रमाणेच निघाले. उंचीला कमी, जाडे व गोरे. गोल चेहरा व बसके नाक. ते भारतीय असण्यापेक्षा कुणी चिनी, जपानी वा इंडोनेशियनच वाटले असते. त्यांची खोली बरीच चांगल्यापैकी ठेवली गेली होती. फर्निचर बऱ्यापैकी होते.

प्रथम वाटले होते, की 'तुम्ही नागांपैकी आहात का?' म्हणून विचारावे. आपण पण आसाममधे होतो वगैरे सांगून बोलायला खेळीमेळीने सुरुवात करावी. पण मग मनाशी विचार केला, की हा नागा टोळीचा न निघता जर चकमा वा अपांग टोळीचा निघाला तर त्याला केवढा अपमान वाटेल? आपल्याकडे नाही का कोणा कोकणस्थाला साधे देशस्थ आहात का म्हणून विचारले तर राग येत? तसेच ह्या आदिवासी टोळ्यांच्या लोकांचे. तेव्हा तो 'नागा' विचार मनातून झटकला व प्रथम मद्रासी सहकाऱ्यांची व नंतर स्वतःची ओळख करून दिली. मी पूर्वी कुठे होतो, काय् कामे केली होती, इंग्लंडमधले शिक्षण व काबूलमधला अनुभव पण सांगितला. हेतू हा की मी कोणीतरी अनुभवी व भारत सरकारातला वरिष्ठ अधिकारी आहे हे त्याला माहीत व्हावे.

नंतर माझी ब्रोशरबद्दलची कल्पना सांगितली. त्याचबरोबर त्याचा काय फायदा होईल वगैरे पण सांगितले. मी 'डमी' ब्रोशर बरोबर नेले होतेच. बोलणे झाल्यावर मी ते त्यांच्या हाती सुपूर्त केले.

राजदूतसाहेबांनी प्रथम ते उलटसुलट करून पाहिले. नंतर काही पाने चाळली व बाजूला ठेवून दिले व बोलू लागले. आम्ही मोठ्या उत्सुकतेने ते ऐकू लागलो. आमची ब्रोशर काढण्याची कल्पना उत्तम आहे असे ते सांगणार ह्याची खात्री होती. पण त्यांच्या चेहऱ्यावर तसे काही दिसेना. पूर्वेकडल्या लोकांच्या चेहऱ्यांचा हा खासपणा आहे. त्यांच्या चेहऱ्यावर राग, लोभ, क्रोध, मत्सर काही म्हणून काही भाव दिसत नाहीत.

पण साहेबांनी सुरुवात केली ती अगदी वेगळ्या गोष्टींनी. ओमानमधे भारतीयांनी कसे वागले पाहिजे – ओमानी लोकांच्या दडपणाला बळी न पडता योग्य तो सल्ला कसा दिला पाहिजे – योग्य ते निर्णय कसे घेतले पाहिजेत – ह्यांवरच भाषण द्यायला त्यांनी सुरुवात केली. आम्ही मोठेच बुचकळ्यात पडलो. आता ह्या गृहस्थाला काय सांगावे असा प्रश्न पडला. मधेच मी थोड्या युक्तीने आमच्या कामाचे स्वरूप फार वेगळे आहे, ह्यात भारत सरकारचा काहीही पैसा खर्च न होता उलट फायदाच होणार आहे हे त्यांच्या नजरेस आणून देण्याचा प्रयत्न केला. म्हटले, खर्च न होता फायदा वगैरे ऐकून तरी गृहस्थ ताळ्यावर येईल.

पण तो गृहस्थ डोक्यात काही म्हणून काही प्रकाश पाडून घ्यायला तयार नव्हता. मी तरी विजेचे बटण किती वेळा खालीवर करू? पद्धत म्हणून त्यांचे आभार मानले व बाहेर पडलो.

अगदी खजील होऊन निघालो. ते ब्रोशर निघण्यात माझा काही वैयक्तिक फायदा होणार नव्हता की मला काही पैसा मिळणार नव्हता. भारत ओमानकरता काय, काय करतोय ह्याची अनायासे जाहिरात होणार होती. ह्यात नाव झाले असते तर राजदूतांचेच झाले असते. त्यांचेच दिल्लीला थोडे कौतुक झाले असते. राजदूतासारख्या महत्त्वाच्या जागेवर काम करणाऱ्याला परमार्थ नाही तरी स्वार्थ तरी कळायला हवा. कोणी काही चांगली कल्पना घेऊन आला आहे तर त्याला उत्तेजन देण्याची वृत्ती तरी त्याच्या ठिकाणी असायला हवी.

ह्याचा अर्थ त्यांच्याकडे येणारी प्रत्येक कल्पना उचलून धरायला पाहिजे असे नाही. माझे ब्रोशर त्यांनी अगदी केराच्या टोपलीत टाकले असते तरी चालले असते. पण तेवढेसुद्धा कष्ट करायची त्यांची तयारी नव्हती. त्यांनी ब्रोशर खोलवर जाऊन न बघताच भारतीयांनी ओमानमधे कसे वागावे ह्याची कदाचित त्यांची नेहमीची रेकॉर्ड लावली.

राहण्याच्या जागेत आता स्थिर झालो आहे. घरात चांगले फर्निचर, उत्तमपैकी कार्पेट्स, मोठाल्या बेड्स, थोराड फ्रीज, गॅस-रेंज व चार एयरकंडिशनर्स – सगळे सरकारने दिलेले. ह्या सगळ्यांमुळे स्थिरस्थावर व्हायला म्हणून जो वेळ लागतो तो काही लागलाच नाही.

माझ्या मजल्यावर चार अपार्टमेन्ट्स आहेत. मागल्या भागात एक अमेरिकी मुलगी एकटीच राहते. इथे ओमान युनिव्हर्सिटी स्थापन होणार आहे. त्याची प्राथमिक तयारी करण्याचे काम एका ब्रिटिश शिक्षणसंस्थेला दिले आहे. ती अमेरिकी तिथे काम करते. त्या मुलीशी ओळख होण्याचा काही संभव नाही. कारण सकाळी ती उशिरा घर सोडते व रात्री खूप उशिराने येते. शुक्रवारी तर ती घरीच नसते.

माझ्या मागल्या फ्लॅटमध्ये एक तरुण तुर्की कुटुंब राहते. तो कुठल्यातरी खाजगी कंपनीत इंजिनियर आहे. त्यांना एक तीन वर्षांचा मुलगा व एक चारसहा महिन्यांची मुलगी आहे. मोठे आनंदी जोडपे आहे ते.

बरेच दिवस त्या तरुण तुर्काची व माझी ओळख फक्त 'हॅलो हॅलो' करण्यापुरती होती. एका प्रसंगाने त्याच्याशी बोलणे सुरू झाले.

एका रात्री त्यांची लहान मुलगी रात्रभर रडत होती. त्यांची बेडरूम माझ्या बेडरूमला जोडून होती. तिच्या रडण्याने मला जाग आली. रात्रीची लहान मुले रडणे मला काही नवीन नव्हते. मला काळजी पडली, की त्या लहान बाळाला काय होत असेल? पोटात दुखत असेल का? ह्या विचाराने माझी झोप उडाली ती उडालीच.

सकाळी कचेरीत जाताना त्या तुर्काची भेट झाली. "सॉरी हं, माझ्या मुलीच्या रडण्यानं तुझी झोपमोड झाली असेल ना?" तो थोडे कानकोंडेपणाने म्हणाला.

"माझ्या झोपमोडीची काळजी करू नकोस. माझी मुलं पण लहानपणी अशीच एखादवेळी रडत. काय झालं होतं तुझ्या मुलीला?"

"तेच काही कळलं नाही. बायको पण खूप घाबरून गेली आहे. दुपारी डॉक्टरांकडं घेऊन जाणार आहोत."

त्यानंतर तो आणि मी भेटलो, की गप्पागोष्टी करू लागलो. त्याची बायको इलेक्ट्रिकल इंजिनियर होती. लग्नाआधी व लग्नानंतरही नोकरी करत आली होती. मुले झाल्यावर तिने नोकरी सोडली होती.

एक दिवस सकाळचे आम्ही भेटलो. पाहतो तो त्याचा चेहरा खूप पडलेला होता. मी सहज चेष्टेने त्याला "सासूबिसू आली आहे की काय?" म्हणून विचारले. आणि काय आश्चर्य! खरेच त्याची सासू आली होती. त्याची मुलगी आजारी होती म्हणून त्याच्या बायकोने आपल्या आईला बोलावून घेतले होते. त्याची सासू आल्याचे मी बरोबर कसे ओळखले असा त्याला प्रश्न पडला. "अरे, सासू आली की माणसाचा चेहरा नुसता पडत नाही, तर तो हवालदिल झाला आहे हे त्याच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसतं." मी उत्तरलो. त्यावर आम्ही दोघे मनापासून हसलो.

एका गुरुवारी दुपारची त्याची-माझी माझ्या फ्लॅटच्या बाहेर भेट झाली. "काय बिअर वगैरे घेणार का?" मी त्याला विचारले. तो "नाही" म्हणाला. तेव्हा पिण्याबद्दल त्याच्या काही धार्मिक भावना आहेत की काय म्हणून मी विचारले, "छट्, तशा भाकड गोष्टींवर माझा विश्वास नाही. मला जरा बरं वाटत नाही आहे, म्हणून मी नाही म्हटलं." तो म्हणाला.

पुढल्या दोन अपार्टमेन्ट्समधे मी व आमच्या ऑफिसमधला दत्ता नावाचा एक बंगाली राहतो. तो इंजिनियर आहे व आपल्या कामात हुशार आहे पण वागण्यात खुळा आहे. अजून तो एकटाच राहतो आहे. दिवाळीनंतर त्याची फॅमिली येणार आहे.

आपण परदेशात आलो आहोत हे दत्ताला जाणवलेच नाही आहे. सुरुवातीला तो माझ्याकडे नुसता लेहेंगा घालून मुंबईचे लोक असतात तसा उघडाच्या उघडा यायचा. मी त्याला त्याविषयी म्हटले तर "तू तरी काय एकटाच आहेस. त्यात काय बिघडलं?" हे त्याचे उत्तर.

"अरे, शेजारी हे तुर्की जोडपं आहे. त्याची बायको किंवा शेजारची अमेरिकन मुलगी बाहेर आली किंवा त्यांच्याकडं कुणी आलं तर ते किती वाईट दिसेल?"

पण अशा उघडेवाघडेपणात काही गैर आहे हेच त्याला मान्य होईना. जेव्हा मी त्याला तसा येणार असशील तर माझ्याकडे येऊच नकोस म्हणून सांगितले तेव्हा कुठे तो शर्ट घालून येऊ लागला.

एकदा तर त्याने मजाच केली. त्या अमेरिकन तरुणीकडे भर दुपारची कोणीतरी तिची मैत्रीण आली. नेमकी ती घरी नव्हती. दत्ताचा फ्लॅट शेजारचा. म्हणून तिने दत्ताकडे चौकशी केली. दत्ताने तिचे योग्य ते स्वागत केले. अमेरिकन मुलीबद्दल जी काही माहिती होती ती सांगितली व नंतर "काही ड्रिंक घेणार का?" म्हणून विचारले.

पश्चिमी देशात 'ड्रिंक' ह्या शब्दाला विशिष्ट अर्थ आहे. तो अर्थ मनात घेऊन ती दुपारच्या उन्हाने पोळलेली मैत्रीण "कोणतं ड्रिंक आहे?" म्हणून विचारती झाली. त्यावर आमचे दत्ताबाबू म्हणाले, "वॉटर म्हणजे पाणी आहे माझ्याकडे."

हे पाणीदार उत्तर ऐकल्या क्षणी ती मुलगी जी काय भडकली ती ओमानच्या कडक उन्हाची पर्वा न करता तडक निघून गेली.

मधून मधून 'लचिन्सच्या दिल्लीतली प्रेमकथा' ह्या कादंबरीचा विषय मनात घोळवतो आहे. ही दोन तऱ्हेने रंगवता येईल. एक तर ब्रिटिश काळातली गोष्ट घेता येईल. दुसरी स्वातंत्र्यानंतरच्या काळातली दिल्लीत घडणारी गोष्ट लिहिता येईल.

पण मुद्दाम बसून अशी कादंबरीला सुरुवात करायला मनच घेत नाही. अपयशांची इतकी

खात्री असताा उत्साहाने काही कसे लिहिले जावे?

काही आंब्याची झाडे नसतात का उंच, हिरवीगार व डेरेदार? मोठा थोरला बुंधा व मोठाल्या फांद्या. पण त्यांना फळ म्हणून येत नाही. माझेही तसेच झाले आहे. पैसा, मानाची नोकरी, अतिशय चांगल्या चांगल्या कल्पना, त्या कल्पना राबवण्याची बौद्धिक पात्रता व कष्ट करायची तयारी हे सगळे असूनसुद्धा माझ्या आंब्याच्या झाडाला फळ म्हणून येत नाही. मी म्हणजे बिन-फळी आंब्याचे झाडच.

पण स्वतःला आंब्याचे झाड म्हणून घेण्यातसुद्धा मी थोडी चूकच करतोय. त्या बिन-फळी आंब्याच्या झाडांना निदान छाया तरी असते. लोक त्यांच्या सावलीत बसून विश्रांती तरी घेतात. त्या तसल्या झाडांची पाने तोरणे बनवायला उपयोगी पडतात. घरांना केवढी शोभा येते त्यांमुळे! माझा तसलाही काही उपयोग नाही. खरे म्हणजे मी म्हणजे बाभळीचे झाड. लगोलग त्यावर कविता केली.

काव्याचा एकंदर समाजावर काय परिणाम होतो वगैरे विषयावर विचार करण्याइतका काही मी विचारवंत नाही वा कुठला प्राध्यापक पण नाही. मात्र कविता केली, की कविता करणाऱ्याला बरे वाटत असावे. निदान मला तरी बरे वाटले, खूप हलके हलके वाटले.

आल्या दिवसापासून इथल्या लायब्ररीच्या शोधात मी होतो. त्याबद्दलची माहिती आज मिळाली. आज कळले की ब्रिटिश कौन्सिलची लायब्ररी जुन्या मसकतमधे आहे.

लगेच संध्याकाळी मी व माझा मद्रासी सहकारी जुन्या मसकतमधे गेलो. लायब्ररीची इमारत जरा आडवळणी जागीच होती. त्यामुळे शोधायला वेळ लागला. पण शेवटी सापडली.

जुनी, कोणा सुलतानाचा वाडा असलेली ही दुमजली इमारत काहीतरी शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वीची असावी. इमारतीपुढे मोठी मोकळी जागा होती. प्रवेशालाच दोन मजली उंच आढा असलेला पोर्च होता. हे सगळे सुबक लाकडातले काम होते. आत तीसएक फुटी चौक होता. त्याच्या चारही बाजूंनी सज्जा होता. तोही चांगल्या लाकडी कामातला होता. चौकात सुलतानाच्या वेळेपासून असलेली घंटा होती. घंटा पहिल्या मजल्यावर असली तरी तिची जाड साखळी अगदी जमिनीपर्यंत आली होती. पूर्वी सुलतानाला भेटायला कुणी आले तर त्याची वर्दी देण्याकरता ह्या घंटेचा उपयोग करत असतील. कौन्सिलने ती आता डेकोरेशन पीस म्हणून वापरली होती.

गुजराथी धाटणी असलेली ही इमारत बाकी साधीच असली तरी तिच्यात आकर्षकता होती. सौंदर्याचे काही खास गुण नसतानाही एखादी बाई कशी गोड वाटते? तसेच ह्या इमारतीचे होते. म्हणून तर ह्या इमारतीला आदल्या वर्षीचे 'आगाखान प्राईज ऑफ आर्किटेक्चर' मिळाले होते.

ओमानी लोकांना मोफत व इतरांना काहीतरी दहा रियाल म्हणजे दोनशे-अडीचशे रुपये वर्गणी घेतात. लायब्ररी फार मोठी नसली तरी पुष्कळ चांगली चांगली नवीन पुस्तके होती. म्हटले, वर्षभर पुरतील ही पुस्तके आपल्याला.

ब्रिटिश कौन्सिल बाकी ठिकाणी चालवते तसेच इथे पण इंग्रजीचे वर्ग चालवते. ओमानी तरुणांमधे इंग्रजी शिकणाऱ्यांचे प्रमाण फार वाढते आहे. वर्गांना चांगली गर्दी दिसली. त्याची दोन कारणे असावीत · एक तर उघडच होते. इंग्रजी शिक्षण घेतले, की इंग्लंड-अमेरिकेत

पुढल्या शिक्षणाकरता जाता येणार असते.

इथला सुलतान नवीन विचारांचा आहे म्हणून मागे सांगितलेच आहे. तो नुसत्या नवीन विचारांचा नाही तर नवीन आचारांचा पण आहे. चांगल्या शिक्षणाशिवाय देशाला तरणोपाय नाही हे तो जाणून आहे. परदेशी जाणाऱ्या ओमानींना तो पैशांची मदत करतो. त्यांतून कोणी ओमानी आपल्या बायकोला परदेशात शिक्षण द्यायला नेत असेल तर सुलतान त्याला दुप्पट पैसे देतो. अट एवढीच की त्या बाईने परदेशात कोणते तरी शिक्षण घेतले पाहिजे, मग ते अगदी टंकलेखनाचे का असेना.

मुलींना शिक्षण मिळाले पाहिजे ह्यावर सुलतानाचा फार कटाक्ष आहे. गावागावांतून शाळांकरता इमारतीबाबतही त्याचे धोरण वेगळे आहे. जिथे दोनचार वर्गांची गरज आहे, तिथे तो चांगले दहाबारा वर्ग बांधायला सांगतो. पुढे विद्यार्थी वाढल्यावर वर्ग कमी पडायला नकोत हा त्यामागला हेतू.

सुलतान आज पेरतो आहे त्याची फळे आणखी दहापंधरा वर्षांनी पाहायला मिळतील. ह्या शिकलेल्या नवीन पिढीतून नवीन विचारांचे तरुण पुढली धार्मिक व सामाजिक क्रांती करतील. ह्या देशाचा पोतच बदलून टाकतील असे वाटते.

इंग्रजी शिक्षणाचे वर्ग लोकप्रिय होण्याचे दुसरे कारण म्हणजे त्यानिमित्त पोरीबाळींशी, शिक्षिकेशी येणारा संबंध.

खरेच आपण हिंदुस्थानात असतो त्या वेळी समाजातले बायकांचे अस्तित्व आपल्या लक्षात येत नाही. कचेरीत, गाड्यांतून, रस्त्यावर शेकडोंनी बायका असतात. आता कल्पना करा, की त्या एकदम सगळ्या गडप झाल्या, दिसेनाशा झाल्या तर काय होईल? तशी कल्पनासुद्धा करणे अवघड आहे. कारण स्त्रीविरहित जीवन आपण कल्पूच शकत नाही.

पण इथे प्रत्यक्षात तसे घडते. कचेरीत काही थोड्या स्त्रिया आहेत. बँकांतून पण आहेत. पण ते तेवढ्यास तेवढे. बाकी समाजात, दुकानांत, सिनेमागृहांत, बाई औषधालाही सापडत नाही. दुपारच्या बायका आपल्या खरेदीकरता, भाजी वगैरे आणायला बाहेर पडल्या आहेत, किंवा कुणी दुकाने चालवताहेत असे कधी दिसत नाही. प्रथम प्रथम फार चुकचुकल्यासारखे व्हायचे.

लायब्ररीच्या काउंटरवर बसलेली मुलगी 'गोरी' आहे. काहीतरी वीसबावीस वर्षांची. काही मुली कशा उगाचच थोराड दिसतात तशी ही दिसायला आहे. कोणातरी इथे नोकरीला आलेल्या साहेबांची मुलगी असावी. आपले बोलणे ओमानी लोकांना कळावे म्हणून ती मुद्दाम हळूहळू बोलते.

एका वेळी चार पुस्तके देतात. त्यांतली दोन मी ठेवून घेणार आहे व दुसरी दोन, माझा मद्रदेशीय सहकारी आहे त्याच्यासाठी. कारण त्याच्याच गाडीतून आम्ही लायब्ररीत येणार-जाणार आहोत. ही आमची आपसांतली व्यवस्था आहे.

पहिल्या वेळीच एक चांगले पुस्तक मिळाले. मारसेला विल्यम्स ह्या बाईचे आत्मचरित्र वा आठवणी म्हणा ना! ती एका वेळची ब्रिटिश पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सनची राजकीय चिटणीस. त्यांच्या मजूर पक्षाची कार्यकर्ती. दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्लंडमधे झालेल्या पंतप्रधानांत विल्सनचा अगदी वरचा नंबर आहे. चर्चिलचे इतर गुण असलेला विल्सन हा चांगला इतिहासकार व चांगला लेखक आहे.

मारसेला विल्यम्सच्या लिखाणातून विल्सनविषयी वाटणारी तिची भक्ती, अभिमान,

आदर, प्रेम स्वच्छपणे दिसून येते. परत आपल्या पुढाऱ्याबद्दल मोठेपणाच्या, महात्मेपणाच्या उगाच खुळचटपणाच्या कल्पना नाहीत. तिथल्यासुद्धा पक्ष-कार्यकर्त्यांना नोकरशाही कशी बाजूला ठेवण्याचा प्रयत्न करते ते बघण्यासारखे आहे.

मला अगदी पहिल्यापासून का कोणास ठाऊक, आत्मचरित्रे वाचायला फार आवडते. मग ते कोणाचेही, लहान-मोठ्याचे असो वा कोणत्याही भाषेतले असो. आत्मचरित्र नाही मिळाले तर चरित्र. वाटते, की हे लोक खरे खरे आयुष्य जगले आहेत. काल्पनिक नाही. ह्या लोकांनी काहीतरी करायचा प्रयत्न केला आहे. कोणी यशस्वी झाले तर कोणी अयशस्वी; पण सगळीच चरित्रे वाचण्याजोगी असतात. त्यांतल्या त्यांत पाश्चिमात्यांची चरित्रे जास्त प्रांजळ असतात, मोकळी असनात.

आपल्याकडे स्त्री-पुरुष संबंधांबद्दल तितके मोकळेपणी लिहीत नाहीत. नवरा-बायको, आई-मुलगा, बाप-मुलगा ह्यांसंबंधी एक ठरून गेल्यासारखे लिहिले जाते. सगळ्या नवरा-बायकोंचे संबंध अत्यंत प्रेमाचे. चरित्रनायकाची आई म्हणजे नेहमी अगदी देवता, तर बाप म्हणजे कर्तृत्वाचा पुतळा असतो. खरे म्हणजे ह्या जवळच्या नातेवाइकांमुळे, त्यांच्यातल्या गुण-दोषांमुळे आपले आयुष्य घडत असते, त्याला वेगळे वळण लागत असते पण त्याबद्दल काही मोकळेपणी लिहिले जात नाही.

चरित्रलिखाणात तर हे फार जाणवते. लेखकाला त्याच्या चरित्रनायकाचे किती कौतुक करू व किती नको असे होऊन जाते. चरित्रनायकही एक माणूस. त्याच्यातही काही गुण-दोष असतील हे लेखकाला मान्यच होत नाही. त्याने केलेली प्रत्येक गोष्ट बरोबर व बाकीचे चूक असाच साधारण सूर असतो. वाङ्मय हा आरसा आहे असे मानतात. पण त्यात आपले खरे रूप दिसायला कोणालाही नको असते. जो चांगले, सुंदर प्रतिबिंब देईल तोच आरसा सगळ्यांना आवडतो.

त्यामुळे आपल्याकडील सगळी आत्मचरित्रे व चरित्रे सानेगुरुजींच्या गोड गोड गोष्टी होऊन जातात. भाग पहिला, दुसरा, तिसरा वगैरे. आता गेल्या काही वर्षांत चांगली आत्मचरित्रे व चरित्रे लिहिली गेली आहेत – नाही असे नाही.

आज पुण्याच्या कानिटकरांचे पत्र आले आहे. मी त्यांना व्यक्तिशः ओळखत नाही. पण त्यांचे लिखाण वाचले आहे. मोठा भारदस्त लेखक. पत्रात त्यांनी माझ्या लिखाणाची मोठ्या मोकळेपणाने वाखाणणी केली आहे. अगदी पुण्याच्या माणसाला न शोभणारी. त्यामुळे खूप आनंद झाला. बरे वाटले. बरोबरच थोडे चक्रावल्यासारखेपण झाले. सहज म्हणून लिहायला सुरुवात केली, त्याचे हे गोड फळ? त्यांना तर उत्तर लिहिलेच पण 'पहिले प्रेमपत्र' नावाचा आमच्या नेहमीच्या साप्ताहिकाकरता एक लेखही ठोकला.

काल कचेरीत अनवर पाशा व अमानुल्लाबरोबर गप्पा मारत बसलो होतो. बोलण्यातून बोलणे निघता इथे मिळणारा पैसा वगैरे गोष्टी निघाल्या. ''आपण एवढे पैसे मिळवतो; पण त्याचा उपभोग मात्र दुसरे घेतात'' असे म्हणून पाशा पुढे म्हणाला, ''उर्दूमधे एक कहावत आहे. 'आपण मेल्यावर आपल्या पैशांची तीन तऱ्हेने वाट लागते. एक म्हणजे आपली बायको

ज्याच्याशी नंतर लग्न करेल त्याला, नाहीतर आपल्या जावयाला तो मिळतो. किंवा तो सरकारकडे जमा होतो. मग आपण पैसा जमवा तरी का व बायकोच्या नावावर ठेवा तरी का ?'"

थोड्या वेळाने अमानुल्ला मला म्हणाला, "ये बडी सच बात कही पाशाने. आपण मेल्यावर आपल्या बायकोचा नवा नवरा आपले पैसे उधळणार ? मी एक दिडकीही बायकोच्या नावाने ठेवणार नाही. उगाच दुसऱ्याची घरभरणी कशाला करायची ?"

मी ह्या लोकांच्या बोलण्याने अगदी चक्रावून गेलो. आपल्या मृत्यूनंतर आपली बायको परत लग्न करेल – तिचा नवा नवरा वगैरे कल्पनाच मला कशातरी वाटल्या. म्हणजे विधवांनी लग्न करू नये, लग्नाचे पावित्र्य वगैरे तऱ्हेच्या माझ्या कल्पना नाहीत. पण अजून हे आपल्या समाजात रुजले नाही म्हणून असेल किंवा लहानपणापासूनचे संस्कार त्याला कारणीभूत असतील.

पण माझ्या ह्या विचारांपेक्षा अमानुल्लाच्या म्हणण्याकडे लक्ष देणे आवश्यक होते.

"उगाच वेड्यासारखं बोलू नकोस. खरं सांग, तू मेल्यावर तुझ्या बायकोनं दुसऱ्याशी लग्न केलं तर चालेल ? तुमच्या धर्मात परवानगी आहे वगैरे ठीक आहे, पण तुला मनोमन काय वाटतं ?"

"खरं सांगू ? तिनं दुसऱ्या कोणाशीही लग्न करू नये असं वाटतं." अमानुल्लाने मनातले सांगितले.

"तू तिला काही पैसे ठेवले नाहीस तर फक्त पैशाकरता म्हणूनसुद्धा तिला दुसऱ्याशी लग्न करायला लागेल. आता तिला दुसऱ्या काही कारणांकरता लग्न करायची इच्छा झाली तर ती गोष्ट वेगळी. पण निदान फक्त पैशांकरता तिला परत लग्न करायला लागू नये ह्याची व्यवस्था तू करायला नको का ?"

"मतलब ? म्हणणं काय आहे तुमचं ?"

"तू जर काही पैसे वगैरे बायकोच्या नावे ठेवलेस तर निव्वळ भुकेच्या पोटी व मुलांकरता म्हणून तरी तिला लग्न करायला लागायचं नाही. आणि कोणी सांगावं ? परिस्थितीमुळं तिला वाइटातल्या वाईट माणसाशीसुद्धा लग्न करायला लागेल. असं लग्न तिला करायला लागू नये असं तुला नाही वाटत ?"

अमानुल्ला क्षणभर थांबला. बहुधा आपण गेल्यावर आपल्या बायकोचे काय होईल ह्याचे चित्र तो मनाशी रंगवत असावा.

"समझ गया ! तुम्ही काय म्हणताय ते लक्षात आलं. बरोबर आहे तुमचं म्हणणं. ह्यापुढं सगळा पैसा मी बायकोच्या नावानंच ठेवीन. मी मेल्यावर काय व्हायचं असेल ते होऊ दे. पण जवळ पैसाअडका नाही म्हणून बायकोवर बेशर्मीची गोष्ट करण्याची पाळी येऊ नये."

आज माझ्या 'दुसरा संसार' ह्या लेखाचे कौतुक करणारे बायकोचे पत्र आले आहे. पण तो लेख आमच्यांतल्या खाजगी गोष्टी उघड करणारा आहे असे तिला वाटते. म्हणजे त्याबद्दल तिने थोडी कुरकूर केली आहे. आमच्यासारख्या मध्यमवर्गातल्या एका जोडप्याचे चित्र मी रंगवत असे. श्याम आणि राधा ही त्यांची नावे व त्यांच्या संसारकथा. वेगवेगळे विषय व लिहिण्याचा ढंग हलकाफुलका व मध्यमवर्गीयांचे आयुष्य रंगवणारा. आता आमचे आयुष्य

त्यात थोडे प्रतिबिंबित होणे साहजिकच होते. पण त्यातली राधा म्हणजे तंतोतंत बायकोच असे समीकरण मांडून कसे चालेल? असे माझे मत. तर गोष्टीत रंगवलेली खाष्ट बाई म्हणजे बायकोच आहे असे लोक समजतील असे तिचे मत. खरे म्हणजे गोष्टीतली राधा खाष्ट, भांडखोर किंवा निर्बुद्ध वगैरे काही नाही आहे. तरी पण बायकोला तसे वाटते हे खरे.

ह्या व असल्या विचारांमुळे तर ती माझ्या लिखाणाबाबत थंड राहिली नाही आहे ना? ज्या गोष्टीबाबत तिला कानकोंडे वाटते त्यात ती कसा रस घेईल? असा विचार काही वेळा मनात येतो.

कचेरीत दत्ताशी आज बराच वाद झाला. अर्थात ही काही पहिली वेळ नव्हती. खरे म्हणजे तो आला त्याच दिवशी अगदी वाद जरी नाही तरी बरेच कडक बोलणे झाले होते. त्यावरून इथे येणाऱ्या लोकांची वृत्ती कळते म्हणून त्याला थोडे महत्त्व.

आल्या दिवशी तो मला भेटून नंतर बाकीच्या लोकांना भेटायला म्हणून गेला. त्या लोकांना भेटून परत आला तोच मोठा तडतडत. "मी फार मोठी चूक केली, माझं फार नुकसान झालं, मी तुझ्यासारखं करायला हवं होतं" वगैरे म्हणत तो माझ्यासमोर उभा राहिला.

मला तो काय व कशाबद्दल बोलतो आहे ते कळेना म्हणून मी त्याला प्रथम "शांतपणे बैस व सगळं सांग" म्हणून सांगितले.

त्याप्रमाणे तो बसला व सांगू लागला.

"बघ, तुला इतका पगार मिळतो. मी चूक केली. मी पण तुझ्याइतकाच पगार मागितला असता तर माझा किती फायदा झाला असता? मी तुझ्याएवढा पगार मागायला हवा होता."

दत्ता माझ्यापेक्षा दहाबारा वर्षांनी लहान होता. अर्थातच त्याचा अनुभव माझ्यापेक्षा तितक्याच वर्षांनी कमी होता. तेव्हा त्याने त्याचा पगार माझ्याइतका असण्याची अपेक्षा करणेच चूक होते. पण तेवढे तारतम्य त्याला नव्हते हे स्पष्ट दिसत होते. ते तारतम्य आणून देण्याचे काम मी केले व त्याला शांत केला.

पण दत्ताशी ह्या वेळी झालेला वाद अगदी वेगळ्या प्रकारचा व वेगळ्या कारणाकरता होता.

इथे नव्याने आलेल्या बाहेरच्या लोकांना ठकवण्याचे नाना ओमानी प्रकार आहेत. त्यांतला एक म्हणजे मोटार चालवण्याचा परवाना काढून देण्याबद्दल आहे. इथे तसा परवाना मिळायला फार त्रास पडतो व सहासहा, आठआठ महिने लागतात. काही लोकांना, विशेषतः ज्यांना बाहेर जाण्यायेण्याचे काम असते त्यांना मोटार चालवण्याचा परवाना लवकरात लवकर मिळणे फार आवश्यक असते. अशा लोकांना इथले लुच्चे ओमानी बरोबर जाळ्यात फसवतात.

"माझा भाऊ वा मेव्हणा पोलिसात आहे," ह्या व अशा वाक्याने हे लोक सुरुवात करतात. "काहीतरी तीस ते पस्तीस रियाल म्हणजे हजारएक रुपये पडतील. पण पंधरा दिवसांत परवाना मिळून जाईल. बघा बुवा."

आता अडचणीत पडलेला माणूस हे ऐकून काय बघणार? तो पैसे द्यायला तयार होतो. एवढेच नव्हे तर आवश्यक तेवढे रियाल देऊनसुद्धा टाकतो.

दत्ताला आमच्या ऑफिसमधल्याच एका गलेलठ्ठ व माजलेल्या ओमानी माणसाने गाठले. तो नवीन सावजांच्या मागेच असायचा. दत्ता त्याला योग्य वाटला. दत्ताला त्याने पोलिसात

भाऊ आहे वगैरे सांगून तीस रियाल काढले व मग तो टाळाटाळ करू लागला. आल्या आल्या तीस रियालचा फटका म्हणजे फार होता. व आपण मूर्ख बनलो हेही दुःख होतेच.

अर्थात त्या ओमानी माणसाने एकदम 'नाही' म्हटले नाही. प्रथम पुढल्या आठवड्यात देतो, पंधरा दिवसांनी देतो म्हणून सांगितले. मग भाऊ आजारी आहे, रजेवर आहे तो परत आला, की देतो म्हणून सांगू लागला. तो जशी जास्तीत जास्त टोलवाटोलव करू लागला तसतसा दत्ता बेचैन होऊ लागला. त्या ओमानीला वेळोवेळी टेलिफोन करू लागला. त्याच्या कचेरीत वारंवार जाऊ लागला.

आता आमच्या लहानशा कचेरीत हे काय लोकांच्या लक्षात आल्याशिवाय राहील होय? अनवर पाशा, अमानुल्ला इथे तीनतीन, चारचार वर्षे राहिले होते. त्या गलेलठ्ठ ओमानीबद्दल व त्याच्या कारवायांबद्दल त्यांना चांगली माहिती होती.

दत्ताने फोन केला, की ते खवचटपणे "त्या ओमानी माणसाशी तुझं इतकं काय काम आहे?" म्हणून विचारत. आता दत्ता त्यांना काय सांगणार? नंतर तर तो ओमानी काही सबबीही सांगेनासा झाला. आधीच तो ओमानी. त्यातून गलेलठ्ठ. त्याच्याविरुद्ध हा सुकडा दत्ता कायदेशीर वा बेकायदेशीर काय कारवाई करणार? कचेरीतही त्याच्याविरुद्ध काही करणे शक्य नव्हते. तेव्हा आपले तीस रियाल गेले ते काही परत मिळत नाहीत ह्या निर्णयावर दत्ता पोहोचला.

हे सगळे दत्तानेच मला सांगितले. आमच्याबरोबरच्या मद्रासी सहकाऱ्याला दुसरा कोणी हिंदी असा फसला जाऊ नये म्हणून मी सांगितले. तो मद्रासी तरी कसा? त्याने थोडे दिवस तरी थांबायचे की नाही? उलट, त्याने लगोलग दत्ताकडे जाऊन "हे सगळं खरं आहे का?" म्हणून चौकशी केली.

आधीच दत्ताला ओमानी जखम झाली होती. त्यावर हे हिंदी मीठ चोळले गेले होते. मग दत्ताचा थयथयाट काय विचारता? तो आला की तावातावाने माझ्याकडे.

"तू सगळं सांगितलंस कृष्णनला?" त्याचा राग उच्चांकाला पोहोचला होता.

"हो, त्याच्यावर किंवा दुसऱ्या कुणा हिंदी माणसावर तसा काही प्रसंग येऊ नये, त्यांची फसवणूक होऊ नये म्हणून सांगितलं." मी आपला शांत.

"हे सगळं खोटं सांगतो आहेस. चीप पॉप्युलॅरिटी मिळवण्याचा तुझा प्रयत्न आहे."

आता मात्र मी तडकलो.

"अरे खुळ्या, जर मला तशी लोकप्रियता मिळवायची असती तर मी सगळ्यांना — अगदी आपल्या कचेरीत येणाऱ्या-जाणाऱ्यांना नसतं का सांगितलं?"

ह्यावर तोही काही बोलला. मी काय त्याला तसा सोडतोय? मी पण त्याचे चांगले कान उपटले.

काल ब्रिटिश-कौन्सिलमधून मिसेस सिंप्सनवरचे पुस्तक आणले. मिसेस सिंप्सन म्हणजे इंग्लंडचा राजा आठवा एडवर्ड याची प्रेयसी व नंतर झालेली त्याची पत्नी: डचेस ऑफ विंडसर. आठव्या एडवर्डने तिच्याकरता इंग्लंडच्या राजगादीचा त्याग केला. जगभर पसरलेले साम्राज्य सोडले पण प्रेयसीला सोडले नाही.

हा सगळा इतिहास जुना झाला असला तरी त्या घटनेतले ताजेपण अजून कमी झालेले

नाही. अशा कायम ताज्या राहणाऱ्या गोष्टी जगात एकूण कमीच.

कित्येकांच्या तरी आयुष्यात असा 'एडवर्डी' प्रसंग येत असेल. प्रेयसी की सत्ता? आता सगळेच काही इंग्लंडचे राजे नसतात व सगळ्यांनाच काही प्रेमाकरता राजत्याग करायला लागत नाही; पण म्हणून काही त्यांच्या त्यागाची किंमत कमी होत नाही. कोणाला आपल्या नातेवाइकांशी असलेले प्रेमाचे संबंध सोडावे लागतात. कोणाला चांगल्या नोकऱ्या सोडाव्या लागतात. कधी चांगल्या आरामी व श्रीमती आयुष्याला तिलांजली द्यायला लागते.

त्यांना हा प्रश्न काही राजा म्हणून पडलेला नसतो. त्यांच्या दृष्टीने नातेवाईक, समाज, नोकरी, आरामाचे आयुष्य हीच राजगादी असते. एडवर्डएवढे मनोधैर्य सगळेच दाखवू शकत नसले तरी तसे धैर्य दाखवणारेही काही कमी नसतात.

ह्यावर काहीतरी लिहावे असे वाटले व चांगली कल्पनाही सुचली. पण लिहून ठेवायचा कंटाळा केला आणि ती कल्पना कुठेतरी गळबटून गेली. आपल्याबरोबर असलेला माणूस गर्दीत गायब व्हावा तसे झाले. म्हणजे तो माणूस तिथेच जवळपास असतो पण आपल्याला सापडत मात्र नाही.

कल्पनांचे तसेच होते. येताना अगदी प्रखरतेने आल्या असल्या तरी त्या गमावायलाही वेळ लागत नाही. त्या त्या वेळीच त्या नोंदवून ठेवल्या नाहीत तर असे होते. आता ह्यापुढे नवी कल्पना सुचली रे सुचली की ती लिहून ठेवायची असा निर्णय घेतला. अर्थात अमलात येणार नाही ह्याची खात्रीच होती

चांगल्या सवयी, नीटनेटकेपणा, व्यवस्थितपणा वगैरे गुण अगदी बालपणापासून रुजवले तर रुजतात. नुसता निर्णय घेऊन थोडेच काम होते! पाऊण आयुष्य संपत आले. आता ह्या चांगल्या सवयी लागणार कशा?

ह्यावरचा गालिबचा एक शेर अमानुल्ला नेहमी ऐकवतो

उमर तो गुजरी बुदखानेमें गालिब
आखरी उमरमें क्या खाक मुसलमान होगा

(सारे आयुष्य गेले मंदिरा-देवळांत गालिब
जाण्याची वेळ आली आता काय मुसलमान होणार कप्पाळ!)

इथल्या 'मिनिस्ट्री ऑफ दिवाण अफेयर्स'मधे माझा कपूर नावाचा दिल्लीच्या ऑफिसमधला सहकारी आहे. त्याचे घर व कचेरी दोन्हीही जुन्या मसकतमधे आहेत. तसे बघायला गेले तर इथे नवीन मसकत व जुने मसकत असे तडक दोन भाग नाहीत. पूर्वीचे मसकत भारतातल्या कोणत्याही जुन्या गावाप्रमाणे आहे. म्हणजे एकाला एक लागून इमारती व अरुंद बोळ व अरुंद रस्ते. ह्या भागातल्या बहुतेक इमारती एक किंवा दोन मजली व सगळ्या लाकडी बांधणीच्या व खास काही वैशिष्ट्य नसलेल्या.

पण ह्या जुन्या भागातच नव्याने बांधलेल्या कचेऱ्या व सरकारी नोकरांना राहण्याकरता इमारती आहेत. त्या सगळ्या आधुनिक पद्धतीच्या आहेत. त्यांतल्या मिनिस्ट्री ऑफ दिवाण अफेयर्स व इतर एकदोन तर अप्रतिम आहेत. पण त्यांतली सगळ्यांत महत्त्वाची इमारत म्हणजे सुलतानाचा नवा वाडा. हा आतून बघण्याची संधी मिळाली नाही तरी जाता येता तो

पाहिला होता. वाडा खूप भव्य असला तरी त्याला काही खास कॅरेक्टर असे नाही. एखादे नाटक नुसत्या चांगल्या संवादांनी मनावर ठसत नाही तर ते त्यातल्या कॅरेक्टर्सनी ठसते, तसेच आर्किटेक्चरचे आहे.

मसकत हे पूर्वीच्या काळापासून एक चांगले बंदर म्हणून प्रसिद्ध आहे. त्यामुळे गावाची वाढ समुद्रालगत होणे साहजिकच होते. आता नव्याने वॉटर-फ्रन्ट बांधून काढला आहे. चांगला मोठा फूटपाथ व भला मोठा रस्ता आणि त्याच्या बाजूने चांगल्या हॉटेल्सच्या व खाजगी कचेऱ्यांच्या इमारती आपल्या मुंबईच्या मरीनड्राईव्हची आठवण करून देतात.

नवे मसकत उंचउंच इमारतींचे व खूप विस्कळीत असे आहे. ज्याला जिथे जागा मिळेल तिथे त्याने इमारत बांधली आहे. त्यामुळे एखाद्या शहराचे एकसंध चित्र डोळ्यांसमोर यायला हवे तसे मसकतचे होत नाही.

आज कपूरकडे गेलो होतो. त्याची बायको चारपाच दिवसांनी दिल्लीला जाते आहे. ती दिल्लीच्या एका शाळेत शिक्षिका आहे. लहान, ठेंगणीचं; पण दिल्लीच्या बायका असतात तशी स्मार्ट व चलाख. ती व मुले दर सुट्टीत महिना-दीडमहिना मसकतला येतात.

कपूर हा माझा भारत सरकारच्या नोकरीतला सहकारी. माझ्याच हुद्याचा व पगाराचा. हा इथे इंडियन टेक्निकल ॲन्ड इकॉनॉमिक को-ऑपरेशनच्या स्कीमखाली आला आहे. मी काबूलला ह्याच स्कीमखाली गेलो होतो. इथे तो गेली चार वर्षे आहे. त्यालाही ओमान सरकारने चांगले प्रशस्त घर दिले आहे. तो भारत सरकारतर्फे आला असल्यामुळे त्याची इथे पोझिशन चांगली आहे. म्हणजे माझ्यापेक्षा. मी बांधकाम मंत्रालयात आहे तर तो गृह-मंत्रालयात. हिंदुस्थानात असल्यापासून त्याचे माझे मैत्रीचे संबंध.

पण इथे आल्यापासून त्याची माझ्याशी वागण्याची पद्धत साफ बदलली. लहानसहान गोष्टींत तो माझी मानहानी करू लागला आहे. एकदा आम्ही असेच बाजारात फिरत होतो. कुठल्या दुकानात एक नव्या तऱ्हेचा पाणी तापवायचा गीझर ठेवला होता. त्याचे वर्किंग माझ्या काही झटकन लक्षात आले नाही. म्हणून त्याला मी ते विचारले.

''ओमान सरकार एवढे मोठ्ठाले पगार देऊन लोकांना बोलावतं पण त्यांना साधा गीझर कसा चालतो ते कळत नाही. ह्याला काय म्हणावं ?'' हे त्यावरचे कपूरचे उत्तर.

तसा कपूर चांगला उमद्या स्वभावाचा. मग इतक्या साध्या साध्या गोष्टींत त्याने इतके खोचून-टोचून बोलण्याचे कारण काय ? मी ह्याचे काय घोडे मारले आहे ? मी फार अस्वस्थ होऊन गेलो. त्याचा व माझा पगार सारखा असेल असे मला वाटले होते. पण ते तसे नव्हते. त्याचा पगार माझ्यापेक्षा जवळजवळ निम्म्याने कमी होता. मी त्याचे घोडे मारले होते ते हेच. एखाद्या रोगाचे मूळ कळले म्हणजे जसे मनावरचे वजन कमी होते तसे मला झाले. आता त्याच्या वागण्याचा ताप वाटेनासा झाला.

असा हा कपूर. त्याची बायको दिल्लीला चालली आहे हे कळल्यावर प्रथम जर माझ्या मनात आले असेल तर हे, की जानकीला काय पाठवता येईल ? म्हणजे कपूरची बायको काय काय नेऊ शकेल ? एक तर त्या बाईकडे स्वतःचे सामान खूप असणार. त्यामुळे मोठे वा वजनी काही पाठवता येणार नाही. बरे, इलेक्ट्रॉनिक्सचे काही पाठवावे तर ती कस्टमच्या अडचणीत आली असती. तेव्हा तसे काही पाठवून चालणार नव्हते.

जानकीने कधी तरी बोलताना तिला सोन्याची गळ्यातली चेन फार आवडते म्हणून सांगितले होते. पण कपूरची बायकोच स्वतःकरता सोन्याच्या चार बांगड्या, दोन चेन्स नेणार होती. त्यामुळे ती कल्पना बाद झाली.

साड्या वगैरे इथे काही खास नसतात. तेव्हा काही सेंट्स, हेअर ब्रश, पेन्स वगैरे सामान्य वस्तू पाठवण्यावरच समाधान मानावे लागले.

मी काही दिवसांपूर्वी जानकीच्या नावाचे आद्याक्षर असलेली एक भारी की-चेन घेतली होती. तेव्हा आपल्या नावाचे आद्याक्षर असलेली की-चेन तिला कपूरबाईबरोबर पाठवावी असे मनात आले. त्याप्रमाणे तशी चेन घेतली. कपूरच्या बायकोकडे दिली व ती दिल्लीला गेलीसुद्धा.

दोनचार दिवसांनी विचार आला, की ही काय आपण घोडचूक करून बसलो आहोत! मी पाठवलेले सामान जानकीच्या घरातले सगळे लोक पाहतील. माझ्या नावाच्या आद्याक्षराची की-चेन पाहून तिचा नवरा काय म्हणेल? तिच्या मेव्हण्याला काही विचित्र वाटेल का? सासूच्या कानावर पडले तर? जानकीची किती अवघड स्थिती होऊन जाईल?

मग घाईघाईने पत्र लिहिले. दोन चेन्स घेतल्या होत्या. एक माझ्या नावाची व एक जानकीच्या नावाची. गडबडीत जानकीची पाठवण्याऐवजी माझ्या नावाची पाठवली गेली, वगैरे.

आता मी घाबरलो होतो तेवढी जानकी घाबरली असेल का? प्रेमात पडलेल्या बाईला पुरुषापेक्षा जास्त धारिष्ट्य असते का? जानकीबाबत माझा अनुभव तसाच होता.

दिल्लीहून परतताना मी इंदूरला उतरलो होतो, त्या वेळची गोष्ट. अर्थात त्यांच्याकडेच उतरलो होतो.

जानकीचे सासर म्हणजे मोठें कुटुंब होते. तिची सासू व एका मेव्हण्याचे कुटुंब तळ-मजल्यावर राहायचे. त्याच मजल्यावर दिवाणखाना, जेवणघर व स्वैपाकघर पण होते. जानकीच्या व दुसऱ्या मेव्हण्यांच्या कुटुंबांच्या झोपायच्या खोल्या पहिल्या मजल्यावर होत्या. त्यांचा स्वैपाक एकत्र व्हायचा. तिन्ही सुना तो पाळीपाळीने करत.

जानकीला सासूचा फार जाच होता. सारखी ती जानकीला घालूनपाडून बोलत असे. एके काळी जानकीला व्हायलिन वाजवायचा फार नाद होता. लग्न झाल्यावरसुद्धा पहिली काही वर्षे ती व्हायलिन वाजवायची. जानकीने व्हायलिन वाजवायला सुरुवात केली की सासूचा तडफडाट व्हायचा. ती रागारागाने बोलायची. काही वेळा तर अक्षरशः शिवीगाळ करायची. शेवटी ह्या सगळ्या त्रासाला कंटाळून जानकीने ते व्हायलिन फोडून टाकले होते.

अशा घरात जानकीने लग्नाची बाराचौदा वर्षे काढली होती. लग्न झाले त्या वेळी ती अगदी अठरा वर्षांची होती. त्यामुळे तिने तो सासू-छळ मुकाट्याने सहन केला होता. काबूलला आल्यावर व तीनचार वर्षे राहिल्यावर स्वतंत्र आयुष्य म्हणजे काय असते ते जानकीला कळले होते. स्वातंत्र्याची चव तिने चाखली होती.

मी त्यांच्याकडे संध्याकाळचा असा पोहोचलो. त्या वेळी त्या लोकांचा दिवाणखान्यात बसून चहा चालला होता. माझी सगळ्यांशी ओळख करून दिली गेली. जानकीचे दोन्ही मेव्हणे डॉक्टर होते. त्यांच्या बायकाही चांगल्या व श्रीमंत घरातल्या होत्या. सासू चांगली जाडी, गोरी

व ठेंगणी अशी होती. जानकीचा सासरा एके काळचा प्रसिद्ध डॉक्टर होता. त्यानेच हा मोठा बंगला बांधला होता. पुढे व मागे मोठी बाग होती. सासू उत्तरेत विधवा बायका नेसतात तशी पांढरी साडी नेसली होती व उत्तरेतल्या सासवांचा असतो तसा चेहऱ्यावर कुर्रा पण होता. ऐश्वर्य भोगलेल्या माणसाची कशी एक खास ढब असते! तशी तिची होती.

चहा वगैरे झाल्यावर आम्ही त्यांच्या वरच्या मजल्यावरच्या जागी गेलो. तिथे गप्पाटप्पा झाल्या. रात्रीचा स्वैपाक करण्याची जानकीची पाळी होती. तिच्या नवऱ्याला काही कामाकरता बाहेर जायचे होते. तेव्हा मी म्हटले, ''ठीक आहे. तुम्ही तुमची कामं करा. मी वाचत पडतो.''

पण ते जानकीला पटेना. मला ''खाली चल'' म्हणून आग्रह करू लागली. ''मी स्वैपाक करते. तू तिथंच खुर्ची टाकून गाझ्याशी गप्पा मारत बैस.'' ती म्हणाली.

''काय बोलते आहेस तू जानकी ? खाली तुझी सासू आहे. आधीच ती तुझा राग राग करते. माझ्यासारखा परका माणूस स्वैपाकघरात बसून तुझ्याशी गप्पा मारतो आहे, हे बघून ती आकाशपाताळ एक करील. माझ्यामुळं तुमच्या घरात भांडण नको'' मी म्हटले.

जानकी काही क्षण थांबली. तिच्या डोक्यात एखादी गोष्ट आली, की ती काही सोडणार नाही हे जानकीच्या नवऱ्याला माहीत होते. म्हणून तो काही बोलला नाही. पण त्याला माझे म्हणणे पटले होते.

''आतापर्यंत मी खूप सहन केलं. आता ह्यापुढं मात्र करणार नाही.'' दोन मिनिटे शांत असलेली जानकी उफाळून उठली, ''माझ्या मित्राशी मला गप्पा मारायच्या असतील तर मी मारणारच. आपको मेरे साथ आना है या नहीं ?''

सगळा स्वैपाक होईपर्यंत मी जानकीशी गप्पा मारत बसलो होतो. खास असे काही नव्हते. जानकीच इकडल्यातिकडल्या गोष्टी सांगत होती. आम्ही गप्पा मारत असताना तिची सासू एकदा डोकावून गेली. मला तर तिच्याकडे बघायचेसुद्धा धैर्य झाले नाही. पण जानकीला त्याचे काही वाटले नाही.

तिची सासू माझ्या देखत व मी तिथे असेपर्यंत तरी काही बोलली नव्हती. पण नंतर काय झाले ते मला कधी जानकीनेही सांगितले नाही — नाही तिच्या नवऱ्याने.

माझ्या नावाच्या आद्याक्षराची चेन बघून जानकीची स्थिती अवघड होऊ नये म्हणून मी धडपड करत होतो. खरे म्हणजे ती खूप खंबीर होती. निदान माझ्याबाबत तरी झाली होती.

आज अमानुल्ला पेटवलेल्या फटाक्यांच्या लडीसारखा तडाडत होता. आधीच शरीराने व हातापायाने भक्कम, त्यात चिडलेला. पाकिस्तानातल्या मुल्ला-मौलवींना जाम शिव्या घालत होता. त्यांना व जमाते इस्लामच्या लोकांना चक्क फाशी द्यायला पाहिजे, वगैरे.

''अरे, पण ते तुमचे धर्मगुरू आहेत ना ?'' मी विचारले.

''म्हणून काय झालं ?'' अमानुल्ला अजून तडकलेलाच. ''साले समाजाच्या भलाईकरता तर काही करत नाहीतच, उलट त्या साल्या झियाला पाठिंबा देतात.''

झियाउल हक हा अमानुल्लाचा नंबर एकचा शत्रू. त्याचा उल्लेख तो नेहमी 'काले कुत्ते की अवलाद' म्हणूनच करायचा.

मुसलमानांत सगळ्यांत नीच प्राणी म्हणजे कुत्रा. ह्या देशांतून तर कुत्र्यांना जिवंतच ठेवत नाहीत. सगळ्या मसकतमधे एक तरी कुत्रे असेल की नाही ह्याची मला शंकाच आहे.

"अरे, नुसतं कुत्ते की अवलाद असं म्हण की!" मला ह्या लोकांचा कुत्र्यांवरचा राग माहीत होता. मी अमानुल्लाला शांत करण्याच्या दृष्टीने म्हटले. "कुत्तेकी अवलाद ही काफी है."

"नही साहाब, इस साले को काले कुत्ते की अवलाद ही कहना चाहिये." अमानुल्ला ठासून म्हणाला.

आज तो झियाला शिव्या देण्याच्या मूडमधे होता. कधी कधी पाकिस्तानमधे प्रचलित असलेले झियाबद्दलचे विनोद सांगत असे.

"एकदा झिया आपल्या सहकाऱ्यांबरोबर विमानानं कुठं तरी चालला होता. तो आपल्या सहकाऱ्यांना म्हणाला,

'मी हजार हजार रुपयाच्या नोटा खाली टाकल्या तर काही थोडे लोक आनंदी होतील. शंभराच्या टाकल्या तर त्याच्या दसपट लोक आनंदी होतील. एक एकच्या नोटा टाकल्या तर त्याच्याही दसपट लोक आनंदी होतील. तर मी काय करू?'

'साहेब, तुम्ही असं करा.' मागल्या बाजूने एक आवाज आला, 'तुम्ही स्वतःच विमानातून खाली उडी टाका. म्हणजे पाकिस्तानातल्या सगळ्या लोकांना आनंद होईल.'"

हे सगळे सांगून तो मोठ्या चार मजली पद्धतीचे हसत असे.

अमानुल्ला झियाचा शत्रू, तर कराचीचा अनवर पाशा झियाचा मोठा चहाता. पाकिस्तान्यांत असे दोन गट चांगले ठळकपणे दिसतात.

अमानुल्ला हा पंजाबचा. म्हणजे पाकिस्तानी पजाबचा मुळापासूनचा रहिवासी. अनवर पाशा हा विभाजनानंतर उत्तर प्रदेशातून आलेला. ह्यांचे हितसंबंध अगदी एकमेकांविरुद्ध.

विभाजन झाले त्या वेळी हिंदुस्थानातून मुख्यत्वे करून उत्तर प्रदेश, पूर्व पंजाब, मुंबई, मध्यप्रदेश, दिल्ली ह्या भागांतली सुशिक्षित माणसे, अधिकारीपदावर असलेले लोक, व्यापारी, जमीनदार, पूर्वीचे नबाब वगैरे उच्च स्तरावरचे लोक पाकिस्तानात गेले. गरीब मुसलमान हिंदुस्थानात राहिले. हे असे श्रीमंत, पुढारलेले, शिकलेले लोक. तर सिंध, बलुचिस्थान, पश्चिम पंजाबमधले अशिक्षित, अडाणी, शेतकरी-कामकरी वर्गातले! राजसत्ता, नोकरशाही, कारखानदारी सगळी हिंदुस्थानातून आलेल्या लोकांच्या हाती. पाकिस्तान ही जणू हिंदुस्थानातून आलेल्यांची 'वसाहत'च झाली. व मूळच्यांची पिळवणूक होत होती. (मला तर वाटते, पाकिस्तानच्या मागणीला ह्याच कारणाकरता मुंबई व उत्तर प्रदेश इथल्या उच्च स्तरावरच्या लोकांनी जोर लावला असावा.)

आतापर्यंत पाकिस्तानचे झालेले बहुतेक राष्ट्रप्रमुख, पंतप्रधान मूळचे भारतातले. अगदी झिया धरून. त्यामुळे हिंदुस्थानातून आलेल्यांची – त्यांना मुहाजिर म्हणतात – फार चलती. त्यांना नोकऱ्यांत प्राधान्य, शिक्षणात सवलती, उद्योगधंद्यांत आर्थिक मदत सहजपणे मिळत गेली. तो वर्ग जास्त सधन झाला व मूळच्या पाकिस्तानी रहिवाशावर अन्याय होऊ लागला. तेव्हा ते चिडून उठले. बंगाली तर वेगळेच झाले. पण मूळचे पंजाबी व सिंधीसुद्धा खवळले.

ह्या मूळच्या पाकिस्तानी लोकाना पहिला त्राता भेटला तो म्हणजे भुत्तो! जरी भुत्तो पुष्कळ वर्षे मुंबईला राहिलेला व तिथेच शिक्षण घेतलेला असला तरी त्याचे घराणे मूळचे सिंधचे. कराचीजवळच्या गावी त्याची जमीनदारी. त्याला ह्या मूळच्या पाकिस्तान्यांचे दुःख बरोबर कळले.

त्याने ह्या मुहाजिर लोकांना मिळणाऱ्या सगळ्या सवलती काढून घेतल्या. त्यांचे वर्चस्व असलेले उद्योगधंदे व बँका सरकारी केल्या. शिक्षणात व नोकरीत मूळच्या लोकांना प्राधान्य

द्यायला सुरुवात केली. त्यामुळे मुहाजिर लोकांचा तो नावडता झाला. भुत्तो सत्तेवरून जायला बरीच कारणे होती हे खरे. पण त्यांतले महत्त्वाचे हे होते, की मूळचे हिंदुस्थानातले मुसलमान त्याच्यावर चिडून होते.

झिया सत्तेवर आला व परत चित्र बदलले. झियाही हिंदुस्थानातून आलेल्या मुसलमानां-पैकीच. त्याला मुहाजिर लोकांबद्दल आपलेपणा. आपली गादी टिकवायची असेल तर ह्या मुहाजिर लोकांच्या मदतीशिवाय ती टिकणे अवघड आहे हे त्याला माहीत होते. त्यामुळे परत बाहेरून आलेल्यांना फायदे मिळू लागले व मूळच्या पाकिस्तान्यांवर अन्याय सुरू झाला.

ह्यामुळे अनवर पाशासारखे मुहाजिर झियावर खूष होते, तर अमानुल्लासारखा मूळचा पाकिस्तानी त्याच्यावर चिडून होता. झियाला 'काले कुत्तेकी अवलाद' म्हणत होता व त्याने लवकरात लवकर सत्तेवरून हटावे अशी इच्छा व्यक्त करत होता.

मुल्ला-मौलवी सर्वसामान्य जनतेला अडाणी व मागास ठेवण्यात झियाला मदत करतात म्हणून पाशा व अमानुल्ला दोघेही नाराज असत. फरक एवढाच, की अमानुल्ला पंजाबी पद्धतीप्रमाणे मोकळेपणी शिव्या घालायचा तर पाशा उत्तर प्रदेशी पद्धतीत शांत राहायचा.

आपल्याकडले मुसलमान असे मुल्ला-मौलवींना शिव्या देणार नाहीत. त्यांच्यावर साधी टीकाही करणार नाहीत. आपल्याकडल्या मुसलमानांना हे चांगले माहीत आहे, की त्यांना हे मुल्ला-मौलवी अडाणी, मागास ठेवताहेत, तरीही. अमानुल्लासारखे तरुणसुद्धा मुल्ला-मौलवींना सडकून शिव्या देत राहत. काबूलमधे असतानाही हेच पाहिले होते. तिथले तरुणही मुल्ला-मौलवींना शिव्या देत वर त्यांच्याबद्दल अश्लील विनोद व गोष्टी पण सांगत.

जिथे मुसलमान बहुसंख्य आहेत तिथे असेच होते. कारण मुल्ला-मौलवी व इस्लाम धर्म ह्या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत हे ते जाणतात. मुल्ला-मौलवींना नावे ठेवणे ह्याचा अर्थ धर्माला नावे ठेवणे असा होत नाही, ह्याची त्यांना समज आहे.

आपण नाही का ब्राह्मणांना, ब्राह्मण-वृत्तीला नावे ठेवतो ? त्याचा अर्थ आपण हिंदू धर्माला नावे ठेवतो असा नाही. ह्या दोन वेगळ्या गोष्टी आहेत हे आपण जाणतो. पण आमच्या इथल्या मुसलमानांना मात्र मुल्ला-मौलवींना नावे ठेवली किंवा काही जुन्या चुकीच्या चाली-रीतींबद्दल विरोधी बोलले, की खुद्द इस्लामला नावे ठेवताहेत असे वाटते. त्यामुळे ते तडकून उठतात.

त्यांना हे सगळे समजावून सांगणार कोण ? तो सगळा समाज आपल्यापासून इतकी योजने दूर आहे. त्यांच्याशी आपले साधे बोलणे चालणेही होत नाही तर त्यांच्याशी मुल्ला-मौलवीं-बाबत वा धर्माबद्दल काय बोलणार ?

काल दोन ऑक्टोबर म्हणजे महात्मा गांधींचा जन्मदिवस. शुक्रवार असल्यामुळे कचेरीला सुट्टी होती. जयंतीचा वकिलातीतर्फे काही कार्यक्रम नव्हता. त्यामुळे गांधींच्या कामाचे स्मरण करण्यात काहीही काम न करता दिवस घालवला.

दुसऱ्या दिवशी कचेरीत येताना मनात विचार आला, की महात्मा गांधी आपले राष्ट्रपिता. तेव्हा आपल्याला त्यांच्याबद्दल माहिती असणे साहजिकच आहे. पण ह्या इतर – त्यातल्या त्यात मुस्लिम-देशांतल्या लोकांना काय काय माहिती आहे ते पाहावे तर खरे.

आमच्या खात्याच्या डायरेक्टर जनरलची इजिप्ती सेक्रेटरी मश्रफा, हिच्याकडे प्रथम गेलो.

तसा मी तिच्याकडे बऱ्याच वेळा जात असे. इंग्रजी कसे गोड व बोबडेबोबडे बोलायची. त्यामुळे गप्पांना एक बोबडी चव येत असे.

एकदा मी तिच्याकडे गेलो होतो तेव्हा विचारले, "नवऱ्याशी भांडतेस की नाही?"

"कधी कधी" तिने हसून उत्तर दिले.

"कोणत्या कारणांनी व साधारण किती दिवसांनी?"

"अगदी लहानसहान कारणाकरता भांडतो आम्ही. आणि साधारणपणे दहाबारा दिवसांनी. आणि तू किती वेळा भांडतोस?" तिने हसून उत्तर दिले व उलट प्रश्न केला.

"साधारण दिवसातून तीन वेळा." मी गंभीर होत म्हणालो.

"हॉ, म्हणजे प्रथम ब्रेकफास्टच्या वेळी, मग दुपारच्या जेवणाला आणि तिसरं रात्रीच्या जेवणाच्या वेळी, होय ना?" परत ती गोड हसली.

"हे तुला कसं कळलं?" मी आश्चर्य दाखवत विचारले.

"सगळे नवरे जेवणाच्या वेळीच भांडतात!" परत 'गोड' मश्रफा म्हणाली.

गांधींच्याबद्दल काय माहिती आहे हे पाहण्याकरता प्रथम मश्रफाला गाठले. नंतर गोव्याच्या एका तरुण ख्रिश्चन मुलीला, मग अनवर पाशा, सिलोनी चंद्रा व शेवटी अमानुल्ला.

मश्रफा म्हणाली, की "गांधी कधी मांस खात नसत, दारू पीत नसत. ते हिंदुस्थानचे पहिले प्रेसिडेंट होते. आणि सगळ्या प्रेसिडेंटना मरण येतं तसं त्यांनाही गोळ्या घालून ठार मारण्यात आलं होतं." अशा मरण्याचे तिला काही विशेष वाटले नव्हते. ईजिप्तमधल्या बहुतेक प्रेसिडेंट्सना मरण अशा तऱ्हेने आलेले तिने पाहिले होते. तिला त्याचे काय कौतुक वाटणार?

अमानुल्लाला गांधींच्या कामाची काही माहिती नव्हती. त्याचे म्हणणे, "क्या यार, इतना बडा आदमी होते हुवे भी कैसे कपडे डालता था! ये कोई रहनेका ढंग हुवा?"

चंद्राने उलट मला विचारले, "द्याट अहिंसा मॅन, नो?" त्यावरून त्याला काय माहिती आहे ते मला कळले.

"हाँ, उनके बारेमें बहुत कुछ सुना है." अनवर पाशा म्हणाला, "उन्होंनेही घेरावका चक्कर चलाया था. कलकत्तेके कोई पागल आदमी ने उनकी कत्तल कर दी थी."

ह्या सर्वांवर आधारून एक लेख लिहिला. तो फार छान उतरला आहे असे माझे मलाच वाटले.

काहीतरी कारणाने कचेरीला गेले तीनचार दिवस सुट्टी पडली होती. आज ऑफिसला जाण्यात उत्सुकता होती, कारण आज तीनचार दिवसांची जमलेली पत्रे मिळणार होती. आत्तापर्यंत जानकीचे मला एकही पत्र आले नव्हते, पण तसे यावे असे नेहमी वाटायचे. माझी पाचसहा पत्रे आली होती. जानकीचे नव्हते, पण तिच्या नवऱ्याचे होते. दुधाची तहान ताकावर भागवावी लागली. पण ते ताकसुद्धा चविष्टपणे परत परत पीत होतो. माझ्या बोलण्या-चालण्याचे जानकी नेहमी कौतुक करत असते असे त्याच्या पत्रात होते. आता खरे म्हणजे माझ्या बोलण्या-चालण्यात तसे काय कौतुक करण्यासारखे खास होते? का एकदा कोणी आवडू लागले की त्याच्या सगळ्या गोष्टी आपल्याला आवडू लागतात?

दिवाळी अंकांकरता दोन लेख लिहून बायकोकडे पाठवले होते. ते संपादकांना पुढे पाठवले आहेत असे बायकोने पत्रात कळवले आहे. खरे म्हणजे ह्या उत्तराने मला आनंद व्हायला हवा पण तसे काही न होता, उलट जिवाची तगमगच झाली. काही तरी होऊन ते लेख प्रसिद्ध होणार नाहीत असे मनात कुठेतरी वाटत होते.

माझ्यामागे हे अभागीपण असे काय म्हणून लागले असावे ? लिहायला लागलो त्याच वेळी जानकीची ओळख झाली. आपल्याला लिहिता येतेय हे कळले त्याच वेळी जानकीला आपल्याबद्दल काही वाटतेय ह्याची जाणीव झाली. खरे म्हणजे ह्या दोन्ही आनंद देणाऱ्या गोष्टी, जवळजवळ एकाच वेळी झालेल्या. त्याने माझ्या आयुष्यात किती आनंद निर्माण व्हायला हवा ! ऊब मिळावी म्हणून शेकोटीजवळ जावे आणि त्याने अंग भाजून निघावे तसे माझे का व्हावे ?

त्यातून मी असा घरापासून, गावापासून, देशापासून व आपल्या माणसांपासून इतका दूर. रणरणत्या वाळवंटात अनवाणी मैलच्या मैल तुडवत जाणारा माझ्यापेक्षा काय वेगळा असेल ? कचेरीत कामाची ती स्थिती, लिहिण्याबद्दल हे असे. आणि वर जानकीचे हे कधी सफल न होणारे प्रेम. माणसाने दिवस काढावेत, ते कोणत्या आशेवर ? मृगजळ खोटे असते पण तेही माणसाची तहान काही प्रमाणात भागवते. माझ्या नशिबी मृगजळ पण नसावे ?

आज खूप मजा आली आमच्या कचेरीत. जॉर्ज नावाचा एक ख्रिश्चन इजिप्ती इंजिनियर आहे. गोरा, उंचापुरा, मोठे बलिष्ठ खांदे असलेला, अमेरिकन नट असतात ना ? तसला. चांगल्या गप्पा मारणारा, चांगली विनोदबुद्धी असलेला.

त्याची बायको सुट्टीत आली होती. चहाच्या वेळी मी त्याला म्हटले, "आता काय तुझी अगदी मजा असेल ?"

"कुठली मजा घेऊन बसलाहात राव ?" जॉर्ज चेहरा पाडून म्हणाला.

"ल्ले !" मी पंजाबी पद्धतीने आश्चर्य दाखवत म्हटले, "आम्ही आपले बायको-मुलांशिवाय तळमळत आहोत. आणि तुझी बायको चांगली इथे आलेली असूनही तू कसली मजा घेऊन बसलात, म्हणून विचारतोस ?"

एवढे होईपर्यंत चारदोन सहकारी माझ्या टेबलाजवळ जमले.

जॉर्ज माझ्याजवळच्या खुर्चीवर बसला होता. माझे हात हातात घेऊन म्हणाला, "त्याचं असं होतं बघ. दुपारी कचेरीतून घरी गेलो की बायको अगदी कपडे करून तयार असते. जेवतो व बाहेर पडतो. बायकोचं चांगलं तीनचार तास शॉपिंग चाललेलं असतं. त्याच्याकरता फीर फीर फिरतो. परत येतो. बायको इतकी दमलेली असते, की ती लगेच झोपून जाते. आणि मी ? इतका खर्च झाला ह्या कल्पनेने डोळे मताड उघडे टाकून रात्रभर तळमळत पडलेला असतो. आता तूच सांग, ह्यात काय मजा आहे ?"

त्याच्या ह्या प्रश्नाचे उत्तर म्हणून आम्ही सगळे खो खो करून हसलो. त्यावर जॉर्जने आणखीच आपला चेहरा खोटेखोटेपणाने पाडला.

कचेरीत मला महत्त्वाचे काही काम दिलेले नाही. – एकदा वाटले, की अब्बास जाफरला – आमच्या मुख्याला – मला फार फालतू कामे दिली आहेत म्हणून सांगावे. पण तशी मोठी कामे दिली तरी मला परत कारच्या हाताखालीच काम करायला लागणार होते. तक्रार केल्याचे

उड़े तो केव्हाही काढू शकला असता. तेव्हा काय करावे हा प्रश्न पडला. अस्वस्थ वाटू लागले.

शेवटी काही करू नये. जे काही होईल ते होऊ द्यावं असं ठरवले. त्यानं माझा काही फायदा होणार आहे की नाही वगैरे विचार केला नाही. फक्त तसं ठरवल्यामुळं मन थोडं तरी शांत झालं.

आज दिल्लीच्या डॉ० नारायणराव कुलकर्ण्यांचे पत्र आले आहे. हा गृहस्थ एका एयर-लेटरमधे पाचसहा पानांचा मजकूर लिहितो. अक्षर बारीक असूनही चांगले वळणदार असल्यामुळे वाचायला तोशीस पडत नाही. स्पष्टपणे वाचता येते.

कुलकर्णी भारत सरकारच्या नॅशनल आर्काईव्हज्‌मधे डेप्युटी डायरेक्टर. डॉक्टरेट केलेला. उंचीला कमी, जाड भिंगांचा चष्मा व कधीही कोणत्याही गोष्टीची घाई म्हणून माहीत नसलेला हा गृहस्थ. माझ्यात आणि त्यांच्यात कोणतेही साम्य नव्हते. त्यांचा स्वभाव, राहणी, शिक्षण, आवडीचे विषय, सगळे माझ्यापेक्षा अगदी वेगळे.

ते आणि मी दिल्लीला करोल बागेतच राहत असल्यामुळे एकमेकांना गेली पुष्कळ वर्षे ओळखत होतो. पण राष्ट्रपतिभवनावर मी वाचन व संशोधन करायला लागलो तेव्हा मात्र आमचा घनिष्ठ संबंध आला. त्या कामात त्यांनी मला फार मदत केली. आणि जरी ते माझ्यापेक्षा सातआठ वर्षांनी लहान होते तरी ते माझे मित्र, गुरू व तत्त्वज्ञानी बनले.

मी प्रथम त्या पुस्तकाचे पहिले प्रकरण हाताने लिहून त्यांना वाचायला दिले तर ते त्या गृहस्थांनी जवळजवळ फेकूनच दिले व वाचायचे चक्क नाकारले. वर म्हणाले, "असं हस्ताक्षरातले वाचायला व त्याचा अर्थ लावत बसायला मला वेळ नाही. चांगला अर्धा कागद समास सोडा, डबल स्पेसिंगमधे टाईप करून आणा, मग मी वाचीन."

"काय खाष्ट माणूस आहे हा! सगळे इतिहासाचार्य खाष्ट असतात असं ऐकलं होतं ते खरंच म्हणायचं!" त्यांचा जिना रागारागाने उतरत मी मनाशी म्हटले.

पण पुढे त्यांचे म्हणणेच योग्य होते हे पटले. मी चांगला टंकलेखक तर झालोच पण चार ओळी शुद्ध इंग्रजी न लिहिता येणारा मी, आता पुष्कळसे चांगले इंग्रजी लिहू लागलो.

त्यांनी माझे मराठी लिखाण वाचले व त्याचे खूप कौतुक केले, उत्साह दिला. पुण्याच्या साप्ताहिकाचे अंक त्यांना नियमितपणे मिळत होते असे नाही पण जे काही मिळायचे ते वाचून झाले, की आवडल्याची पावती ते ताबडतोब पाठवत.

आजचे त्यांचे पत्र म्हणजे विनोदी लिखाण कसे करावे ह्याचा एक उत्तम पाठ होता. त्यांनी लिहिले होते

"मराठीतले रजिष्टर्ड विनोदी लेखक अतिरंजित लिहितात. वाक्यावाक्यांतून विनोद साधू पाहतात. त्यामुळे त्यांचेच हसू होते...तुमच्या मूलतः आनंदी, आशावादी व खेळकर वृत्तीचे प्रतिबिंब तुमच्या लिखाणात उतरले आहे...चिं० वि० जोशीशेजारी जर स्टूल टाकून बसायचे असेल तर तुम्हीही अतिरंजित लिखाण करू नका...खरे वाटेल इतपतच विनोद करा... स्वानुभवातूनच तो फुलू द्या...फिरोझने आता खऱ्या म्हणजे पंढरीनाथ वा मुकुंद ह्या नावाने लिहायला काही हरकत नाही. का आता हा पुरुषी बुरखा कायमचा चिकटला?"

मी लिहायला सुरुवात केली त्या वेळी कोणत्या नावाने लिहावे ह्याची आमच्या घरात बरीच चर्चा झाली होती. माझे सरकार-दरबारी नाव 'पंढरीनाथ' व घरचे 'मुकुंद' असे होते.

मराटवाड्यातल्या कोणी डॉ० पंढरीनाथ रानड्यांनी स्वतःच्या मनास योग्य व खरे वाटत होते तसे शिवाजी महाराजांबद्दल लिहून बराच तंटा निर्माण केला होता तेव्हा ते नाव नको असे ठरले. मुकुंद हे नाव फार वापरातले व त्या नावाला कवींनी इतक्या प्रकारे छळलेले होते की त्याचे आणखी हाल करावेत असे वाटेना. त्यामुळे ते बाद झाले.

बायकोने लेखिका म्हणून खूप प्रसिद्धी मिळवली होती. अफगाणिस्तानावरच्या लिखाणा-मुळे तिच्या नावाचा बराच बोलबाला झाला होता. त्या काळी इंदिराजींचे राज्य होते. दिवसेन्दिवस दिल्लीचे महत्त्व वाढत होते. सगळ्यांचे लक्ष दिल्लीकडे असे. माझे पण लक्ष दिल्लीकडे गेले. प्रथम इंदिराजी डोळ्यांसमोर आल्या व त्यांच्या पाठोपाठ फिरोझ गाधी आले. ताबडतोब निष्कर्ष काढला : प्रसिद्ध स्त्रीच्या नवऱ्याला 'फिरोझ' म्हणावे व लगोलग ते नाव पक्के केले.

हे जेव्हा कुलकर्ण्यांना कळवले तेव्हा त्यांनी, "हे नाव घेऊ नये, त्यामुळे तुमच्या मनात कायमचा न्यूनगंड राहील" असे कळवले होते. पण मला त्यांचे हे मत भावले नव्हते. मला कुठलाही गंड तर आला नाहीच, उलट ह्या नावाचा खूप फायदा झाला. नावामुळे थोडीशी उत्सुकता निर्माण होत असे व त्यामानाने माझे लिखाणही बरे असे, त्यामुळे त्या औत्सुक्याची पूर्ती होत असे.

काही वेळा मजेशीर प्रसंग येत. लिखाणावरून व लेखकाच्या नावावरून वाचक मनाशी काही कल्पना करतात. माझे लिखाण वाचून मी चांगला तरुण व स्मार्ट माणूस असेन असे बरेच जण समजत पण प्रत्यक्ष भेट झाल्यावर अर्थातच त्यांचा भ्रमनिरास होई. एका बाईने तर मला मी मुसलमान असूनही ब्राह्मणी जीवनाचे इतके बारकावे कसे माहीत आहेत असे विचारले होते!

आजच कुलकर्ण्यांचे पत्र मी वाचत असता अमानुल्ला जवळ येऊन पाहू लागला. इतक्या बारीक अक्षरातले लिहिलेले पत्र पाहून तो चक्रावून गेला. आपल्याकडे तांदळावर गीता लिहिणारे लोक आहेत हे त्याला सांगितले असते तर तो फेन्ट येऊन पडला असता.

आता ऑक्टोबर महिना सुरू आहे. सकाळी सकाळी थोडी थंडी पडते. त्यामुळे खूप प्रसन्न वाटते. पूर्वी एकटा असताना दिल्लीच्या ऑक्टोबरमधे मी पहाटेचा फिरायला जात असे. चांगले चारपाच मैल. पण इथे ऑफिसच मुळी आठ वाजता असल्यामुळे फिरायला जायचा प्रश्न येत नाही.

फिरायला गेले म्हणजे विचार, कल्पना चांगल्या रवंथ करता येतात. आपले आपल्याशी चांगले संभाषण होऊ शकते. पण ती संधी इथे मिळत नाही.

आज मसकतचा पहिला पाऊस पडला. इथे पाऊस असा कधी पडतच नाही. आपल्या राजस्थानसारखा वर्षात काहीतरी चारपाच इंच म्हणजे डोक्यावरून पाणी. दोन वर्षापूर्वी इथे अतोनात पाऊस पडला होता. त्याने केलेल्या नुकसानीच्या खुणा अजून दिसतात. बऱ्याच ठिकाणचे रस्ते वाहून गेले होते. इथे फार पाऊस पडत नाही म्हणून पावसाच्या पाण्याचा निचरा करण्याची काहीही व्यवस्था नाही. त्यामुळे सगळे रस्ते म्हणजे पाणी वाहून नेण्याची गटारे झाली. रस्त्यावर उभ्या केलेल्या गाड्या पावसाच्या पाण्याच्या लोटामुळे वाहत जाऊन थेट समुद्रात गेल्या. हजारो रुपयांचे त्या वेळी नुकसान झाले.

मसकत नुसता कोरडाच नाही तर अगदी खडकाळ प्रदेश. समुद्राला लागून असला तरी पाऊस नाही. त्यामुळे नावालाही हिरवळ नाही. झाडेझुडपे नाहीत. साधे गवतसुद्धा मुद्दाम चांगली माती टाकून लावल्याशिवाय उगवत नाही. मसकतमधे काही बागा आहेत व राजरस्त्यांच्या आजुबाजूला थोडी हिरवळ आहे. पण त्याकरता पाकिस्तानातून चांगली माती बोटीने आणली जाते. बाकी नदीच्या काठी थोडी हिरवळ असते, थोडी झाडे असतात, पण ते सगळे मसकतच्या बाहेर. मसकत शहरात नदी नाही.

माझा फ्लॅट चवथ्या मजल्यावर असल्याने बाल्कनीत आले, की शहराचा पॅनोरॅमिक व्ह्यू दिसतो. हे सगळे गेल्या दहापंधरा वर्षात उभारले गेलेले शहर. कितीतरी ऑफिसेसच्या इमारती, चांगली हॉटेल्स व अपार्टमेंट बिल्डिंग्ज इथून दिसतात. बारा-चवदा मजली इमारती असणे हे काही नवीन राहिले नाही आहे. पैसा असल्यामुळे चांगले आर्किटेक्ट्स नेमता येतात व भारी इमारतसामान वापरता येते.

बहुतेक आर्किटेक्ट्स ब्रिटिश, पाकी किंवा भारतीय, म्हणजे परक्या देशांतले आहेत. त्यामुळे त्यांनी डिझाईन केलेल्या इमारती एकमेकांपासून अगदी वेगळ्या वेगळ्या वाटतात. प्रत्येक आर्किटेक्टचा मूळचा देश वेगळा, विचार करण्याची पद्धत वेगळी त्यामुळे असे होणे साहजिकच होते. पण त्यामुळे इथले नवीन आर्किटेक्चर काही एका घाटाचे वा पद्धतीचे असे निर्माण होत नाही आहे.

पूर्वीसुद्धा एका देशातले आर्किटेक्ट्स दुसऱ्या देशात जाऊन इमारती डिझाईन करत असत. पण ते आर्किटेक्ट्स नव्या राज्यकर्त्यांबरोबर येत असत. जसे मोंगलांनी, इतर मुसलमानी राज्यकर्त्यांनी वा अलिकडच्या काळात इंग्रजांनी आपआपले आर्किटेक्ट्स बरोबर आणले. ताजमहाल इराणी पद्धतीचा आहे व मुंबईचे व्ही० टी० स्टेशन गोथिक पद्धतीचे आहे, याचे कारण तेच आहे. पण त्या वेळी बाहेरून येणारे आर्किटेक्ट्स एकाच देशातले असत. त्यामुळे वेगवेगळे आर्किटेक्ट्स असूनसुद्धा त्यांनी डिझाईन केलेल्या इमारतींत एक तऱ्हेचा सारखेपणा असे. तसा मसकतच्या नव्याने उभ्यारल्या गेलेल्या इमारतींत दिसत नाही.

संध्याकाळचे बाल्कनीत आले, की वेगवेगळ्या उंच उंच इमारती दिसत. प्रत्येक इमारतीची उंची वेगळी, ढब वेगळी, रंग वेगळा, प्रकृती वेगळी. संध्याकाळचे धूसर वातावरण...कित्येक इमारतीत दिवे असत. त्यांत रस्त्यावरच्या दिव्यांची भर पडे. मग तो सगळा दीपोत्सवच वाटे.

ह्या सगळ्यामागे एका रंगात रंगवलेला बॅक-ड्रॉप असावा अशा डोंगरांच्या रांगा असत. ते उजाड, उघडेबोडके, कोरडे ठणठणीत डोंगर सुरवातीला फिक्या करड्या रंगात असत. पण थोड्या वेळाने संधिप्रकाश कमी व्हायला लागला, की त्यांना पण एक गहिरा जांभळी रंग येई व तेही मनोहारी वाटू लागत.

रंगभूमीवर एखादा नट कसे वेगळे रूप घेतो व आपण त्याने वेडावून जातो तसेच ह्या डोंगरांचे होई. त्याच नटाला नंतर पाहिले तर त्याचे खरे रूप कळते. त्याचप्रमाणे दिवस उजाडला, की ह्या डोंगरांचे कोरडेपण, ठणठणीतपण जाणवते.

ह्या सगळ्या कोरडेपणावर व ठणठणीतपणावर आज पाऊस पडलां आहे. पहिला पाऊस.

तसा पाऊस लहरीपणाबद्दल प्रसिद्ध आहेच.

पण पहिला पाऊस तो पहिला पाऊस. थोडा पडो, जास्त पडो. ठरलेल्या वेळेच्या आधी पडो, उशिरा पडो. त्यांची चव काही न्यारीच असते. पहिला पाऊस म्हणजे प्रेयसीला भेटण्यासारखे आहे. केव्हाही, कुठेही, कधीही भेट झाली तरी त्याने आनंद होणारच. पावसाची आणखी एक मजा म्हणजे पाऊस पडायला लागला म्हणजे आता आपली प्रेयसी जवळ असायला हवी होती असे वाटते; आणि जर प्रेयसी सोबत असेल तर आता पाऊस पडायला हवा होता असे वाटते!

बाल्कनीत एकटाच उभा राहून पावसाची मजा चाखत होतो. पावसाने जमीन थंड होत होती तसे मन थंड होऊ लागले. कोरडी माती भिजल्यामुळे एक छान गंध सुटला होता. अशा वेळी दुसऱ्या कोणाची आठवण येणार?

बऱ्याच दिवसांत बायकोचे पत्र नाही. तिथे सगळे ठीक असेल ना? तिच्या आईची प्रकृती वरी नसते, तिचे तर काही जास्त नसेल ना? एका बाजूला बायकोबद्दल राग व एका बाजूला तिचे पत्र आले नाही तर काळजी. इतक्या विरोधी भावना फक्त बायकोबद्दलच असू शकतात, नाही?

आज दूरदर्शनवर महाभयंकर प्रकार पाहिला. माझ्याकडे टीव्ही नाही पण शेजारच्या दत्ताकडे आहे. आजकाल त्याच्याकडे संध्याकाळचा जाऊन बसतो. सगळ्या मध्य-पूर्वेतल्या देशांप्रमाणे इथेही रंगीत टीव्ही आहे.

ईजिप्तचा आपल्या २६ जानेवारीसारखा काहीतरी राष्ट्रीय कार्यक्रम घालला होता. तो टीव्हीवर दाखवत होते. आपल्या मंत्र्यांबरोबर व परदेशच्या पाहुण्यांबरोबर राष्ट्रपती अनवर सादात थोड्या उंच अशा मंचावर बसून कवायत पाहत होता. त्या मंचावर जवळ जवळ शंभरएक माणसे तरी असतील. सादातची बायको त्याच्याबरोबर नव्हती पण परदेशी पाहुण्यांच्या, तिथे असलेल्या राजदूतांच्या बायका मंचावर होत्या.

एकामागून एक तुकड्या जात होत्या. अनवर सादातला सलामी देत होत्या व सादात त्यांची मानवंदना स्वीकारत होता. तेवढ्यात एक मोठा ट्रक आला. त्यातून तीन बंदूकधारी जवान उतरले. तिथे असणाऱ्यांना व आम्हां टीव्ही बघणाऱ्यांनाही ते तिघे काही सलामी वगैरे देणार असतील असे वाटले. पण कुठली सलामी आणि कुठले काय? ते सैनिक, सादातसमोर अटेन्शनमधे उभे राहिले. तोपर्यंत ट्रक पुढे निघून गेला होता. त्या तिघांनी हातांतल्या बंदुका सरसावल्या व धडाधड गोळीबार केला!

अरे, काय पाहत आहोत आपण हे? हे सलामी देण्याकरता आलेले सैनिक ना? मग हे गोळीबार काय करताहेत? हे सगळे प्रश्न आमच्या मनाशी येताहेत तोपर्यंत सैनिकांनी आपल्या बंदुका चालवल्या होत्या. सादातचे धड तिथेच समोर असलेल्या सेंटर-टेबलवर पडले. त्याच्या शेजारी बसलेला मसकतचा एक मंत्री व दुसरा एक जण गोळ्या लागून ठार झाले. काही क्षणांपूर्वी जितीजागती असलेली ही मंडळी मरून पडली होती! डोळ्यांनी पाहिलेले असूनही त्यावर विश्वास बसत नव्हता.

हे सगळे इतक्या अनपेक्षितपणे व काही सेकंदांत घडले की टीव्हीवाले कार्यक्रम बंद करायचे पण विसरले!

मग मंचावरची धावपळ काय विचारता? आतापर्यंत प्रतिष्ठितपणे बसलेली बडी मंडळी बावचळून जाऊन धावपळ करू लागली. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात राहिला नाही, असे म्हणतात ते तिथे अक्षरशः पाहायला मिळाले. कोणी खुर्च्यांच्या व सोफासेटच्या मागे लपले. बायका आरडाओरडी करू लागल्या. कोणी मंचावरच आडवे पडले. कोणी हातांतल्या खुर्च्या समोर धरून उभे राहिले. पण त्या सैनिकांचे काम झाले होते. त्यांनी नंतर कोणावरही गोळीबार केला नाही. तोपर्यंत टीव्ही पण बंद झाला.

दुसऱ्या दिवशी कचेरीत गेलो तर अनवर सादातच्या आदरार्थ सगळ्या सरकारी कचेऱ्या बंद ठेवल्याचे सांगण्यात आले. गेलो होतो तसाच परत आलो.

अनवर सादातच्या खुनाने इथले वातावरण फार तंग झाले आहे. सुलतान व सत्ताधारी वर्ग चांगलाच हबकून गेला आहे. ठिकठिकाणी सैनिक उभे केले गेले आहेत. आकाशात हेलिकॉप्टर्स उडताहेत. सगळ्या गावाचे निरीक्षण हेलिकॉप्टरने केले जात आहे. गावात काही गडबड होते आहे का? लोक कुठे जमले आहेत का? — ह्या सगळ्याची टेहळणी हेलिकॉप्टरने फार छानपैकी करता येते.

हे सगळे बघून काबूलची आठवण झाली. राज्यक्रांती झाल्यानंतरच्या काही महिन्यांत असे हेलिकॉप्टरने टेहळणी करण्याचे अगदी नेहमीचे झाले होते. हेलिकॉप्टर्सची घरघर दिवसरात्र ऐकू यायची. त्यानंतर गोळीबाराचे आवाज येत. त्यामुळे त्या घरघरीची एक तऱ्हेची भीती निर्माण झाली होती. तशीच भीती त्या दिवशी मसकतध्ये वाटली.

पण नंतर विशेष असे काही झाले नाही. सगळ्या कचेऱ्यांबरोबर सिनेमागृहे, दुकाने वगैरे पण बंद असल्यामुळे लोकांना चकाट्या पिटण्याशिवाय काही करण्यासारखे नव्हते व लोक तेच करत होते.

नंतर चांगला आठवडाभर गावातले वातावरण तंग होते हे खरे.

एक दिवसाच्या सुट्टीनंतर ऑफिस उघडले तेव्हा अनवर सादातच्या मृत्यूबद्दल हळहळ व्यक्त करण्याकरता म्हणून कचेरीतल्या इजिप्ती सहकाऱ्यांकडे आम्ही गेलो. प्रथम त्यांनी शिष्टाचार व पद्धत म्हणून आमची हळहळ स्वीकारली. पण थोड्याच वेळात त्यांची खरी मते बाहेर पडू लागली.

"नाहीतरी अनवर सादात हरामीच होता. त्याला योग्य तीच शिक्षा झाली. कुत्र्याच्या मौतीने मरण्याच्याच लायकीचा होता तो." वगैरे वगैरे.

इझराईलशी सख्य केल्यामुळे बहुसंख्य इजिप्ती लोक व अरब जग अनवर सादातवर नाराज झाले होते. त्या सगळ्यांपासून तो दूर पडत चालला होता.

पण ह्या कारणापेक्षासुद्धा अनवर सादातने ईजिप्तमधल्या मुल्ला-मौलवींबद्दल घेतलेल्या कडक धोरणामुळे तो इजिप्ती लोकांत फार अप्रिय झाला होता. त्याने मुल्ला-मौलवींना चांगलेच धारेवर धरले होते. कारण ते कोणत्याही सामाजिक वा धार्मिक सुधारणा करण्याच्या विरुद्ध होते आणि सरकारविरुद्ध जनतेची मने भडकवत होते. नेहमीप्रमाणे बहुतेक मशिदी सरकार-विरोधी लोकांचे अड्डे बनल्या. तेव्हा अनवर सादातने साध्या पोशाखातल्या पोलिसांकडून नमाज पढून बाहेर पडणाऱ्यांची निर्दयपणे पिटाई करायला सुरवात केली. असे पूर्वी कधी झाले नव्हते. मशिदीत नमाज पडायला जाणे तर सगळ्यांना आवश्यक होते. आणि तसे गेले की

अनवर सादातचे पोलीस लाठ्या घालून डोकी फोडत. ह्या सगळ्यामुळे अनवर सादात मारला गेल्याबद्दल इजिप्ती दुःखी होण्याचे काही कारण नव्हते.

मश्रफाला भेटलो तर झाल्या प्रकाराने ती खरेच फार दुःखी झालेली दिसली. रडून रडून तिचे डोळे लाल झाले होते. त्यामागे सादातबद्दल वाटणारे प्रेम असणारच; पण त्यापेक्षासुद्धा जर सादातच्या जागी आता कोणी 'खोमेनी' आला तर ? हा प्रश्नसुद्धा तिच्या मनामधे आला असेल. जर असा कुणी 'खोमेनी' सत्तेवर आला तर आपल्यासारख्या बायकांना परत बुरख्यांत जायला लागेल, नोकऱ्या सोडून घरी बसायला लागेल, असेही तिच्या मनात आले असेल. 'खोमेनी'च्या उद्यापासून सगळ्या मुस्लिम जगातले सुधारणादी पुरुष व स्त्रिया धास्तावून गेल्या आहेत.

कोणाचेही मरण स्त्रियांना फार जाणवते म्हणूनही मश्रफा त्या दिवशी जास्त दुःखी झाली असेल. अर्थात त्या दिवशी त्याविषयी वा अनवर सादातच्या इंग्लिश बेगमेविषयी, मनात असूनही काही बोलणे योग्य दिसले नसते.

इंग्रजी म्हणजे युरोपियन चित्रपट पाहणे नेहमीप्रमाणे चालले आहे. दररोज तीन खेळ असतात. सिनेमाचे दर त्यामानाने स्वस्त आहेत. दीड रुपया, तीन रुपये, पाच रुपये. दररोज नवीन सिनेमा.

साधारणतः प्रतिष्ठित लोक व बायका थिएटरमधे येत नाहीत. इथे टीव्ही आणि व्हिडियो खूप बोकाळले आहेत. घरच्या घरी कोणताही इंग्रजी वा हिंदी सिनेमा पाहता येतो, मग चित्रपटगृहात कोण येईल ? 'निळ्या' चित्रपटांची म्हणजे ब्ल्यू-फिल्मस्‌ची इथे फार चलती आहे. पण ते सगळे चोरूनमारून आणावे व पाहावे लागतात. सगळे व्हिडियो दुकानदार तशा फिल्म्स ठेवतात पण चांगली ओळख झाल्याशिवाय देत नाहीत.

मी कचेरी सुटल्यावर घरी जाऊन, जेवूनखाऊन व वामकुक्षी वगैरे करून संध्याकाळच्या चित्रपटाला जातो. कोणता चित्रपट आहे ह्याची चौकशी करण्याच्या भानगडीत पडत नाही. चांगला वाटला तर थांबतो नाहीतर परत येतो.

इथले सेन्सॉर-बोर्ड चित्रपटात काही धार्मिक भावना दुखवणारे नाही आहे ना, एवढेच पाहते. बाकी गोष्टींकडे त्याचे लक्ष नसते. त्यामुळे उघड्यावाघडया बायका व प्रेमाचे अतिप्रसंग पाहणाऱ्यांची फार चंगळ होते. त्यातल्या त्यात इटालियन चित्रपट फारच पुढारलेले व कोणत्याही गोष्टीचा फारसा विधिनिषेध न पाळणारे असतात. त्या चित्रपटांना तोबा गर्दी होते. हे इटालियन, ग्रीक चित्रपट इंग्रजीत 'डब' केलेले असतात. आता ओमान्यांना इंग्रजी काय, इटालियन काय, काही फरक पडत नाही. त्यांचा 'बघण्याचा' दृष्टिकोनच वेगळा असतो.

पण हल्ली हल्ली इथेही 'महत्त्वाचे' प्रसंग कापले जाऊ लागले आहेत. त्यामुळे अगदी 'आणी-बाणी'च्या वेळी नेमकी फिल्म कापली जाते. आणि प्रेक्षकांकडून 'च्-च्' असे नाराजीचे आवाज आणि शिव्या देऊन राग व निराशा व्यक्त केली जाते.

आज एका ख्रिश्चन कुटुंबावरचा सिनेमा पाहिला. ह्याला कुटुंबनियोजनाचा प्रचार

करणारा चित्रपट म्हणायला हरकत नाही. पण तो बटबटीत नव्हता. त्यात भाषणबाजी नव्हती. उलट अत्यंत हळुवारपणे विषय हाताळला होता.

त्यातल्या नायिकेचे लग्न होते त्याच दिवशी तिची आई सहाव्या बाळंतपणात मरते. प्रत्येक बाळंतपण म्हणजे आईला भयंकर यातना हे मुलीने पाहिलेले असते. ते लोक कॅथलिक असल्यामुळे संततिनियमनाची साधने वापरणे हे त्यांच्या धर्म-विश्वासाच्याविरुद्ध असते. त्यामुळे आईची बाळंतपणे व यातना वर्षनुवर्ष चालू राहिलेल्या असतात.

आईच्या पूर्वीच्या यातनांमुळे व नंतरच्या मृत्यूमुळे लग्न म्हणजे पुरुषसंबंध, म्हणजे बाळंतपण म्हणजे भयंकर यातना व त्यांत मृत्यू हे समीकरण त्या मुलीच्या मनावर इतके बिंबवलेले असते, की ती नवऱ्याला अगदी जवळ म्हणून येऊ देत नाही. एक दिवस अगदी न राहवून नवरा तिच्यावर बलात्कार करतो. ती माहेरी निघून जाते.

काही कारणाने ती एक दिवस कुठल्यातरी हॉस्पिटलात कोणाला तरी भेटायला म्हणून जाते. एका वॉर्डात एक अगदी कोवळे मूल रडत असते. त्याला ती जवळ घेते तर ते एकदम रडायचे थांबते व ह्या मुलीला प्रेमाचा पान्हा फुटतो.

माझे लेखन त्या साप्ताहिकात दर आठवड्याला छापून येत आहे असे पत्रांवरून कळते पण त्याची प्रत संपादकही पाठवत नाहीत व बायको पण पाठवत नाही. संपादकांना वाटत असेल, की आमची बायको पाठवत असेल व बायकोला वाटत असेल, की संपादक पाठवत असतील.

खरे म्हणजे त्यांना तरी माझे एवढे कौतुक करायला वेळ कुठला? असे शेकड्याने छापून येत असते. ते कोणाकोणाला पाठवणार? बायको आपल्या कामात मग्न असणार.

ही सगळी कारणावळी झाली. पण त्यामुळे चिडचिड व्हायचे थोडेच थांबते? ती होतेच. त्याच चिडचिडीत बायकोला पत्रे लिहिली जातात. त्यामुळे बायको नाराज. असे हे वाईटातून वाईटाकडे जाणारे प्रकरण आहे.

ह्यावर उपाय एकच म्हणजे मुळात अपेक्षाच करायची नाही. अपेक्षा ठेवली आणि पुरी झाली नाही, की चिडचिड आलीच. भगवंतांनी फळाची अपेक्षा ठेवू नका म्हणून सांगितले आहे. खरे म्हणजे फळाचीच का? कसलीच अपेक्षा ठेवू नका म्हणून सांगायला हवे होते.

विचार करता करता मी थेट भगवंतांपर्यंत पोहोचलो. असाच विचार करता करता कोणाच्या तरी डोक्यातून भगवंताची कल्पना निघाली नसेल ना? भगवंताची कल्पना निघाली व मग त्याच भगवंताकडून 'फळाची अपेक्षा ठेवू नका' हे तत्त्वज्ञान पण वदवून घेतले गेले!

पण हे सगळे फोल विचार आहेत. फळाची अपेक्षा किंवा कसलीही अपेक्षा ठेवू नका म्हणणे सोपे आहे. फळ न देणारी झाडेसुद्धा लोक लावत नाहीत व तशी असली तर तोडून टाकतात; तर सगळ्या कर्तृत्वाला, बुद्धीला, शरीराला फळाची आशा न करता राबवणे कसे शक्य आहे?

तात्पर्य : माझे अपेक्षा ठेवणे चालू आहे व त्या पुऱ्या होत नाहीत म्हणून चिडचिड करणे व मनस्ताप करून घेणे पण चालू आहे.

आज कपूरच्या घरी श्री० व सौ० सूदची ओळख झाली. सूद हा कुठल्यातरी खाजगी

कंपनीत इलेक्ट्रिकल इंजिनियर आहे. हे खास उच्च मध्यमवर्गीय पंजाबी जोडपे. श्री० व सौ० सूद पेय तर पीत होतेच पण सौ० सूद सिगारेट पण पीत होती. बायकांनी सिगारेट प्यालेले मला फार आवडते. म्हणजे सिगारेट पिणाऱ्या बायका मला आवडतात. त्यामागे फ्राईड साहेबांचे काही तत्त्वज्ञान आहे की काय ते मला माहीत नाही; पण माझी मी आवड सांगितली.

ह्याच सौ० सूदची पुढे एक गंमत झाली.

एकदा मी एका मोठ्या डिपार्टमेंटल स्टोअरमधून काही खरेदी करून बाहेर पडलो, तर समोर सौ० सूद उभी. "हॅलो, की हाल है?" वगैरे इंग्रजी व पंजाबी पद्धतीने अभिवादन करून झाल्यावर ती मला म्हणाली, "इनके भाई साहाब, अंदर कुछ परचेसेस कर रहे है. मै उनके लिये वेट कर रही हूँ." ह्या सगळ्या पंजाब्यांचे असेच असते. एका वाक्यात दहा इंग्रजी शब्द.

तेवढ्यात तिच्या नवऱ्याचे 'भाईसाहेब' खरेदी संपवून बाहेर आले. मी माझी ओळख करून दिली. त्याने आपण इलेक्ट्रिकल इंजिनियर आहोत म्हणून सांगितले.

"म्हणजे तुम्ही दोघे भाऊ इलेक्ट्रिकल इंजिनियर आहांत तर!" मी थोडे आश्चर्याने म्हणालो.

"कोणते दोघे भाऊ?" त्याने माझ्यापेक्षा दुप्पट आश्चर्याने विचारले.

"हे काय विचारणं झालं?" मला काय घोटाळा झालाय ते कळेना. "कोणता भाऊ म्हणजे? अर्थातच मिस्टर सूद."

"सूद काही माझा भाऊ नाही. तो माझा सहकारी आहे."

मी सौ० सूदकडे पाहिले. तिचा चेहरा लाजेने लाल लाल झाला होता. स्वतःच्या मित्राला दीर ठरवणारी सौ० सूद ही काही पहिलीच बाई मी पाहिली नव्हती. आता मी काय सांगतो ह्याकडे तिचे लक्ष होते. "ह्या मिसेस सूदनंच मला तू मिस्टर सूदचा भाऊ आहेस म्हणून सांगितलं" असे मी सांगितले असते तर फार अवघड प्रसंग निर्माण झाला असता. ती मोठ्या अडचणीत पडली व तिच्या चेहऱ्यावर ते स्पष्ट दिसत होते.

अडचणीत पडलेल्या ललनांना मदत करणे हे सभ्य लोकांचे कर्तव्य आहे, असे इंग्रजीत म्हणतात – म्हणजे 'डॅमुसेल इन डिस्ट्रेस' वगैरे. मी सभ्य होतो व सौ० सूद 'डॅमुसेल इन डिस्ट्रेस' होती.

"ओव्ह, मिस्टर सूद म्हणजे तुझ्या भावासारखाच नाही का? तोही इलेक्ट्रिकल इंजिनियर आणि तूही इलेक्ट्रिकल इंजिनियर!"

"हो, हो, त्या अर्थी म्हणत असशील तर मिस्टर सूद माझा भाऊच!"

सौ० सूदने माझ्याकडे मोठ्या थँक्सच्या नजरेने पाहिले.

कचेरीतली कामे व्यवस्थित सुरू आहेत. तरी पण अजून पगार मिळायला सुरुवात झालेली नाही. कारण आमचे सगळे कागद गृहमंत्रालयात गेले आहेत. गृहमंत्रालयाचे एकदा शिक्का-मोर्तब झाले म्हणजे मग आम्हांला पगार मिळायला लागणार आहे.

त्याच्याही थोड्या आंबट आठवणी आहेत:

गृहमंत्रालयातून आमच्या नेमणुकीवर शिक्कामोर्तब करून घेणे तेवढे सोपे व सरळ काम नव्हते. त्याच्याकरता फोटो काढून घ्यायला लागला होता. डझनांनी फॉर्म्स भरायला लागले होते. फोटो काढणे सोपे होते, पण ते फॉर्म्स भरणे फार कटकटीचे व जिकिरीचे काम होते.

माझ्यासारख्या पंचवीस वर्षे सरकारी नोकरीत काढलेल्यालाही ते फॉर्म्स भरणे जिकिरीचे वाटत होते.

त्या फॉर्म्समधे स्वतःचे कुटुंब, आई, बहीण, भाऊ ह्यांची तर माहिती द्यायची होतीच; शिवाय भावाची बायको, तिचे आई-वडील, बहिणींच्या नवऱ्यांची नावे व त्यांच्या आई-वडलांची माहिती, त्यांची वये, नावे, पत्ते – सगळे द्यायला लागले होते. मला तर वहिनींच्या माहेरचे आडनावसुद्धा आठवत नव्हते, तर संपूर्ण नाव कुठले आठवणार? आणि नुसती आद्याक्षरे चालत नसत तर सगळ्या गोष्टींची संपूर्ण नावे द्यायला लागत.

आता माझ्या शिक्षणाच्या संदर्भात मी सर जे० जे० स्कूल ऑफ आर्किटेक्चर असे लिहिले होते तर ते फॉर्म्स परत आले. का? तर नुसते जे० जे० चालायचे नाही. संपूर्ण नाव लिहायला पाहिजे. आता सर जे० जे० म्हटले, की मुंबईतले लहान मूलसुद्धा ओळखते. उलट सर जमशेठजी जीजुभाई म्हटले तर तिथला पोस्टमनसुद्धा बुचकळ्यात पडेल वगैरे मी त्यांना सांगितले. त्यांचे उत्तर एकच, "संपूर्ण नाव पाहिजे". म्हटले, "घ्या आणि घाला..."

माझ्यापेक्षा सरदारजीची जास्तच गंमत झाली. त्याचे शिक्षण सेंट झेव्हियर्समधे झाले होते. तेव्हा त्याने फॉर्ममधे St. झेव्हियर्स वगैरे लिहिले. त्याचाही फॉर्म परत आला. 'नुसते St. झेव्हियर्स चालायचे नाही. St. म्हणजे काय ते संपूर्ण लिहा.' आता सरदारजी बुचकळ्यात! वर्षोनुवर्षे तो St. झेव्हियर्स लिहीत होता. त्याला कोणीही St. संपूर्ण लिहा म्हणून सांगितले नव्हते. तो बिचारा माझ्याकडे आला व "रानाडे साहाब, ये St. का फुल-फॉर्म क्या होता है?" म्हणून विचारू लागला.

दत्ता, माझा बंगाली सहकारी, आधीच वेंधळा. तो माझ्याकडे वेंधळत आला. "ही बायकोच्या माहेरच्या माणसांची, बहिणींच्या नवऱ्यांच्या वडलांची माहिती द्यायची तरी कुठून? हिंदुस्थानात पत्र लिहिलं तरी दीड-दोन महिने लागणार. आता काय करायचं?"

"काय करायचं म्हणजे वाटेल ती माहिती ठोकून द्यायची." मी तेच केले होते. म्हणून त्याला फार आत्मविश्वासाने सांगितले. "कोण विचारायला जातंय तुझ्या वहिनींच्या वडलांचं नाव आणि गाव? खुळ्यासारखं विचारतात तर खुळ्यासारखी माहिती द्यायला काय हरकत आहे?"

ह्याप्रमाणे 'ठोकून' पद्धतीने फॉर्म्स भरले व पाठवून दिले. आता महिन्या दोन-महिन्यांत पगार मिळायला लागावा. पगार मिळेपर्यंत आम्हांला, ॲडव्हान्स म्हणून महिना अडीच हजार रुपये देत. तसे ते एकट्याला पुरे पडत होते. पण काही मोठी खरेदी करायची म्हणजे पंचाईत होत असे. त्यातूनही असे वाटायचे, की ह्या लोकांनी पगार देण्यात तत्परता दाखवायला नको का? नुसते शंभर रियाल हातावर टिकवले की झाले, असे ह्यांना वाटते, ह्याचा राग येई.

तेव्हा मी अनवर अल्लीला भेटायला गेलो. हा डायरेक्टर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन व आमच्या मश्रफाचा साहेब. ह्याला आल्यादिवशी भेटलो होतो. त्यानंतर आज भेटत होतो.

तीसएक वर्षाचा, गोरापान, उमदा व श्रीमंत घराण्यातला हा अनवर अल्ली कामातही हुशार होता. ओमानी लोक एका वंशाचे नाहीत. हा मूळचा इराणी-आर्यन असावा. बाकी बहुतेक हिंदी, आफ्रिकन, अरब, इराणी वगैरेंची भेसळ. त्यामुळे चांगल्या, सुसंस्कृत ओमानीशी गाठ पडणे जवळजवळ अशक्य. पण अनवर अल्ली त्यांतला नव्हता. तो चांगल्या घराण्यातला तर होताच, पण पदवीधरही होता.

मी त्याला भेटलो व म्हणालो,

"हे शंभर रियाल फार कमी होतात. निदान पाचशे रियाल ॲडव्हान्स म्हणून द्या."
यावरती तो शिष्टपणे म्हणाला,
"तुम्हां हिंदी लोकांना इतके पैसे कशाला लागतात? पन्नास-पन्नास, साठ-साठ रियाल-मधे इथे शेकडो हिंदी वर्षोन्‌वर्षे राहत आहेत. आम्ही तर तुम्हांला शंभर रियाल देतो आहोत. त्यातून तू एकटा. नाही इथं तुझी बायकामुलं, नाही घरभाडं. तुला हवेत कशाला पाचशे रियाल?"

एका सुशिक्षित व सुसंस्कृत ओमानी माणसाचे हे बोलणे ऐकताच मला राग आला पण त्याला उत्तर काय द्यावे असा मला प्रश्न पडला. कारण त्याचे म्हणणे खरे होते. सगळ्यांत कमी पगारावर इथे हिंदी माणसे कामे करताहेत आणि तेसुद्धा दुसऱ्या कुणाकडे नाही तर हिंदी कंत्राटदाराकडेच. तेव्हा मी अनवर अल्लीला काय उत्तर देऊ शकलो असतो? मी चूप राहिलो. मी चूप राहिलो होतो तरी माझ्या चेहऱ्यावरचा राग त्याला दिसला असावा. कारण तो समजुतीच्या स्वरात म्हणाला,

"आता अगदीच पैसे लागत नाहीत असं नाही. काही मोठी खरेदी करायची असली तर नक्कीच लागतात. पण तुला एक सांगतो, बायको येईपर्यंत फ्रीज, टीव्ही वगैरे काही घेऊ नकोस. काही जरी घेतलंस तरी बायको त्यात काहीतरी दोष काढील. ह्या बायकांची ती सवयच असते. आणि आता जास्त ॲडव्हान्स वगैरे देण्याऐवजी मी तुला तुझा पगारच लवकर मिळवून देण्याची व्यवस्था करतो, मग तर झालं?"

अशा रीतीने आमची मुलाखत संपली.

•

काबूलमधे आमच्याबरोबर असलेल्या वैद्यांचे ग्रीटिंग-कार्ड आले आहे. त्या कार्डावर 'तुमचा कथांकित' म्हणून खाली सही केली आहे. ह्याचा अर्थ त्यांना माझे लिखाण आवडले आहे असा केला व मी मनोमनी आनंदलो. कुंडीतल्या झाडाला थोडे जरी पाणी घातले की कशी त्याला लगेच टवटवी येते? तशीच मनाला टवटवी आली. अशा लहानसहान गोष्टीनेदेखील कलावंताच्या मनाला उभारीच्या लाटा येतात. पाण्यात अगदी लहान जरी दगड टाकला तरी पाण्यावर तरंग उठतातच ना? तसेच कलावंताच्या मनाचे पण आहे.

काल शुक्रवार व आज ओमानी वर्षाचा पहिला दिवस म्हणून जोड-सुट्टी मिळाली. वाढदिवस, नवीन वर्षाचा पहिला दिवस वगैरे गोष्टीचे कौतुक करण्याची पद्धत साहेब लोकांची. आपल्याकडल्या वरच्या वर्गात ती चाल बोकाळली पण सर्वसामान्यांत ती म्हणावी तशी रूढ झाली नाही.

बाकी देशांतून नवीन वर्षाची सुट्टी देण्याची पद्धत आहे म्हणून इथेही देतात, पण बाकी काही कार्यक्रम वगैरे नसतो.

आता दोन दिवस सुट्टी आहे तर जानकीला फोन करावा का? – ह्या विचारात होतो. माझ्या घराजवळच परदेशांत टेलिफोन करायचे केंद्र आहे. तिथे पैसे तर भक्कम पडतातच पण कधी कधी वेळही फार लागतो. टेलिफोन लागला तर दहा-पंधरा मिनिटांत लागतो, नाहीतर काही वेळा तासन्‌तास जातात. आणि एवढे करून जानकी घरी असायला हवी. तेव्हा तो

विचार रद्द केला.

मग जानकीच्या आठवणींची जपमाळ ओढत बसण्यात सुट्टीचे दोन्ही दिवस घालवले. दिल्लीची भेंट चुकली म्हणून इंदूरला गेलो होतो त्या वेळची गोष्ट :

पहिल्या मजल्यावर त्यांच्याकडे प्रथम फक्त एकच खोली होती. आता त्याला जोडून त्यांनी आपला दोन बेडरूमचा फ्लॅट बांधून घेतला होता; व पूर्वीची खोली गेस्ट-रूम केली होती. माझ्या राहण्याची व्यवस्था तिथेच केली होती.

सकाळी उठलो. गादी वगैरे न आवरता जेवणाच्या खोलीत जाऊन चहा घेतला. परत आलो. आंघोळ केली. आतले कपडे नुसतेच पिळून बाथरूममधेच नळावर वाळत टाकले. मी गेले चारपाच दिवस फिरतीवर होतो त्यामुळे ते कपडे जास्तच मळले होते. पण विचार केला, की आता बाथरूममधे ते बघायला कोण येणार आहे? राहू द्यावे तसेच.

नाश्ता करायला परत जेवणघरात गेलो. माझा व जानकीच्या नवऱ्याचा ब्रेकफास्ट चालला होता, त्या वेळी जानकी पाचदहा मिनिटे बाहेर जाऊन आली. नाश्ता करता करता तिच्या नवऱ्याचे आणि माझे कुठेतरी बाहेर जायचे ठरले. म्हणून मी नाश्ता संपल्यावर कपडे करायला म्हणून खोलीत गेलो. बघतो तर काय!

माझे अंथरूण-पांघरूण व्यवस्थित लावून ठेवले होते. बेड-कव्हर नीटपणे अंथरले होते; आणि मुख्य म्हणजे माझे कपडे व्यवस्थित धुऊन बाहेरच्या दोरीवर वाळत टाकले होते.

म्हणजे जी गोष्ट कोणाच्याही नजरेला पडणार नाही – निदान पडू नये – असे वाटले होते ती नेमकी जानकीच्या नजरेला पडली होती. एवढेच नाही तर जानकीने ते कपडे स्वतः धुऊन वाळत टाकले होते.

बाहेरून परत आल्यावर योग्य संधी मिळताच मी जानकीला म्हटले, "मै बडा शरमिंदा हूँ. मी अंथरूण-पांघरूण हॉटेलमधे सोडतात तसंच सोडून दिलं. माझे कपडे पण इतके मळले होते. आता तू हे धुशील असं मला माहीत असतं तर मीच धुऊन ठेवले असते. बडी शरम की बात है."

"उसमे शरम की क्या बात है?" जानकीने हसत हसत उलट मलाच विचारले. व पुढे म्हणाली, "आप तो हमारे मेहमान है. और तो और खास मेहमान है."

"वो तो ठीक है, मगर तुने किया वो अच्छा नही किया." मी अजून ओशाळलेलाच.

"मैने जो भी किया, अच्छाही किया. जानकी निर्णय देऊन निघून गेली.

आता काय बोलू ह्यावर? का ही अशी माझ्यासारख्या माणसाच्या नादी लागत होती? त्याच्यावर जीव लावत होती? ज्या कादंबरीची शेवटची पाने गहाळ झाली आहेत, त्या कादंबरीची नायिका होण्यात तिचा काय मतलब?

माझ्या असहायतेचा मला त्या दिवशी प्रत्यय आला. इतकी ही प्रेमात पडली आहे! तिची वंचना कशी करू? पण मग हिच्या अपेक्षा तरी पुऱ्या कशा करू?

देवा, शरीराचे दुबळेपण एकवेळ परवडले, पण मनाचे दुबळेपण कोणालाही देऊ नकोस!

आता ऑक्टोबर संपत आला. हिंदुस्थानात दिवाळी, महाराष्ट्रात दिवाळी आणि इथे? आपले लेख छापून येतील का? फार उत्सुकता वाटते आहे. पण ती उत्सुकता पुरी होईल असे वाटत नाही. कुठे काही प्रकाशाचे किरण दिसत नाहीत. अंधार पसरलेला आहे. आता ही

विनादिव्याची दिवाळी साजरी तरी कशी करावी?

सध्या कपूर व इतर मित्रमंडळी पण इथे नाहीत. नाहीतर त्यांच्याकडे एक एक दिवस जाता आले असते. पटेल नावाचा एक मित्र आहे. त्याने दसऱ्याला जेवायला बोलावले होते. पटेल एका खाजगी कंपनीत आहे.

इथे काबूलसारख्या पार्टीज नाहीत. पुरुष-बायकांचा मेळावा नाही. मौजमजा नाही. कपूरने जेव्हा जेवायला बोलावले होते त्या वेळी त्याच्या कचेरीतली दोनचार माणसे होती. पटेलकडे गेलो होतो त्या वेळी दोनचार गुजराथी कुटुंबे होती. ड्रिंक्स नाहीत. बूफे पार्टीज नाहीत. प्रथम आम्ही पुरुष मंडळी जेवलो. नंतर बायका जेवल्या. अगदी आपल्या हिंदुस्थानी पद्धतीप्रमाणे.

परदेशात राहण्याचा आनंद घ्यायला इथे कोणी येतच नाही. जास्तीत जास्त पैसे मिळवायचे, त्यांतले जास्तीत जास्त वाचवायचे. व ते हिंदुस्थानात पाठवायचे हे तत्त्व, हे धोरण व त्याची कसून अंमलबजावणी करायची. फार फार तर कुठे टेपरेकॉर्डर घेतला, कुठे टीव्ही घेतला, इतकेच. बाकी, चांगले कपडे केलेत किंवा चांगले राहताहेत – अगदी नाव नको.

ह्याच्या अगदी विरुद्ध विलायती लोक.

गुरुवार म्हणजे कचेरी अर्धा दिवस. त्या दिवशी ह्या विलायती लोकांच्या बायका हॉटेलवर यायच्या. कचेरीतून नवरे परस्पर तिथे यायचे. मग त्यांचे बिअर पिणे, जेवणखाण, हॉटेलच्या तलावात पोहणे वगैरे चालायचे.

अर्थात ही फक्त मौजमजाच चालत असे असे नाही. पुष्कळ विलायती लोक आपल्या ओमानी साहेबांना वा इतर ओळखीच्या महत्त्वाच्या ओमानींना बरोबर घेऊन येत. त्यांना ड्रिंक्स वगैरे देत. ओमानींना कुठल्याही हॉटेलात किंवा कुठेही स्वतः ड्रिंक्स विकत घेता येत नाहीत. विलायती साहेबांबरोबर आले, की तोही प्रश्न सुटत असे. साहेब लोकच त्यांच्याकरता ड्रिंक्स मागवत. साहेबांच्या बरोबर त्यांच्या मडमाही असत. त्या काही उगाचच आपला वेळ वाया घालवायला येत नसत. ह्या ओमानींना खूप करून आपल्या नवऱ्यांचे बस्तान पक्के करायचे, आपल्या देशातली माणसे इथे घुसवायची, आपल्या देशाचा माल खपवायचा ह्या व अशा गोष्टी त्या अगदी कौशल्याने करत. कित्येक गोष्टी साहेबांना ऑफिसमधे बोलता येत नसत, त्या ते ह्या मोकळ्या वातावरणात बोलू शकत असत. मडमांची त्यांना साथ होत असे. ओमानी लोकसुद्धा अशा गोष्टींचे भुकेले असत.

आम्हां हिंदी लोकांना अशी संधी घेता येत नाही. आपल्या बायका काय किंवा पुरुषसुद्धा काय, अशा तऱ्हेने समाजात मिसळण्यात पटाईत नसतात. अशा गोष्टींची आपल्या बायकांना सवय नसते. सराव नसतो. ह्याचा अर्थ त्यांनी ओमानी अधिकाऱ्यांबरोबर अगदी झोपायलाच पाहिजे असे नाही. ह्या विलायती मडमासुद्धा अगदी त्या थरापर्यंत जातातच असे नाही व त्याची गरजही नसते.

पण चार लोकांत बसणे, गप्पाटप्पा मारता मारता आपल्या नवऱ्याचा, त्याच्या कंपनीचा व पर्यायाने आपल्या देशाचा फायदा करून द्यायचा हे आपल्या बायकांना जमेल असे वाटत नाही. आपल्याकडे तसे वळणच नाही.

ह्याला एक दुसरी बाजू पण आहे. समजा, अशी कोणी चतुर हिंदी बाई निघाली, तरी ओमानी अधिकारी त्याला कितपत तयार होतील? हिंदी माणसांबरोबर गप्पागोष्टी करण्यात, ड्रिंक्स घेण्यात त्यांना काय स्वारस्य? गोऱ्या साहेब-मडमांबरोबर ड्रिंक्स घेण्यात, जेवण्या-खाण्यात जी शान-शौकत आहे, थोडी प्रतिष्ठा आहे, थोडा मान आहे तसा हिंदी लोकांबरोबर

खाण्यापिण्यात कुठे आहे?

ह्याचा परिणाम असा होतो, की आपण हिंदी सामाजिक स्तरावर ह्या ओमानींपासून फार दूर राहतो. काय बोलणेचालणे होईल ते फक्त ऑफिसच्या चार भिंतींत. आजकाल तेवढेच पुरत नाही. ह्या चार भिंतींच्या बाहेरच फार महत्त्वाचे घडत असते, व घडवून आणता येते.

शेजारच्या दत्ताला आपली बायको-मुले येण्याचे वेध लागले आहेत. त्याच्या बोलण्यातून त्याच्या बायकोचे जे उल्लेख येतात त्यांवरून त्याचे लग्न त्याच्या मनाविरुद्ध झाले आहे असे वाटते. तिच्याविषयी फार कोरडे कोरडे बोलतो. पण मुलांचा फार लळा आहे असे वाटते. त्यांची सतत आठवण काढत असतो. त्याची मोठी मुलगी काहीतरी तेराचौदा वर्षांची आहे व मुलगा आठ वर्षाचा. मुलगी सुप्रिया, मुलगा बाबून.

दत्ताच्या बायकोबरोबर काही दिवाळी अंक पाठवून देण्याविषयी बायकोला लिहिले आहे. हे दत्ता लोक पार चेंबूरला राहतात. म्हणजे आमच्या घरापासून पुष्कळ दूर. पण आता आमची मुले मोठी आहेत. अंक द्यायला त्यांना चेंबूरपर्यंत जायला जमावे. म्हणजे तेवढा त्रास त्यांनी घ्यावा.

सध्या एक नाटक लिहायला घेतले आहे. खरेच प्रत्येक कलाकार काही अंशी ईश्वराचा प्रेषित असतो. एकदा काही कल्पना सुचली, की जणू काही कोणीतरी आपल्या कानात सांगतेय आणि आपण ते फक्त लिहून घेतोय असे वाटते. लिहिण्याचे काम आपले. विचार भगवानच करत असतो.

हे नाटक रंगभूमीवर आले तर? ह्या विचारानेच इतका पेटून निघालो होतो, की रात्री तीनसाडेतीनपर्यंत लिहीत राहिलो. शेवटी तन थकले पण मन थकले नव्हते. पण काही झाले तरी लिहिण्याचे काम तनच करणार होते – मन नाही.

तेव्हा थकून झोपलो. म्हणजे गादीवर पडलो. डोळ्यांसमोर स्टेजवर चाललेले नाटक स्पष्ट दिसत होते. सविता...लक्ष्मी...त्यांचा गडी...अगदी सगळे सगळे.

झोप लागली हे सकाळी उठल्यावर कळले.

आज अमानुल्लाने त्याच्या जीवनातला एक किस्सा सांगितला. तो इंजिनियरिंगचे शिक्षण घेत असतानाची गोष्ट: त्या वेळी तो कराचीत होता. काहीतरी तिसऱ्या वर्षाला असेल.

तिथल्या एका मोठ्या खानदानी कुटुंबातल्या मुलीशी त्याची ओळख झाली. तिच्या प्रेमातच पडला म्हणा ना; आणि तिच्याशी आपले लग्न व्हावे असे त्याला वाटू लागले. तेव्हा तो त्यांच्या घरी जाऊ लागला.

इंजिनियरिंगला असलेला हा चांगला उंचनिंच पंजाबी पाहून त्या घरातल्या इतर तरुण मुली तर विरघळल्याच व त्याच्या मागे लागल्याच, पण कहर म्हणजे त्या मुलींची आई पण त्याच्या मागे लागली. ती अमानुल्लाला, त्याला आवडलेल्या मुलीशी अगदी बोलू देत नसे. शेवटी त्याने त्या मुलीचा नाद सोडला. त्यांच्या घरी जाण्याचे पण बंद केले.

अमानुल्लाशी जेवढ्या गप्पाटप्पा होतात तेव्रढ्या काही अनवर पाशाशी होत नाहीत. अमानुल्ला हा पंजाबी, थोडा रानवट पण मनाने सरळ व चांगला. त्याच्या मनात हिंदुस्थान-बद्दल राग किंवा अढी अशी काही नाही. पाशाचे घराणे पूर्वीच्या उत्तर प्रदेशातले. सांस्कृतिक दृष्ट्या अनवर पाशा पुढारलेला, पण लबाड अन् स्वार्थी. ह्या दोघांवरून मूळचे पाकिस्तानचे व बाहेरून आलेले यांतला फरक जाणवतो. अनवर पाशा मूळचा हिंदुस्थानातला म्हणून की काय, तो पक्का हिंदुस्थानद्वेष्टा. हिंदी लोकांच्या विरोधी.

तसा अमानुल्लासुद्धा हिंदुस्थानातला, पण पंजाबमधला. त्याला आपला प्रांतच काय पण तालुकासुद्धा सोडावा लागला नव्हता. त्याच्या तालुक्याचे विभाजन झाले होते. त्याच्या कुटुंबाला काही गावे टाकून पाकिस्तानात जावे लागले होते. तिथली भाषा पंजाबी, माणसे पंजाबी, खाणेपिणे त्यांच्यासारखे. त्यांना फाळणीचा काही त्रास झाला नाही. फरक तर बिलकूल जाणवला नव्हता.

एकदा बोलताना मी त्याला विचारले,

"का रे, फाळणीच्या वेळी तुझे वडील हिंदुस्थान सोडून इकडे आले. आता कधी आपलं चुकलं वा आपण बरोबर केलं, ह्याबद्दल काही बोलतात का?"

"साहाब, उसवक्त इतना सोचने के लिये टाईमही कहा था?"

"आम्ही पंजाबमधल्याच एका खेड्यातून जवळच्या खेड्यात आलो होतो. त्यामुळं दररोजच्या आयुष्यात काही फरक जाणवलाच नाही. त्यामुळं त्याबद्दल कधी काही बोलणं होत नाही.

"पण हिंदुस्थानात कधी हिंदु-मुसलमानांत दंगे झाल्याचं व त्यांत कित्येक माणसं मारलं गेल्याच कळलं, की मात्र ते म्हणतात, 'अच्छा किया हमने'. वहाँ होते तो तुम बच्चोंकी हमेशा फिक्र रहती."

इथे काही पुस्तकविक्रेत्यांच्या पण छोट्या-छोट्या लायब्ररीज आहेत.

रुई म्हणून मसकतमधला नव्याने वसवलेला बाजार आहे. जवळजवळ दोन किलो-मीटर्सच्या त्या रस्त्यावर दोन्ही बाजूंना दुकाने आहेत. मोठा विचार करून काही हा बाजार वसवलेला नाही. रस्ता फार रुंद नाही. गाड्या पार्क करण्याची सोय नाही. आणि सगळ्यांत मोठा त्रास म्हणजे एयर-कंडिशनर्सचा! प्रत्येक दुकान एयर-कंडिशनर्स लावून थंड केलेले असते. ते एयर-कंडिशनर्स दुकान थंड करतात, पण रस्त्यावर गरम हवा सोडतात. आधीच गरम असलेल्या वातावरणात गरम हवेचे फवारे सोडले जात असतात. त्यामुळे फूटपाथवरून जाता येत नाही. रस्ता लहान व त्यात गाड्यांची सारखी ये-जा.

ह्या रस्त्याच्या एका टोकाला काबूस मशीद व दुसऱ्या टोकाला पाकिस्तान-स्क्वेयर आहे. ह्याला हे नाव कसे पडले हे कळले नाही. एक दिवस मी आणि सरदारजी मोठ्या धडधडत्या छातीने तो पाकिस्तान-स्क्वेयर बघायला म्हणून गेलो. म्हटले तिथे 'पाकिस्तानी' असे आहे तरी काय ते बघावे! असेच संध्याकाळचे गेलो होतो. तर तिथे पाकिस्तानी लोकांचे थवेच्या थवे उभे होते. निरनिराळ्या ठिकाणी काम करणाऱ्या पाकिस्तानी लोकांचा हा अड्डा होता. मसकतच्या बाहेर काम करणारे पाकिस्तानी त्यांची पत्रे घेण्याकरता म्हणून इथे येत. म्हणून हा पाकिस्तान-स्क्वेयर!

अशा त्या रुई बाजारात एक लहान लायब्ररी होती. ती चालवणारा मुसलमान होता. इथे कोणी मुसलमान भेटला, की प्रथम प्रश्न पडतो, की हा हिंदी की पाकी ? बरे, तसे विचारताही येत नाही. पण मोकळेपणी वागला तर ओळखावे, की तो पाकिस्तानी आहे व कोरडा कोरडा वागला तर हिंदी ! इतके सोपे आहे ओळखणे.

हा लायब्ररी चालवणारा लखनौचा. तोही प्रथम कोरडा कोरडा वागत होता. पण माझा एकंदर स्वभाव, चांगले हिंदी बोलणे व मुस्लिमांविषयीची आपुलकी बघून तो मोकळा वागायला लागला.

असा पाचएक फूट उंच, लांब केस ठेवलेला व लखनवी नजाकतीने बोलणारा. त्याची तक्रार म्हणजे इथे मोकळेपणी पान खाता येत नाही. सुलतानाने एकदा कोणीतरी पान थुंकून रस्ता खराब केल्याचे पाहिले व लगेच फर्मान काढून ओमानमधे पान खायला बंदी केली. दुकानात पाने मिळत नाहीत. फक्त तंबाखू मिळते. पण ती फक्त घरी खायची. खाऊन रस्त्यात थुंकलात तर पोलीस पकडून नेतात व तुरुंगात डांबतात. म्हटले हा 'सुलतानी'पणा चांगला आहे.

तो लायब्ररीवाला शेरो-शायरी पण करतो. त्यानेच इथे पाकिस्तानी व हिंदी शायरांचे मुशाहिरे होतात वगैरे सांगून 'पुढल्या वेळी तुला जरूर आमंत्रण देईन' म्हणून आश्वासनही दिले. त्याप्रमाणे पुढे झालेल्या मुशाहिऱ्याला बोलावलेदेखील.

त्या रुईच्या लायब्ररीतून आणलेले 'व्हिक्टोरिया ॲण्ड लॉर्ड एम' नावाचे पुस्तक वाचतोय.

लॉर्ड एम म्हणजे लॉर्ड मार्लबरो. हा इंग्लंडचा पंतप्रधान, जवळजवळ सत्तरीला आलेला. व्हिक्टोरिया राणी झाली त्या वेळी जेमतेम सतरा-अठरा वर्षांची होती. हा उंचापुरा, देखणा व अतिशय छानपैकी व्यक्तिमत्त्व असलेला. बोलण्यात फार चतुर व निष्णात. तर व्हिक्टोरिया अल्लड, हट्टी, ठेंगणी व दिसायला तशी बेढब.

राणी आणि पंतप्रधान म्हणून त्यांचे प्रथम आलेले संबंध पुढे फार घनिष्ट झाले. लॉर्ड एम अगदी दररोज न चुकता तिला भेटायला येत असे. पुढे तर तो राजवाड्यावर राहायलाच आला. त्यांचे संबंध इतके गहिरे झाले, की लोक व्हिक्टोरिया लॉर्ड एम्‌ची 'ठेवलेली' आहे म्हणून कुजबुजू लागले. रेसकोर्सवर राणी गेली, की बाकी लॉर्डांच्या व इतर प्रतिष्ठितांच्या बायका तिला ऐकू येईल इतक्या मोठ्या आवाजात 'मिसेस एम' असा उल्लेख करू लागल्या.

लॉर्ड एम्‌चे खाजगी आयुष्य फार कडवट होते. त्याची बायको त्या वेळचा सुप्रसिद्ध कवी बायरनकरता अगदी वेडी झाली होती. पुढे तर खरीच वेडी झाली व तिला हॉस्पिटलमधे ठेवले. तिथेच ती वारली. त्यांचा एकुलता एक मुलगा डोक्याने थोडा कमी होता. काही वर्षांनी तोही वारला.

मी वाचत असलेल्या ह्या पुस्तकात लॉर्ड एम्‌चे व राणी व्हिक्टोरियाचे नाजूक संबंध तितक्याच नाजूकपणे दाखवले होते.

आधीच राणी सतरा-अठराच्या खुळ्या वयातली. हा सत्तर वर्षांचा माणूस आपला पंतप्रधान आहे ह्या कल्पनेनेच ती भिरभिरून गेली होती. त्याच्या व्यक्तिमत्त्वाने व चतुर बोलण्याने ती अगदी वेडीपिशी झाली. त्यांच्या प्रेमाची जात काही वेगळीच होती. स्त्री-पुरुषांतलीच पण फार मुलायम, मखमली.

मला तर हे प्रेमप्रकरण फार आवडले. त्यावर काही लिहावे ह्या विचाराने त्यातले कितीतरी संवाद व उतारेच्या उतारे लिहून घेतले.

एक सतरा-अठरा वर्षांची मुलगी सत्तर वर्षांच्या माणसाच्या काय म्हणून प्रेमात पडत असेल ? पण 'काय म्हणून ?' का कोणी प्रेमात पडते ? अशा वेळी जानकीची तीव्रतेने आठवण होणे साहजिक होते. किंबहुना जानकीची पदोपदी आठवण येत होती म्हणून तर मी ते पुस्तक आवडीने वाचत होतो. त्यात रंगलो होतो.

जानकी अशीच एकोणतीस, तीस वर्षांची आणि मी असा पन्नाशीला आलेला. सत्तर वर्षांचा लॉर्ड एम प्रसन्न व्यक्तिमत्त्व असलेला व इंग्लंडसारख्या देशाचा पंतप्रधान. बरे, साधाही पंतप्रधान नाही तर अगदी पट्टीचा. आत्तापर्यंत जे नावाजलेले पंतप्रधान होऊन गेले, त्यांतल्या डिझरेली, ग्लॅडस्टन, लॉईड जॉर्ज, चर्चिल ह्या मालिकेतला हा लॉर्ड मार्लबरो. त्याच्यावर राणी व्हिक्टोरियाचे मन जडले तर ते साहजिकच होते.

वडलांच्या प्रेमाची भूक तर ह्या मुली वयस्क माणसावर प्रेम करून भागवत नसतील ? पण मग अशा तऱ्हेच्या प्रेमात शारीरिक आकर्षण का म्हणून असते ?

एकदा आम्ही गाडीतून इंदूर शहरात फिरत होतो. आम्ही मागे बसलो होतो व मुले व ड्रायव्हर पुढे होते. माझ्या आणि नवऱ्याच्यामधे आपण बसणार आहो म्हणून जानकीने नवऱ्याला बजावून ठेवले होते. इंदूर तसे लहान गाव. त्यात ह्यांना ओळखणारे पुष्कळ. म्हणून नवरा तसे बसायला तयार होणार नाही म्हणून जानकीने तसे बजावले होते.

जवळ बसलो होतो तेव्हा अंगाला अंग वा पायाला पाय लागणे साहजिकच होते. पण काही वेळाने तिचे पाय जास्तच 'साहजिकपणे' लागताहेत म्हणून मी तिच्याकडे पाहिले व आपले अंग चोरू लागलो तर "रहने दो" म्हणून ती हळूच पुटपुटली.

हा सगळा काय खेळ होता ? आणि त्या खेळाला काय अर्थ होता ? तिचा नवरा कथा-कादंबऱ्यांतून नवरे दाखवलेले असतात तसा नव्हता. चांगला उंचापुरा. देखणा. ठणठणीत.

पण ह्या सगळ्या गोष्टींचा प्रेमात हिशोब नसतो. आपल्याला तसा सहवास कितीही मिळाला तरी त्याने समाधान होत नाही. उलट त्याची भूक वाढतच जाते. जवळ राहून, शक्य तितक्या जवळ राहून, ही भूक भागवण्याची तर जानकीची इच्छा नव्हती ?

काल रात्री दत्ताची मंडळी मुंबईहून आली. आज शुक्रवार. सुट्टीचा दिवस. म्हणजे काही घाईगर्दी नव्हती. तरी लवकर उठलो. त्यांचे विमान रात्री काहीतरी एक-दीडला आले असावे. त्यांच्या घराकडे सगळी सामसूम दिसत होती.

बायकोने दिवाळी अंक पाठवले असतील ? त्यांत माझे काही छापून आले असेल ? फार उत्सुकता आहे. पण त्यांना झोपेतून उठवून "अंक आणले आहेत ?" म्हणून विचारणार कसे ? घरचे लोक बहुत करून दिवाळी अंक पाठवणार नाहीत. त्यांना ते काही जमले नसेल असे मनातून वाटत होते. आपल्याला इथे त्या दिवाळी अंकांचे महत्त्व वाटतेय ते त्यांना मुंबईत बसून कसे वाटणार ? पावसाची ओढ चकोराला किंवा शेतकऱ्याला. नळाने घरी पाणी येतेय तोपर्यंत ती मुंबईकराला कशी लागेल ? तरी वाटत होते, काहीतरी करून बायको दिवाळी अंक पाठवीलच पाठवील. आपल्याबद्दल अगदीच काळजी करणार नाही असे होणार नाही.

पण आपल्याकडली पद्धत म्हणजे दूर राहणाऱ्या माणसाच्या प्रकृतीची काळजी करायची.

तो हातापायाने धड असेल ना? हीच चिंता व काळजी. पण तिथे तो एकटा आहे, कोणत्या गोष्टी त्याला पाठवल्या तर तो जास्त सुखावेल ह्याचा विचार करते कोण? दिवाळी अंकांऐवजी मी जर काही औषधे मागवली असती तर ती नक्कीच आली असती. पण दिवाळी अंकसुद्धा औषधांचे काम करतील व म्हणून ते पाठवलेच पाहिजेत हे कुणाच्या लक्षात येते? फक्त वांझ काळजी करायची, की संपली आपली जबाबदारी.

अंक पाठवले असतील, पाठवले नसतील; पाठवील, पाठवणार नाही ह्या 'आट्या-पाट्या' – विचारांत सगळी सकाळ गेली. अकरा -साडेअकरा वाजता दारावरची बेल वाजली. दारात आपल्या मुलाबरोबर दत्ता-महाराज उभे. त्याच्या हातात काही नव्हते. म्हणजे काही अंकबिंक पाठवलेले दिसत नाही आहेत असे मनात आले.

पण मन पक्के कोडगे. कदाचित अंक दिले असतील पण अजून बॅग्ज उघडायच्या असतील. ते लोक आल्या आल्या थोडेच सगळे सामान सोडणार आहेत? त्या उघडल्या की अंक मिळतील असे म्हणून मनाला चुचकारले व मनाचे भुंकणे थांबवले.

''तुझ्या बायकोनं काही पाठवलंच नाही, असं माझी बायको म्हणत होती.'' खुर्चीवर येऊन बसता बसता असे सांगत दत्ताने माझ्या आशांची बोळवण केली. हे ऐकताच माझा एकदम सगळ्या गोष्टींतला रस गेल्यासारखा झाला.

दत्ता विमानतळावर काय काय झाले, अडचणी कशा आल्या, त्या ह्या खुळ्याने कशा हुशारीने सोडवल्या वगैरे सांगू लागला. आता माझा आयुष्यातलाच रस गेला होता तिथे दत्ताच्या विमानतळावरच्या गोष्टींत मला काय रस वाटणार?

त्याच्या बोलण्याकडे माझे बिलकूल लक्ष नव्हते. पण हे काही त्याच्या ध्यानात घेत नव्हते. तो आपलीच फुशारकी मारण्यात गुंगून गेला होता.

माणूस स्वतःतच गुंतून व गुंगून गेलेला असतो! फोटोत कशी फक्त एखादी गोष्टच स्पष्ट दिसते; बाकी सगळ्या आउट-ऑफ-फोकस असतात! माणसाचेही तसेच नाही आहे का? त्यात आपण स्वतः स्पष्ट व बाकीचे सगळे आउट-ऑफ-फोकस. आपल्या आयुष्याशी काही संबंध नसलेले, पण फोटोत आलेले.

मग फक्त बायकोलाच दोष का द्या? बायको झाली म्हणून काय झाले? शेवटी तीही एक माणूसच. स्वतःतच गुंगून जाणारी.

दत्ताला कसेतरी करून घालवला आणि भांडी घासण्याच्या व झाडू मारण्याच्या मागे लागलो. हाताने काम करू लागलो, की चिडचिड, राग वगैरे रस त्या काम-रसात बुडून जातात असा माझा अनुभव. चिडचिडीत झाडू मारला तर घर जास्त स्वच्छ होते व भांडी पण जास्त लखलखीत निघतात हा जास्तीचा फायदा! ह्या घरच्या लोकांना चेंबूरला जाऊन दोनचार दिवाळी अंक देण्याचे जमू नये? नाहीतर साऱ्या मुंबईभर फिरत असतात, वगैरे वगैरे विचार झाडू मारतामारता मनाला सतावत होते.

'सविता' नाटकाची पहिली प्रत लिहून संपवली. शेवट चांगला जमला आहे असे वाटले. पण आता ह्या नाटकाचे पुढे करू तरी काय? इथून कोणाला पाठवू? ते बसवेल तरी कोण? जवळजवळ पंचवीस-सत्तावीस वर्षे महाराष्ट्राच्या बाहेर राहिल्यामुळे महाराष्ट्राशीच सगळा संबंध तुटला होता. नाट्यक्षेत्रातल्या कोणाचीही आमची ओळख नाही. खरे म्हणजे नाट्य-

क्षेत्रातलें चमकते तारे कोण आहेत ह्याचीसुद्धा आम्हांला खबर नाही.

आपला प्रांत सोडून बाहेर राहण्यातले तोटे आता जाणवत होते. आमच्या लोकांनाच आम्ही परके झालो होतो. बायकोकडे पाठवू? पण तिच्या तरी नाटकातल्या लोकांशी कुठे ओळखी आहेत? आणि तिला तिची व्यवधाने आहेतच की! त्यांत आणखी भर कशाला?

हे व असे प्रश्न पडत असले तरी नवीन नवीन कल्पना सुचताहेतच. रानातल्या फुलांचे कसे होते? त्यांना कोणी देवाला वाहत नाही, की केसांत माळत नाही. नाही त्यांचा हार बनत, नाही त्यांचा गजरा. तरी पण फुलतच असतात आणि काही दिवसांनी गळून पडतात व अक्षरशः मातीला मिळतात. माझ्या सगळ्या लिखाणाची अशीच 'रानफुलं' होणार आहेत की काय? तरी पण लिहितो आहेच. 'दाजीबा, हे वागणं बरं नव्हं' नावाचा तमाशा – लोकनाट्य लिहायला घेतले.

नेहमीप्रमाणे इंग्रजी सिनेमा पाहणे चालू आहे. आज 'कम ॲण्ड मीट माय वाईफ' हा ग्रीक सिनेमा पाहिला.

एक सतरा-अठरा वर्षांची मुलगी व तिचा वीस-बावीस वर्षांचा नवरा. त्यांचा संसार मोठा सुखाचा. मुलीचे नवऱ्यावर फार प्रेम. त्या मुलीच्या मागे कोणी आर्मी ऑफिसर लागतो आणि पुढे अशी काहीतरी परिस्थिती निर्माण होते, की त्या मुलीला त्या आर्मीतल्या ऑफिसरपुढे हार खायला लागते व त्यांचा शरीरसंबंध येतो.

हे फक्त एकदाच झाले आहे अन् ते कोणालाही माहीत नाही असे ती नवऱ्याला सांगते. आणि ते खरे असते. पण काही दिवसांनी नवऱ्याला हे सगळे सांगणारे निनावी पत्र येते. म्हणजे त्यांचा संबंध पुष्कळांना माहीत होता, पण आपल्या बायकोने खोटेच सांगितले असा नवऱ्याचा ग्रह होतो व तो त्या मुलीला घरातून हाकलून देतो. ती त्या आर्मीतल्या ऑफिसरकडे जाते. नवरा पण तिच्या मागोमाग तिथे पोहोचतो. तेव्हा ती घाईघाईने बाथरूममधे लपते. तिथून तिला त्या दोघांचे बोलणे स्पष्ट ऐकू येत असते.

ते निनावी पत्र आपणच लिहिले असे आर्मी ऑफिसर कबूल करतो. कारण काय, तर हे सगळे कळल्यावर नवरा नक्की तिला हाकलून देईल व ती आपसुखच आपल्याकडे येईल ह्याची त्या ऑफिसरला खात्री असते.

आर्मी ऑफिसर इतक्या नीचपणे वागल्याचे पाहून ती मुलगी जाम भडकते. बाथरूमच्या बाहेर येते. नवऱ्याचे घर तर तिने सोडलेले असतेच; आता त्या ऑफिसरला पण सोडून देते.

गोष्ट फार वेगळी आहे असे नाही. पण ती निष्पाप मुलगी मात्र कित्येक दिवस डोळ्यांसमोर घोटाळत राहिली.

इतके दिवस ज्या पत्राची वाट पाहत होतो ते पत्र आले. "दुर्दैवाने तुझे दोन्ही लेख दिवाळी अंकात आले नाहीत. अपेक्षेपेक्षा ते फार मोठे होते..." वगैरे वगैरे तिने कळवले होते. फुंकर घातली की विस्तव थंड थोडाच होतो? क़धी कधी तो जास्तच फुलतो. पत्राने तेच काम केले. मग हे सगळे आधीच नसते का कळवता आले?

तसे बघितले तर हे लेख छापून आले असते तरी अशी काय मोठी प्रसिद्धी मला मिळणार

होती ? नाव होणार होते ? मग हा जिवाचा आटापिटा का ? जिवाचे खालीवर होणे का ?

मी वयाच्या खूप उशिरा लिहायला सुरुवात केली म्हणून माझे मन अधू झाले आहे ? अधू मनाला तारतम्य कोण शिकवणार ? एखाद्याला खूप उशिरा मुले झाली, की तो कसा मुलांबाबत हळवा होतो ? एक मिनिट ते मूल इकडचे तिकडे गेलेले त्याला खपत नाही. त्याला थोडासा जरी ताप आला तरी तो बाप आकाशपाताळ एक करतो. जसे काही जगात इतर मुले नाहीच आहेत आणि कधी कोणाला ताप येतच नाही. पण म्हटले ना, ह्या सगळ्या मन अधू झाल्याच्या खुणा !

चांगला आर्किटेक्ट म्हणून नाव मिळवण्याचे माझे स्वप्न स्वप्नच राहिले होते. आर्किटेक्चरवरच्या लिखाणात तरी यश मिळेल ह्या आशेने मोठ्या हिरिरीने राष्ट्रपतिभवनावरची माहिती गोळा करून चांगले दीडशे पानांचे हस्तलिखित तयार केले होते.

आता माझ्याजवळ दीडशे पानांचे हस्तलिखित तयार होऊन पडले आहे. इतक्या जणांनी वाखाणलेले व इतके कष्ट घेऊन तयार केलेले 'हस्तलिखित'च राहिले. ती आस तशीच अपुरी राहिली. म्हणून मला ही प्रसिद्धीची व नाव मिळवण्याची घाई झाली होती ? अगदी पोरकट वाटण्याइतकी !

पण मला प्रसिद्धीपेक्षा यश हवे आहे. जे हाती घेतो त्यात अपयश येते. आता लिहायला सुरुवात केली त्यातही तेच. तेव्हा आता ह्यापुढे काही लिहावे की नाही हा प्रश्न पडला आहे. पण लिहू नको तर काय करू ? कल्पना सुचायला काय ? 'एक पैशाची भांग घेतली, की हव्या तितक्या कल्पना सुचतात' अशी लोकमान्यांनी टीका-टिपणी केली होती. मला तर भांगेचीही गरज नाही. सतत नाटकांच्या, लेखांच्या, गोष्टींच्या, कवितांच्या कल्पना सुचत असतात. मग शांत राहू कसा ? पिंजऱ्यातला प्राणी कसा उगाचच येरझारा घालत असतो ! त्याचा त्याला काही फायदा असतो ? पण त्यालाही स्वस्थ बसवत नाही म्हणून मग आपल्या येरझाराच चाललेल्या असतात. त्याच मनोवृत्तीत मी नामस्मरणावर अभंग केले. काहीतरी तीनचार अभंग होते ते. काव्य म्हणून ते कसे उतरले होते, कुणास ठाऊक ! पण माझ्या मनाचे मात्र समाधान झाले. आणि शेवटी स्वतःचे समाधान हेच महत्त्वाचे नाही का ? आता त्याबरोबर समविचारांच्या, समदुःखी लोकांच्या मनाचे समाधान झाले तर उत्तमच.

त्या समाधानी वृत्तीतच कागद पुढे ओढले, हाती पेन घेतले व लिहू लागलो; पण म्हणजे काही नाटक, तमाशा, लेख असे काही नाही, तर फक्त 'जानकी'...'जानकी'...'जानकी'...

जानकीला मी काबूलला असताना महाराणी गायत्री देवी म्हणत असे. खरेच एखाद्या राजाची राणी होण्याच्या लायकीची आहे ती. असे सौंदर्य क्वचितच पाहायला मिळते. आणि जानकी नुसतीच दिसायला सुंदर नाही तर मनाने उमदी आहे. बुद्धिमान आहे. फार समजूतदार तशी मनाची पक्की व करारी पण आहे. सारखी तिला पत्रे लिहावीशी वाटतात. पण कशी लिहिणार ?

'इंदिरेस पत्रे' ह्या नावाचे पुस्तक प्रसिद्धच आहे. नेहरूंनी इंदिरा गांधींना लिहिलेली ही पत्रे आहेत. त्या धर्तीवर 'जानकीस...' म्हणून पत्रे लिहावीत व त्यांचा संग्रह करावा. ती पत्रे काही पाठवायची वगैरे नाहीत त्यामुळे मोकळेपणी लिहिता आली असती. आणि 'न पाठवलेली पत्रे' म्हणून प्रसिद्ध करावीत.

'व्हिक्टोरिया व लॉर्ड एम' परत परत वाचतोय. त्यामुळे 'जानकी-पत्रां'चा विचार बळावत चालला आहे. राणी व्हिक्टोरिया किती मनापासून प्रेम करत असते त्याच्यावर ! त्यांचे संवाद,

प्रतिसंवाद किती वेळा वाचू ? आणि किती उतरवून घेऊ ? लॉर्ड एम्‌च्या गुणांबरोबरच त्या दोघांच्या वयांतला फरक हे त्यांच्यातल्या प्रेमाचे महत्त्वाचे कारण असावे. आता जानकीचे व माझेच पाहा ना.

काही करा, विचारगाडी शेवटी 'जानकी-रुळा'वरच येते.

आज आलेल्या पत्रांत जानकीच्या नवऱ्याचे पत्र आहे व एक बायकोचे.

बायकोने माझे लेख दिवाळी अंकांत का आले नाहीत ह्याची कारणमीमांसा दिली आहे व आता पुढल्या अंकांत ते लेख प्रसिद्ध करणार आहेत म्हणून कळवले आहे. आता लेख छापून येण्याबाबत माझा जीव मरून गेला आहे. आता त्याला भाजून खा, उकडून खा वा तळून खा. मला त्याने काय फरक पडणार आहे ?

जानकी अल्सरने आजारी आहे असे नवऱ्याने कळवले आहे. म्हणजे तशी ती बऱ्याच दिवसांपासून आजारी आहे म्हणे. पण तो पठ्ठ्या आता कळवत होता.

ते पत्र आल्यापासून जानकीच्या आजारपणाचा विषय काही केल्या मनातून जात नाही. खरेच किती गंभीर असेल तिचा आजार ? इथे राहून आपण काय करू शकतो ? ह्या प्रश्नाचे 'काही नाही' हे उत्तर मिळत होते. रात्री स्वप्नातसुद्धा जानकी. हे अघटित होते. आत्तापर्यंत जानकी स्वप्नात कधी आली नव्हती :

खूप वाळली आहे. मी तिच्या उशागती बसलो आहे. तिने माझा हात घट्ट धरून ठेवला आहे वगैरे.

खरेच, साधा हात धरण्यातही किती प्रेम व्यक्त करता येते, नाही ? दरवेळी इंदूरहून निघताना जानकी माझा हात घट्ट धरून ठेवते. असा घट्ट, की सगळ्या शरीराला मिठी मारल्यासारखे वाटते. आलिंगन म्हणतात ना तसे.

आज कचेरीत थोडी गडबड उडाली. इथे इजिप्ती, सुदानी, पाकिस्तानी, हिंदी ह्या वेगवेगळ्या देशांतले मुसलमान आहेत. धर्म जरी एक असला तरी त्यांतल्या प्रत्येकाची संस्कृती वेगळी, भाषा वेगळी, देश वेगळा आहे. त्यामुळे त्यांच्यातही गट पडतात. अशा वेळी इजिप्ती व सुदानी दोघे अरब असल्यामुळे एक होतात. पाकिस्तानी वा हिंदी मात्र एकटा पडतो.

आजच्या गडबडीचे थोडे तसेच झाले. अमानुल्ला कोणा सुदानी सहकाऱ्याबरोबर उर्मटपणे वागला. त्या सुदान्याने अर्थातच बरीच आरडाओरड केली व वरच्यांकडे तक्रार केली. तेव्हा वरच्या अधिकाऱ्यांनी अमानुल्लाकडून खुलासा मागितला. लेखी पत्र देऊन.

अमानुल्ला माझ्याकडे आला व तावातावाने आपणच कसे बरोबर होतो वगैरे सांगून, "त्या खुलाशाच्या मागणीपत्राला मी असं उत्तर देतो, तसं उत्तर देतो." म्हणून सांगू लागला.

सगळे सुदानी अमानुल्लावर चिडून गेले होते. त्यात त्यांना इजिप्ती व ओमानी लोकांचे पाठबळ मिळाले. त्यामुळे त्यांच्या ओरडयाला जोर चढला. इकडे अमानुल्लाला कोणी साहाय्य करेनात. तो एकटा पडला.

मी अमानुल्लाला सबुरीचा सल्ला दिला. म्हटले, "तू ताबडतोब तर काही उत्तर देऊ नकोसच पण शक्यतो उत्तर देण्याचं टाळ. कारण आता तू काही जरी उत्तर दिलंस तरी ते त्यात काहीतरी

खुसपट काढतील व जास्त त्रास होईल. तेव्हा सबूर."

अमानुल्ला हा आमच्या मुख्याच्या मर्जीतला. अमानुल्ला त्याला जाऊन भेटला. मुख्याने पण माझ्यासारखाच सबुरीचा सल्ला दिला. त्यामुळे माझा भाव तर अमानुल्लाकडे वधारलाच. पण सगळे मुसलमान जरी एक असले तरी अरब मुसलमान 'जास्त एक' आहेत हे अमानुल्लाला प्रखरतेनं जाणवले.

छचोर सिनेमा पाहावे तर ते इटालियन असे माझे पक्के मत झाले आहे. स्त्री-पुरुष संबंध व तेसुद्धा चोरीमारीचे हे मुख्य सूत्र. त्याला अनसरून नाना गोष्टी रचून सिनेमा काढतात.

काल 'हू मिस्लेड माय वाईफ' नावाचा इटालियन – म्हणजेच छचोर सिनेमा पाहिला. एक मोठा उद्योगपती आणि त्याची चालू बायको. तिचे पुष्कळ प्रियकर. सध्याचा प्रियकर म्हणजे त्यांच्या चौकीदाराचा मुलगा. नवरा बाहेरगावी गेला तशी ही आपल्या प्रियकराला घरी बोलावते. तेवढ्यात विमान चुकले म्हणून नवरा परत घरी येतो तर बायको आणि तो मुलगा त्यांच्या शयनमंदिरात. बायको घाईघाईने त्या मुलाला पडद्याआड लपवते. ते नवऱ्याच्या लक्षात येते. तो मुलाला पकडतो. पण ती बायको असा देखावा करते, की तो प्रियकर वगैरे काही नसून साधा चोर आहे. एक तर इतका लहान व त्याहून त्यांच्याच चौकीदाराचा मुलगा! तेव्हा त्याला सोडून देण्यात येते.

नवरा परत विमानतळावर गेल्यावर बायको परत प्रियकराला बोलावते.

"ॲम आय दॅट बेटर दॅन युअर हसबंड ऑर युवर लव्हर्स?" तो विचारतो.

"यू आर बेटर दॅन ऑल ऑफ देम पुट-टुगेदर!"

मी निवृत्त होण्याची वयोमर्यादा गाठण्याआधीच निवृत्त झालो होतो. इथे तीनचार वर्षे राहिलो तरी अठ्ठावनच्या आतच असेन. "तेव्हा तुला परत सरकारी नोकरी करता येईल. तसं झालं तर मग दिल्लीला का येत नाहीस? काहीतरी 'ऑफिसर-ऑन-स्पेशल ड्यूटी' वगैरे म्हणून? आपल्या डिपार्टमेंटचा फायदा होईल." हा कपूरचा विचार व त्याप्रमाणे सल्ला.

हा विचार माझ्याही मनात इंदूर सोडताना आला होता. तो मी जानकीला सांगितला होता. मी दिल्लीला येणार ह्या कल्पनेनेच ती आनंदली, "हाँ, हाँ, जरूर. फिर हम बहूत दफे मिलेंगे." कपूरने दिल्लीचे सुचवले तेव्हा हे सगळे मला आठवले.

पटेल नावाचा इथे एक दिल्लीचा मित्र आहे. आज शुक्रवार. त्याच्याबरोबर सकाळी-सकाळी त्याच्या एका गुजराथी मित्राकडे गेलो.

मसकतला फार मोठा गुजराथी समाज आहे. त्यांचा फार मोठा व्यापारउदीम आहे. चांगले पैसेवाले आहेत हे लोक. काही तर आज कित्येक पिढ्या इथे आहेत. ते ओमानचे नागरिक आहेत. इथले इंडिया-स्कूल बांधण्यात व चालवण्यात ह्यांचा फार मोठा वाटा आहे. इथे एकुलते एक शिवाचे मंदिर आहे. त्याचा खर्च, तिथल्या पुजाऱ्याचा खर्च इथला एक धनाढ्य गुजराथी करतो.

ज्यांच्याकडे गेलो होतो ते एक तरुण जोडपे होते. काहीतरी पाचसहा महिन्यांपूर्वीच त्यांचे लग्न झाले होते. आम्ही शुक्रवारी म्हणजे इथल्या सुटीच्या दिवशी सकाळ-सकाळचे गेलो होतो. पण त्यांची 'मध्यरात्र' होती असे वाटले.

बऱ्याच वेळा बेल वाजवली. अशा आणीबाणीच्या वेळी नेहमी बायको दार उघडते तसे ह्या वेळीसुद्धा बायकोनेच दार उघडले. पटेलला व मला पाहून तिची फार तारांबळ उडाली. 'रात्री कुणाकडे तरी जेवायला गेलो होतो. त्यामुळे झोपायला खूप उशीर झाला व म्हणून दार उघडायला उशीर !' वगैरे खुलासा ती आरक्त तरुणी करू लागली. तेवढ्यात नवराही बाहेर आला.

आम्ही मनातल्या मनात हसत होतो तर ते दोघे आम्हांला मनातल्या मनात शिव्या देत असतील.

कपूरने 'कुठे तरी आउटिंगला जाऊ या' असा बूट काढला. त्या प्रमाणे त्याच्या गाडीतून वीस-बावीस किलोमीटरवर असलेल्या एका सहलीच्या ठिकाणी गेलो.

कपूरची स्वतःची गाडी आहे. कुठली तरी जपानी भली मोठी. ती घेण्याकरता त्याला सरकारने गाडीच्या किंमतीएवढे कर्ज दिले आहे. तेही बिनव्याजी. इस्लाम धर्माच्या ह्या नियमाचा कपूरच का, इतर पुष्कळ बिगर इस्लामी लोक फायदा घेत असतात.

त्या भल्या मोठ्या गाडीतून आम्ही सकाळचे साडेनऊ-दहा वाजता निघालो. ओमानमधले सगळे रस्ते अगदी उत्कृष्ट स्थितीत असतात आणि शहरापासून कितीही दूर गेले तरी कुणीही वाहतुकीचे नियम मोडत नाहीत कारण पोलिसांचे भय सतत मानगुटीवर असते.

सहलीचे स्थळ म्हणजे एका छोट्या नदीकाठची जागा होती. आम्ही आमच्याबरोबर खाण्याचे व पिण्याचे नेले होते. सँडविचेस, ऑमलेट वगैरे खायला व बिअर वगैरे प्यायला घेतली होती.

बरीच ओमानी व सुदानी कुटुंबे तिथे आली होती. त्यांतल्या कोणाही बाईने बुरखा घेतलेला नव्हता. आम्ही बसण्याकरता निवडलेल्या जागेशेजारीच काही वेळाने बरेच मुल्ला व मौलवी येऊन बसले. त्यांचे त्या गावात काही संमेलन वा सभा होती, की काय कोणास ठाऊक ! पण चांगले पंधरा-वीस जण तरी होते.

आता ह्या सगळ्या धर्मगुरूंसमोर त्यांच्या धर्माने बंदी घातलेल्या देशात बिअर प्यावी, की पिऊ नये असा आम्हांला प्रश्न पडला. जर ह्यांनी गंभीरपणे घेतले तर अनवस्था प्रसंग यायचा. तेव्हा पिण्याचा कार्यक्रम रद्द करून आणि बाकी खाण्याचा कार्यक्रम करून संध्याकाळी आम्ही दोघे 'मोरू' घरी परत आलो.

आम्ही बहुसंख्य आहोत वगैरे आपण इथे नेहमी म्हणत असतो. पण आपल्याकडे बहुसंख्याकांचा दरारा कधी जाणवत नाही. तो इथे पदोपदी जाणवतो.

आज शेवटी अगदी न राहवून जानकीला फोन केला. कॉल पी० पी० होता. ती तिथे नाहीये एवढेच कळले. पण म्हणजे तिला बरे नाहीये म्हणून दिल्लीला गेलीय, की गावातच कुठे गेलीय ते कळले नाही. त्यामुळे उगाच काळजी लागून राहिली.

शेजारची दत्ता-मंडळी आता स्थिरस्थावर होत आहेत. त्यांची बारातेरा वर्षांची मुलगी गोरी, केस कापलेले, नाक जरा डब्ब पण अभ्यासात चांगली हुशार – अशी आहे. ह्या वयाची मुले जशी चपळ असतात तसाच मुलगाही चपळ. दत्ताची बायको पण चांगली शिकलेली व चुटचुटीत. पण इतकी हडकुळी – आपण फाटका इसम वगैरे म्हणतो ना तसे म्हणायला योग्य. मुलांच्या शिक्षणाची इथे चांगली सोय आहे.

इथे चांगले भक्कम इंडिया स्कूल आहे. आपल्या सेंट्रल स्कूल्सच्या धर्तीवर. अगदी प्राथमिक शिक्षणापासून सोय असलेले. चांगले दोनअडीच हजार विद्यार्थी आहेत. एवढा मोठा आकडा बघून मलाही आश्चर्य वाटले होते. विषय, पुस्तके आपल्या सेंट्रल बोर्डाप्रमाणे. फरक एवढाच, की जास्तीची भाषा म्हणून इथे अरबी शिकायला लागते.

ह्या विद्यालयाची भली मोठी पक्की इमारत आहे. खेळायला मोठे पटांगण आहे. चांगला मोठा हॉल आहे. ह्या स्कूलबोर्डाचा चेअरमन हिंदी राजदूत असतो.

मी अजून ह्या स्कूलमधे कधी गेलो नाही. कधी तसा प्रसंगच आला नाही. ह्या शाळेच्या हॉलमधेच गणपति-उत्सव, कालीपूजा, दिवाळीचा मेळावा भरतो. गाण्यांचे व भाषणांचे कार्यक्रम पण इथेच होतात. तेव्हा कधी तरी तिथे जाण्याचा योग येईलच असा मनाशी विचार केला. काही दिवसांनी खरेच तसा योग आला.

मी, सरदारजी व दत्ता ह्या ऑफिसच्या सहकाऱ्यांपासून दूर राहत होतो. त्यांच्याशी घरगुती काही संबंध ठेवायचा नाही हे धोरण ठेवले होते. पण आता दत्ताची मंडळी आल्यापासून त्यात फरक पडला होता. त्यांच्याशी थोडी घसट वाढू लागली आहे. बहुतेक संध्याकाळी आम्ही गच्चीवर जातो किंवा त्यांच्या घरी जाऊन गप्पाटप्पा करतो.

असाच दत्ताशी गप्पा मारत होतो. मिसेस दत्ता आत चहा बनवत होती.

"मी माझ्या बायकोला अगदी संपूर्ण स्वातंत्र्य दिलं आहे." सूडो – म्हणजे दिखाऊ सुधारक बोलतात त्या-पद्धतीने दत्ता फुशारकी मारू लागला. म्हटले, मी ह्याची आता फिरकी घ्यावी.

"मग तू दिलेल्या संपूर्ण स्वातंत्र्याचा फायदा तुझ्या बायकोनं घेतला की नाही?" मी गंभीरपणे विचारले.

दत्ता ह्या अशा प्रश्नाला भिडायला मनाने तयार नव्हता. तेव्हा तो तत-पप करू लागला. तेवढ्यात संपूर्ण स्वातंत्र्य मिळालेली त्याची बायको बाहेर आली आणि तिने दत्ताला संकटातून वाचवले.

"तू माझ्याशी कधी खोटेपणानं वागला नाहीस...मला नेहमी समजून घेण्याचा प्रयत्न केला आहेस..." बायकोचे आज फार भावूक पत्र आले आहे.

बायको! एक कोडे. सुटता सुटत नाही. कधी सुटल्यासारखे वाटते पण ते सुटता सुटता दुसरे कोडे तयार करून ठेवते. गेली वीस-पंचवीस वर्षे आम्ही बरोबर काढली आहेत. उर्दूत 'हमसफर' म्हणतात तसे सहप्रवासी, एकाच रस्त्याने जाणारे. सुखदुःखांत सहभागी झालो. पण नंतर कित्येक सुखदुःखे आमच्या सहभागीपणामुळेच निर्माण झाली होती.

पण नुसते हमसफर म्हणजे सहप्रवासी असणे पुरेसे आहे का? आगगाडीच्या प्रवासाचे असेच असते. सगळे प्रवासी एयर कंडिशनिंग वगैरे सुविधांचा फायदा घेत असतात. काही अपघात वगैरे झाला तर त्यामुळे होणारे नुकसान व त्रास सोसतात. पण ह्याचा अर्थ त्यांची मने थोडीच सांधली गेलेली असतात? प्रत्येकाचा प्रवास करण्याचा हेतू वेगळा, उतरण्याचे ठिकाण वेगळे. बरोबरीचा प्रवासी चांगला असला तर प्रवास चांगला सुखाचा होतो. उगाच भांडखोर असला तर वाईट होतो. पण हे सगळे तेवढ्यास तेवढे असते.

संसार-प्रवास आगगाडीच्या प्रवासासारखा समजायचा का? बायकोच्या जागी दुसरी कोणी असती किंवा माझ्या जागी दुसरा कोणी असता तर आमचे आयुष्य आता गेले तसेच गेले असते? मनाने बायकोशी फारकत केव्हा घेतली? ती स्वार्थी नाही पण आपल्याआपल्यापुरते पाहते असे मला वाटायला लागले, तेव्हापासून? आता आम्ही फक्त हमसफर राहिलो आहोत, हमजुबाँ नाही. फक्त सहप्रवासी राहिलो आहोत पण आम्हांला एकमेकांची भाषा समजत नाही, मने कळत नाहीत, हे जाणवल्यापासून?

आज कपूरच्या घरी व्हिडियोवर भारतात वेगवेगळ्या कारणांकरता गाजलेला 'नाईन अवर्स टु रामा' हा गांधीहत्येवरचा सिनेमा पाहिला. हा चित्रपट काढायला भारत सरकारने मदत केली होती. पण चित्रपट प्रकाशित झाल्यावर कळले, की त्याने भारताची बदनामी होते आहे. त्या वेळी पंडित नेहरू पंतप्रधान होते व आपले बाळकृष्ण केसकर माहिती व प्रसारण मंत्री.

आता भारताची बदनामी करणाऱ्या चित्रपटाला भारत सरकारने मदत कशी केली? अशी ओरड लोकसभेत झाली. तेव्हा कळले, की त्या सिनेमाची गोष्ट पंडितजींनी वाचली नव्हतीच; पण केसकरांनी पण वाचली नव्हती. कारण त्यांना ती वाचायला वेळ मिळाला नाही. ही तर ह्या मंत्री महोदयांची भारताच्या राष्ट्रपित्याबद्दलची आस्था! शेवटी त्या सिनेमावर बंदी घातली गेली.

सगळा सिनेमाच वेगळ्या दृष्टिकोनातून घेतला आहे. त्याचा नायक गोडसे आहे व तो लैंगिक विकृतीचा आहे असे दाखवले आहे. गांधींचे काम करणाराही यथातथाच आहे.

गांधी-खुनावरची माझी मते अगदी वेगळी आहेत. हा खून फक्त वैयक्तिक द्वेषाने झाला असे माझे मत. फाळणीला व पाकिस्तानला पंचावन्न कोटी द्यायला महात्मा गांधी जबाबदार आहेत म्हणून गोडसे कंपनीने त्यांची हत्या केली वगैरे नंतरची भलावण आहे. फाळणी मान्य झाली मे १९४७ साली आणि गांधींची हत्या झाली जानेवारी १९४८ मधे. म्हणजे तब्बल सात महिन्यांनी! फाळणीचा राग यायला गोडसेला सात महिने लागले? आणि फाळणीला मुख्यत्वे माउंटबॅटन जबाबदार होता. मग त्याची हत्या का नाही केली? बॅ० जिनांची का नाही केली?

आज एक अगदी नवख्या विषयावरचे पुस्तक वाचले. पुस्तकाचे नाव आहे 'एस्केपर्स'. म्हणजे तुरुंगातून पळून जाणारे युद्धकैदी. त्यांच्या व्यथा व कथा.

चांगले तीनशे-साडेतीनशे पानांचे पुस्तक आहे. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धांत जर्मन युद्ध-

तुरुंगातून पळण्याचा प्रयत्न केलेल्या व पळून आलेल्या वीर सैनिकांच्या ह्या कथा आहेत. अर्थातच सगळ्या ब्रिटिश सैनिकांच्या.

ह्या रसभरित गोष्टींबरोबरच युद्धकैद्यांना वागवण्याचे नियम, त्या नियमांचा इतिहास, जिनेव्हा कन्वेन्शनमधे संमत झालेले ठराव, युद्धकैद्यांनी कसे वागावे ह्याचे नियम वगैरे माहिती पण आहे ह्या पुस्तकात.

तुरुंगातून पळून जाण्याचे फक्त तीन मार्ग आहेत : एक कुंपणावरून, दुसरा कुंपणाखालून व तिसरा कुंपणामधून ! अशी अगदी साध्या दिसणाऱ्या वाक्याने पुस्तकाची सुरुवात होते. पण हे साधे दिसणारे वाक्य व त्यातले मार्ग काय भयंकर आहेत हे नंतर लक्षात येते. हे तीनही मार्ग वेगवेगळ्या परिस्थितीत सैनिकांनी यशस्वी रीत्या अवलंबले आहेत.

वीरश्रीच्या पुष्कळ गोष्टी आहेत. जर्मनांसारख्या कडव्या लोकांच्या युद्धकैदेतून पळून जाणे म्हणजे काही साधी गोष्ट नाही. तरीही दोन्ही पाय गमावलेला एक ब्रिटिश सैनिक तशा तुरुंगातून पळून गेला. पळून तर गेलाच पण लाकडी पाय लावून घेऊन परत जर्मनीवर बॉम्बहल्ला करायला विमान घेऊन आला !

एका सैनिकाला पळून जाण्याचा काहीच मार्ग दिसेना तेव्हा त्याने काय करावे ? संडासातली घाण नेणारी एक टँक-ट्रक तुरुंगात येत असे. तो त्या घाणीच्या टँकमधे काही तास उभा राहून तुरुंगाच्या बाहेर पडला. अशा कितीतरी गोष्टी.

सगळ्या देशांच्या युद्ध-तुरुंगांतून कैदी पळून जातात. ह्याला फक्त एक अपवाद, तो म्हणजे जपान्यांचा. त्यांच्या तुरुंगातून कोणी पळून जात नाही. कारण एखाद्या तुकडीतले एकदोघे जण जरी पळून गेले तरी जपानी ती तुकडीच्या तुकडी जीवानिशी मारून टाकत. आपल्यामुळे दुसऱ्यांचे प्राण जाऊ नयेत म्हणून कोणीही पळून जात नसे. तेव्हा एका तुकडीने काय केले ? तर सगळी तुकडीच्या तुकडी पळून गेली.

दुसरे महायुद्ध चर्चिलमुळे जिंकले गेले असेल पण त्याच्या मागे असे धारिष्ट्यवान लोक होते हे विसरता यायचे नाही.

पुस्तक वाचून झाल्यावर आपल्याकडल्या सैनिकांच्या अशा कथा कशा नसतात, हा विचार मनात आला. ब्रिटिशांकरता का होईना, आपल्या सैनिकांनी पहिल्या व दुसऱ्या महायुद्धांत फार मोठी कामगिरी केली होती. स्वातंत्र्यानंतर पाकिस्तानशी आपली तीन युद्धे झाली. चीनशी एक झाले. ह्या युद्धांत आपले कितीतरी सैनिक युद्ध-कैदी झाले असतील. त्यांतल्या कोणी असे निसटून जाण्याचा प्रयत्न केला नाही ? किंवा केला असता तरी त्यावर काही लिहावे, त्या प्रसंगांची माहिती लोकांना द्यावी असे कोणालाही वाटले नाही ?

का आपल्याकडे ती दृष्टीच नाही ? अजून आपण इतिहासातल्या कथाच ऐकण्यात रंगून जातो व वर्तमानकाळातल्या गोष्टींकडे दुर्लक्ष करतो ?

---

आज दिल्लीच्या नारायण कुलकर्ण्यांचे पत्र आले आहे. दिवाळी अंकात माझे लिखाण छापून आले नाही वगैरे कुरकूर मी केली होती. माझ्या मनाच्या जखमेवर मलमपट्टी करणारे ते पत्र आहे.

"एका खेळकर वृत्तीनं लिहिणाऱ्यानं हे सगळं इतकं गंभीरपणं घ्यावं हाच मुळात एक मोठा विनोद आहे." अशी सुरुवात करून त्यांनी पुढे लिहिले होते "तुम्ही काही प्रसिद्धी मिळवण्या-

करता म्हणून लिहायला सुरुवात केली नव्हतीत. मनात काही कल्पना आल्या त्या तुम्ही लिहून काढल्यात, त्या संपादकांना आवडल्या, काही दर्दी वाचकांना पसंत पडल्या हेच पुष्कळ झालं नाही का? असे कितीतरी लेखकांचे कित्येक लेख संपादकांकडे पडून असतात'' वगैरे.

मी कुलकर्ण्यांना अगदी मोकळेपणाने पत्र लिहितो. सगळे विचार व अविचार. माझ्या लिखाणाबद्दलच्या बायकोच्या थंडवृत्तीबद्दल मात्र काही लिहीत नाही. तसे लिहिणे म्हणजे मला कमीपणाचे वाटते. गृहछिद्रे बाहेरच्या माणसाला दाखवायची? असे आपल्याकडे करत नाहीत. नवरा-बायको संबंध आपल्याकडे 'होली काऊ' म्हणजे पवित्र गोमाता बनवून ठेवलेले आहेत. नातेवाइकांबद्दल म्हणजे आई, वडील, बहीण, भाऊ ह्या नातेवाइकांबद्दल लिहिले तर चालते. त्याच्याशी बिनसले असेल तर त्याच्यावर बोलले तर लोक खपवून घेतात. पण नवऱ्याने आपली बायको कायमची हसतमुख व कायम उत्तेजन देणारी आहे व बायकोने 'आमचे हे फार समजूतदार व मदत करणारे आहेत' असेच लिहायला पाहिजे. असा अगदी नियम झाल्यासारखा झाला आहे.

असे का? हा प्रश्न मसकतमधे असताना कायम सतावत असे. दोघे नवरा-बायको म्हणून राहायला लागताच त्यांचे सर्व बाबतींत अगदी एकमत व्हावे ही अपेक्षा का? त्यांच्यांतही राग, लोभ, मत्सर वगैरे असणारच की! मग हा खोटा खोटा पडदा कशासाठी, कोणासाठी?

आज एका ट्रॅम्प माणसाचे आत्मचरित्र वाचले. पुस्तकाचे नाव आहे 'सुपर-ट्रॅम्प.'

पुस्तकाला जॉर्ज बर्नार्ड शॉने प्रस्तावना लिहिली आहे. एवढे सांगितले म्हणजे पुस्तकाची वाङ्मयीन किंमत कळावी. ट्रॅम्प म्हणजे भटक्या. अगदी पायी पायी भटकणाऱ्या – जवळ-जवळ भिकारी माणसाचे आत्मचरित्र आहे. स्वतःचे घरदार नाही, संसार नाही, मुलेबाळे नाहीत. कायम ह्या गावाहून त्या गावाला जायचे. धर्मशाळांतून राहायचे. मिळेल ते खायचे. हे ट्रॅम्प्सचे आयुष्य.

काही जण आवडीने असे आयुष्य पसंत करतात. हे कळल्यावर आश्चर्य वाटते. हा लेखक पण त्यांतला, ट्रॅम्पचे आयुष्य आवडीने पत्करलेला. फक्त त्याचा विरंगुळा म्हणजे लिहिणे. आपले अनुभव लिहिणे. काही विनोदी, काही मनाला चटका लावणारे. त्याने पुस्तक लिहिले आणि काही विशेष विचार न करता थेट बर्नार्ड शॉसारख्याला पाठवून दिले! ना ओळख, ना देख. नाही काही लेखक म्हणून नाव.

शॉ पण रत्नपारखी. त्याने ते लिखाण वाचले. त्याला आवडले. लगेच प्रस्तावना पण लिहून द्यायला तयार झाला व तशी लिहिली. बऱ्याच दिवसांनी साधे राग, लोभ, काम, क्रोध, मत्सर आदी रसांविरहितचे काहीतरी वाचायला मिळाले.

आता शेजारच्या दत्ताकडले जाणेयेणे वाढले आहे. पुरुषांचा कचेरीत वेळ जातो पण बायकांनी काय करायचे? दत्ताकडे गाडी पण नाही त्यामुळे त्यांना बाहेर जाणे फारसे जमत नाही. ह्या हिशोबाने दत्ताने टीव्ही घेतला.

इथे दर शुक्रवारी दुपारी अडीच वाजता टीव्हीवर हिंदी सिनेमा असतो. हिंदी सिनेमा सर्वदूर आवडणारी गोष्ट झाली आहे. बहुधा जुनाच सिनेमा असतो, पण वेळ बरा जातो,

म्हणून त्यांच्याकडे सिनेमा पाहायला जाऊ लागलो आहे.

मसकतला फार गरम असते. कचेरीत व घरी एयर-कंडिशनर्स असले तरी त्यांचाही उबग यायला लागतो. दत्ताची बायको ह्यावर खास बंगाली उपाय अनुसरते. हा उपाय कलकत्त्याच्या बायका मोठ्या प्रमाणात कामी आणतात. तो म्हणजे संध्याकाळचे गच्चीवर जायचे. तिथेही उकडत असते, पण ऊन नसते. बनावटी थंड हवेने उबलेल्या जिवाला तो गरमपणाही बरा वाटतो.

दररोज काही खरेदी नसते वा सिनेमाला पण जायचे नसते. तेव्हा आता मीही गच्चीवर जाऊ लागलो. कधी आम्ही गप्पा मारतो, कधी नुसत्या फेऱ्या मारतो, दत्ताच्या मुलांबरोबर कधी बॉलने खेळतो.

एक दिवस काय गंमत झाली, की खेळता खेळता बॉल खाली – चार मजले खाली जमिनीवर गेला. मुले घाईघाईने खाली गेली. पण त्यांना काही केल्या तो बॉल सापडेना. तेव्हा त्यांनी बाबांना हाका मारायला सुरुवात केली.

आता बाबा पंचाइतीत आल्याचे त्यांच्या तोंडावरून दिसू लागले. खाली जावे तर गच्चीवर मी आणि त्याची बायको दोघेच राहणार. जाऊ नये तर मुले सारखी हाका मारत होती.

ह्याच दत्ताने, आपण बायकोला संपूर्ण स्वातंत्र्य दिल्याचे सांगितले होते. ते माझ्या चांगले लक्षात होते. खरे म्हणजे मी त्याच्याबरोबर खाली जायला हरकत नव्हती. पण म्हटले, बघू या काय होते ते!

दत्ताची मनोवृत्ती द्विधा झाली आहे हे जसे माझ्या लक्षात आले तसे त्याच्या बायकोच्या पण लक्षात आले. ती लबाडपणे थोडी हसू लागली. मी आपला शांतपणे उभा होतो. मुले खालून हाका मारतच होती. दत्ताला एकदा वाटले, की बायकोला घेऊन खाली जावे; पण तसे म्हणणार तरी कोणत्या कारणाकरता? बॉल शोधण्याकरता तिचा काही उपयोग होण्यासारखा नव्हता. शेवटी दत्ताने आपल्या जिवाचा धडा केला व आमच्याकडे बघत बघत खाली गेला.

अर्थात दत्ताने दिलेल्या संपूर्ण स्वातंत्र्याचा फायदा बायकोने उठवला नाही किंवा मीही उठवू दिला नाही हे वेगळे सांगायला नकोच. पण ह्या गोष्टीमुळे 'स्वातंत्र्य' देणाऱ्या नवऱ्यांच्या वृत्तीवर प्रकाश टाकला गेला, हे खरे.

काल थोरला मुलगा मुंबईहून आला. बायकोला घर सोडून येण्यासारखे नाही. धाकटा काही दिवसांपूर्वी येणार होता पण त्याच्या व्हिश्याची काहीतरी भानगड झाली म्हणून तो येऊ शकला नव्हता. आता त्याला सुट्टी नव्हती. तेव्हा फक्त थोरलाच आला. हा आर्किटेक्चरच्या तिसऱ्या वर्षाला.

त्याचे विमान फार अडाणीं वेळी म्हणजे रात्री दीडदोनच्या सुमाराला यायचे होते. इथे कोणाला आणायला जायचे म्हणजे फार जिकिरीचे व त्रासाचे आहे. विमानतळावरच्या इमारतीत कोणाला येऊ देत नाहीत. त्यामुळे तासन्‌तास बाहेर उघड्यावर उभे राहायला लागते. रात्रीची वेळ असली म्हणजे त्याचे काही वाटत नाही पण दिवसा उन्हात उभे राहायला लागले तर मरणच.

मला ह्या गोष्टींचा त्रास नव्हता. मी मंत्रालयात काम करत असल्यामुळे मला इमारतीत थेट आतपर्यंत जायचा पास मिळाला.

तसा पास घेऊन आत गेलो ते बरेच झाले. नाहीतर मुलाची फार पंचाईत झाली असती. विमानातले प्रवासी उतरले, की त्यांचा पासपोर्टवर एन्ट्रीचा शिक्का मारून घेण्याकरता क्यू लागतो. प्रत्येक विमानातून जवळजवळ दोन-अडीचशे प्रवासी येत असतात. चार काउंटर्स आहेत. म्हणजे प्रत्येकापुढे साठ-सत्तर जण उभे असतात. प्रत्येकाला पाचसहा मिनिटे धरली तरी चांगले चारपाच तास लागतात. इथे प्रत्येक पासपोर्ट इतका बारकाईने पाहतात, की विचारू नका.

जे नेहमी येतात त्यांना हे सगळे माहीत असते. ते भराभरा क्यूमधे उभे राहतात. असे लोक उभे राहत आहेत बघून मीही घाईघाईने लाईनमधे जाऊन उभा राहिलो. तरी माझा नववा-दहावा नंबर लागला.

थोड्या वेळात आमचे चिरंजीव आले. प्रवास कसा झाला, घरी सगळे ठीक आहे ना, विचारेपर्यंत पासपोर्ट तपासून त्यावर शिक्का मारायला सुरुवात झाली. पण आमचे नशीबच खराब. रांगेत पहिलाच होता तो कोणी ओमानी. त्याने नुकतेच लग्न करून हिंदुस्थानातून बायको आणली होती. अर्थात ती बुरख्यात होती. आता बुरख्यातली बाई व पासपोर्टवरची बाई एकच आहे हे कळणार कसे? सगळे पुरुष अधिकारी. त्यांना काऊंटरवर हिचा बुरखा दूर करण्याची मनाई. आता आला वांधा!

मग काऊंटरवरचा माणूस कोणा स्त्री अधिकाऱ्याला आणण्याकरता म्हणून गेला व चांगल्या दहापंधरा मिनिटांनी एका स्त्री अधिकाऱ्याला घेऊन आला. ती एयरलाइन्समधली होती. नशीब, की तिचा बुरखा नव्हता! मग ती त्या बुरखेवाल्या बाईला बाजूच्या खोलीत घेऊन गेली. तिचा मुखडा पाहिला व पासपोर्टवर फोटो असलेली बाई ती हीच असे आपले मत दिले. म्हणजे जे काम अर्ध्या मिनिटात झाले असते त्याला चांगली पंधरावीस मिनिटे लागली.

सगळा खुळ्यांचा बाजार. आता इथे हे बुरख्याचे कौतुक करताहेत पण छायाचित्रकाराने तिची छबी घेतली त्या वेळी तर तिला बुरखा काढायला लागला असेल ना? त्या वेळी हिच्या नवऱ्याने काय केले? आणि बुरख्याची धर्माज्ञा आहे म्हटले तर फोटो काढणेसुद्धा धर्माच्या-विरुद्ध आहे. कारण इस्लाममधे माणसाची वा कोणा प्राण्याची प्रतिकृती दाखवायला बंदी आहे. असो.

आम्ही रांगेत उभे राहिलो होतो तर शेजारच्या रांगेतले कोणी दोघे जण शुद्ध मराठीत बोललेले कानावर आले. आनंद झाला. जरा जास्त निरखून पाहिल्यावर आनंदात भर पडली. कारण ह्यांतले एक इम्फालमधे तीनचार वर्षे आमच्याबरोबर असलेले पदकी नावाचे आमचे परम-मित्रच निघाले!

मग पत्त्यांची अदलाबदल केली. ते इथे एका मोठ्या भारतीय कंत्राटदाराकडे प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून होते. हा मोठा उमदा माणूस. बिलकूल खडूसवृत्ती नाही. मोठा आनंदी व हुशार. आता आपले इथले दिवस मजेत जाणार अशी मी मनाशी खूणगाठ बांधली व त्या-प्रमाणे पुढले दिवस चांगले गेलेही.

पासपोर्टवर शिक्का मारून झाला, की मग सामान तपासतात. खाण्याचे काही आणले नाही आहे ना, व मुख्य म्हणजे हशीश-ब्राउन शुगर वगैरे काही नाही आहे ना, हे कसून तपासतात.

पण तसले कोणी काही करत नाही. इथे येणारा प्रत्येक माणूस ओमानमधला नोकरदार असतो. टूरिस्ट नावाची गोष्ट इथे नाही. एक तर लोकांनी मुद्दाम बघायला यावे असे इथे काही

नाही. आणि इथल्या कोणी कंपनीने वा ओमानी माणसाने तुमची जबाबदारी घेतल्याशिवाय तुम्हांला व्हिसाच मिळत नाही. त्यामुळे काही स्मगल करून आणण्याचा कोणी प्रयत्नसुद्धा करत नाही. कारण जर असे करताना कोणी सापडला तर तो तर पंधरावीस वर्षांकरता तुरुंगात जातोच; पण जो माणूस जबाबदार म्हणून राहिला आहे त्यालाही तितकीच वर्षे तुरुंगात खडी फोडायला पाठवतात.

नोकरदारांशिवाय शक्यतो कोणालाही ओमानमधे येऊ देत नाहीत. मागल्या वर्षीची गोष्ट : कपूरचा भाऊ लंडनला काही कामाकरता गेला होता. येताना आपल्या भावाकडे उतरावे, दोन दिवस राहावे व पुढे हिंदुस्थानात जावे असा त्याचा विचार होता. कपूर स्वतः इथल्या गृहमंत्रालयात अधिकारी. त्याने जंगजंग पछाडले. आपल्या वकिलातीची मदत घेतली. पण त्याच्या भावाला काही व्हिसा मिळाला नाही.

इथल्या सुलतानाचे ते पक्के धोरणच आहे. आधी लोकांना आपल्या देशात हवे तसे येऊ द्यायचे व काही गडबड झाली की 'परकीय हात, परकीय हात' म्हणून ओरड करायची हे त्याला पसंत नाही.

आणि हे धोरण फक्त हिंदुस्थानच्या लोकांपुरते आहे असे नाही. पॅलेस्टाइनी अगदी कडवे मुसलमान. तरीसुद्धा सुलतान त्यांना ओमानमधे येऊ देत नाही. काय पैशाची मदत हवी असेल ती पाठवून देतो.

रात्री दोन-अडीच वाजता मुलाला घेऊन घरी पोहोचलो. मुलगा दमला होता. लगोलग काहीतरी खाऊन तो झोपला. बायकोने त्याच्याबरोबर चारपाच दिवाळी अंक पाठवले होते. 'मौज', 'माणूस' वगैरे. चांगला चार-साडेचारपर्यंत वाचत होतो.

दिवाळी अंकांत माझे काही नव्हते त्यामुळे मन खट्टू झाले होते. या खट्टू मनानेच सानियाची 'प्रतीत' व निर्मला देशपांडेची 'बन्सी काहे को बजायी' वाचली. 'बन्सी' फारच छान उतरली आहे.

कोणी कृष्ण कोणा गोपीच्या जीवनात बन्सी वाजवून जातो आणि हुरहूर लावून जातो. पुरुषांच्याही आयुष्यात अशी बन्सी वाजते. तितकीच सुरेली व हुरहूर लावणारी.

आता जानकीचेच पाहा ना. वेडी माझ्यावर जीव लावून बसली आहे. सर्वसामान्य आम्ही असामान्य प्रेमसंबंधात गुरफटलो होतो.

'बन्सी'मधली नायिका आपले कसेतरी समाधान करून घेते. बाई म्हणून तिची असाहाय्यता आहे. पण पुरुषही काय कमी असहाय असतो ? तिने आपले समाधान करून घेतले पण मी माझे कसे करून घेऊ ?

मुलगा आला आहे तरी त्यामुळे दररोजच्या जीवनात फरक पडला नाही. नेहमीसारखा लवकर उठतो व साडेसातला घर सोडतो. तोपर्यंत हा पहेलवान झोपलेलाच असतो. मी अडीचच्या सुमाराला येतो. तोपर्यंत त्याने भात टाकलेला असतो, आमटी बनवून ठेवलेली असते.

त्याला स्वैपाकात गती आहे. रस आहे. स्वैपाकातच नव्हे तर 'बायकांची' म्हणून जी कामे

आहेत, म्हणजे शिवण, कशिदा काढणे, स्वेटर विणणे हेसुद्धा तो उत्तम करतो. आम्ही मुलीला कधी स्वैपाक कर वा शिवण-टिपण कर म्हणून म्हटले नाही. तसेच ह्या मुलालाही हे काय बायकी उद्योग करतोस, म्हणून खजील केले नाही. उलट, त्याचे त्याकरता कौतुकच केले. मुलांच्या मनात आपणच न्यूनगंड निर्माण करतो व ते दूर कसे करावेत ह्याची अमेरिकन पुस्तके वाचतो.

मी कचेरीतून आल्यावर कधी पोळ्या करतो, कधी ब्रेड असते, कधी नान असते. मग रम घेऊन व जेवून जो झोपतो तो अगदी पाचसहा वाजेपर्यंत.

आज मी, मुलगा आणि कपूर एका इटालियन सिनेमाला गेलो होतो. आता इटालियन सिनेमा म्हणजे काय असते ते मागे सांगितलेच आहे. उघड्यावाघड्या बायका, अतिप्रसंग भरपूर.

"तुम लडकेके साथ ये फिल्म कैसे देखोगे ?" कपूरचा प्रश्न. थोड्या काळजीच्या स्वरातला.

"क्यू ? उसमें क्या हर्ज है ?" मी प्रतिप्रश्न केला व मीच त्याचे उत्तर दिले, "ही ईज मॅन लाइक मी." त्यातल्या 'मॅन' वर जोर देत.

कपूरचे समाधान झालेले दिसले.

सिनेमा संपल्यावर आम्ही चहा प्यायला गेलो. कपूर आणि मी सिगरेट प्यायला लागलो. इथे उत्तम विलायती सिगरेट्स मिळतात. जसा त्या सिगारेट्सचा वास मुलाच्या नाकात जाऊ लागला तसा तो अस्वस्थ होऊ लागला. त्याला सिगरेट प्यावीशी वाटते आहे, हे मी ओळखले. तो घरात माझ्यादेखत पीत असे. पण कपूर अंकलच्यादेखत प्यावी की नाही ह्या संभ्रमात तो पडला. तेव्हा मीच मुलग्याला सिगरेट ऑफर केली. कपूरला ह्याही गोष्टीचे फार कौतुक वाटले.

आम्ही घरात दबावाचे वातावरण कधी ठेवलेच नाही. दबावामुळे मुले बिघडतात असे माझे तत्त्वज्ञान. तर मोकळे सोडले तर मुले बिघडतात असे बऱ्याच जणांचे मत. दबावाने बिघडलेल्या मुलांपेक्षा मला स्वातंत्र्य दिल्यामुळे बिघडलेला मुलगा जास्त आवडेल, हे त्यावरचे माझे मत. त्यामुळे आमच्या घरात नेहमी वातावरण मोकळे, म्हणून आनंदी.

"आपल्या घरात असं वाटतं," थोरली मुलगी थोडी मोठी झाल्यावर एक दिवस सांगू लागली, "की आपण सगळी बहीणभावंडं आहोत व आपले आई-वडील कुठंतरी बाहेरगावी असतात."

आता आणखी काय सर्टिफिकिट पाहिजे ?

घरून आलेले दिवाळी अंक वाचतो आहे. एक ठणठणपाळांचा 'ललित'मधला लेख सोडला तर चांगलेच का — बऱ्यापैकीसुद्धा विनोदी लिखाण नाही. एकंदर विनोदी लिखाणाचे पीक कमी यायला लागले आहे की काय ? का आता समाज विनोदी लिखाण पसंत करण्याच्या मनःस्थितीत नाही आहे ?

माझे लिखाण चांगले असते, उच्च दर्जाचा विनोद असतो, लिखाण खुसखुशीत असते असे चांगले चांगले लोक म्हणतात; मग माझे लिखाण दिवाळी अंकांतून का येऊ नये ?

आर्किटेक्ट म्हणून नाव मिळवण्याची आमची बस चुकली, आर्किटेक्चरवर काही लिहिण्याची बस चुकली. आता ही मराठी लिखाणाची बस पण चुकणार ?

तरुणपणी टक्केटोणपे खाण्याची तयारी असते. काहीतरी करून दाखवीन अशी जिद्द असते. आता ह्या वयात व अशा दोन बसेस चुकल्यावर जिद्द राहणार तरी कशी ?

जानकीच्या नवऱ्याचे पत्र आले आहे. त्याला इथे काही नोकरी लागावी अशी मी खटपट करतो आहे. त्याबाबत त्याचे पत्र आहे. जानकी पुढल्या वेळी पत्र लिहील म्हणून मधाचे बोट लावले आहे.

जानकी कसे पत्र लिहिणार ? आणि लिहिले तरी त्यात काय लिहिणार ? मला पत्र लिहायचे म्हणजे तिची परीक्षाच आहे. मी तिच्या नवऱ्याला पत्र लिहितो त्यात तिला उद्देशून काही वाक्ये असतात. पण उद्या फक्त तिलाच पत्र लिहायचे झाले तर मी तरी काय लिहीन ?

जी व्यक्ती आपल्या कायम मनात ठाण मांडून बसलेली असते तिला पत्र लिहिणे फार अवघड गोष्ट आहे. अगदी मायना कोणता लिहावा इथपासून अवघडीला सुरुवात होते. मग मजकूर लिहिताना काय होईल ? भावनांना शब्दांत बसवणे म्हणजे ढगांना पकडण्यासारखे आहे.

बरे, आम्ही लिहिणार तरी काय ? आम्हांला एकमेकांबद्दल काहीतरी वाटते हे आता लिहिण्याची गरज नाही. अशा पत्रांतून पुढली स्वप्न-चित्रे रंगवलेली असतात. आमच्या पुढे तशी स्वप्न-चित्रे नाहीत – रंगवायला रंग नाहीत – असे नाही, पण कॅनवास नाही. आम्ही विचित्र तऱ्हेने जखडले गेलो आहोत. वय, मिळकत, आपआपली कुटुंबे, सगळ्या बाजूंनी बांधले गेलो आहोत.

असे असूनसुद्धा जानकीचे कधी ना कधी काहीतरी पत्र येईल असे वाटत राहते. आणि तसे आले तर त्यात ती काय लिहील, ह्या विचारात रंगून जातो. ह्या विचारात आणि जुन्या आठवणींत.

दिल्लीला जानकीच्या घरी गेलो होतो तर तिची धाकटी बहीण पण आली होती. बहुधा मी येणार म्हणून जानकीने तिला मुद्दाम बोलावले असावे. ती बहीण जानकीइतकीच सुस्वरूप व चाणाक्ष.

काबूलला असताना ह्या बहिणीबद्दल जानकी काही सांगत असता मी जानकीला खोड्यात टाकले होते. जानकी आपल्या बहिणीचे काहीतरी कौतुक करत होती व आम्ही शांतपणे ऐकत होतो. ऐकता ऐकता मी अचानकपणे विचारले, "तुझी बहीण पण तुझ्यासारखी खूबसूरत आहे ?"

ह्या प्रश्नाने जानकी चांगलीच चमकली. सुंदर स्त्रीला आपल्या सुंदरतेचे भान असते पण असे तोंडावर कोणी त्याचा उल्लेख करील असे तिला वाटत नसते. साधारणपणे तसा कोणी करतही नाहीत. "तुझ्यासारखी खूबसूरत आहे का ?" ह्या माझ्या प्रश्नाने जानकी बावचळली, लालेलाल झाली.

तर मी त्यांच्या दिल्लीच्या घरी गेलो तेव्हा ही खूबसूरत बहीण पण आली होती. मी आणि जानकी दोन सोफ्यांच्या कोनांत येणाऱ्या सीट्सवर बसलो होतो. बहीण समोरच्या सोफ्यावर जरा दूर. जानकीने माझ्याबद्दल तिला बरेच काही सांगितले असावे. कारण ती बहीण माझ्याकडे पाहत मोठ्या मिश्किलतेने हसत होती. 'नेहमी ज्याच्याबद्दल तू सांगत असतेस तोच ना हा ?' अशा अर्थाचे ते हास्य होते. ते सगळे बघून मी जानकीला खोट्या खोट्या तक्रारीच्या सुरात म्हटले,

"ये तो बडी खराब हसती है."

जानकीने आपल्या बहिणीकडे पाहिले. तिलाही तिच्या हसण्यामागची वृत्ती कळली. ती थोडीशी हसत म्हणाली,

"वो ऐसेही खराब लडकी है."

मद्रासकडल्या हिंदूंच्या धर्मांतराबाबतच्या बातम्या इथल्या वर्तमानपत्रांतही येत आहेत. म्हणजे 'टाइम्स ऑफ इंडिया'मधे तर येतातच; पण इथल्या 'ओमान टाइम्स'मधे पण येत आहेत. त्याला इथे मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळते आहे. त्यावर होणाऱ्या चर्चा व बाकी हिंदू संघटनांनी घेतलेला पवित्रा ह्यांबाबतही पुष्कळ छापून येत आहे.

अर्थात ह्याचा पहिला चिमटा अनवर पाशाने घेतला.

"वैसे भी इंडियामे मुसलमानो की पैदाईश बढ रही है. आणि आता जर असे हिंदूच मुसलमान व्हायला लागले तर थोड्याच दिवसांत हिंदुस्थानात आम्हां मुसलमानांची मेजॉरिटी होईल!" त्याला होणारा आनंद त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता.

"बच्चू, बहुत खूष मत होना," मीही तेवढ्याच आनंदाने म्हटले. "मधून मधून आमच्याकडं दंगेफसाद होतात. त्यामुळं मुसलमानांचा नंबर कमी होत जाईल. त्यांची मेजॉरिटी होण्याचा काही संभव नाही."

अनवर पाशा व इतर आनंदी झालेल्या लोकांनी ह्या शक्यतेचा विचारच केला नव्हता. माझ्या उत्तराने तो गंभीर झाला.

अमानुल्लाची प्रतिक्रिया अगदी वेगळी होती. अगदी त्याच्या स्वभावाप्रमाणे रोखठोक.

"पण जर कोणाला मुसलमान व्हायचं असेल तर त्याला सरकारनं आडकाठी करायचं कारणच काय? त्याला बंदी काय म्हणून?"

. "अमानुल्ला, तुला हे कसं समजत नाही?" मी त्याला समजावून सांगण्याच्या स्वरात म्हणालो, "की हे लोक मुसलमान होत आहेत ते काही त्यांना इस्लाम धर्म चांगला वाटला आहे म्हणून नाही. पूर्वीच्या काळी जबरदस्तीनं मुसलमान होत असत म्हणजे त्यांना करण्यात येत असे. आता पैशाच्या लालचीनं होतात. ही काय चांगली गोष्ट आहे?"

पूर्वीची धर्मांतरे सगळी सक्तीने, बळजबरीने केली गेली होती म्हटल्यावर अमानुल्ला तडकला.

अमानुल्लाचे पूर्वज राजपूत. एवढेच नव्हे तर आपण राजपूतकुळीचे आहोत ह्याचा त्याला फार अभिमान. जाता येता तो म्हणायचा, "हम ऐसेवैसे थोडेही है? हम तो राजपूत है." एक मुसलमान आपण राजपूत आहोत ह्याचा अभिमान बाळगतो ह्याची मला मजा वाटायची.

तडकलेला अमानुल्ला म्हणाला,

"हा तुम्हां लोकांचा प्रोपोगँडा आहे. आम्ही राजपूत आहोत. आमचे दादा, पडदादा असे जबरदस्तीनं काही करणारे नव्हते, तर जबरदस्तीनं मुसलमान कसे होतील? त्यांनी बघितलं, की त्यांच्या धर्मापेक्षा इस्लाम चांगला आहे म्हणून ते मुसलमान झाले. आणि जबरदस्तीनं असे लाख्खो लोक थोडेच धर्म बदलतील?"

मी काही उत्तर देणार त्याआधीच अमानुल्ला म्हणाला,

"आणि तू म्हणतोस तसं जर जबरदस्तीनं म्हणजे मनाविरुद्ध मुसलमान झाले असतील तर मग ते परत हिंदू का नाही झाले? मुसलमानच का राहिले?"

ह्या त्याच्या प्रश्नाला माझ्याकडे उत्तर होते व नव्हतेही. लाख्खो हिंदू मुसलमान झाले व नंतर तसेच राहिले ह्याचे कारण बाकी हिंदूंचा नादानपणा होता हे त्याच्या प्रश्नाचे उत्तर होते; पण ते अमानुल्लाला सांगू कसे?

अमानुल्ला अशा विचाराचा आहे ह्याचे कारण, आपले पूर्वज जबरदस्तीने मुसलमान झाले होते हे मान्य करणे त्याला कमीपणाचे वाटते, की पाकिस्तानात ह्या पद्धतीने इतिहास शिकवतात? लाख्खो हिंदू लोक बळजबरीने नाही, तर इस्लाम धर्म आवडला म्हणून मोठ्या राजीखुशीने मुसलमान झाले, असे शिकवत असतील?

काय इतिहास शिकवतात पाकिस्तानांतल्या मुलांना? खरेच, आपल्याला किती थोडी माहिती आहे. आपल्या शेजारच्या देशाबद्दल! – ज्याला आपण नंबर एकचा शत्रू समजतो, त्या लोकांबद्दल, त्यांच्या आचारा-विचारांबद्दल! आणि हे फक्त पाकिस्तान्यांबद्दल नाही, बर्मीज, सिलोनी, बांगलादेशी, नेपाळी लोकांबद्दल तरी आपल्याला काय माहिती असते? तेही आपले शेजारीच ना?

मी इंग्लंडात असतानाची गोष्टः आमच्या वर्गात पाकी, बर्मी, सिलोनी, इंडोनेशियन, चिनी विद्यार्थी पण होते.

एकदा मी तावातावाने मुसलमानांनी भारतावर कसे आक्रमण केले, आमची देवळे पाडून तिथे कशा मशिदी बांधल्या वगैरे सांगत होतो. तेवढ्यात मला एक बर्मी मित्राने थांबवले व म्हणाला,

"ही आक्रमणाबद्दल रागारागानं बोलण्याची भाषा हिंदी माणसाच्या तोंडी शोभत नाही."

"का?" मी तेवढ्याच रागारागाने व थोड्या आश्चर्याने विचारले, "न शोभायला काय झालं?"

"तुम्ही तरी पूर्वेकडं म्हणजे सिलोनमधे, ब्रम्हदेशात, थायलंड, सिंगापूर, इंडोनेशिया वगैरे देशांत काय केलंत? तुमचा बुद्ध-धर्म असाच आक्रमणानं आला!"

"छे, छे! आम्ही काही सैन्य पाठवलं नव्हतं. बौद्ध-भिक्षू गेले होते. ते बळजबरी काय करणार? तिथल्या लोकांना बुद्धधर्म आवडला म्हणून त्यांनी तो धर्म स्वीकारला."

म्हणजे अमानुल्ला जे मुसलमानांच्या धर्मांतराबद्दल म्हणत होता ते मी बुद्ध-धर्मीयांबद्दल म्हणत होतो.

खरे म्हणजे माझा व बुद्ध-धर्माचा काही संबंध नव्हता. तो बर्मी व सिलोनी बौद्ध होते, मी हिंदू होतो. पण ते बुद्ध-भिक्षू हिंदुस्थानातून गेलेले असल्यामुळे मी त्यांचे वकीलपत्र घेऊन केस लढवत होतो.

"हे बघ," आता सिलोनी मित्र पण चर्चेत सामील झाला होता. "आपण होऊन आपला धर्म कुणीही सोडत नाही. मग त्यांचा स्वतःचा धर्म चांगला असो की वाईट असो. दुसरा धर्म स्वीकारताना कधी पैशाची, कधी अधिकाऱ्याच्या जागेची लालूच असते वा चक्क भीती असते.

"तुम्ही जे आमच्या देशात केलंत तेच तुमच्या देशात मुसलमानांनी केलं तर त्याबद्दल इतका आरडाओरडा का?"

आता इतिहासाच्या दृष्टीने त्यांचे म्हणणे बरोबर होते की चूक होते मला माहीत नाही, पण इतिहासात काय म्हटले आहे, त्यापेक्षा लोकांना काय वाटते, त्यांच्या भावना काय आहेत हे महत्त्वाचे नाही आहे का?

आमची धर्मांतरावरची चर्चा संपली तरी पाकिस्तानात इतिहासात काय शिकवतात हा विषय मनात घोळत होताच.

आता प्रथम जो कोणी सहकारी पाकिस्तानात जाईल त्याला हायस्कुलात शिकवले जाणारे पुस्तक आणायला सांगायचे असे पक्के केले. बघू या तरी पाक-इतिहास आहे तरी काय ? आणि मजेची गोष्ट म्हणजे अनवर पाशाच काही दिवसांनी कराचीला जायला निघाला. त्याला इतिहासाचे पुस्तक आणायला सांगितले तर तो चक्रावलाच. असले पुस्तक वगैरे आणायला कधी कुणी कुणाला सांगत नाही म्हणून त्याचे चक्रावणे. त्याने येताना पुस्तक आणले, अगदी लक्षात ठेवून आणले.

पुस्तक हाती पडताच प्रथम काय पाहिले असेल तर आपल्या शिवाजी महाराजांचा उल्लेख ह्या लोकांनी कसा केला आहे ते. महाराजांवर एक पान मजकूर होता. शिवाजी हा फार न्यायप्रिय व चांगला होता. मुख्यतः तो स्त्रियांना फार आदराने वागवत असे. हा उल्लेख बघून अभिमानाने माझी छाती भरून आली; पण त्याच वेळी स्त्रियांना आदराने वागवणे हे त्या काळी इतके दुर्मिळ होते ? असाही विचार आला.

आज 'पुलं'चा इथल्या शाळेच्या हॉलमधे कथा-वाचनाचा कार्यक्रम आहे. बराच मराठी समाज जमणार तेव्हा चांगलेचुंगले कपडे घालून गेलो. इथे आल्यापासून प्रथमचं कुठल्यातरी मराठी कार्यक्रमाला असा जात होतो.

पण एकंदरीत पाहिलं, की इथल्या मराठी लोकांत समाजाची भावना नाही. आपसांत प्रेम वा सहानुभूती नाही. दिल्ली वा कलकत्त्याला तसे नव्हते. इथे सगळे सुटे सुटे माळेच्या मण्यांसारखे. पैसे करायला इथे आले आहेत हाच सगळ्यांना जोडणारा धागा. बाकी काही नाही. आता मीच मण्यासारखा वेगळा राहिलो होतो म्हणून मला तसे वाटत होते की काय कळत नाही.

अशा कार्यक्रमांतून दुसरा काही लाभ उठवावा अशी कार्यकर्त्यांची वृत्ती दिसली नाही. मी जर कार्यक्रम ठरवणारा असतो तर पुलंसारखे श्रेष्ठ मराठी लेखक आले आहेत तर प्रमुख गुजराथी, पंजाबी, बंगाली लोकांना बोलावले असते. निदान भारताच्या राजदूताला तरी. अगदी कार्यक्रमाला नाही तरी चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला असता.

पुलंचे कथावाचन नेहमीप्रमाणे रंगले. त्यांचे वाचन नुसते ऐकण्यासारखे नसते तर पाहण्यासारखेसुद्धा असते. त्यांच्या चेहऱ्यावरचे मिश्किल भाव जास्तच मजा आणतात.

पुल आता दमलेले, थकलेले वाटत होते. खुर्चीवर बसून त्यांनी वाचन केले. आपली एकसष्टी त्यांनी साजरी करू दिली नव्हती. तरी पण इथल्या लोकांनी त्यांना एकसष्टीनिमित्त एक सोन्याचे पेन पुण्याला पाठवले होते. पुलंनी त्या भेटीचा आवर्जून उल्लेख केला व कार्यक्रमाला सुरुवात केली.

मध्यंतरात पुलंना भेटलो. "माझं लिहिलेलं कधी बघितलं आहे का ?" असे थोडे संकोचाने विचारले. म्हटले एवढा कार्यरत माणूस, त्याला कुठले आपले वाचायला वेळ मिळणार ? पण आनंदाची गोष्ट म्हणजे त्यांनी नुसते बघितले नव्हते तर वाचले पण होते.

"छान लिहिता तुम्ही. दर आठवड्याच्या आठवड्याला असं विनोदी लिहिणं अवघड गोष्ट आहे. कीप इट अप." असा उत्साहवर्धक अभिप्रायही दिला.

लगेच मला लालच सुटली. "पुस्तक काढलं तर त्याला आशीर्वाद द्याल का?" म्हणून विचारले. त्यालाही त्यांनी आनंदाने "जरूर" असे उत्तर दिले.

तो दिवस मोठा उत्साहात गेला. पुलंसारख्यांनी कौतुक करावे असे आपले लिखाण होते आहे म्हणायचे!

पुलंशी बोलत असता कोणीतरी बायकोच्या लिखाणाबद्दल सांगितले. तिच्या लिखाणाची पण पुलंनी फार वाखाणणी केली. पुण्याला आल्यावर जरूर भेटायला सांगा म्हणून आवर्जून सांगितले.

ह्या सगळ्या समारंभाचे व भेटीचे बातमीपत्रवजा पत्र बायकोला लिहिले.

बायकोच्या लिखाणाचे कोणी कौतुक केले, स्तुती केली तरी मला त्याचा मत्सर वाटत नाही. ह्याचा अर्थ मी राग, लोभ, मत्सर जिंकले आहेत असे नाही, तर बायकोचे कौतुक होते त्या वेळी तिच्या लिखाणात माझाही सहभाग आहे, व त्याचेही कौतुक होत आहे असे मला वाटत असते.

अर्थात तिचे लिखाण तिचे तीच करते. लिहिण्याची व चांगले लिहिण्याची कला व बुद्धी तिची स्वतःचीच. ते लिहिण्याकरता करायचा अभ्यास व वाचन तिचे तीच करते. तिला बाकी काही मदत करायची, कोणाला भेटायला जायचे असले तर सोबत करायची, सूचना करायच्या, ह्या तऱ्हेचा माझा सहभाग.

पण त्याचबरोबर हेही खरे, की माझ्या लिखाणाबद्दल तिने कधी उत्साह दाखवला नाही. ह्याचे असेही कारण असेल, की माझे लिखाण तिला टाकाऊ वाटत असेल. तिसऱ्या दर्जाचे वाटत असेल. आता जी गोष्ट तिला टाकाऊ वाटत असेल तिथे ती कौतुक तरी काय करणार?

म्हणूनच की काय माझे छापून आलेले अंक पाठवण्याची तिला फारशी जरुरी भासली नसेल व त्याबद्दल पत्रातून कमीत कमी उल्लेख करत असेल?

आता अगदी बायको झाली तरी तिचे मन कसे विचार करते हे आपल्याला थोडेच कळणार आहे? आपले मन आपल्याला कळत नाही तर दुसऱ्याचे काय कळणार?

पुलंच्या कार्यक्रमाचे फोटो कुणी कामत नावाच्या फोटोग्राफरने घेतले आहेत व तो 'ओमान टाइम्स'मधे काम करतो असे कळले. ते फोटो आपल्याकडे असावेत असे वाटले. म्हणून त्याच्या कचेरीत गेलो.

त्यांची कचेरी आमच्या ऑफिसच्या जवळच रुई बाजारात आहे. चांगली नवी कोरी चार मजली इमारत. मुख्य संपादक व उपसंपादक ब्रिटिश आहेत व खालचे सगळे हिंदी.

इथे वर्तमानपत्र चालवायचे म्हणजे मोठी कसरत आहे. राजकीय काही म्हणजे काही लिहिता येत नाही. त्याचप्रमाणे धार्मिक विषयावरही काही लिहिता येत नाही. इथे सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था नाहीत. तेव्हा तोही विषय नाही. मग दररोजचा पेपर भरणार तरी कसा?

मग कुठे हिंदुस्थानातल्या बातम्या छापायच्या, कुठे पाकिस्तानातल्या. म्हणजे त्या त्या देशातल्या वर्तमानपत्रांत आलेल्या. थोड्या 'पाहिजेत'च्या जाहिराती आणि थोड्याफार टीव्हीच्या व फर्निचरच्या.

मधल्या पानावर छोटेसे संपादकीय व बाकीच्या पानांवर विलायतेतल्या नव्या डिझाइन्सचे कपडे घातलेल्या बायका-पुरुषांचे फोटो. कधी काळे-पांढरे व कधी रंगीत. फ्रेंच, ब्रिटिश, इटालियन मासिकांतून आलेले. आता इथले पुरुष पायघोळ पांढरा शुभ्र झब्बा घालणारे आणि

बायका बुरख्यात! त्यांना ह्या फॅशन-परेडचा काय उपयोग होता?

कामत काही भेटला नाही. वर्तमानपत्रांत काम करणारे असे सहज थोडेच भेटतात? नंतर दोनदा खेपा टाकल्या तरी भेटला नाही. तोपर्यंत उत्साहही कमी झाला होता. तेव्हा त्या फोटोंचे तसेच राहून गेले.

उद्या महंमद पैगंबराचा जन्मदिवस आहे म्हणून कचेरीला सुट्टी आहे. बाकी जन्मदिनाचा काही कार्यक्रम नाही. कार्यक्रम असणार कसा? 'व्यक्तीचे – अगदी महंमद पैगंबराचेही – स्तोम माजवू नका' ही इस्लामची शिकवण. त्या शिकवणीप्रमाणे कोणाचेही फोटो नकोत, चित्रे नकोत, पुतळे नकोत, व्यक्तीच्या कौतुकाची गाणी नकोत ही ह्यांच्या धर्माची शिकवण. प्रथम इंग्लिश लोक मुसलमानांना 'मोहामेडनूस' म्हणजे महंमदाचे अनुयायी म्हणून संबोधत असत; तर तेही ह्या लोकांना आवडले नाही. ते स्वतःला मुसलमान म्हणवून घेतात. जिथे व्यक्तिपूजेला महत्त्व नाही तिथे महंमद पैगंबराचा जन्मदिवस साजरा होणार कसा? पण बाकी देशांतून अशा सुट्या देतात म्हणून इथेही देतात.

इस्लाम धर्मातल्या गाण्यावरल्या बंदीची गोष्ट मजेशीरच आहे. गाण्याला स्पष्ट शब्दांत बंदी नाही; पण महंमद पैगंबर कुठेतरी जात असता त्यांच्या कानांवर गाण्याचे स्वर पडले तेव्हा त्यांनी कानांवर हात ठेवले. त्यावरून असा अंदाज, की त्यांना संगीत आवडत नसावे.

ह्या गाण्याच्या प्रकरणावरून आठवले · कधीही हिंदी सिनेमांचा विषय निघाला, की अमानुल्लाच नाही तर इतर पाकिस्तानीसुद्धा त्यांना आपली भजने फार आवडतात म्हणून सांगतात. पाक आणि भारतीय मुसलमानांवर भजनांचा फार परिणाम झाला आहे. अजमेरला कोणा मुसलमान संताचा मेळावा भरतो. त्या वेळी इस्लामी भजनांना अगदी ऊत येतो. व्यक्तिपूजा मान्य नसलेल्या इस्लामी धर्माचे लोक त्या अजमेरी संताचे गुण गात असतात.

उगाच नाही इजिप्ती व सुदानी, पाक व भारतीय मुसलमानांना खरे मुसलमान मानत नाहीत ते.

पैगंबराच्या जन्मदिवसाचा बाकी काही कार्यक्रम नव्हता तेव्हा माझ्याच घरी कार्यक्रम करण्याचे ठरले व तोही अगदी दारू पिण्याचा! अट इतकीच, की तो संध्याकाळचा नमाज पढून झाल्यानंतर करायचा.

अमानुल्ला येणार होता. दुसरा एक पाकिस्तानी नईम नावाचा ड्राफ्टसूमन होता, तो. सदाकत अली नावाचा हैद्राबादच्या नबाबाचा मुलगा आमच्या मंत्रालयात आर्किटेक्ट आहे, तो येणार होता.

सदाकत अली नुसता नबाबाचा मुलगा नाही, तर खरेच स्वतः नबाबासारखा आहे. नबाबी वृत्ती व नबाबासारखे वागणे. काहीतरी चौसष्ट-पासष्ट साली त्याने हैद्राबाद सोडले व तो पाकिस्तानात गेला.

काही दिवसांपूर्वी त्याच्याकडे जेवायला म्हणून गेलो होतो. त्याचाही फ्लॅट मोठा होता. घरात उत्तम फर्निचर होते. चांगले चांगले पुतळे व कलात्मक वस्तू होत्या. क्रोकरी वगैरे नबाबी होती.

ह्या सगळ्यांत आश्चर्य व आनंद वाटण्यासारखी गोष्ट म्हणजे बाजूच्या टेबलावर प्रमुखपणे सदाकत अली पंडित नेहरूंना काही नकाशे दाखवतो आहे, समजावून सांगतो आहे

असा फोटो होता. पाकिस्तानात जाण्याआधी सदाकत अल्ली हैद्राबादच्या बांधकाम खात्यात आर्किटेक्ट होता. त्याने डिझाईन केलेल्या इमारतीच्या पायाभरणी-समारंभाकरता नेहरू आले होते. तो फोटो त्या प्रसंगाचा होता.

नेहरूंचा फोटो एक पाकिस्तानी आपल्या दिवाणखान्यात मोठ्या अभिमानाने ठेवतो ह्याचा मला आनंद व अभिमान वाटला. आता कुणाला वाटेल, की त्यात एवढ्या आनंदाची व अभिमानाची बाब काय आहे? नाहीतरी नेहरू मुस्लिमप्रेमी होतेच. काही जण तर त्यांना मुस्लिमधार्जिणे समजतात. तेव्हा तसा फोटो असणारच. पण प्रश्न तो नाही.

एक पाकिस्तानी ओमानसारख्या परदेशात असतानासुद्धा आपल्या घरात पंडित नेहरूंचा फोटो लावतो, ही त्यातली आनंदाची बाब होती. तो ओमानमधे गेली सातआठ वर्षे होता. त्याच्याकडे ओमानी, सुदानी, इजिप्ती मित्रमंडळी येत असणार. तरीदेखील त्यांच्या दृष्टीने शत्रु-राष्ट्राच्या पंतप्रधानांचा फोटो त्याने घरात लावावा ही कौतुकाची बाब होती.

सदाकत अल्लीने हिंदुस्थान सोडले ते म्हणजे पाकिस्तान झाल्यावर तब्बल वीस वर्षांनी. पाकिस्तानाच्या प्रेमाने व हिंदुस्थानात राहणे नको ह्या विचाराचे लोक विभाजनाच्या वेळीच पाकिस्तानात गेले होते. हा नबाबाचा मुलगा हैद्राबादला काही सरकारी हुद्यावर असलेला. त्याने जवळजवळ वीस वर्षांनंतर हिंदुस्थान सोडावे ह्याचे मला कुतूहल वाटत होते.

एकदा ऑफिसमधे असेच बोलत बसलो असता मी त्याला म्हटले,

"मियाँ, तुमको कुछ पूछना है."

"पूछो, मग त्याला इतकी प्रस्तावना कशाला?"

"नाही, अगदी तुझ्या स्वतःबद्दलच आहे म्हणून थोडा संकोच वाटतो. फाळणी झाली १९४७ साली. हैद्राबाद-पोलीसॲक्शन काहीतरी पन्नासमधे; पण तू पाकिस्तानला गेलास पासष्ट-सहासष्ट साली, हे कसं? त्यातून तू गव्हर्न्मेंट आर्किटेक्ट होतास."

"उसका ऐसे हुवा." सदाकत अल्ली आपली कैफियत मांडता झाला.

"पासष्ट साली हिंदुस्थान आणि पाकिस्तान युद्ध झालं त्या वेळी आम्हां मुसलमान अधिकाऱ्यांना फार जाच व्हायला लागला. कुणीही येताजाता 'काय पाकिस्तानला कधी जाणार?' म्हणून विचारू लागला. 'आम्ही काय म्हणून पाकिस्तानला जाऊ?' असा मी त्यांना प्रतिप्रश्न करत असे. त्यावर ते लोक मोठ्या कुत्सितपणे हसत. तरी पण मी त्यांच्याकडे लक्ष देत नसे. पण एक दिवस कळसच झाला. आमचे दुबे नावाचे चीफ आर्किटेक्ट होते. त्यांच्या खोलीत मी जाता जाताच त्यांनी 'काय सदाकत अल्ली पाकिस्तानला कधी जाणार?' असं विचारलं व स्वतः जोरजोरानं हसले. इतर दोघंतिघं होते ते तसेच खदखदून हसले. माझं मस्तक पेटलं. म्हटलं हा काय त्रास आहे? त्या मस्तक पेटलेल्या अवस्थेतच मी म्हटलं, की 'तुम्ही काळजी करू नका. मी चारसहा महिन्यांत जातोच आहे.'

पाकिस्तानात आमच्या थोरामोठ्यांच्या ओळखी होत्या. जमीनजुमला विकला व तडक पाकिस्तानात गेलो."

सदाकत अल्ली फार चिडीने बोलत होता. त्याची चीड मी समजू शकत होतो. विभाजनाच्या वेळी मुस्लिम लीगने व बॅ० जिनांनी सगळ्या गोष्टींचा विचार केला पण भारतात राहणाऱ्या मुसलमानांच्या भवितव्याचा त्यांनी बिलकूल विचार केला नाही. आणि ह्याच लोकांनीं पाकिस्तान-निर्मितीसाठी सगळ्यांत जास्त मदत केली होती.

आता तेच लोक आपल्या कृतीचे फळ भोगत होते, त्याला कोण काय करणार?

सदाकत अल्ली इंग्लंडात बरीच वर्षे राहिला होता. त्यामुळे त्याची खाण्यापिण्याविषयी काही जुनी मते नव्हती. अमानुल्ला बिअर प्यायचा. नईम मात्र काही पीत नसे.

खाण्याचे पदार्थ सदाकत अल्ली घेऊन आला होता. काही त्याच्या बायकोने बनवलेले, काही विकतचे. पिण्याची व्यवस्था माझ्याकडे होती. रात्री एकदीड पर्यंत गप्पा, खाणे, पिणे चालले होते. असा आम्ही तो जन्मदिन साजरा केला.

आज कपूरबरोबर मुलाला घेऊन इथले छोटेखानी म्यूझियम पाहायला गेलो. कपूर इथे गेली चार वर्षे आहे पण त्याने हे म्यूझियम पाहिले नव्हते. म्यूझियम जुन्या मसकतमधे आहे. कपूरच्या कचेरीजवळ.

म्यूझियम कोणा सुलतानाच्या जुन्या दुमजली वाड्यात आहे. आम्ही असे सकाळचे दहा-साडेदहा वाजता गेलो. म्यूझियममधे अगदी शुकशुकाट होता.

आत जाऊन पाहतो तो सगळ्या वस्तू आपल्या सौराष्ट्रातल्या. मोठ्या लाकडी पेट्या, लोखंडी व पितळी वस्तू, अगदी अठराशे सदीपासूनच्या. पण सगळ्या गुजराथी. ह्याचे कारण गुजराथ ह्यांना सगळ्यांत जवळचा. समुद्रमार्गे त्यांचा व्यापार द्वारकेशी होत असे. इथले कित्येक ओमानी व्यापारी घरी व दारी गुजराथी बोलतात. त्यांची आपली अशी वेगळी मशीद पण आहे.

कपूरने व पदकीने मुलाला त्यांच्या गाडीतून बरेच फिरवले, मसकतबाहेरही घेऊन गेले.

पंधरावीस दिवस राहून मुलगा परत मुंबईला गेला. त्याला सोडायला विमानतळावर गेलो. जाण्याच्या वेळी विमानतळावरच्या इमारतीत जाऊ देतात. त्यामुळे काही अडचण पडली नाही. त्याचे सामान तपासले व तो आत गेला. मग मी काही विमानतळावर थांबलो नाही.

परत येताना विचार आला, की गल्फ-एयरची कचेरी रस्त्यावरच आहे तर जाता जाता विमान वेळेवर सुटले आहे की नाही, चौकशी करावी. तेव्हा तिथे गेलो.

मुलाचे तिकीट अर्थात पहिल्या वर्गाचे. रिझर्व्हेशन पक्के करण्याकरता, नंतर काही चौकशी करण्याकरता मी त्या कचेरीत दोनचार वेळा गेलो होतो. मी काउंटरवर जाताच तिथल्या पाक वा हिंदी चुटचुटीत मुलीने, "अरे, तुम्ही आज मुंबईला जाणार होतात ना?" म्हणून विचारले.

इथे शेकडो प्रवासी येतात-जातात. तरी ह्या मुलीने आपल्याला लक्षात ठेवावे ह्याच्याबद्दल मला स्वतःचे कौतुक वाटले. नुकतेच डॉक्टर केतकरांचे पुस्तक वाचले होते. त्यात त्यांनी "कोणत्याही स्त्रीच्या मागे लागायचा कोणाही पुरुषाला अधिकार आहे" असे म्हटल्याचे आठवले. त्या मुलीवर लाईन मारायचा विचार आला. पण त्याच केतकरांनी पुढे म्हटले होते की "त्या स्त्रीला ते आवडले नाही तर तिला त्या पुरुषाला जोडे मारायचा अधिकार आहे." तेही आठवले. आपल्याला वेळ तरी कुठे आहे, ह्या सबबीवर ती कल्पना सोडून दिली.

आज अमानुल्लाने अल्लाउद्दीन खिलजीबद्दलची एक दंतकथा सांगितली

अल्लाउद्दीन खिलजीला एकदा एक फकीर भेटतो व विचारतो, "तुला आपल्या सिंहासनाची

फार फिकीर वाटत असेल ना?" अशी फिकीर सगळ्याच राजकर्त्यांना असते. तशी ती खिलजीला पण वाटत असते. "हो, फार फिकीर असते." तो उत्तरला.

मग तो फकीर खिलजीला एक रुमाल देतो. तो रुमाल डोक्याला बांधला की तो माणूस अदृश्य होतो. त्याला सगळे बघता येते, ऐकू येते, पण तो मात्र कोणाला दिसत नाही. अर्थात अशी काही गोष्ट देताना असे फकीर व साधू लोक काही अटी घालतात. त्याप्रमाणे तो फकीर अट घालतो, की "लोक तुझ्याबद्दल जे काही बोलतील वा करतील ते फक्त ऐकायचं व बघायचं, त्याचा वचपा काढायचा नाही. फक्त त्याप्रमाणं आपली वर्तणूक सुधारायची. नाहीतर रुमालाचा गुण निघून जाईल."

त्याप्रमाणे खिलजी काही दिवस वागतो. पण नंतर पाहतो तो लोकच नाहीत, तर त्याचे सरदार, दरकदार अगदी घरातली माणसेही त्याच्याविरुद्ध काहीबाही बोलत असतात. त्याचे जवळचे नातेवाईक तर त्याच्या खुनाचे कट रचत असतात. हे बघून अल्लाउद्दीन संतापतो व त्या लोकांना फाशी देतो. त्याबरोबर त्या रुमालाचा दैवी गुण नाहीसा होतो.

काही दिवसांनी फकीर परत येतो व म्हणतो, "काही लोकांना फाशी देण्यानं का हा प्रश्न सुटणार आहे? रुमालामुळं तुला जे कळत होतं त्याचा फायदा करून घेण्याऐवजी तू गैरफायदा घेतलास. आता तुझं राज्य बुडणार." त्याप्रमाणे त्याचे राज्य काही दिवसांत बुडाले.

माझ्या मनात आले, की हा रुमाल म्हणजे गुप्तपोलीस खाते. राज्यकर्त्यांनी त्या खात्या-कडून कळणाऱ्या बातम्यांबरहुकूम स्वतःला सुधारायचे. लोकांना शिक्षा करायची नाही, उट्टे काढायचे नाही. लोक बोलतात ते खरे असेल वा खोटे असेल, पण त्या लोकांच्या खऱ्या भावना असतात.

पण राज्यकर्त्यांना हा पोच राहत नाही. इंदिराजींनी तरी काय, हेच केले. आणीबाणीच्या आधी व आणीबाणीत त्यांनी 'रुमाला'चा दुरुपयोग केला. परिणामी त्यांना राज्य गमवायला लागले.

ह्यावर चांगला फार्स वा लोकनाट्य लिहिता येईल नाही? अंतुले साहेबांसारखा एक राजा...त्याला एक फकीर रुमाल देतो...वगैरे...

आज एक जानेवारी म्हणजे ख्रिश्चन लोकांच्या नव्या वर्षाचा पहिला दिवस.

इथे तशी खूप ख्रिश्चन वस्ती आहे. काही इजिप्ती, काही पाक, पण बहुसंख्य भारतीय व तेही केरळातले. ख्रिश्चन स्त्रियाही पुष्कळ आहेत. बहुतेक जणी नर्सेस म्हणून वा घरांत आया म्हणून काम करणाऱ्या. गोव्याकडलेही बरेच ख्रिश्चन आहेत.

मुसलमानांना ख्रिश्चन लोक फारसे परके वाटत नाहीत. येशू हा महंमदाच्या आधीचा प्रेषित असे ते मानतात. त्यांचे एक मोठे गोल आकाराचे व घुमट असलेले चर्च इथल्या एका मोठ्या हमरस्त्यावर आहे. आमच्या कचेरीत जॉर्ज नावाचा इजिप्ती ख्रिश्चन सोडून दिला तर दुसरा कोणी ख्रिश्चन नाही. त्यामुळे त्यांच्या इथल्या समाजाची काही हालचाल कळायला मार्ग नाही.

एकदा मी व अनवर पाशा असेच बोलत बसलो होतो. विषय होता आपण परदेशाकडून, म्हणजे अमेरिका वा रशिया यांच्याकडून मदत घेतो त्याचा धार्मिक गोष्टींवर परिणाम होतो का? राजकीय व सामाजिक गोष्टींवर होतो हे त्यालाही मान्य होते; पण धार्मिक बाबींवरही

होतो हे त्याला मान्य नव्हते.

''साहाब, हम रिलिजन के बारेमें कुछ कॉम्प्रमाईज नही करेंगे!''

मोठ्या आवेशाने तो इंग्लिशमिश्र उर्दूत म्हणाला.

''पाशा, तुला हे माहीत आहे का?'' मी त्याला शांतपणे विचारले, ''की पाकिस्तानच्या लाहोर रेडियोवर दररोज सकाळी बायबलवर पाठ चालतो.''

हे ऐकताच तो चक्रावला.

''ऐसे होही नही सकता.''

तो जास्तच आवेशाने म्हणाला.

''ऐसेही होता है.''

मी तेवढ्याच ठामपणे म्हणालो. कारण मी काही सांगोवांगीची माहिती सांगत नव्हतो. मी कित्येक वेळा लाहोर स्टेशनवरचा तो कार्यक्रम ऐकला होता.

''ऐसेही होता है और हर सुभे सात बजे पंद्रह मिनट का प्रोग्राम चलता है. चाहे तो कलही सवेरे सून लो!''

मी इतक्या ठामपणे सांगतो आहे त्या अर्थी ते खरे असले पाहिजे असे त्याला वाटले.

''ऐसा होता होगा तो बडी बुरी बात है.'' तो थोडा खजील होत म्हणाला, ''हमें इस बारे में कुछ करना पडेगा.''

''तुम लोग कुछ नही कर सकोगे. आप क्या समजते है? के अमेरिकी इतने बेवकूफ है की बिना कुछ फायदेकेही आपको हवाई-जहाजों, पैसों और बंदूकोंकी मदत करेंगे?''

आता त्याचा सगळा होश गेला होता. पण त्यालाच व इतर पाकिस्तान्यांना का नावे ठेवा? आपल्याला रशियन लोक इतकी मदत करतात पण त्याचा ते काही फायदा घेत नाहीत अशी समजूत असणारे आपल्याकडे भोळसट लोक काय कमी आहेत? अगदी शेकड्यांनी आहेत व सगळ्या थरांवरचे आहेत.

ह्या जगात कुणी कुणाला फुकाची मदत करत नाही हे पाकिस्तान्यांना व आम्हांला कधी कळणार?

'बन्सी काहे को बजायी' परत परत वाचतो आहे. असे वाटते, की लेखिका हे जीवन स्वतःच जगली आहे. हेच चांगल्या कादंबरीचे गमक आहे का?

कोणा बाईच्या जीवनात कोणी बन्सी वाजवून जातो. तसे पुरुषाला प्रेमाचे मोरपीस सापडते. अचानक, अनपेक्षितपणे. नाजूक पण ठळक रंग असलेले. तो ते मोरपीस आपल्या जीवनपुस्तकात अलगदपणे ठेवून देतो.

जानकीचे पत्र नाही ते नाहीच. काबूलला असताना एकदा गप्पा मारत होतो. हिंदुस्थानात परत गेल्यावर ते इंदूरला जाणार होते. आम्ही दिल्ली, कलकत्ता, मुंबई ह्यांपैकी कुठल्यातरी गावी. म्हणजे इंदूरपासून दूर, काही योजने दूर.

''मैत्रीचं हे फार वाईट असतं.'' जानकी थोडी खिन्नतेने म्हणाली, ''आपण इतके दूर दूर राहणार. आपल्या गाठीभेटी पण होणार नाहीत. काही दिवसांनी आपण एकमेकांना पार

विसरून पण जाऊ. अगदी विसरण्याची इच्छा नसतानादेखील संबंध राहिला नाही, मैत्रीही फिक्कट होत जाते. जुन्या फोटोंसारखी!''

तिचे पत्र नाही म्हणजे ती मला विसरली की काय? आमची मैत्री फिक्कट झाली आहे, की तिला पत्र लिहायला जमत नाही?

नेहमीचे आयुष्य सुरू आहे. म्हणजे नेहमीप्रमाणे लिहीत आहे, ते छापून येत आहे. नेहमीप्रमाणे काही चांगले अमेरिकन व इंग्लिश सिनेमे पाहत आहे. नेहमीप्रमाणे काही वाह्यात इटालियन सिनेमे पाहत आहे. नेहमीप्रमाणे शेजारी दत्ताकडे शुक्रवारी हिंदी सिनेमे पाहत आहे. नेहमीप्रमाणे संध्याकाळी गच्चीवर तास दोन तास घालवत आहे. नेहमीप्रमाणे कचेरीत जात आहे. सगळे नेहमीप्रमाणे...

माळेत कसे एका सारखे एक मणी असतात! नाही रूपात फरक, नाही आकारात. तसे माझे आयुष्य चालले आहे. एवढा मला आर्किटेक्चरमधे रस व गोडी! इथे कितीतरी ब्रिटिश आर्किटेक्ट्सनी चांगल्या चांगल्या इमारती डिझाइन केलेल्या आहेत. आपल्या हिंदी आर्किटेक्टने डिझाइन केलेला सुलतानाचा राजवाडा आहे. पण त्या काही मुद्दाम जाऊन बघाव्याशासुद्धा वाटत नाहीत.

'माणूस'च्याच दिवाळी अंकात कोणा लेखिकेचा 'भिंत' का 'भिंती' नावाचा लेख आहे. दलितमंडळी ब्राह्मणांची आडनावे घेतात वगैरेबद्दल. ज्यांच्याशी लढा करायचा त्याच वर्गाची नावे घेण्याच्या वृत्तीवर थोडी टीका पण केली आहे. आपण इंग्रजांशी स्वातंत्र्यलढे दिले, त्या वेळी त्यांची नावे घेतली नव्हती वगैरे म्हटले आहे. सगळ्या लेखालाच थोडा 'सवर्ण' दृष्टिकोन आहे.

आपण इंग्रजांची नावे घेतली नाहीत ह्याचे साधे कारण म्हणजे त्यांची नावे ख्रिश्चन धर्माशी संबंधित होती म्हणून. पण आपण त्यांची भाषा, त्यांची राहण्याची पद्धत, त्यांचे कपडे घेतलेच नाही? आणि नुसते घेतले नाहीत तर त्याबद्दल अभिमान बाळगला.

त्याच्याही थोडे मागे गेले तर अफगाण व फार्सी पद्धतीने वडलांच्या नावाआधी 'बिन' असा प्रत्यय पुण्यातले सवर्ण ब्राह्मणही लावत होते हे विसरून कसे चालेल? जसे त्यांच्यात अहंमद बिन कासिम म्हणजे कासिमचा मुलगा अहंमद तसे गोपाळ बिन कृष्ण असे पेशवाईच्या उत्तरकाळात सर्रासपणे नाव लिहीत असत.

ही तर लहान लोकांची उदाहरणे झाली. प्रत्यक्ष शिवाजी महाराजांनी व शहाजी राजांनी मुसलमान पद्धतीची दाढी उगाचच का ठेवली होती?

राज्यकर्त्यांच्या व पुढारलेल्या समाजातल्या पद्धतींचे, नावांचे अनुकरण करण्याची माणसात वृत्तीच असते. त्यात एकाने दुसऱ्याला हिणवण्यासारखे काही नाही.

आज सकाळी सकाळी 'सोहार' नावाचे एक उत्तरेकडे गाव आहे तिथे गेलो होतो. मी, एडवर्ड कार व शिक्षणमंत्रालयातले दोन अधिकारी असे होतो.

सगळा बकाल व भयाण प्रदेश. औषधालाही झाडझुडूप नावाची गोष्ट नाही. उगाच नाही महंमद पैगंबराने आपला ध्वज हिरव्या रंगाचा ठेवला! ह्या वैराण प्रदेशात तो हिरवा रंग किती आल्हाददायक वाटला असेल नाही?

प्रदेश असा असला तरी उत्तम रस्ते, थंडगार गाड्या व खाण्यापिण्याची चांगली व्यवस्था यामुळे प्रवास खूप सुखकर झाला.

इथल्या सुलतानाच्या मनात सगळ्या मोठ्या गावांतून यूथ सेंटर्स स्थापन करायची आहेत. तिथे जिमखाना, बॅडमिन्टन कोर्ट्स, फूटबॉल व हॉकीचे मैदान असावे अशी त्याची कल्पना. ह्याचबरोबर बाहेरगावाहून आलेल्या खेळाडूंकरता, राहण्याची व जेवणाखाण्याची पण व्यवस्था असावी, असे एक सेंटर सोहार गावी करायचे आहे. त्या सेंटरकरता जागा निवडायला आम्ही गेलो होतो.

हा कार इतका दगड आहे, की मला हा आर्किटेक्ट म्हणून इंग्लंडात कसे काय काम करतो ह्याचे आश्चर्य वाटते. अगदी साध्या-साध्या गोष्टी त्याला कळत नाहीत. म्हणून जरा खोलात जाऊन त्याच्याकडेच त्याने इंग्लंडमधे केलेल्या कामाची चौकशी केली. तिथे तो एका आर्किटेक्टच्या ऑफिसात क्वांटिटीज काढण्याचे, म्हणजे एखाद्या इमारतीला किती विटा लागतील, सिमेंट किती लागेल वगैरे काढण्याचे काम करत होता. हे ऐकून मला हसूच आले. पण मोकळेपणी हसताही येईना. कारण तो आमचा साहेब पडला ना!

आज अमानुल्लाने गजनीच्या महंमदाची गोष्ट सांगितली:

ह्या महंमदाचा एक आवडता प्रधान होता. तो आवडता होता म्हणून बाकीचे त्याच्यावर जळत व महंमदाकडे "त्या प्रधानात खास असं काय आहे की जे आमच्यात नाही?" अशी कुरकुर करत. महंमद त्यांना म्हणायचा, की "तुम्हांला एक दिवस कळेल. थांबा थोडे."

एकदा महंमदाने त्या सगळ्यांना एका तळ्याच्या काठी नेले व एकेकाला सांगितले, की "तळ्यात बुडी मारून यायचं; पण कपडे ओले होऊ द्यायचे नाहीत." एक एक प्रधान तळ्यात बुडी मारत असे व अर्थातच ओला होऊन वर येत असे. वर आल्यावर महंमदाला म्हणे, "तुमचा हुकूमच मुळी चुकीचा आहे. पाण्यात गेल्यावर माणूस ओला होणारच."

शेवटी आवडत्या प्रधानाची पाळी आली. त्याने बुडी मारली व तोही ओला होऊन वर आला. पण वर आल्यावर तो म्हणाला, "माफ करा मला. तुमचा हुकूम चुकीचा नाही. मीच तुमचा हुकूम पाळायला नालायक ठरलो आहे. मला कामावरून काढून टाका."

हे त्याचे उत्तर ऐकताच बाकी प्रधानांच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. आपल्या पदरात मालकाच्याही चुका घेणारे नोकरच मालकाचे आवडते होतात, हे त्यांना स्पष्टपणे कळले.

पदकींकडे जेवायला गेलो असता खूप गप्पा झाल्या. प्रथम ते माझ्या मुलाला आणायला मी विमानतळावर गेलो होतो त्या वेळी भेटले होते. त्यानंतरही दोनचार वेळा भेटले होते; पण त्या वेळी गप्पा अशा झाल्या नव्हत्या.

ह्या कंपनीकडे बरीच मोठी मोठी कामे होती. शेकडो लोक तिथे कामाला होते. गवंडी व इतर कामगार बांधकामाच्या जागीच राहत पण वरच्या अधिकाऱ्यांकरता व सुपरवायझर्स

लोकांकरता बराकी होत्या. ह्यांच्या जेवणाखाण्याची व्यवस्था पण कंपनीच करत असे. पदकी 'साहेब' असल्यामुळे त्यांच्या खोलीवर त्यांना हवे ते जेवण पाठवले जाई.

आतापर्यंत इमारत-कामगारांबद्दल मला बरीच माहिती झाली होती. इथे येणाऱ्या भारतीय कामगारांना ओमानी चांगले वागवत नाहीत, चांगला पगार देत नाहीत, त्यांची राहण्याची चांगली व्यवस्था नसते वगैरे मला माहीत झाले होते. ह्याबाबत आपण आपल्या राजदूतांकडे काही तक्रार करायला पाहिजे म्हणून मी पदकींना सांगताच त्यांनी मला जे काही सांगितले ते ऐकून माझ्या छातीत धस्स झाले.

इथे सगळ्यांत कमी पगार आपल्या भारतीय कंपन्या देतात. त्यातला निम्मा भारतीय चलनात – भारतातल्या त्यांच्या घरातल्या लोकांना देतात. ह्यामुळे कंपनीचे परदेशीय चलन वाचते.

हिंदी कंपन्यांतून दिवसाचे जवळजवळ बारा ते चौदा तास काम करायला लागते. लंच-टाईम म्हणजे अक्षरशः जेवणाला वेळ लागेल तेवढा. विश्रांती वगैरे काही नाही.

फक्त जेवणघर पक्क्या विटांचे बांधलेले व थंड केलेले. पण राहायला चक्क तंबू. अगदी सकाळ होण्याच्या आधीपासून जे कामाला लागायचे ते अगदी रात्र पडेपर्यंत. मग हवी आहेत कशाला पक्की घरे आणि एयरकंडिशनर्स ? सुट्टीच्या दिवशी बहुधा काम असतेच. नसले तर तंबूत पडून राहायचे. उष्मा अगदी जीवघेणा असतो. तंबू तर काय अगदी आग-आग होतात!

बहुतेक शुक्रवारचेही इथे काम करायला लागते. अर्थात त्याबद्दल ज़ास्तीचे पैसे मिळतात. त्या आशेने लोक सुट्टीतही कामे करत राहतात. पण प्रकृती नावाची काही गोष्ट आहे, की नाही ? शरीराला विश्रांतीची गरज असते हा विचारच नाही.

ओमानी कंपन्यांची वागणूक, कामाच्या वेळा वगैरे अशाच असल्या तरी निदान त्या पगार तरी दुप्पट देतात व तोही रियालमधे.

आता जर अशी परिस्थिती होती तर ओमान्यांविरुद्ध आम्ही राजदूतांकडे तक्रार तरी काय करणार होतो ? आणि त्यांनी जर पुढे ओमानी सरकारकडे तक्रार केली असती तर ती कुणी ऐकून घेतली असती ?

'सूर' नावाच्या पार दक्षिणेत असलेल्या गावी मी, कार व अराफती नावाचा शिक्षण-मंत्रालयाचा अधिकारी असे गेलो. सूर गाव मसकतपासून तसे जवळ असले तरी सरळ रस्ता नाही. प्रथम बरेचसे पश्चिमेला जायला लागते. मग दक्षिणेला. त्यामुळे लांबचा फेरा पडतो व वेळही फार लागतो.

पण रस्ते छान असतात. मुलायम व मैलच्या मैल अगदी एकही खड्डा नसलेले. रस्त्यावर साईनबोर्ड्स असतात व मुख्य म्हणजे त्यांवर वा आजूबाजूच्या खडकांवर आचरटासारखे तांबी, तांबी लिहिलेले नसते. त्यामुळे बाहेर पाहवते. महाराष्ट्रातल्यासारखे होत नाही.

रस्ता चांगला, गाड्या भक्कम, आरामशीर व थंड केलेल्या त्यामुळे प्रवास सुखाचा होतो.

सूर हे समुद्रकिनाऱ्यावरचे गाव. त्यांतल्या त्यांत मोठे. इतिहासकालापासून प्रसिद्ध असलेल्या चाचे लोकांचे हे एक ठाणे. ह्या चाचे लोकांचे काय उद्योग चालत ते मागे सांगितलेच आहे.

सूरला काहीतरी बारा-साडेबारा वाजता पोहोचलो. कार साहेबाने साहेबी पद्धतीप्रमाणे पिण्याचे पाणी, फळे, सॅण्डविचेस वगैरे आणली होती. ओमानी अधिकारी 'गावात कोणी

नातेवाईक आजारी आहेत त्यांना भेटायला जायचेय' म्हणून, पण खरे म्हणजे जेवायला बाहेर पडला.

कारने मला त्याने आणलेले खाण्याचा आग्रह केला. पण "माझा उपास आहे" ह्या सबबीवर मी ते टाळले. जरा गाव बघून येतो म्हणून मी जेवायला बाहेर पडलो. कारने ' — बाहेर काही खाऊ नकोस — फार घाण जागा आहे ही' म्हणून परत परत सांगितले. आता त्याला काय माहीत, की हिंदुस्थानात अशीच घाण असते व अशा जागी खाण्यातच माझा जन्म गेला आहे म्हणून ?

कोणा एका हॉटेलात गेलो तर लोक मराठी बोलताना ऐकले म्हणून एका टेबलावर जाऊन बसलो. सगळे कोकणी मुसलमान. नाव सांगताच त्यांना कळले, की मी 'त्यांच्या'तला नाही आहे ते. पण त्याने त्यांच्या वागण्यात काही फरक पडला नाही.

मग हिंदुस्थानातल्याप्रमाणे कुठून आलात ? कशाकरता आलात ? परत कधी जाणार ? पगार किती आहे ? वगैरे चौकशा झाल्या. ह्या लोकांपेक्षा माझा पगार जवळजवळ आठदहा पटीने जास्त. पण त्या पगाराएवढा मी मोठा साहेब वाटत नाही. नाही गाडी, नाही काही. पायी पायी फिरणारा माणूस त्यांना मोठा साहेब कसा वाटावा ? म्हणून मी माझा पगारही खूप कमी सांगतो — म्हणजे त्यांच्यापेक्षा दुप्पट असा. त्याचा फायदा असा होतो, की आपसांतला दुरावा कमी होतो व लोक जास्त मोकळेपणी बोलतात.

इथल्या हिंदी व पाक लोकांचे आयुष्य पण मसकतमधल्या लोकांसारखे कष्टमय होते. बायका-मुलांपासून वर्षोन्‌वर्षे दूर राहायचे. हॉटेलमधे किंवा घरी हाताने करून जेवायचे व जनावरासारखे बाराबारा, चौदाचौदा तास काम करायचे. वर्षातून एकदा घरी जायचे — उंटासारखे सगळ्या वर्षाचे सुख खाऊन यायचे व ते बाकीचे अकरा महिने रवंथ करायचे.

पण पैसा चांगला मिळतो. चांगले कपडे करायला मिळतात. बहुतेकांकडे ट्रॅन्झिस्टर, कॅसेट-प्लेयर वगैरे आहेत. अजुनी टीव्ही आला नाही पण बऱ्याच जणांकडे व्हिडियो आहेत. हिंदुस्थानातले काही निर्माते तर आता फक्त व्हिडियोकरता सिनेमा काढतात. 'फुल खिले है गुलशन गुलशन'चा कार्यक्रम करणारी तबस्सुम खास हिंदी गाण्यांचे व विनोदी गोष्टींचे व्हिडियो काढते. ती इथे फार लोकप्रिय आहे.

मग त्यांच्याबरोबर कोकणी पद्धतीचे माशाचे कालवण व भात खाल्ला. चहा प्यालो व परत आलो.

नंतर कार, तो शिक्षणखात्याचा अधिकारी व मी असे यूथसेंटरची जागा पाहण्याकरता म्हणून बाहेर पडलो. गावात बहुतेक घरे नवीन आहेत. किंबहुना गावाचा नवीन भाग होता तिथेच आम्ही फिरत होतो. त्यामुळे खरे ओमानी खेडे पाहायला मिळाले नाही. मी इच्छा प्रकट केली पण कारला व त्या ओमानी अधिकाऱ्याला त्यात बिलकूल रस नव्हता.

जरा टेकडीवर असा एक जुना वाडा होता. तो इथल्या सुलतानाचा म्हणजे इथल्या जहागीरदाराचा राहता वाडा. तो आतूनच काय पण जवळूनसुद्धा पाहायला मिळणे शक्य नव्हते.

काम आटोपून मसकतला आलो तर रात्रीचे साडेदहा-अकरा वाजले होते.

आज आईचे पहिले वर्षश्राद्ध. गेल्या दहा फेब्रुवारीला ती गेली. त्या दिवशी मंगळवार होता.

आज पण मंगळवार. साधा योगायोग पण त्यावरून विचारचक्र सुरू झाले.

मी साधारण दररोज दोन पेग व्हिस्की म्हणा, रम म्हणा पितो. मनात विचार आला, की ह्या निमित्ताने दर मंगळवारी पिण्याचे बंद करावे.

आमची आई महिला दारूबंदी मंडळाची, महाराष्ट्राची अध्यक्ष होती व ऑल इंडिया बोर्डाची मेंबर. दारूबंदी-प्रकरणाची सगळेच टिंगल करतात. त्याप्रमाणे मी पण करत असे. पण तिचे उत्तर ठरलेले असे - "ही दारूबंदी तुमच्यासारख्या सुशिक्षितांकरता नाहीच आहे. ती गरीब कामगारांकरता आहे. त्यांचे संसार पाहिलेत तर तुमची दारू खाडकन उतरेल."

अर्थात माझी दारू खाडकनच काय पण साधीही उतरली नाही. पण निदान आठवड्यातून मंगळवारी तरी पिऊ नये असे ठरवले. पण असले ठराव मी आयुष्यात प्रथमच करतो आहे असे नाही. एकदोन आठवडे हे टिकतात. परत ये रे माझ्या मागल्या!

अचपळ मन माझें नावरे आवरीतां!

आम्ही जी ठिकठिकाणी यूथसेंटर्स करतो आहोत त्यांचे नकाशे बनवण्याचे काम इथल्या एका ब्रिटिश आर्किटेक्टच्या फर्मला दिले आहे. ही फर्म इथे दहाबारा वर्षे तरी काम करते आहे. त्यांना सरकारात फार वजन व प्रतिष्ठा आहे.

इथे ब्रिटिश आर्किटेक्ट्स म्हणा, इतर तंत्रज्ञ म्हणा, ह्या देशाला पिळून काढताहेत हे स्पष्ट दिसते. त्यांना इतरांच्या मानाने जबर फी दिली जाते. आता हे खरे, की ब्रिटिश आर्किटेक्ट्सची कामे पण फार छान असतात. अगदी बारीकसारीक गोष्टींकडे त्यांचे फार बारकाव्याने लक्ष असते.

मात्र ह्या यूथसेंटर्सकरता केलेली डिझाइन्स फार बेकार आहेत. तसे एकदोन वेळा कारने त्यांना सांगायचा प्रयत्न केला. पण त्या आर्किटेक्टने कारचे म्हणणे अगदी धुडकावून लावले.

"तुम्हांला ती बेकार वाटत असतील," तो आर्किटेक्ट ठोसपणे म्हणाला, "पण मला तसं वाटत नाही. मला ती योग्य वाटतात. दोन आर्किटेक्ट्सच्या मतांत फरक पडायचाच."

कार हा काही स्वतः चांगला आर्किटेक्ट नाही. त्यामुळे त्याला त्या डिझाइन्समधले दोषही दाखवता आले नाहीत. तेव्हा तो चूप बसला.

पण कार ज्या वेळी महिन्याच्या रजेवर गेला त्या वेळी त्या ब्रिटिश आर्किटेक्ट्सशी बोलणी करण्याचे काम माझ्याकडे आले. आता तर तो ब्रिटिश आर्किटेक्ट फारच अवघड स्थितीत सापडला. साहेबाने एका हिंदी माणसाशी बोलणी करायची? पण त्याला खात्री होती, की मला तो चुटकीसरशी बाजूला करू शकेल. त्याच गुर्मीत तो व त्याचा सहकारी माझ्याकडे आले.

"हे बघा, तुम्ही आर्किटेक्ट आहात," मी शांतपणे सुरुवात केली, "मी पण आर्किटेक्ट आहे – आणि चांगला आर्किटेक्ट आहे. तुमची-माझी मतं डिझाइनच्या बाबतीत जुळणार नाहीत हे खरं."

हे ऐकून तो आनंदला व म्हणाला, "आम्ही मिस्टर कारला हेच म्हणतो, पण तो ऐकतच नाही."

"पण जर काही ढोबळ चुका असतील तर त्या सांगायला काही हरकत आहे?" मी विचारले.

त्यांना वाटले असावे, की हा चुका काढून काढून काय काढणार? तेव्हा त्यांनी आनंदाने

त्याला संमती दिली.

त्यांनी त्या यूथसेंटरच्या तिरप्या छताला बाहेरून पांढरा रंग दिला होता. तो योग्य नाही असे मी म्हणताच तो म्हणाला,

''काय बोलतोहेस तू? अरे इथं पाऊस अगदी कमी पडतो, पांढऱ्या रंगाला काय हरकत आहे?''

''पण धूळ? धुळीचं काय?'' मी उलट विचारले.

सुदैवाने माझ्या खिडकीतून दिसणाऱ्या मशिदीच्या काही भागाचे छत असेच तिरपे होते. त्याला लाल रंग दिला होता. तरी त्याच्या छतावर चिक्कार धूळ साचली होती. ते मी त्याला दाखवताच तो विचारात पडला.

तो विचारात पडला ह्याचा अर्थ तो कच्चा झाला आहे हे मी ओळखले. मग काय? त्याला ढोबळ चुकाच नाही तर डिझाइन्समधल्या चुका पण मी सांगितल्या. त्या त्याने लिहून घेतल्या व ''त्यांवर विचार करतो'' म्हणाला. पण तेही मोठ्या कुर्‍यातच.

ही गोष्ट मी माझी फुशारकी म्हणून सांगितली नाही. खरी गोष्ट पुढेच आहे.

मुंबईच्या एका नावाजलेल्या पार्शी आर्किटेक्टची इथे फर्म आहे. त्यांच्याकडेही बरीच कामे आहेत. एक तर त्या फर्मला कमी फी मिळते; व त्यांनी बनवलेल्या डिझाइन्समधे हा कार व अली – आमचा ओमानी मुख्य – पाहिजे ते बदल करवून घेतात. आणि ते बिचारे आपल्या हातून काम जाईल ह्या भीतीनें म्हणाल ते बदल करून द्यायला तयार असतात.

राष्ट्राला प्रतिष्ठा व वजन नसले म्हणजे कसे होते ते अशा लहानसहान गोष्टींवरूनही कळतें.

पुलंच्या 'माझा हसवण्याचा धंदा' ह्याप्रमाणे 'माझा हसवण्याचा गुन्हा' असा कार्यक्रम करायला पाहिजे असे मनात आले.

जो मन रिझवतो, जीवनात थोडा का होईना आनंद निर्माण करतो तो कमी प्रतीचा मानला जातो. एक तर जो शिष्टासारखे भारूड लिहितो तो मान्यता पावतो, वा जो अद्वातद्वा लिहितो, उद्वेग आणणारे लिहितो त्याचे कौतुक होते. वगैरे विचार मनात येत होते. आता त्या विचारांत तथ्य किती व मनात आलेला कडवटपणा किती?

धोबी, वाणी, न्हावी वगैरे मंडळी माझी फार चटकन मित्रमंडळी होतात. एक तर माझा स्वभाव फार मोकळा. शिवाय त्यांच्या इथल्या कामाबद्दल, मनाला टोचणाऱ्या गोष्टींबाबत, भारतात असलेल्या कुटुंबीयांबद्दल मी त्यांच्याशी बोलतो. कधी सल्ले देतो. कधी मदत करतो.

आज केस कापायला म्हणून गेलो. ''चार दिवसांनी महाशिवरात्र आहे तर इथल्या देवळात जाणार का?'' म्हणून न्हाव्याने केस कापता कापता विचारले. खरे म्हणजे मी गेल्या कित्येक वर्षांत देवळात असा गेलो नव्हतो. गेलो होतो ते देवळांच्या इमारती व वास्तुशिल्प पाहण्याच्या दृष्टीने. पण इथे मुसलमान बहुसंख्य असलेल्या देशात आल्यावर मात्र आपण देवळात जायला पाहिजे ही भावना बळावली.

कचेरीत काम करता करता मनात विचार आला, की पाकिस्तानात देवळे असतीलच की!

आता त्यांची काय स्थिती असेल? अमानुल्ला समोरच बसला होता. लगेच त्याला विचारले. त्याने जे सांगितले ते ऐकून जीव नुसता गलबलला.

लाहोरला त्याच्या घराजवळ एक शिवालय आहे. खूप मोठ्ठे, अगदी दगडी बांधणीचे. विभाजनानंतर सगळे हिंदू तिथून निघून आल्यानंतर त्या देवळाची लुटालूट झाली. नंतर कित्येक महिने ते तसेच पडून होते. मग उनाड लोक तिथे पत्ते खेळू लागले. जुगार खेळू लागले. दारू पिणे सुरू झाले. पोलिसांनी धाडी घातल्यावर ते जुगाराचे व दारूचे अड्डे बंद झाले. मग लोक त्या जागेचा सार्वजनिक संडास म्हणून वापर करू लागले.

हे सांगताना अमानुल्लालाच स्वतः स्वतःची लाज वाटायला लागली. त्याच्या बोलण्यात चाचरेपणा आला. पण त्याचे ते चाचरे बोलणेही माझ्या हृदयात तापलेल्या सळईसारखे मन पोळत गेले.

अमानुल्ला पुढे सांगत होता : लालबहादुर शास्त्री पंतप्रधान झाल्यावर मात्र त्यांनी पाकिस्तान सरकारबरोबर बोलणी करून प्रत्येक मोठ्या देवळावर पोलीस बसवून स्वच्छता व सुव्यवस्था ठेवण्याची तजवीज केली. आता जे काही मूठभर हिंदू आहेत ते तिथे जातात. साफसफाई करतात. पूजाअर्चा करतात.

मनात विचार आला, की आपल्या धर्मात तसे बघितले तर देवळांना महत्त्व किती कमी आहे नाही? म्हणजे दररोजच्या जीवनात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला हिंदू धर्माकरता खरेच काही करायचे होते तर त्यांनी आपल्या शाखा देवळांतून भरवायला हव्या होत्या. म्हणजे ह्या पन्नास-साठ वर्षांत देऊळ-संस्कृती निर्माण झाली असती. देवळांबद्दल आत्मीयता निर्माण झाली असती व हिंदू धर्माबद्दल आस्था. पण देवळात शाखा भरवायला ब्राह्मण समाजाचाच प्रथम विरोध झाला असता. आणि संघाची सगळी भिस्त ब्राह्मण समाजावरच.

आता हे येणारे सगळे विचार म्हणजे मुसलमान मशिदीत व ख्रिश्चन लोक चर्चमधे जमतात त्याची फक्त प्रतिक्रिया होती? पण हिंदू धर्मीयांत जे संघटन होतेय तीसुद्धा तशी फक्त प्रतिक्रियाच आहे. आपणहून हिंदूंनी काही केले असते?

काही दिवसांपूर्वी अनवर पाशा बोलता बोलता थोडे अभिमानाने म्हणाला, "साहाब, दुनियामे सब मजहब चेंज हुवे है. इस्लाम नही हुवा!"

"काय बोलतो आहेस पाशा?" मी त्याला म्हटले, "जगात अशी एकही गोष्ट नाही, की जिच्यात काही बदल होत नाही. नाव होतं ते राहिलं म्हणून काही बदल झाला नाही असं कसं म्हणता येईल? आता तुझंच बघ. एक वर्षाचा होतास तेव्हाही अनवर पाशा होतास. दहाबारा वर्षांचा होतास त्या वेळीही अनवर पाशा होतास; आजही अनवर पाशाच आहेस. म्हणजे तुझ्यात काही फरक पडला नाही?"

"ती गोष्ट वेगळी व धर्माची – आमच्या इस्लाम धर्माची वेगळी" अनवर ठासून म्हणाला.

"तुमच्या धर्मात फरक पडला आहे, की नाही हे तू तुझ्या वडलांना किंवा म्हातारी माणसं असतील त्यांना विचार. ते सांगतील काय फरक पडला आहे तो."

अनवर पाशा थोडा विचारात पडला.

"बरं हे सांग, तुला मुसलमान असण्याचा फार अभिमान आहे?" मी विचारले.

"अर्थातच! आहे म्हणजे? आहेच." अनवर पाशाला माझ्या प्रश्नाचा अर्थच कळला नाही.

"नाही, पण तू मुसलमान का झालास?"

"माझे वडील मुसलमान होते म्हणून!"

"आणि ते हिंदू वा ख्रिश्चन असते तर?"

आता अनवर पाशाकडे ह्या प्रश्नाला उत्तर नव्हते. आपला प्रत्येकाचा धर्म हा योगायोगाने आलेला असतो. बाप हिंदू, मुसलमान वा ख्रिश्चन म्हणून मुलगा त्या धर्माचा! आणि ह्या योगायोगाने ठरलेल्या गोष्टीबद्दल काय अभिमान, दुराग्रह, हाणामाऱ्या व खून-खराबा. बरे, धर्माचा दररोजच्या जीवनावर काही परिणाम होतो म्हणावे तर तेही नाही. जितके टक्के चांगली वा वाईट माणसे हिंदू धर्मात असतात तितकेच टक्के ती मुसलमानांत वा ख्रिश्चन लोकांतही असतात. मग एखादा धर्म श्रेष्ठ वा कनिष्ठ कसा? तो मोठमोठे तत्त्वज्ञान सांगतो म्हणून?

असे व असले प्रश्न मनात आले होते तरी ठरवल्याप्रमाणे महाशिवरात्रीला जुन्या मसकत-मधल्या महादेवाच्या देवळात गेलो. शेकडो लोक आले होते. श्रीमंत व मोठे अधिकारी आपआपल्या गाड्यांतून, काही कामगार आपआपल्या कंपनीच्या ट्रक्समधून व काही बसने काही अंतरापर्यंत व पुढे चालत चालत.

मीही असाच त्या गर्दीत चालत होतो. त्यांतल्या कोणाचीही माझी ओळखदेख नव्हती तरी पण मला त्यांच्याबद्दल काहीतरी आपलेपणा वाटत होता. थोडे हृदय भरून आल्यासारखे झाले.

देऊळ तसे लहानसेच आहे. बाजूला चार उंच भिंती आणि आत खूप मोठी मोकळी जागा. बाजूला विहीर. प्रत्येकाने प्रथम विहिरीवर हातपाय धुवायचे. मग देवाला फुले वाहायची व पैसे ठेवायचे. प्रसाद घ्यायचा व थोडा वेळ थांबून चालू लागायचे. अगदी कळत नकळत आपण दुसऱ्या धर्मातल्या गोष्टी घेत असतो. आता ही हातपाय धुण्याची पद्धत खास मुसलमानी आहे. भारतात असे हातपाय धुवून मीही कधी देवळात गेलो नाही व कोणाला तसे करताना बघितलेही नाही. मुख्य म्हणजे आपल्या देवळांतून अशा विहिरी वा पाण्याची कुंडे क्वचितच असतात.

नेहमी होते त्याप्रमाणे देवळात आरती मोठ्या आवाजात चालली होती. पण घंटानाद मात्र नव्हता. आजूबाजूच्या मुस्लिम लोकांची डोकी उठतील म्हणून घंटानाद करू देत नसतील कदाचित.

माझे प्रसाद घेणे झाल्यावर तिथल्या पुजाऱ्याला भेटलो. हा मुंबईचा तीस-बत्तीस वर्षांचा गुजराथी तरुण. पुरोहित नावाचा. तसे हे देऊळ तीनशे-साडेतीनशे वर्षांपूर्वीचे जुने. आता तीस-चाळीस वर्षांपूर्वी परत नव्याने बांधले. इथली धनिक गुजराथी व्यापारी मंडळी फार भाविक आहेत. तेच ह्या देवळाचा व पुजाऱ्याचा खर्च भागवतात.

हिंदुत्वनिष्ठ म्हणवून घेणाऱ्यांपेक्षा ह्या महात्मा गांधींच्या गुजराथी लोकांनीच इथे हिंदू धर्म जागवला आहे म्हणायचा!

पुरोहित लेंगा, कुडता घातलेला. फारसा उंच नाही. थोडा सुकडाच असा होता. मी त्याला म्हटले की, "तुम्ही तर धोतर नेसायला पाहिजे."

"प्रथम आलो त्या वेळी नेसत होतो." तो म्हणाला. "धोतर नेसून बाहेर पण जायचो. पण

मग मुलं दगड वगैरे मारायला लागली. आता प्रत्येक वेळी कुठं भांडणार ? म्हणून मग लेंगा घालायला सुरुवात केली."

आता फेब्रुवारी महिना संपत आला. जुलैत आलेला मी. म्हणजे आता वर्ष संपायला पाच महिने राहिले. अमानुल्लाला आता माझ्याबद्दल आपुलकी निर्माण झाली आहे. त्यामुळे मी आणखी दोनतीन वर्षे तरी राहावे अशी त्याची इच्छा आहे.

जास्त पगार बऱ्याच वेळा सहकाऱ्यांत उगाचच वैर निर्माण करतो. मी बऱ्याच जणांच्या डोळ्यांत खुपू लागलो होतो. मला एक वर्षापेक्षा जास्त राहायला मिळाले नाही तर बरे, अशी बऱ्याच जणांची भावना. मी जाण्याने त्यांचा पगार काही वाढणार नव्हता. हे त्यांना पण माहीत आहे. तरी पण मी परत जावे अशी त्यांची उगाचच इच्छा.

अमानुल्लाचे म्हणणे, मी जास्त काम मागून घ्यावे म्हणजे पुढे राहण्याचे पक्के होईल. पण काम देणार एडवर्ड कार. स्वतः तोच मला त्याचा प्रतिस्पर्धी समजतो. उद्या त्याच्या जागेवर कोणाला नेमायचे ठरले तर मलाच नेमतील. तेव्हा मला जास्त काम देऊन तो आपल्या पायावर धोंडा थोडाच पाडून घेईल ? हिंदुस्थानातल्या सहकाऱ्यांतही चढाओढ असते पण आपली जागा कोणी घेईल अशी भीती कधीही नसते.

एडवर्ड कार हा शत्रू नंबर एक. तर नंबर दोनचा शत्रू म्हणजे शौखी हा इजिप्ती आर्किटेक्ट. तो कामात चांगला पण माथेफिरू व तडक डोक्याचा. स्वतःबद्दल अगोचर कल्पना असलेला. आधीच ह्या इजिप्ती लोकांना एक तऱ्हेचा अहंगंड असतो व इतर अरब लोकांशी तुलना करता तो योग्यही वाटतो. बाकी अरब लोक म्हणजे सुदानी, सौदी, ओमानी वगैरे इजिप्तींच्या मानाने फिके व मागासलेले.

एक दिवस ह्या शौखीने कहरच केला.

इथल्या शिक्षणमंत्रालयाने इस्लामिक आर्किटेक्चरवर नोट बनवायला आमच्या मंत्रालयाला सांगितले. त्या नोटेबरहुकूम निवडलेल्या आर्किटेक्टला फेलोशिप देऊन विलायतेला पाठवायचा सरकारचा विचार होता प्रत्येक सेक्शनमधला एक एक आर्किटेक्ट निवडला होता. आमच्या सेक्शनमधले काम ह्या शौखीकडे आले. हा विषय माझ्या आवडीचा. मी त्याच्यावर अभ्यास केलेला. पण मी काफीर असल्यामुळे मला ती फेलोशिप मिळणे शक्यच नव्हते. तेव्हा मी शौखीला मदत करायचे ठरवले.

मी त्याला सुचवले, की इस्लामिक आर्किटेक्चर चार किंवा पाच विभागांत आहे; जसे इजिप्ती, इराणी, हिंदी वगैरे. तेव्हा अरब राष्ट्रांतल्या इस्लामिक आर्किटेक्चरबद्दल त्याने लिहावे व मी इराणी, पाकिस्तानी, हिंदुस्थानी इस्लामी इमारतींबद्दल लिहीन.

हे मी म्हणताच तो भडकला. चिडून लालेलाल झाला व म्हणाला, "अरब राष्ट्रांत आहे तेच इस्लामी आर्किटेक्चर. बाकी कुठलंही नाही."

मी त्याला शांत करत म्हटले, "असं कसं होईल ? हिंदुस्थानातलं व पाकिस्तानातलं आर्किटेक्चर इस्लामी नाही का ? ते वेगळ्या तऱ्हेचं आहे हीच तर त्यातली मजा. धर्म एक असला तरी त्या त्या जागेचं हवामान, भूगोल, पूर्वीचे संस्कार, जुनी बांधण्याची पद्धत ह्यांचा इमारतींवर परिणाम होतो. त्यामुळे वेगवेगळ्या तऱ्हा म्हणजे स्टाइल्स निर्माण होतात. भारतात व पाकिस्तानात तसंच झालं आहे."

माझ्या मताला दुजोरा मिळावा म्हणून मी अनवर पाशा व अमानुल्लाकडे पाहिले. त्यांनी

माझ्या म्हणण्याला फक्त मूक संमती दिली. पण त्या इजिप्ती माणसाला खडसावून सांगण्याची हिंमत त्यांना झाली नाही.

शौर्खी हिंदुस्थान-उपखंडातल्या मुसलमानांनी बांधलेल्या इमारतींना मुळी इस्लामी मानायलाच तयार नव्हता. ह्या इस्लामी नाहीतच असे त्याचे म्हणणे. खरे म्हणजे ह्या दोन पाकिस्तान्यांनी त्यावर वाद घालायला पाहिजे होता. ते चूप होते. त्या इजिप्ती माणसांनी 'वर' काही सांगितले तर नसती पंचाईत व्हायची ह्या भीतीने. मी विचार केला, की ज्यांना ह्याच्याबद्दल काही वाटायला पाहिजे त्यांना काही वाटत नाही, तर मी तरी माझा जीव थोडा थोडा का करू?

तरी हा शौखी खूप बरा. हा फक्त इमारती इस्लामी नाहीत असे म्हणत होता. मला लंडनला एक तरुण इजिप्ती डॉक्टर भेटली होती. ती तर म्हणाली होती, की "तुमच्या देशातले काय आणि पाकिस्तानातले काय, मुसलमान खरे मुसलमान नाहीच आहेत; हिंदूच आहेत. लग्नकार्य हिंदू पद्धतीनं करतात. हिंदू पद्धतीनं मुलगे हुंडा घेतात."

मी तिला कळवळून म्हटले होते, "माझे आई, असं म्हणू नकोस. ह्या मुसलमानपणामुळेच तर आमच्या देशाचे तुकडे झाले. हजारो मारले गेले, लाख्खो बेघर झाले."

इस्लामिक आर्किटेक्चरवरचे वादळ शांत झाले. थोड्या वेळाने अमानुल्ला माझ्याजवळ आला. अर्थातच त्याचा चेहरा पडलेला होता. तो म्हणाला, "ह्या लोकांची पर्वा करू नका. सगळ्या बाबतींत ह्या लोकांची हीच वृत्ती असते. स्वतःला कोण समजतात, अल्ला जाने!"

ह्या इजिप्ती लोकांसमोर शेळी बनणारे लोक हिंदूंच्या संबंधात शेर बनतात.

इथल्या एका भारतीय कंत्राटदाराच्या कॅम्पमधली गोष्ट. तिथेच, मागे सांगितलेले पदकी व एक मराठी डॉक्टर वगैरे राहत असत.

त्यांचा जेवणाचा मोठा हॉल होता. चांगली दोनशे माणसे एका वेळी जेवू शकतील असा. तिथेच हे लोक गणपति-उत्सव साजरा करत. अशाच एका उत्सवात त्यांनी मुख्य दारावर गणपतीचे मोठे चित्र लावले व वर निऑन साईनमधे 'श्री गणपतये नमः' असा बोर्ड लावला.

आतापर्यंत ठीक चालले होते. त्याच हॉलमधे काही मुसलमान सुतार व ज्यूनियर इंजिनियर्स जेवत असत. ते कोकणी असल्यामुळे त्यांना गणपतीचे चित्र खुपले नाही. आणि खालच्या दर्जाचे ते कामगार होते म्हणून कदाचित ते काही बोलले नाहीत.

पण एक दिवस एक उत्तर प्रदेशीय मुसलमान सीनियर इंजिनियरच्या जागेवर नेमला गेला. तो आला व "ह्या हॉलवरचं गणपतीचं चित्र व ती निऑन साईन काढल्याशिवाय मी हॉलमधे प्रवेश करणार नाही. हे ताबडतोब काढून टाका, नाहीतर मी ओमानी सरकारकडे तक्रार करतो!" म्हणून त्याने बराच हंगामा माजवला.

कंत्राटदार मुंबईचा पार्शी. त्याला कळेना काय करावे ते. बहुसंख्य कामगार हिंदू व त्यातून मराठी. गणपती त्यांचे श्रद्धेचे आणि मानाचे स्थान. त्यांना दुखवणे योग्य नाही हे त्याला कळत होते. पण ह्या मुस्लिम देशात त्याला आपला धंदा करायचा होता. त्या मुस्लिम इंजिनियरने खरेच जर ते प्रकरण ओमान सरकारकडे नेले असते तर कदाचित त्याला गंभीर वळण लागले असते.

शेवटी जे नेहमी होते तेच झाले. म्हणजे ते गणपतीचे चित्र व ती निऑन साईन काढली

गेली. ती तिथे असलेल्या मराठी डॉक्टरांनी आपल्या घरावर लावली व ते प्रकरण मिटले.

आपल्या देशातल्या मुस्लिम बांधवांना ह्या अरबी देशांतून फिरवून आणले पाहिजे. म्हणजे ह्यांना मुस्लिम जगात त्यांची काय किंमत आहे हे कळेल. आणि पॅन-इस्लामिझम, मुस्लिम-ब्रदरहूड वगैरे कल्पना वल्गनाच आहेत, हेही त्यांच्या लक्षात येईल. पाकिस्तान हे समस्त मुस्लिम राष्ट्रांचे पुढारी होईल ही झुल्फीकर भुत्तोची कल्पना व त्याच्याकरता केलेली खटपट त्यामुळेच वाया गेली.

अर्थात ह्या प्रश्नाला दुसरी बाजू आहे. काही दिवसांनी त्या मुस्लिम इंजिनियरशी ओळख झाल्यावर मी त्याच्याकडे हा विषय काढला. तो मला म्हणाला, "सगळे मला शिव्या घालतात पण प्रत्यक्षपणे माझ्याशी बोलणारा व मला विचारणारा तूच निघालास. तुमच्या धर्माविषयी व देवांविषयी मला पण आदर आहे; पण तुम्ही त्यांची चित्रं, त्यांच्या मूर्ती सार्वजनिक ठिकाणी का लावता ? त्यांची पूजा जिथं मुसलमान, ख्रिश्चन वगैरे लोक पण येणार आहेत तिथं का करता ? तुम्ही तुमच्या घरात काय पूजा करायची असेल ती करा. पण सार्वजनिक ठिकाणी ?"

इथे एक वर्षापेक्षा जास्त राहायला मिळेल की नाही हा विचार आला की मी अगदी अस्वस्थ होऊन जातो. तसे मी स्वतःच एक वर्षापेक्षा जास्त राहायचे नाही असे ठरवले होते. मनासारखे काम नाही, एकटे राहायचे, चांगल्या विचारांची सोबत नाही. जीव हिंदुस्थानात अडकलेला. तेव्हा इथे राहून काय करू ? हा विचार मनात येई व काही झाले तरी वर्षानंतर परत जायचे असे मी मनाशी म्हणत राही.

पण मन आणखीही बऱ्याच गोष्टी म्हणत होते.

इथे पैसा चांगला मिळतो. दोनतीन वर्षे राहिलो तर मुंबईला चांगल्या भागात फ्लॅट घेता येईल, गाडी ठेवता येईल असाही विचार येतो. थोडक्यात म्हणजे पैशाची लालच काही सुटली नव्हती.

दुसरा भाग असा, की एक वर्षापेक्षा इथे जास्त राहायला न मिळणे ही अपमानास्पद गोष्ट वाटते आहे. आतापर्यंत जिथे जिथे गेलो तिथे तिथे तडक डोक्याचा, भांडखोर म्हणून प्रसिद्धी मिळवली असली तरी त्याचबरोबर चांगला कामाचा व विश्वासू माणूस म्हणूनही मी नाव कमावले होते. त्यामुळे जिथे गेलो तिथे हवाहवासा झालो होतो.

पण इथे गुण दाखवायला संधीच मिळत नव्हती. हिंदी वा पाक लोकांचा मुळात सल्ला घ्यायचाच नाही ही ओमानी अधिकाऱ्यांची वृत्ती. खरे म्हणजे सल्ला देण्याच्या हुद्यावर ह्या देशांची माणसे नसतातच. सगळे आपले मदतनीस. सल्लागार असतात ते सगळे ब्रिटिश, इजिप्ती किंवा सुदानी.

त्यामुळे मला माझ्या कल्पना कारला सांगायला लागत. आजकाल तोही मला काही रिपोर्ट बनवायचा असला किंवा काही नोट बनवायची असली, की सल्ला विचारत असे. म्हणजे मी नोट वा रिपोर्ट लिहूनच देत असे. मग कार ते रिपोर्ट वरच्या अधिकाऱ्यांकडे घेऊन जात असे. त्यामुळे व्हायचे काय, की त्या सगळ्या कामाचे श्रेय अर्थातच कारला मिळत असे, मला नाही. त्यामुळे माझी गोची झाली होती.

पण निदान मी कारला तरी जिंकले होते.

आज हिंदुस्थानातून दत्ताला आलेल्या पत्रामुळे एक वेगळ्या तऱ्हेचा गोंधळ उडाला.

अनवर पाशाला पोस्टाची तिकिटे जमवायचा छंद आहे. त्यामुळे आम्ही सगळे त्याला रिकामे लिफाफे देत असतो.

आज दत्ताने त्याला एक लिफाफा दिला त्यावर एक मूल आपल्या आईचे स्तनपान करते आहे असे तिकीट होते. आईचे दूध डब्यातल्या दुधापेक्षा चांगले असे सांगणारी मधे जी मोहीम निघाली होती त्याला अनुसरून ते चित्र होते.

त्या चित्रात त्या बाईचे स्तन फार प्रशस्तपणे दाखवलेले होते. आपल्याकडल्या बायका दूध पाजताना आपले स्तन दिसू न देण्याची काळजी घेतात. ह्या बाईला तशी काही काळजी दिसत नव्हती.

आधीच पाशा स्वभावाने खडूस. त्यात हिंदुस्थानातून आलेले असे तिकीट बघितल्यावर मग काय विचारता? त्याने दत्ताला ह्यावरून छेडले. दत्ता एकदम तडकला. अद्वातद्वा बोलू लागला. मग पाशाला काय? त्याला आणखीनच मौज.

मग ते दोघे माझ्याकडे आले. माझ्या हातात ते पाकीट देत अनवर म्हणाला, "देखो भाईसाहाब; सरकारी स्टॅम्पवर किती घाणेरडी-घाणेरडी चित्रं छापतात." मी तसली तिकिटे पूर्वी पाहिली होती पण आताचे परत काळजीपूर्वक पाहिले. ते चित्र थोडे अगोचरच होते ह्यात शंका नाही. एवढे भक्कम स्तन दाखवायची काही गरज नव्हती.

पण आपल्या देशाचे तिकीट होते ते. त्याची भलावण करणे मला भागच होते. मी म्हटले, "ये तो ठीकही है. माँ अपने बच्चेको दूध पिला रही है."

"सो तो ठीक है, पर इतना नंगा बतानेकी क्या जरूरत थी?" पाशाला फक्त आम्हांला चिडवण्यात रस होता. तेव्हा पहिली गोष्ट म्हणजे न चिडणे ही होती.

"भाई, ये देखो," मी शांतपणे म्हटले, "ही गोष्ट तुझ्या समजुतीच्या पलिकडली आहे. स्त्रियानाच मुळी तुम्ही घाणेरड्या नजरेनं पाहता. मग तिनं कपडे घातलेले असोत वा ती उघडी असो. हे तर तुम्हांला कशी शिकवण मिळते त्यावर अवलंबून असतं."

अनवर थोडा चूप झाला. तेवढ्यात अल्ली आला व ते दोघे आपल्या जागेवर जाऊन बसले.

आजच्या आलेल्या पत्रांत जानकीचे पत्र होते. पाकिटावर पत्ता जानकीच्या नवऱ्याने लिहिला होता व पाकीट चांगले जाडजूड होते. म्हटले, ह्याने नोकरीकरता अर्ज व सर्टिफिकेट्स पाठवली असणार. म्हणून पाकीट उघडण्याची फारशी उत्सुकता वाटली नाही. पण उघडल्याशिवाय राहवेना. म्हटले, निदान जानकीची काहीतरी खबर तर कळेल.

पाकीट फोडले तर आत जानकीचे पत्र! काटेरी फणस कापावा व त्यात गोड गराचे कापे निघावेत तसे झाले. नकळत असणारी गोडी व कुरकुरीत, तसे जानकीचे पत्र होते.

पांढऱ्या रंगाच्या लेटरपॅडच्या पातळ कागदाचे चार पानी पत्र होते. प्रथम कितीतरी वेळ ते वाचलेच नाही. म्हटले, की वाचायला सुरुवात केली, की ते संपून जाईल. तेव्हा सुरुवातच लांबवावी म्हणजे शेवट पण लांबेल.

विचार करू लागलो. काय लिहिले असेल जानकीने? व कसे लिहिले असेल? पत्र लिहिताना फार उत्सुकता दाखवता आली नसेल. उलट, नवरा आग्रह करतो आहे म्हणूनच लिहिते आहे असे तिला दाखवायला लागले असेल. भावना तर व्यक्त करायच्या पण त्या फार सलगीच्या आहेत असे तर नवऱ्याला वाटता कामा नये. अशा तऱ्हेने लिहिणे किती अवघड.

नंतर पत्र फक्त उघडले. जानकीचे सर्व शिक्षण कॉन्व्हेन्टमधे झालेले, त्यामुळे लिहिण्याची

हातोटी कॉन्व्हेटमधली मुले-मुली लिहितात तशी. गोल गोल लपेटी वळणाची. पांढऱ्या शुभ्र पातळ कागदावर निळ्या शाईने लिहिलेले.

पत्राची सुरुवात अर्थातच फक्त 'डियर' ह्या मायन्याने केली होती. खरेच, एकाच शब्दातून वेगवेगळे अर्थ काढण्याचे कसब फक्त ह्या साहेबांच्या भाषेतच आहे. डियर म्हणजे प्रिय, प्राणप्रिय, अतिप्रिय, सर्वांत प्रिय – काय तुम्हांला वाटेल तो अर्थ त्यातून काढा.

"मी इतके दिवस तुला पत्र का लिहिलं नाही हे वेगळं सांगायला का पाहिजे ??" जानकीने प्रश्नार्थक वाक्याने सुरुवात केली होती व त्या प्रश्नार्थक वाक्याला दोन प्रश्नचिन्हे दिली होती. एक प्रश्नचिन्ह बाकी कोणी वाचेल त्याच्याकरता व एक फक्त मला कळावे असे. पुढे स्वतः त्या प्रश्नाचे उत्तर दिले होते. "तू ह्यांच्या नोकरीकरता खटपट करत आहेस. मी ह्याआधी पत्र लिहिलं असतं तर मी त्या मतलबाकरता लिहिलं आहे, असं तुला वाटलं असतं.

"काबूलला आपण हिंडलो-फिरलो, एकत्र जेवलो-खाल्लो. तो सगळा आजकालच्या समाजाच्या पद्धतीचा एक भाग आहे असं त्या वेळी वाटत होतं. परत हिंदुस्थानात गेल्यावर ह्या सगळ्याला काही अर्थ राहणार नाही असं मनात यायचं. पण आम्हांला तुझ्यात खरा मित्र गवसला आहे हे आत्ता कळलं...आपली मैत्री म्हणजे एक स्वप्न आहे स्वप्न...तुझ्या आपलेपणाच्या भावनांना मी आपलेपणानंच प्रतिसाद देईन. त्यात मी कधीही कमी पडणार नाही ह्याची खात्री बाळग."

त्या सगळ्या पत्राचे भाषांतर करण्याची गरज नाही. प्रेमपत्राचे कसले आले आहे भाषांतर आणि रूपांतर ? त्याचा फक्त वास घ्यायचा. आणि फुलाचा वास घ्यायला त्याचे काय अत्तरच काढायला लागते ? त्याचा सुवास आपोआपच येतो.

पत्राच्या शेवटी 'जरूर पत्र पाठव' वगैरे काही नव्हते. "तुझी पत्रं म्हणजे मोठी दिलासा देणारी असतात" एवढेच होते.

वाचून झाल्यावर काबूलची तीन वर्षे व दिल्ली-इंदूरला झालेल्या भेटी काही क्षणांत डोळ्यांसमोरून येऊन गेल्या. आमच्या मैत्रीला काय अर्थ होता ? अशा संबंधांचा शेवट काय होणार होता ? मी आता पन्नास-बावन्न वर्षांचा, सर्वसामान्य माणूस. जानकी अशी संसारी, दोन मुलांची आई. आमची मैत्री म्हणा, प्रेम म्हणा, सगळेच अवघड व अनाडी.

फार पूर्वी मी रिचर्ड बर्टन व लिझ टेलरचा 'सॅण्ड-पायपर' नावाचा सिनेमा पाहिला होता. बर्टनचे लग्न झालेले असते. तो एका कॉन्व्हेन्टमधे शिक्षक असतो. लिझ आपल्या दहा वर्षांच्या मुलाबरोबर एकटी राहत असते.

त्या मुलाबद्दल काही सांगण्याकरता म्हणून बर्टन लिझ टेलरच्या घरी जातो व तिच्या प्रेमात पडतो. एवढेच नव्हे तर त्यांचा घनिष्ट संबंधही येतो.

हे सगळे आपण बायकोला सांगितले आहे असे बर्टनने टेलरला सांगताच ती भडकते. "आपल्या पवित्र प्रेमाबद्दल बायकोला सांगायची गरजच काय होती ?" म्हणून त्याच्यावर डाफरते.

आपण एका लग्न झालेल्या पुरुषावर प्रेम करतो आहोत. ते योग्य नाही हे कळत असूनही ती आपल्या प्रेमाला पवित्र मानते व त्या पवित्र प्रेमाची त्याने बायकोजवळ वाच्यता केली म्हणून बर्टनवरच भडकते.

हा सगळा घोळच विचित्र आहे. प्रेमात पवित्र काय अन् अपवित्र काय ? बायको, प्रेयसी व आपण असा नेहमी म्हणतात तसा हा काही त्रिकोण नाही आहे. ती कोणताही आकार,

रूप, रंग, नियम नसलेली आकृती आहे. तीन व्यक्ती असतात म्हणून तो त्रिकोण वाटतो एवढेच. पण त्याला भूमितीचेच काय पण कोणत्याही शास्त्राचे नियम लागू नाहीत. कोणतेही नियम नसलेले ते एक शास्त्र आहे.

जानकीच्या पत्राला उत्तर लिहायचे आहे पण काय लिहावे तेच कळत नाही. जे काही लिहायचे होते ते तिनेच लिहून टाकले आहे.

अनवर पाशाचे असे मत आहे, की अमानुल्लाची व माझी मैत्री दारूमुळे जमली व पक्की झाली आहे. खरे म्हणजे मी फक्त अमानुल्लाला एकदाच त्या सदाकत अलीबरोबर दारू प्यायला बोलावले होते. दारूच्या बाटल्या तर मी त्याला कधीच दिल्या नाहीत किंवा इतरही देवाणघेवाण कधी केली नाही.

पण पाशाला तसे वाटणे साहजिकच आहे. मैत्री, गप्पागोष्टी, एकमेकांच्या घरी जाणेयेणे ह्या गोष्टी काहीतरी समान गुण वा स्वार्थ असल्याशिवाय होत नाहीत. अमानुल्लात व माझ्यात तसे काहीही समान गुण नाहीत. धर्म वेगळा, प्रांत व देश वेगळा, भाषा वेगळी, वय वेगळे, कामाचे क्षेत्र वेगळे. मग आमची मैत्री समान व्यसनावर आधारित असणार असा अनवर पाशाने अंदाज केला तर त्यात त्याची काय चूक?

मैत्री जमायला मने मिळावी लागतात. त्यात समानता यायला लागते हे पाशालाच काय पण कित्येकांना कळत नाही.

बायकोची पत्रे नेहमीप्रमाणे दहाबारा दिवसांनी येतात. मधे तिने तीनचार लेखांची कात्रणे पाठवली. मग तेच लेख परत परत वाचत होतो. स्वतःवर खूष होत होतो. आपल्या मुलांना परीक्षेत चांगले गुण पडले किंवा त्यांचा कशात तरी पहिला नंबर आला की कसे आपल्याला बरे वाटते? तसचे काहीतरी.

अमानुल्ला उद्या लाहोरला चालला आहे. बायको-मुलांना सहाआठ महिन्यांनी भेटायला मिळणार म्हणून खूप खूष आहेत मियाँसाहेब. आज तो स्वतः तर काम करणारच नाही, पण मलाही करू देणार नाही आहे. आज जर मी काम केले तर त्याचा-माझा मोठा झगडा होईल असा त्याने मला सज्जड दम देऊन ठेवला आहे.

त्याने आज आणखी एक गोष्ट सांगितली:

जुन्या काळची गोष्ट. एक पीर म्हणजे म्हातारा फकीर स्वतःलाच अल्लाचा अवतार समजू लागला आहे असे लोकांना वाटते. स्वतःला अवतार समजण्याइतका मोठा दुसरा कोणताही गुन्हा इस्लाममधे नाही.

त्यामुळे लोक चिडून गेले. त्यांनी त्या पिराला चौकातल्या खांबाला बांधून घातले व त्याला जाणारायेणारा दगडं, धोंडे मारू लागला. पण पिराला ना काही जखमा, नाही काही वेदना.

मग त्याचा एक पक्का दोस्त आला. त्याला माहीत होते, की ह्या पिराच्या मनात अवतार वगैरे काही कल्पना नाही आहेत. पण आता त्याला दगड मारले नाहीत तर लोक चवताळतील व आपल्यालाच खांबाला बांधून दगडांनी ठेचून काढतील. बरे, तसे मारावे तर हा त्याचा निष्पाप मित्र.

आता काय करावे? एका बाजूला मित्रप्रेम, तर दुसऱ्या बाजूला लोकांच्या धर्मभावना.

मग त्या मित्राने काय केले, की काही फुले घेतली व ती पिराला फेकून मारली. झाले, ती फुले पिराला लागताच त्याला जखम झाली. रक्त वाहू लागले. तो पीर दुःखाने विव्हळू लागला!

तात्पर्य: प्रेमिकांनी मारलेली फुलेसुद्धा दगडांपेक्षा कठोर असतात.

इथला सुलतान शिक्षणक्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती व्हावी म्हणून खटपट करतो आहे, नव्या शाळांच्या इमारती बांधतो आहे, इथे युनिव्हर्सिटी स्थापतो आहे वगैरे मागे सांगितलेच आहे. ह्या सगळ्या पेरणीचे पीक आणखी दहापंधरा वर्षांनी मिळेल. नंतरची ओमानी पिढी पुष्कळ सुधारलेल्या विचाराची होईल, असे मला वाटते.

त्याचे प्रत्यंतर मला आज ब्रिटिश कौन्सिलमधे गेलो त्या वेळी पाहायला मिळाले. एक ओमानी तरुण आपल्या बायकोला इंग्लिश शिक्षणाच्या वर्गात घालण्याकरता म्हणून घेऊन आला होता. बायकोचा बुरखा वगैरे तर नव्हताच, पण त्या तरुणाने आपल्या लहान मुलाला आपल्या कडेवर घेतले होते! असे दृश्य अगदी तीसएक वर्षांपूर्वी आपल्याकडेसुद्धा पाहायला मिळाले नसते! कडेवर मुलाला घेऊन बायकोला इंग्लिश क्लासमधे घालण्याकरता कोणी ओमानी?

सगळ्या तऱ्हेच्या मागासपणावर शिक्षण हाच एक तोडगा आहे हेच खरे.

जेम्स हॅलिडे नावाच्या इंग्लिश आय० सी० एस० लेखकाचे 'ए स्पेशल इंडिया' नावाचे पुस्तक ब्रिटिश लायब्ररीतून आणले.

हॅलिडे साहेबाच्या हिंदुस्थानवरच्या ह्या पुस्तकात गांधींच्या सत्याग्रह व इतर चळवळींमुळे हिंदुस्थानचा फायदा न होता उलट नुकसानच झाले आहे, असे मत मोठ्या हिरीरीने मांडले आहे. मला हे वाचून खूप मजा वाटली. हिंदी कम्युनिस्टसुद्धा ह्याच निर्णयाला आले होते. महात्माजींच्या चळवळीबद्दल त्या पक्षाची अशीच मते होती. अर्थात अगदी वेगळ्या कारणां-करता. म्हणजे आय० सी० एस० अधिकारी व कम्युनिस्ट वेगवेगळ्या वाटांनी का होईना पण एकाच गावाला पोहोचले होते म्हणायचे!

आज एक सत्तर-पंचाहत्तर वर्षांचा जख्ख म्हातारा ओमानी अनवर पाशाकडे आला होता. त्याने तीनचार महिन्यांपूर्वी हिंदुस्थानातल्या एका सोळासतरा वर्षांच्या मुसलमान मुलीशी निका लावला होता. ती अजून हिंदुस्थानातच होती. तिच्या पासपोर्टसंबंधी आणि इथे येण्याबाबत उर्दूमधे पत्रे लिहायची होती.

तो ओमानी म्हातारा होताच, वर एका पायाने अधू होता. त्याला नीट दिसत नव्हते आणि तो कुठेतरी चौकीदार होता. आणि ह्या पठ्ठ्याने तसे लग्न केले होते. आम्ही सगळेच त्या म्हाताऱ्याला येताना-जाताना पाहत होतो. पण त्याचे कोणाला काहीही वाटत नव्हते.

हे सगळे बघून मी मात्र फार अस्वस्थ झालो. हिंदुस्थानात अशी लग्ने कशी होतात, कुठे होतात हे सगळे मी वाचले होते. म्हटले, पाकिस्तानात काय होते? मग अमानुल्लाशी व अनवर पाशाशी बोललो.

इस्लाम धर्मात अशा लग्नाला परवानगी असल्यामुळे पाकिस्तानात त्याला बंदी घालता येत नाही. पण तिथला समाज ह्या बाबतीत फार जागरूक आहे; जो कोणी आपल्या मुलीचे असे

लग्न करतो त्याच्यावर बहिष्कार टाकतात. त्यामुळे पाकिस्तानात अशी लग्ने होत नाहीत असे त्या दोघांचे म्हणणे. मला हे बहिष्कार टाकणे वगैरे खरे वाटत नाही. गल्फ देशांतून पाकिस्तान्यांना मोठ्या प्रमाणात नोकऱ्या मिळतात, त्यामुळे त्यांच्याकडे फार मोठ्या प्रमाणात पैसा येतो. त्यांना अशी लग्ने करून पैसे मिळवायची गरज पडत नाही. हे खरे कारण असावे.

"पण ह्या हिंदुस्थानातल्या गरीब मुस्लिम मुलींबाबत तुम्हांला काही वाटत नाही?" मी त्या दोघांना विचारले.

बाकी सगळ्या गोष्टींबाबत त्यांचे मतभेद असले तरी ह्याबाबत उत्तर एकच होते : "त्या तुमच्या हिंदुस्थानातल्या आहेत. त्यांचं त्यांच्या लोकांनी पाहून घ्यावं. पाकिस्तानातल्या मुली असं कधीही करणार नाहीत!" हा वर अभिमान!

असे विचार जर पाकिस्तान्यांचे, तर इजिप्ती, सुदानी लोकांशी ह्या विषयावर बोलण्यात अर्थच नव्हता.

मग आमची कार्डे पंच करणाऱ्या कोकणी मुस्लिम माणसाला त्याबाबत विचारले. त्याचे उत्तर साधे व सरळ होते : "साहेब, त्या मुली हैद्राबादकडल्या किंवा कर्नाटकातल्या. आपले मराठी मुसलमान असं आपल्या मुलींना कधीही विकणार नाहीत." त्याच्याही बोलण्यात अभिमान होता.

माणूस आपले समाधान वा सांत्वन कसे करून घेतो पाहा! आम्ही म्हणतो, त्या मुली आमच्या धर्माच्या नाहीत. पाकिस्तानी म्हणतात, त्या आमच्या देशातल्या नाहीत. आणि हा मराठी मुसलमान म्हणतो, त्या आमच्या प्रांताच्या नाहीत! म्हणजे 'कोणी मुली विकल्या जाताहेत' ह्याचे कोणाला काही सोयर-सुतक नाही!

पण हे काय फक्त आजकालच घडते आहे? पूर्वी हिंदुस्थानात पैसा होता, वैभव होते त्या वेळी इजिप्ती, इराणी मुली हिंदुस्थानात विकल्या जायच्या; तेलाचा का असेना, आता इथे पैसा आहे. आता हिंदी मुली इथे विकल्या जात आहेत.

म्हणजे कोणत्याही काळात मुली ह्या 'विकण्याच्या वस्तू'च राहिल्या आहेत.

परवा लिफ्टमधे एक ओमानी कारकून भेटला. तो अगदी मुंबईचे खास हिंदी बोलत होता. म्हटले, हे कसे? तर त्याचे चक्क दोन संसार आहेत. एक मस्कतला व एक आपल्या माहीमला. दोन्ही ठिकाणी बायका-मुले आहेत. इथे सरकारी नोकरी तर माहीमला दुकान. त्याच्याकडे ओमानी आणि हिंदी दोन्ही पासपोर्ट आहेत. इथे असे डबल पासपोर्टवाले रग्गड लोक आहेत. मुसलमान व हिंदूही.

आब्बास जाफरने, म्हणजे आमच्या डायरेक्टर जनरलने आज आमच्या विभागात चक्कर टाकली.

तो माझ्याही टेबलाशी आला. माझ्या कामाबद्दल बोलला. "पुढल्या वर्षी बरीच महत्त्वाची कामं येणार आहेत. तुझ्याकडं एकदोन महत्त्वाची कामं द्यायचा विचार आहे."

ह्यामुळे इजिप्ती आर्किटेक्ट शौखी फार अस्वस्थ झाला. आपण इथे असताना दुसऱ्या कुणाला काम दिले जातेय हे त्याला सहन होत नसे. सगळे काम आपल्यालाच द्यावे, किंबहुना फक्त आपणच काम करायला लायक आहोत ही त्याची भावना. तो माझा उगाचच शत्रू झाला

होता. अरब असल्यामुळे तो ह्या लोकांशी त्यांच्या भाषेत मोकळेपणी बोलू शकतो. कारला अरेबिक पत्रांचे भाषांतर करून सांगायचे हेही त्याचे काम आहे. त्यामुळे त्याचा उपयोग जास्त आहे.

त्या म्हाताऱ्या ओमानीवर एक लेख लिहून मोकळा झालो.

बायकोने तिचे नवे पुस्तक पाठवले आहे. पुस्तक चांगलेच उतरले आहे. त्यातले सगळे प्रसंग मला माहीत आहेत. त्यामुळे काही ठिकाणी थोडे खटकते. काही ठिकाणी लिखाण फार भावनेच्या भरात झाले आहे. ऐतिहासिक घटना इतक्या हळवेपणाने बघून कशा चालतील? त्यामागे काहीतरी ठोस विचार असायला नको?

आता माझे हे खरे खरे मत आहे, की तिचे पुस्तक चांगले झाले आहे आणि माझे चांगलेच काय पण वाईट पण पुस्तक अजून झाले नाही म्हणून मी मत्सरी तर झालो नाही आहे ना?

टीकाकार व समीक्षक असेच तयार होत असतात का?

कचेरीतल्या आणखी एका बाईची ओळख झाली. उंच, गोरी व सडसडीत. इतकी सडसडीत, की तिच्या बाईपणाच्या खुणासुद्धा जेमतेम दिसतात. ही मिसेस दार. मूळची काश्मिरी. मग पाकिस्तानात गेली. तिथून इंग्लंडला जाऊन तिथेच स्थायिक झाली व आता इथे आली आहे. तिचा नवरा आर्किटेक्ट आहे. एका खाजगी कंपनीत.

मिसेस दार आमच्या मंत्री-महोदयांची खाजगी चिटणीस आहे. म्हणून ती महत्त्वाची. तशी दिसायला बरी आहे आणि अशा सेक्रेटरीज असतात तशी चुटचुटीत. नेहमी विलायती ढंगाचे कपडे म्हणजे स्कर्ट,घालते. त्यामुळे ओमानी तिच्याविषयी चांगले बोलत नाहीत.

तिच्याशी अर्धाएक तास गप्पा मारल्या. 'हिंदी आणि पाकिस्तानी एक' ह्या वृत्तीची ती आहे. आपण लोक ह्या इंग्लिश लोकांपेक्षा कामाला खूप चांगले आहोत पण आपल्यांत एकी नाही, एकमेकांना मदत करण्याची वृत्ती नाही, वगैरे वगैरे.

अशा गोष्टी सगळे पाकिस्तानी व हिंदी नेहमी करत असतात पण त्याप्रमाणे वागत मात्र कोणी नाही. त्यामुळे तिच्या बोलण्यात मला रस नाही, पण तिच्यात रस आहे. मंत्र्यांची सेक्रेटरी ओळखीची असणे चांगले ह्या दृष्टीने मी तिचे सगळे शांतपणे ऐकून घेतले. कदाचित त्यामुळे माझ्याबद्दल तिचे मत चांगले झाले असावे.

ह्यानंतर ती कॉरिडॉरमधे वगैरे भेटली की वा आमच्या विभागात आली की 'हाय' करत असे. कधी माझ्या टेबलाजवळ येऊन बोलत असे.

"ये बुढी तो तुम्हारे पीछे पडी लगती है." एकदा अमानुल्ला म्हणाला.

"और हमारे पीछे कौन पडेगा? और बुढी तो बुढी सही. मसकतके लिये ये भी ठीक है. मी हसत म्हणालो.

त्यावर अनवर पाशाने एक प्रसंग सांगितला. त्याचा एक मित्र त्याच्याकडे आला व 'सिनेमाला चल' म्हणून आग्रह करू लागला. तेव्हा पाशाने कोणता सिनेमा, त्यातली हिरॉईन कोण वगैरे चौकशी करायला सुरुवात केली. त्यावर मित्र म्हणाला.

"ये सब बातें छोड दो, यार. मसकतमें तो दुर्गा खोटे हिरॉईन होगी तो भी चलेगा!"

ह्यावर आम्ही सगळेच खळखळून हसलो.

आज एन्थनी क्वेनचा एक अप्रतिम सिनेमा पाहिला. गेल्या वर्षीच मी अफगाणिस्तानातून आलो होतो. तिथला रशियन सैन्याबरोबरचा अफगाण लोकांचा लढा पाहिला होता. ह्या सिनेमातल्या गावांची व माणसांची नावे बदलली तर हा आजच्या अफगाणिस्तानवरचा सिनेमा म्हणून दाखवायला हरकत नाही.

लिबिया इटालीच्या अमलाखाली होता त्या वेळची गोष्ट. बहुसंख्य वस्ती मुसलमान. त्यांच्या स्वातंत्र्यलढ्यावरचा हा चित्रपट. एन्थनी क्वेन हा मूळचा शिक्षक पण लढ्यात लोकांचा पुढारी होतो. तो त्या वेळी साठ-पासष्ट वर्षाचा दाखवला आहे.

मुसोलिनी व इटालियन राज्यकर्त्यांचे क्रौर्य तर इतके आहे, की सिनेमा बघतानासुद्धा जीव थरारून जातो. त्या मानाने इंग्रज चांगले. त्यांनी त्या मानाने काहीच अत्याचार केले नाहीत असे वाटायला लागते. अर्थात आमचे स्वातंत्र्ययुद्धही त्या तऱ्हेचे नव्हते.

इटाली प्रगत देश व लिबिया मागासलेला. त्यांची बरोबरी कशी होणार? त्यांची चळवळ मोठ्या क्रूरतेने दडपली जाते.

आपल्याकडे पंधरा ऑगस्टला वा सव्वीस जानेवारीला असे इतर देशांच्या स्वातंत्र्य-चळवळीचे चित्रपट का दाखवत नाहीत?

आता कचेरीत थोडे जास्त काम असते, एवढेच. बाकी आयुष्य नेहमीसारखे चालू आहे. कधी नवीन लिहितो. कधी नाटके लिहिली आहेत त्यांच्या प्रती तयार करतो.

आज 'मिया'ची (MIYA) उच्चस्तरीय बैठक झाली. ('मिया' म्हणजे मिनिस्ट्री ऑफ इन्फर्मेशन अँड यूथ अॅफेयर्स). बैठकीला त्यांचे मंत्री महोदय होते. मंत्रालयाचा मुख्य अधिकारी होता. ब्रिटिश आर्किटेक्ट्स होते. आमचा डायरेक्टर जनरल होता. कार सुट्टीवर गेला आहे, म्हणून मला पाठवण्यात आले.

'मिया'च्या लोकांकरता हौसिंग कॉलनी उभारायची आहे. त्याचे ले-आऊट्स, घरांचे नकाशे व एकंदर योजना हा चर्चेचा विषय होता. मला ह्या योजनेबद्दल काही माहिती नव्हती. कारण आतापर्यंत कारच हे काम बघत होता. तरी पण अशी मी पुष्कळ कामे केली आहेत. हिंदुस्थानात असताना मध्यवर्ती सरकारच्या मंत्र्यांशी व उच्च अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेत भाग घेतला आहे. त्यामुळे ह्या उच्चपदी असणाऱ्या लोकांच्या विचारांची ठेवण व पद्धत मला चांगली माहीत होती. त्यांना साधारणपणे काय प्रश्न पडतात ते व त्यांच्या आवडीनिवडीही मला माहीत होत्या.

अशा बैठकींचे व चर्चेचे एक तत्त्व असते. तेथे जमलेले फार खोलात जाऊन विचार करणारे नसतात. त्यात हौसिंगचे ले-आऊट्स वा घरांचे नकाशे बारकाईने समजायला जशा तऱ्हेचे ज्ञान लागते, ते ह्या मंत्र्यांकडे व अधिकाऱ्यांकडे नसते. अशा बैठकीत सर्वसामान्यांना समजेल असा मुद्दा ठोसपणे मांडलात, की तुमची सरशी होते.

बैठक सुरू झाल्यावर प्रथम ब्रिटिश आर्किटेक्ट्स बोलले. त्यांनी योजनेचे मॉडेल बनवून आणले होते. ते त्यांनी समजावून सांगितले. जवळजवळ चारशे-पाचशे कुटुंबांच्या राहण्याची त्या कॉलनीत व्यवस्था होणार होती. त्यांच्याकरता छोटा बाजार, लहान दवाखाना वगैरे

बांधला जाणार होता.

नंतर मंत्री महोदयांनी काही प्रश्न विचारले. माझी बोलण्याची पाळी आली. मी माझ्या कल्पना सांगितल्या व ह्या कॉलनीत एक आदर्श मॉंटेसरी असावी असे सुचवले व आर्किटेक्ट्सनी आपल्या योजनेत ती का दाखवली नाही ह्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. लहानपणापासून चांगल्या शिक्षणाचे महत्त्व मी सांगायला पाहिजे असे नाही हेही वर जोडले!

झाले! मंत्री महोदय व अधिकारी एकदम माझ्यावर खूष झाले. त्यांनी माझी कल्पना उचलून धरली. ह्या सूचनेत विरोध करण्यासारखे काहीच नव्हते. त्यामुळे ती त्या आर्किटेक्ट्सना मान्य करणे भाग पडले.

मंत्री महोदयांनी नंतर माझ्याबद्दल आमच्या डायरेक्टरकडे चौकशी केली. पण ते अरेबिकमधे बोलत होते, त्यामुळे त्यांचे सगळे बोलणे मला कळले नाही. फक्त हिंदी आर्किटेक्ट आहे, चांगला आहे वगैरे बोलताहेत एवढे कळले. माझ्या नावाचा थोडा घोटाळा त्याने केलाच. आपली नावे त्यांच्या नेहमीच्या सरावातली नसतात त्यामुळे तसे होणे साहजिकच होते.

काल इथल्या मराठी मंडळींची बैठक होती. इथे व्यवस्थित स्थापन झालेले असे मंडळ नाही. कारण इथे कोणालाही कोणत्याही तऱ्हेची संस्था काढायची परवानगी नाही. म्हणजे अगदी कायद्याने बंदी आहे. साधी सांस्कृतिक कामे करणारी मंडळेसुद्धा स्थापन करता येत नाहीत. इंडिया स्कूल आहे ह्याचे कारण त्यांच्या बोर्डाचा अध्यक्ष भारतीय राजदूत असतो व त्या शाळेची सर्व तऱ्हेची जबाबदारी भारत सरकार घेते.

अर्थात कायद्याने बंदी असली तरी मराठी माणसे लहानसहान कार्यक्रम करतात, वर्गणी जमवतात व आवश्यक तेवढी तावातावाने चर्चा करतात.

इथले साध्या-साध्या गोष्टींना बंदी घालणारे कायदे पाहिले, की आपल्या देशात किती आझादी आहे ते कळते. स्वातंत्र्य म्हणजे काय? हे अशा 'परतंत्र' राज्यात आल्यावर उमगते. खरे म्हणजे तसे इथे येण्याचीही गरज नाही. आपल्याकडले आणीबाणीचे दिवस आठवावे व तशीच किंबहुना त्याच्यापेक्षा जास्त कडक व कायमच्या आणीबाणीची कल्पना करावी. इथे राहिल्यावर कळते, की आपल्याकडे जरा जास्तच स्वातंत्र्य आहे. तरी पण आपण कायम आरडाओरडी करतच असतो.

हिंदी मुसलमानांना ह्या अरब देशांतून फिरवून आणले पाहिजे असे मी मागे म्हटले होते, तसेच सगळ्या भारतीयांना पण फिरवून आणायला हवे.

ह्याचा अर्थ इथे चालले आहे ते सगळे चांगले आहे व मी त्याची तरफदारी करतो आहे असा नाही. इथे पोलीस कोणालाही कोणत्याही कारणाकरता (वा कारणाशिवाय) तुरुंगात टाकू शकतो. एखादा माणूस कोणत्या तुरुंगात आहे हे कळायलासुद्धा आठआठ, दहा-दहा दिवस लागतात. मग ॲक्सिडेंटची केस असो, चोरीची असो, वा रस्त्यावर कोणी सिगारेटचे रिकामे पाकीट, वा पाणी टाकलेले असो.

ओमानमधे पुष्कळ लोक पासपोर्टशिवाय येतात. का कोणास ठाऊक, असल्या लोकांना बंगला-देशी म्हणतात. ही माणसे बारीकसारीक कामे करत असतात. ते बेकायदेशीर असल्यामुळे पोलीस त्यांच्या मागावरच असतात. असल्या घुसखोर लोकांना मोठ्या संख्येने पकडण्याचे पक्के ठिकाण म्हणजे सिनेमा थिएटर्स.

सिनेमा सुटला रे सुटला, की सगळ्यांना डांबून ठेवतात. ज्या ठिकाणी तुम्ही काम करत असता तिथून तुम्हांला तुमचा फोटो असलेले कार्ड दिले जाते. ते जर तुमच्याबरोबर असले तर ठीक नाही तर तुम्हांला तुरुंगात टाकतात. आता काही लोकांना कार्डे मिळालेली असतात पण ते ती नेहमी जवळ बाळगतातच असे नाही. उदाहरणार्थ, मी स्वतः ! मला हा नियम माहीत नव्हता. सुदैवाने मी इतक्या वेळा सिनेमांना जाऊनसुद्धा माझ्यावर तो प्रसंग आला नाही. कदाचित मी फक्त विलायती चित्रपट दाखवतात अशा थिएटरमधे जातो, तिथे हिंदी व पाकी फारसे येत नाहीत, ओमानीच असत म्हणूनही पोलिसांची त्या तिथे धाड पडली नसेल.

काल अनवर पाशावर हा प्रसंग ओढवला म्हणून तरी मला कळले. नाहीतर माझीही एक दिवस गठडी वळली असती.

सांगत होतो मराठी मंडळींबद्दल. आम्ही सत्तर-ऐंशी मराठी एका बंधूच्या गच्चीवर जमलो होतो. काही दिवसांनी इथे भीमसेन जोशी यायचे होते. त्यांचा कार्यक्रम आखण्याकरता, राहण्याची व्यवस्था करण्याकरता व इतर गोष्टी ठरवण्याकरता आम्ही जमलो होतो. मराठी बाण्याला अनुसरून अगदी अटीतटीची चर्चा झाली.

हे सगळे लोक मला नवीन होते. आपण मराठी लोक किती हेंगाडे दिसतो नाही ? असाही मनात विचार आला. दिल्लीला, कलकत्त्याला अशीच मंडळी होती. पण ती इतकी हेंगाडी वाटत नव्हती. कदाचित आणखी थोडी जास्त ओळख झाल्यावर हीच मंडळी चांगली वाटू लागतील.

माझे घर मोठे असल्यामुळे व मी एकटा असल्यामुळे जोशींचे दोन साथीदार माझ्याकडे उतरवून घ्यायचे ठरले. माझ्या मुस्लिम-हिंदू भेसळ नावामुळे प्रथम लोक थोडे चपापले होते.

पुढे भीमसेन जोशींबरोबर सात-आठ लोक आहेत ह्या सबबीवर त्यांना व्हिसा नाकारला गेला व त्यांचा कार्यक्रम झालाच नाही.

एमेल म्हणजे आमच्या डायरेक्टर जनरलचा डेप्युटी. हा बैरुटचा राहणारा. तो सुट्टीवरून परत आला. त्याने मला बोलावून 'मिया'ची मीटिंग कशी झाली, काय काय झाले वगैरे चौकशी केली. कारण त्याच्याकडे त्या मीटिंगचा अहवाल आला होता. त्या मीटिंगला मी गेलो होतो. तिथे मी काही बोललो होतो. ते मंत्री महोदयांना रुचले पण होते. असे असूनसुद्धा मला काही त्या मीटिंगचा अहवाल पाठवला गेला नव्हता. तसे होणे साहजिकच होते. कारण मी कारच्या बदल्यात म्हणून गेलो होतो. तरी पण आपल्याला अहवाल न मिळण्याचे मला फार जाणवले.

आता मार्च महिना संपत आला आहे. वर्षभरात कचेरीतल्या कोणी केव्हा रजेवर जायचे ह्याचे वेळापत्रक बनते आहे. कारण सगळ्यांना एकदम सुट्टी देता येणे शक्य नसते. इथे एक महिन्याची भर पगारी रजा, आपल्या गावी जाण्यायेण्याचे विमानाचे तिकीट वा त्याबद्दल पैसे मिळतात.

मी इंग्लंडला कोलंबो-प्लॅन स्कॉलरशिपवर गेलो होतो. तिथे वर्षभर राहिलो होतो. परतताना पॅरिस, रोम व आम्हां आर्किटेक्ट्सचे मक्का समजले जाणारे ॲथेन्स वगैरे शहरे पाहून आलो होतो. पण बायकोने युरोप पाहिला नव्हता. तेव्हा सुट्टीत मी मुंबईला न जाता तिनेच

मसकतला यावे व दोघांनी मिळून युरोप पाहायला जावे असा बेत आखला. तसे बायकोला कळवले व कार्यक्रम आखू लागलो.

काल एक ग्रीक सिनेमा पाहिला. त्यात तीन वेगवेगळ्या मुली वेश्या-व्यवसायाला का लागतात ह्याचे चित्रण होते. आपल्याकडेही वैजयंतीमाला, वहिदा रहमान, मीनाकुमारी यांनी वेश्यांच्या जीवनावरच्या सिनेमांतून कामे केलेली आहेत. पण त्यांत वेश्यांबद्दल कळवळा व ह्या तारकांचे ग्लॅमर हेच प्रामुख्याने असते. त्या मानाने हा ग्रीक सिनेमा जास्त रोखठोक होता.

एक मुलगी पैशात किती सुख आहे हे कळल्यावर आपल्या गरीब प्रियकराला सोडून एका श्रीमान माणसाबरोबर निघून जाते. पुढे तो श्रीमान माणूस तिला टाकून देतो तेव्हा तिला हा व्यवसाय करण्याशिवाय गत्यंतरच राहत नाही.

दुसरी मुलगी खेडेगावातली असते. लग्नानंतर तिच्या नवऱ्याला ती 'कुमारी' नाही आहे असा संशय येतो व तो तिचा खून करायचा प्रयत्न करतो. ती भीतीने पळून जाते व वेश्या बनते.

तिसरी एका आर्किटेक्टची बायको असते. नवरा फार आजारी पडतो. त्याच्या उपचाराकरता पैसा हवा म्हणून ही ह्या व्यवसायाला लागते. बरा झाल्यावर हे नवऱ्याला कळते. त्याच्याकरता तिने केवढा त्याग केला आहे ह्याची पर्वा न करता तो तिला टाकून बोलतो. ती चिडून जाते व घर सोडून हा व्यवसाय करायला लागते.

आज माझ्या सरदारजी सहकाऱ्याबरोबर इथल्या गुरुद्वारात गेलो होतो. एका हिंदी कंत्राटदाराचा मोठा कॅम्प आहे. तिथे शेकड्याने हिंदी कामगार राहतात. एका मोठ्या शेडमधे गुरुद्वार आहे. प्रथम ग्रंथसाहेबाचे दर्शन घ्यायचे. ते घेताना डोके उघडे टाकलेले चालत नाही. सरदारांची पगडी असते व बायका पदर घेतात. बाकीच्यांनी डोक्यावर रुमाल बांधायचा. ग्रंथसाहेबासमोर पैसे ठेवायचे, डोके टेकायचे व भजन ऐकायचे, नंतर प्रसाद घ्यायचा असा क्रम असे.

दिल्लीत सोळा वर्षे राहून व इतके सरदारजी ओळखीचे असूनसुद्धा कधी गुरुद्वारात गेलो नव्हतो. म्हणजे कधी तसे वाटलेच नव्हते. दुसऱ्या धर्माबाबत आपण फार उदासीन असतो. आजसुद्धा थोडी उत्सुकता व सरदारजीचा जास्त आग्रह म्हणूनच जाणे झाले.

पण तिथे गेल्यावर मन प्रसन्न झाले. प्रथम 'मथ्था' टेकला. थोडा वेळ भजन ऐकले व मग प्रसाद घ्यायला गेलो. प्रसाद कसला ? चक्क जेवणच होते. त्याला लंगर म्हणतात. आम्ही गेलो त्या वेळी पंगत बसली होती. शेकड्याने लोक बसले होते. पुरुषांची पंगत वेगळी. बायकांची वेगळी. ती पंगत उठल्यावर आम्ही बसलो.

सगळे शांततेत व शिस्तीत. प्रथम बसायला मिळावे म्हणून घाईगर्दी नाही, गोंधळ नाही. वाढणारे शिस्तीत वाढत होते. वाढताना एखादे पान राहिले तरी त्याबद्दल कोणी आरडाओरडी करत नव्हते. हाका मारून वाढायला सांगत नव्हते. जेवढे पानात पडेल तेवढेच खायचे व उठायचे. कारण तो प्रसाद होता. जेवण नव्हते. पानात कोणी काही टाकायचे नाही. अगदी लहान मुलांनीही. शेकड्याने व त्यांतले बहुतेक अशिक्षित असूनही हिंदी समाज इतका शिस्तबद्ध वागू शकतो ह्याचे मला आश्चर्य वाटले. अभिमानही वाटला. सरदारजींबद्दलचे मत

एकदम चांगले झाले.

म्हणजे आपल्या देशातल्या एका धर्मगटाबद्दल चांगले मत व्हायला मला परदेशात जायला लागले होते!

दत्ता आल्या दिवसापासूनच त्याच्या वागण्यामुळे तो मनातून उतरला होता. त्यामुळे प्रथम मी त्याच्याशी वा त्याच्या घरच्यांशी फारसा संबंध ठेवला नव्हता. पण आजकाल थोडा घरोबा निर्माण झाला आहे. दत्ताची बायको हुशार व स्मार्ट आहे.

मी त्यांच्याकडे दोनचारदा चहाला गेलो होतो म्हणून त्या संध्याकाळी मी त्या कुटुंबाला चहाला बोलावले. अर्थात चहाला बोलावले तरी चहा दिला नाही. मुलांनी थंड पेय घेतले व मी आणि दत्ताने बीयर घेतली. दत्ताच्या बायकोला थोडा आग्रह केला तेव्हा ती पण बीयर घ्यायला तयार झाली. तिच्या ग्लासात बीयर ओतत असता दत्ता म्हणाला, "तिला फार बीयर देऊ नको. ती प्रथमच घेते आहे."

"थत्त!" दत्तीण खास बंगाली पद्धतीने राग व्यक्त करत म्हणाली, "आत्तापर्यंत मी कितीतरी वेळा बीयर घेतली आहे!"

ह्यावर दत्ताचा चेहरा अगदी पाहण्यासारखा झाला.

कचेरीतल्या लोकांनी सुट्टीवर जाण्याकरता मला कोणत्या दिवसाची, कोणत्या ठिकाणची तिकिटे पाहिजेत वगैरे चौकशी केली.

माझे इथे राहण्याचे वर्ष जुलैत संपते आहे. मी रजा पण जुलैतच मागितली आहे. त्याला अजून चार महिने बाकी आहेत. इथे तुम्ही पुढल्या वर्षी राहणार नसाल तर वर्ष संपायच्या दोन महिने आधी तसे कळवतात. म्हणजे त्याबद्दल पक्के कळायला अजून अवकाश आहे. पण ज्या अर्थी तिकिटाची चौकशी चालली आहे त्यावरून राहीन असे वाटते.

पण इथे राहीन की नाही? ह्यापेक्षा इथे राहिलो काय आणि भारतात परत गेलो काय, काय फरक पडणार आहे? हा प्रश्न मनाला सतावतो आहे. इथेही मन लागत नाही, तिथेही लागणार नाही ह्याची खात्री आहे.

जानकीला कपूरच्या बायकोतर्फे पाठवलेल्या वस्तू मिळाल्या असतील ना? खरे तर सगळ्या गोष्टी अगदी साध्या होत्या. पण भारी काही पाठवणे शक्य नव्हते. ते जानकी समजून घेईल ना? पाठवलेल्या गोष्टी तिला आवडतील ना? ती तसे कळवेल का? नावडल्याचे तरी पत्र येईल का? फक्त प्रश्न, उत्तरे नाहीतच.

काल मी इथे आल्या आल्या राहत होतो त्या हॉटेलात हिंदी व पाकिस्तानी कवींच्या मुशाहिऱ्याचा कार्यक्रम झाला. मी आणि पदकी गेलो होतो.

चांगली अडीचशे-तीनशे माणसे होती. पन्नास-साठ बायका होत्या. सगळे खाली जाजमा-वर बसले होते. फक्त भारताचे व पाकिस्तानचे राजदूत सोफ्यावर बसले होते.

व्यासपीठावर कवी होते तशाच काही कवयित्री पण होत्या. परदेशात, तेही ओमानसारख्या परदेशात, आपल्या कविता व्यासपीठावरून अशा मिश्र समाजापुढे म्हणून दाखवण्याइतक्या

ह्या मुसलमान स्त्रिया धीट झाल्या आहेत म्हणायच्या.

पाकिस्तानचे राजदूत शेरवाणी, बॅ० जिना-पद्धतीची उंच दिवाल असलेली टोपी घातलेले पठाण गृहस्थ होते. आपले नागा राजदूत विलायती कपड्यांत. त्यांना उर्दूच काय, हिंदीसुद्धा बोलता येत नव्हते. प्रास्ताविकाचे भाषण त्यांनी इंग्रजीत केले व पाक राजदूताने उर्दूत.

व्यासपीठावरचे काय किंवा प्रेक्षकांतले काय, हिंदी कोण आहेत व पाकिस्तानी कोण आहेत हे कळायला काही मार्ग नव्हता. माझ्या आजूबाजूला बसलेले सगळे तरुण होते — बहुधा पाकिस्तानी असावेत. उनाडपणा करणे हा त्यांचा गुण प्रभावीपणे दिसत होता. कविता पण यथातथाच होत्या. त्यामुळे त्यांच्या टिंगल-टवाळीला फार वाव मिळत होता.

कार्यक्रम चालू होता. कोणी एक कवी अत्यंत नम्रपणे "मी अगदी एक मामुली माणूस आहे" असे म्हणताच माझ्या शेजारचा तरुण "आप तो असलीयत बता रहे है" — म्हणजे "तुम्ही तर सत्यस्थिती सांगताहात" म्हणून ओरडला. त्यावर मोठा हशा पिकला.

मला ह्या गोष्टींची खूप मजा वाटत होती. मीही ह्या तरुणांसारखा पूर्वी उनाडपणा करत असे. मीही ह्या लोकांसारखा कार्यक्रम चालू असता आरडाओरडी करत असे. ह्या सगळ्यांमुळे आपण कोणा कलाकारावर अन्याय करताहोत हे लक्षातही येत नसे. तरुणपणात इतका विचार सुचला तर तरुणपणा तो काय राहिला?

इथे मित्रांकडे टीव्हीवर इंग्लिश वा अमेरिकन सीरियल्स पाहतो. वाटते की आपल्यालाही असे लिहिणे शक्य आहे. पण आपण लिहिलेले टीव्हीवर कोण घेईल?

दिवाळी अंकाकरता म्हणून पाठवलेले लेख आता आठवड्याच्या साध्या अंकात छापले आहेत. सोबत संपादकांनी हे लेख खरे म्हणजे 'दिवाळी अंकात यायचे होते पण काही कारणास्तव देता आले नाहीत' म्हणून तळटीप जोडली आहे. ते वाचून जीव थोडा थंडावला. तरी पण हे सगळे आधी कळले असते तर?

ॲडमिनिस्ट्रेशनच्या मुख्य अनवर अल्लीला भेटलो. रजेबाबत बोलायचे होते म्हणून. त्याने माझी रजा काही कारणाकरता स्थगित केली आहे म्हणून सांगितले व नंतर कोणाशी तरी टेलिफोनवर बोलला. ते सगळे अरबी भाषेत. त्यामुळे एक अक्षरही कळले नाही, तरी मी पुढल्या वर्षी इथे राहावे की नाही ह्याबद्दल वाद चालू आहे एवढी मला कल्पना आली.

राहणार असलो काय किंवा परत जाणार असलो काय, काही मोठी खरेदी करायची ती करायला हवी होतीच. तेव्हा त्याची यादी व चौकशी करायला सुरवात केली.

आता मे महिना उलटून दहा-बारा दिवस झाले आहेत.

आज काम करत असताना ॲडमिनिस्ट्रेशनच्या लोकांनी बोलावणे पाठवले म्हणून त्या सेक्शनला गेलो. जगात कुठेही जा, टॅक्सीवाले जसे लबाड असतात तसे ॲडमिनिस्ट्रेशनवाले शांत असतात. शांत, थंड व भावनारहित. इथे पुढील वर्षी राहण्या न राहण्यात मला बराच फरक पडणार होता; पण इथल्या डायरेक्टरला त्याचे काही वाटत होते असे दिसले नाही. मी इथे राहणार नाही ह्या अर्थाचे पत्र त्याने मला अगदी शांतपणे दिले व तेवढ्याच शांतपणे ते मिळाल्याबद्दलची माझी सही घेतली.

त्याच्या टेबलावर दुसरेही पत्र पडले होते. ते सरदारजीच्या बाबतचे होते. त्यातले फक्त 'वुइ रिग्रेट' एवढेच दोन शब्द मी वाचले. म्हणजे त्या सरदारजीलाही पुढल्या वर्षी राहायला

मिळणार नाही आहे म्हणायचे. त्याच्या राहण्या न राहण्याने मला काही फरक पडणार नव्हता; तरी पण त्यालाही राहायला मिळणार नाही हे कळल्यावर कुठेतरी बरे वाटले.

आता इथे राहायचे नाही असे पत्र मिळाल्यावर एकदम वृत्तीच बदलली. सगळ्या गोष्टींकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलला. सुटकेची भावना झाली. काडीमोड मिळालेल्या बाईला असेच वाटत असेल?

माझा स्वभाव अशी तडकाफडकी हार मानणाऱ्यांपैकी नाही. इंग्लंडला जाण्याच्या वेळी व नंतरही मी कित्येक अवघड परिस्थितींतून गेलो होतो. कित्येक वेळा मिळालेल्या 'नाही'चे मी 'हो' करून घेतले होते.

पण ह्या वेळी काही खटपट करावी – वरच्या अधिकाऱ्यांना वा मंत्री महोदयांना भेटावे – असे मनातसुद्धा आले नाही. ते पत्र वाचून मी मनाची परत जाण्याची तयारी केली व ह्यातूनच काहीतरी चांगले निघेल अशी पण जोड दिली. पूर्वीची रग आता माझ्यात राहिली नव्हती. झाड होऊन उमळून पडलो होतो; आता लव्हाळे होऊन काय होते ते पाहणार होतो.

माझ्यानंतर सरदारजीला बोलावणे आले व त्याचे पत्र दिले गेले. त्याने लगेच धावपळ सुरू केली. प्रथम म्हणजे सगळ्यांना पत्र मिळाल्याचे सांगितले. नंतर एकेकाच्या सल्ल्याप्रमाणे ह्याला भेट, त्याला भेट सुरू केले. व ते योग्यच होते. मीही पूर्वीचा असतो तर हेच केले असते. पण ह्या वेळी मी कोणाला असे पत्र मिळाल्याचेही सांगितले नव्हते व त्या बाबतीत काही करायचे नाही असे ठरवल्यामुळे मी स्वस्थ होतो.

त्याच दिवशी आम्ही हिंदुस्थानातून आलेल्या आर्किटेक्ट्सची बैठक घ्यायचे ठरवले होते. त्या ठरवण्यात मी फार पुढाकार घेतला होता. इथे जवळजवळ पन्नाससाठ हिंदी आर्किटेक्ट्स आहेत. त्यांची काहीतरी संघटना असावी हा विचार त्या बैठक घेण्यामागे होता. पण आता त्या बैठकीला जाण्यात रस राहिला नव्हता.

पण आपणच ह्या बैठकीची कल्पना काढली व आपणच जायचे नाही हे मनाला बरे वाटेना. ते योग्य होणार नाही असा विचार करून मी गेलो. इथे कायद्याने असोसिएशन बनवायला बंदी आहे तरीसुद्धा सगळ्या हिंदी आर्किटेक्ट्सनी महिन्यातून एकदा तरी जमावे असे ठरले. कुठे काही सरकारी वा खाजगी नोकऱ्या असतील तर तसे एकमेकांना सांगावे. तसेच भारतात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट्सला नोकऱ्यांबाबत कळवावे असे ठरले. थोडक्यात म्हणजे इथे भारतीय आर्किटेक्ट्सची संख्या वाढवायची हे धोरण.

बैठकीला तीसचाळीस जण आले होते. म्हणजे प्रतिसाद चांगला होता. फक्त मी आणि कपूर पन्नाशीच्या पुढचे होतो. बाकी सगळी अगदी पोरेटोरे होती. अशा तऱ्हेची बैठक प्रथमच घेतली जात होती. त्यामुळे त्या मुलांत फार उत्साह होता. काम करायची तयारी होती. तें बघून खूप बरे वाटले. आणखी राहिलो असतो तर आणखी काहीतरी करून दाखवले असते.

त्याच रात्री बायकोला टेलिफोन करून इथे पुढल्या वर्षी राहण्याचे होत नाही हे कळवले. ते ऐकून ती बिचारी चक्रावून गेली. सुट्टीत तिने इथे यायचे व पुढे आम्ही दोघांनी युरोपला जायचे ठरवले होते. तिला वाटले, की माझा टेलिफोन त्याबद्दलचा असेल. पण निघाले भलतेच. मी परत येत आहे हे कळल्यावर ती भांबावून जाणे साहजिकच होते.

पदकींना भविष्य चांगले कळते. त्यांनी काही प्रश्न विचारून निष्कर्ष काढला, की नव्व्याण्णव टक्के मी इथे राहावा व एकदा राहिलो, तर चांगला चारपाच वर्षे तरी राहावा. फक्त

अट एकच होती . त्या दिवसांत येणारी एकादशी की अमावास्या पार पडली पाहिजे. आणि ती चौदा किंवा पंधरा जुलैला येणार होती. नियमाप्रमाणे माझे वर्ष अकरा तारखेलाच संपत होते. त्या दिवशी मला कोणत्याही परिस्थितीत मसकत सोडणे भागच होते. इथल्या नियमाप्रमाणे वागले नाही तर त्याला तुरुंगवासाची शिक्षा होती. अगदीच अपघात झाला वा कोणी आजारी पडला किंवा काही कारणाने विमान आले नाही तरच ठरलेल्या दिवसानंतर राहता येते. आता ह्या तिन्ही गोष्टी भविष्यावर अवलंबून होत्या. पदकी त्याबाबत काही भविष्य सांगू शकले नाहीत.

आता जरी हे सगळे थोड्या मजेच्या वृत्तीने लिहीत असलो तरी त्या वेळी त्यांनी सांगितलेले भविष्य ऐकून बरे वाटले हे मात्र खरे. असे बरे वाटवण्याचा गुण अशा 'भविष्या'त असतो म्हणून तर ते लोकप्रिय होते.

पदकींनी सांगितलेले दुसरे भविष्य मात्र फार उत्साहवर्धक होते. ते म्हणाले, "तुम्ही सिनेमा किंवा जाहिरातीच्या लाईनमधे, म्हणजे ज्या लाईनमधे ग्लॅमर आहे अशा लाईनमधे जा." तशा मी एकदोन चित्रपटकथा लिहिल्या आहेत. पण सिनेमातल्या ग्लॅमरस जगातल्या लोकांशी माझा संबंध येणार कुठे व कसा?

काही लोकांचे सगळे कसे छान जमते. सहज योगायोगाने त्यांना कोणीतरी, कुठेतरी भेटते. त्यांची बातचीत होते. त्यांतून सिनेमा निघतो. नाटक बसवले जाते. तो भयाण यशस्वी होतो. ते एकदम कीर्तीच्या शिखरावर पोहोचतात. हे सगळे वाचले म्हणजे मला तर कल्पित कथा-कादंबऱ्यांप्रमाणे वाटते.

एक वर्षापेक्षा जास्त राहायला मिळणार नाही ह्याचे प्रथम प्रथम काही वाटले नाही. उलट, जे झाले ते बरेच झाले असे मनात आले होते. पण जसजसे दिवस जाताहेत तसतसे झाले हे बरे झाले नाही, फार अपमानास्पद झाले आहे अशी मनाला टोचणी लागली. पण अजून दोन महिने आहेत म्हणजे ह्याच मंत्रालयात खटपट करता येईल किंवा दुसरीकडे नोकरी पाहता येईल. पुष्कळांना इथे एक नोकरी सुटल्यावर दुसरी मिळाली आहे.

पण भरपूर वेळ आहे व दुसऱ्यांना अशा नोकऱ्या मिळाल्या आहेत ह्याने माझा प्रश्न सुटणार नाही. एक तर माझे वय झाले आहे. आता सटरफटर कामे माझ्या हातून होणार नाहीत. बरे, मला पगारही भक्कम हवा व पोझिशन पण हवी. माझ्यायोग्य जागा फारच थोड्या. खाजगीत जवळजवळ नाहीतच व सरकारीसुद्धा अगदी थोड्या.

हे सगळे विचार येत असताना आमच्या टेक्निकल डायरेक्टरला म्हणजे अब्बास जाफरला भेटलो. हा काळारोम, जाडजूड, धिप्पाड हबशी माणूस: मुंबईत मुलाखतीच्या वेळी ह्याने, आमचे मंत्रालय नवीन आहे, खूप काम आहे त्यामुळे चारपाच वर्षे तरी राहशील; पण आमच्या सरकारी नियमाप्रमाणे प्रथम एका वर्षापेक्षा जास्तीचे कॉन्ट्रॅक्ट करता येत नाही म्हणून सांगितले होते.

आता ह्याच लोकांनी मला परत जाण्याची नोटीस दिली होती. त्यामुळे त्याला फार कानकोंडे वाटत होते.

"कामच कमी आहे. मंत्रालयच बरखास्त करायचं चाललंय, त्याला मी काय करू? व्यक्तिशः तुझ्याविरुद्ध काही नाही. जेव्हा काम वाढेल, त्या वेळी परत बोलावू."

एकदा गेलो, की परत बोलावणे काही यायचे नाही, ह्याबद्दल माझी खात्री होती. पण त्या

वेळी अब्बासला तसे काही सांगणे शक्य नव्हते.

काम कमी व्हायला दोन कारणे होती : एक तर तेलाचा भाव घसरला होता, आणि ह्या देशाची मिळकत कमी झाली होती. त्यामुळे सरकारने कपातीचे धोरण स्वीकारले होते.

आणि कुठेही कपात आली म्हणजे ती प्रथम इमारत-बांधकामावर येते. इथेही तसेच झाले होते.

दुसरे म्हणजे आमचे हे मंत्रालय प्रस्थापित होण्याआधी प्रत्येक मंत्रालय आपआपली इमारत-बांधणीची कामे स्वतःच बघत असे. म्हणजे त्यांनीच कामाची आखणी करायची, त्यांनीच आर्किटेक्ट्स नेमायचे, त्यांनीच कॉन्ट्रॅक्टर नेमायचा व त्यांच्याकडून कामे करून घ्यायचो.

आता ही सगळी कामे आमचे नवीन मंत्रालय करायला लागले होतं. त्यामुळे बाकी मंत्रालयांचे अधिकार व मुख्यतः कॉन्ट्रॅक्टर वगैरे नेमताना मिळणारी मिळकत बंद झाली होती, त्यांनी सुलतानाकडे आमच्या मंत्रालयाविरुद्ध तक्रारी करायला सुरुवात केली. सुलतानच तो. त्याने आमचे मंत्रालयच बरखास्त करायचा निर्णय घेतला. आमचे बांधकाम-खाते मिनिस्ट्री ऑफ म्युन्सिपल अफेयर्सला जोडून टाकले. त्यामुळे माझ्यासारख्या वरिष्ठ आर्किटेक्ट्सची गरज राहिली नाही. आणि नेमके ह्याच वेळी माझे वर्ष संपत आले होते. तेव्हा आम्हांला परत जाण्याची नोटीस दिली गेली.

आमच्या ऑफिसमधला सरदारजी अब्बास जाफरला भेटला. त्यालाही माझ्यासारखे उत्तर मिळाले. तो माझ्या चार दिवस आधी आला होता व चार दिवस आधी जाणार आहे.

मी जुलैनंतर इथे राहणार नाही आहे हे कळल्यावर मंत्र्यांची सेक्रेटरी मिसेस दार फार हळहळली.

"आपलं मंत्रालयच सुलतानानं रद्द करून टाकल्यामुळं मंत्री महोदय फार वाईट मनः-स्थितीत आहेत. नाहीतर काहीतरी खटपट करता आली असती."

अजून काहीतरी करता येईल व तशी ती करेल असे आश्वासनही तिने दिले व त्याप्रमाणे खटपट पण केली.

एमिलने मला भेटायला बोलावले. हा आमच्या डायरेक्टर जनरलचा सल्लागार.

"तू व तुझं काम मला फार आवडतं. पण काय करू ? तुझा पगार इतक्या वरच्या लेव्हलचा आहे की काही करता येत नाहीये."

ह्याचा अर्थ मी कमी पगारावर काम करायला तयार असलो तर मला इथे राहायला मिळेल असे हा सुचवतो आहे की काय ? पण तसे करायचे नाही हे मी झटकन ठरवले. आता हे खरे होते, की इथला कमी पगारसुद्धा हिंदुस्थानच्या मानाने खूपच जास्त असणार होता. पण मोठ्या पगारावर काम केल्यानंतर तिथेच कमी पगारावर काम करणे मला योग्य वाटले नाही. राहायचे तर आहे त्या पगारावर राहायचे.

त्याने दाखवलेल्या सहानुभूतीबद्दल त्याचे आभार मानून त्याच्या खोलीबाहेर पडलो.

नेहमीप्रमाणे लिहिणे, खाणे व पिणे चालू आहे. सिनेमा बघणे बरेच कमी झाले आहे. बऱ्याच संध्याकाळी घरीच असतो. आता दत्ताच्या मुलीशी मैत्री जमली आहे. ती बऱ्याच वेळा

संध्याकाळची घरी येते. तेराचौदा वर्षांच्या कच्च्या लिंबू वयाची ती आहे. त्यामुळे तिचे प्रश्नही कच्च्या लिंबू प्रकारचे आहेत. त्यांतले ती जे आईवडलांना सांगू शकत नाही ते मला विचारते. चांगली बुद्धिमान आहे, माझ्या मुलीसारखी, म्हणून तिच्याशी बोलण्यात रस वाटतो.

आज सांगत होती, की सकाळची ती शाळेच्या बसकरता उभी असली, की ओमानी तरुण मुले शिट्या मारतात. "आय लव्ह यू" म्हणतात.

"मग त्यावर काय करतेस तू?" मी विचारले.

"मी काय करणार? मी तोंड फिरवून दुसरीकडे बघत राहते."

"तुला लव्ह करावंसं वाटत नाही?"

ह्या माझ्या प्रश्नाने ती गडबडली. चेहरा लालेलाल झाला. मी माझा प्रश्न परत विचारला.

"तसं लव्ह वगैरे नाही, पण एकदोन मुलं आवडतात. त्यांच्याकडं बघून मी हसतेसुद्धा. पण नंतर भीती वाटते. हे सगळं कुणी पाहिलं तर?"

म्हटले, झाली हिच्या आयुष्याला सुरुवात. असेच हिच्या आयुष्यात आवडणारे येतील, त्रिकोण बनतील, चौकोन, पंचकोन बनतील. कोळ्याचे जाळेच बनेल आणि त्यात अडकून जाईल.

असाच एका मोकळ्या संध्याकाळी बाल्कनीत उभा होतो. पहिल्या दिवशीची चंद्रकोर अगदी समोर अशी होती.

ह्या परक्या शहरात आपले कोणी नाही, असे नेहमी मनात यायचे. पण ती नाजूक चंद्रकोर पाहताच वाटले, अरे ही कोर आहे की इथं. आणखी कोण कशाला हवं?

चांगली व योग्य नोकरी मिळण्याचे एक ठिकाण म्हणजे युनायटेड नेशन्सच्या कचेरीत. त्यांचे पुष्कळ देशांतून बांधकामाचे प्रकल्प चालू असतात. त्यांना सीनियर तंत्रज्ञांची गरज असते. त्यांचे ऑफिस शोधून काढले व तिथे गेलो.

युनायटेड नेशन्सची कचेरी एका छोट्याशा टुमदार इमारतीत होती. आतले फर्निचर सुबक व चांगली मांडणी केलेले होते. सगळा बायकांचा कारभार. चुटचुटीत व स्टाईलने राहणाऱ्या बायकांचा.

ह्यांच्या सगळ्या कचेऱ्यांतून जगभरच्या देशांतून कुठे कुठे काय काय जागा मोकळ्या आहेत ह्याची माहिती-पत्रके असतात. कचेरीत दोन 'गोऱ्या' व दोन 'काळ्या' बायका होत्या. त्यांनी मोठ्या आपुलकीने मदत केली. मलाही माहिती कशी मिळवायची वगैरे चांगले ठाऊक होते.

गेल्या वर्षीच मला यू०एन०ची डोमिनिका बेटात आर्किटेक्टची जागा देऊ केली गेली होती. डोमिनिका म्हणजे थेट उत्तर व दक्षिण अमेरिकेच्या मधले बेट. ती फारच नामी संधी होती. नुसते तिथे जातायेताच सारे जग पाहून होणार होते.

पण कामाचा देश अमेरिकेजवळ, त्यांची कचेरी केनियामधे म्हणजे आफ्रिकेत व मी इथे भारतात मुंबईला. आमच्या पत्रव्यवहारातच इतके दिवस गेले, की डोमिनिका सरकारने कंटाळून जाऊन ती जागाच रद्द केली.

मसकतच्या यू०एन० कचेरीतली कागदपत्रे बघितली तर माझ्या योग्यतेच्या तीन-चार

जागा होत्या. एक दक्षिण अमेरिकेत, एक इराकमधे व एक केनियाच्या मुख्य कार्यालयात. इथे जास्त राहायला मिळाले नाही तेव्हा ह्या तिन्हींपैकी एक तरी आपल्याला मिळणार. किंबहुना तशी ती मिळावी म्हणूनच आपले इथे राहण्याचे जमले नाही असा भाबडा विचार पण माझ्या मनी आला. मनाचे समाधान करण्याचे नाना प्रकार असतात. त्यांतलाच हा एक.

घरी येताच लगोलग तिन्ही ठिकाणी अर्ज पाठवून दिले.

आम्ही इथे चौघे हिंदी बाकीच्यांच्या मानाने बऱ्याच वरच्या पगारावर आलो आहोत. सगळ्यांत जास्त मला, नंतर सरदारजीला, त्यानंतर दत्ताला व सगळ्यांत कमी कृष्णन ह्या मद्रदेशीय आर्किटेक्टला मिळतो. त्याचा पगार कमी म्हणून त्याला आतापर्यंत फार न्यूनगंड वाटत असे.

पण आता सरदारजीला व मला सोडचिठ्ठी मिळाली व दत्ताला मिळण्यात आहे. ह्या-उलट, कृष्णनला कमी पगारावर का होईना, राहायला मिळणार आहे. त्या न्यूनगंडाचा आता अहंगंड झाला आहे.

इथे जास्त राहणे म्हणजे इंग्रजीत ज्याला एक्स्टेन्शन म्हणतात, हे काय प्रकरण आहे ते ह्या देशांतून नोकरीकरता गेल्याशिवाय कळणेच शक्य नाही. सगळ्यांचे आयुष्य ह्या एक्स्टेन्शनच्या बिंदूभवती फिरत असते. एक्स्टेन्शन हाच तारणकर्ता – अगदी देव वाटू लागतो. कारण नाही म्हटले तरी भारताच्या मानाने इथे पगार चांगला मिळतो. राहणेही चैनीचे असते. एक्स्टेन्शन मिळाले नाही म्हणजे ते सगळे जाणार व भारतातली नोकरी, भारतातले आयुष्य परत नशिबी येणार हे चित्र प्रत्येकाला दिसत असते.

बायकोने मुलग्याबरोबर गाण्याच्या काही टेप्स पाठवून दिल्या होत्या. मला तशी गाण्याची खास आवड नाही. त्यामुळे त्या मुद्दामून लावाव्या असे कधी वाटले नाही. आज त्यांतली एक लावली तर काय मजा! जानकी, तिचा नवरा, मी आणि बायको ह्यांच्या गप्पांची ती टेप होती.

जानकी फार कमी बोलते. पण जे काही बोलली आहे ते व तिचे खुसूखुसू हसणे परत परत ऐकावेसे वाटतेय व त्याप्रमाणे ऐकतोय. व मनापुढे तिचे चित्र रंगवतोय.

नोकरीच्या गडबडीत, ह्याला भेट, त्याला भेट, यू०एन० ऑफिसला जा ह्या भानगडींत जानकीला विसरून गेल्यासारखे झाले होते.

मी परत येणार आहे हे कळल्यावर तिची काय प्रतिक्रिया होईल? मी भारतात येणार म्हणजे भेटीचे प्रसंग जास्त ह्या कल्पनेने ती नक्कीच आनंदी होईल. पण त्याचबरोबर माझी एवढी चांगली नोकरी सुटली ह्याचे तिला वाईटही वाटेल.

आज अनपेक्षितपणे चारपाच सुशिक्षित पाकिस्तान्यांशी गप्पा मारण्याचा योग आला.

"पाकिस्तान झालं ह्यात खरं नुकसान भारतात राहिलेल्या मुसलमानांचं झालं," मी माझे म्हणणे सांगत होतो. "एक तर हिंदी मुसलमानांची म्हणून जी संस्कृती होती ती नष्ट झाली. पाकिस्तानी मुसलमान फायद्यात गेले. पण हिंदुस्थानात राहिलेले ना इकडले, ना तिकडले."

पण त्यांना काही पटेना. बरे, मी म्हणतो आहे ते चुकीचे कसे आहे तेही त्यांना सांगता

येईना. खरे म्हणजे पाकिस्तानातल्या मुस्लिमांना हिंदी मुसलमानांबद्दल काहीही वाटत नाही. त्यांचा काही विचारच हे पाकिस्तानी करत नाहीत. भारतीय मुसलमानांचे काही प्रश्न आहेत व ते पाकिस्तान-निर्मितीमुळे निर्माण झाले आहेत ह्याची त्यांना कल्पनाच नाही. म्हणजे ती जाणीवच नाही.

फक्त भारतात दंगे झाले की त्याचा भारताविरुद्ध प्रचाराकरता उपयोग होतो म्हणून त्याबद्दल ते आरडाओरडी करतात.

फैज अहंमद फैज ह्या सुप्रसिद्ध उर्दू कवीला पंडित नेहरूंनी हिंदुस्थानात राहण्याचा फार आग्रह केला तरी पण तो भारतात न राहता पाकिस्तानात आला, हे सगळे पाकिस्तानी अभिमानाने सांगतात; पण त्याच फैज अहंमद फैजने पाकिस्तान-निर्मिती ही फार मोठी चूक होती असे काही वर्षे पाकिस्तानात राहिल्यानंतर म्हटले ते मात्र कोणी सांगत नाहीत.

ते सगळे असले तरी पाकिस्तानी तरुण बोलायला, चर्चा करायला उत्सुक असतात हे खरे.

हिंदी मुसलमान वरच्याच का पण अगदी मध्यम हुद्यांवरसुद्धा नाही आहेत. जे आहेत ते ड्रायव्हर, माळी, गवंडी असे. आणि जरी वरच्या हुद्यांवरचे कोणी असते तरी ते मोकळेपणी बोलले असते की नाही ह्याची शंकाच आहे. ते काहीही असो. भारतीय मुसलमानांचे मन कळायचे राहून गेले.

नोकरीकरता काही जणांना भेटलो. अगदी 'एकच प्याल्या'तल्या सुधाकरासारखी स्थिती झाली नाही तरी नोकरी असताना लोकांना भेटण्यात व तशी नसताना भेटण्यातला फरक जाणवला.

'मिया'मधे गेलो. त्यांच्या मंत्र्यांवर व उच्च अधिकाऱ्यांवर मी चांगले वजन मारले होते. पण त्यांनी अगदी दहाबारा दिवसांपूर्वीच एका आर्किटेक्टला नेमले होते. त्यामुळे तिथे नोकरी जरी मिळाली नाही तरी त्यांनी हळहळ व्यक्त केली, त्याचे बरे वाटले.

मी नवी नोकरी फार गंभीरतेने शोधत नाही, त्यामुळे ह्या प्रकरणात येणारे अनुभव आनंदाने उपभोगू शकतो.

आमचे सध्याचे मंत्री आता सुलतानाचे बांधकामाचे सल्लागार झाले आहेत. त्यांचे ऑफिस आमच्या इमारतीतच पूर्वी होते तिथे आहे. पण त्यांचा आमच्या खात्याशी काही संबंध राहिला नाही आहे.

मंत्रालय रद्द झाल्यामुळे ब्रिटिश, सुदानी, इजिप्ती सीनियर लोक अगदी गडबडून गेले आहेत. कोणाला परत जायला लागेल ते सांगवत नाही. अर्थात ज्यांचे हे वर्ष संपायला बराच अवकाश आहे, त्यांना तशी भीती नाही. पण इथे कशाचा काही भरवसा नाही. हातात नारळ दिला तर भांडणार तरी कोणाबरोबर?

जुन्या मंत्री महोदयांनी आज कचेरीत सगळ्यांची मीटिंग घेऊन जरी हे खाते दुसऱ्या मंत्रालयाला जोडले गेले असले तरी चालू आहे त्या पद्धतीत काही फरक पडणार नाही आहे म्हणून दिलासा दिला.

मी मनाशी म्हटले, की असा दिलासा पूर्वीच्या मंत्र्यांनी देऊन काय उपयोग? हे नवीन मंत्र्यांनी सांगितले तर त्याला काहीतरी अर्थ आहे. पण मग विचार आला, की एवीतेवी आपला

पत्ता कटलाच आहे तर आता फेरबदल होणार आहेत की नाही ह्याची पर्वा तरी का करा?

सध्या मार्गरेट पॉएल नावाच्या अक्षरशः मोलकरीण असलेल्या ब्रिटिश बाईचे 'UNDER THE STAIRS' हे पुस्तक वाचतो आहे. तसे बघितले तर ते आत्मचरित्र आहे. घरोघर दूध पोहोचवणाऱ्या माणसाबरोबर तिचे लग्न झाले. पुष्कळ ठिकाणी तिने प्रथम खालच्या व नंतर वरच्या दर्जाची मोलकरीण म्हणून कामे केली. वयाच्या पंचेचाळीस-पन्नासाव्या वर्षी तिच्या डोक्यात काय आले कोणास ठाऊक, ती चक्क लिहायला लागली. पहिले पुस्तक फार लोकप्रिय झाले, तशी तिने आणखी सहासात पुस्तके लिहिली. नंतर टीव्हीवर त्याची सीरियल झाली व तिला सगळ्या इंग्लंडमधे प्रसिद्धी मिळाली. तिचे सगळे लिखाण नर्म विनोदी व सरळ अन् साधे.

आपल्याकडे घरगड्यांबाबत पुष्कळ विनोदी लिहिले गेले आहे पण स्वतः घरगड्यांनी वा मोलकरणींनी लिहिण्याचे धारिष्ट्य दाखवलेले नाही. तसे कोणी लिहिले तर ते मोठे चविष्ट ठरावे.

माझ्याप्रमाणे दत्ताला पण सोडचिठ्ठी मिळाल्याचे कळले. दत्ताला मिळालेले पत्र त्याने आपणहून सगळ्यांना दाखवले. आधीच तो स्वभावाने तडतड्या. आता तर त्याला फारच स्कोप मिळाला. एडवर्ड कारला पण परत जाण्याचे पत्र मिळाले आहे असे कर्णोपकर्णी कळले. तो आजकाल फार गंभीर असतो. त्यामुळे ते खरे असावे असे वाटते.

अनवर पाशाचे व माझे प्रेमाचे संबंध कधीच नव्हते. उलट, थोडे तणातणीचे होते. त्यामुळे त्याला माझ्या जाण्याचा थोडा आनंदच झाला असणार असा माझा अंदाज. बाकीच्यांना तर त्याचे काही वाटत नव्हते. त्यांतले कित्येक जण इथे काही वर्षे राहिले होते. कोणी आपल्या देशी परत जाणे हे त्यांना नेहमीचे झाले होते.

अमानुल्ला माझ्या इथे राहण्याबाबत वेळ पडली तर अब्बास जाफरशी बोलेन म्हणून सांगत असे. त्याने अब्बास जाफरची बरीच खाजगी कामे केली आहेत, म्हणून त्याला थोडा आत्मविश्वास आहे. पण मला ते पत्र मिळाल्यापासून तो अब्बासशी बोलण्याचा विषयच काढत नाही. ह्याचा अर्थ त्याचे अब्बासकडे फारसे वजन नसावे. माझी केस कोणा ज्यूनियर माणसाची असती तर गोष्ट वेगळी होती. मी अमानुल्लापेक्षा कितीतरी सीनियर. तो माझ्याबद्दल बोलेल तरी कसा?

का माझा हिंदुस्थानीपणा ह्या गोष्टींच्या आड येत आहे? असेही मनात आले. शेवटी मन 'जाती'वर जाते हेच खरे.

आजपासून ऑफिसला पाच दिवस सुट्टी मिळाली आहे. अगदी अनपेक्षितपणे. सौदी अरेबियाच्या सुलतानाचा मृत्यू झाला आहे. सुलतान मेला म्हणजे अशी मोठी सुट्टी मिळते.

सौदी सुलतान मेला, की गादीवर त्याचा मुलगा येत नाही तर भाऊ येतो. असे सगळे भाऊ गादीवर येऊन झाले, की मग थोरल्या सुलतानाचा मोठा मुलगा गादीवर येतो. ह्या पाच दिवसांत मेलेल्या सुलतानाचे दफन व्हायचे होते आणि नवा गादीवर बसायचा होता. त्याच्याकरता ही पाच दिवसांची सुट्टी.

ओमानी माणसांचे ठीक आहे. त्यांचे गावातच वा जवळच्या गावांतून नातेवाईक असतात. पण आमच्यासारख्यांनी काय करायचे? त्यातल्या त्यात सड्या माणसाने? कधी नव्हे ते सौदी सुलतान मेल्याचे मला दुःख झाले!

सुट्टीचा लाभ उठवण्याच्या दृष्टीने बायकोला फोन करायला गेलो. तिथे हमीद दलवाईंचा पुतण्या की चुलत भाऊ भेटला. हमीद दलवाईंची व माझी काही प्रत्यक्ष ओळख नव्हती पण त्यांच्या कामाबद्दल मी बरेच वाचले व ऐकले होते.

त्या पुतण्याशी पुष्कळ गप्पा झाल्या. "आमच्या धर्मात सगळंच चांगलं आहे असं नाही, त्यातही खूप दोष आहेत," असे तो म्हणत होता. असे म्हणणारा मला भेटलेला तो पहिलाच मुसलमान! आता दहापंधरा दिवसांत मला परत जायचे आहे, नाहीतर ह्याच्याशी मैत्री वाढवली असती. तरी पण त्याला चहाचे निमंत्रण देऊन ठेवले आहे.

आतापर्यंत मी आणि सरदारजीच फक्त एका बोटीत होतो. आता दत्ता पण आला आहे. दत्तापेक्षा माझी व सरदारजीची परिस्थिती बरी आहे. कारण आम्ही एकटे आहोत. दत्ता सहकुटुंब सहपरिवार आला आहे. दत्ता चाळीस-बेचाळीस वर्षांचा. मुंबईतली कॉर्पोरेशनमधली पक्की नोकरी सोडून आला आहे. मला तर काय, निवृत्त व्हायला सहा वर्षेच बाकी आहेत. सरदारजीची स्वतःची फर्म आहे. त्यामुळे आम्हांला इथे नोकरी मिळाली नाही तरी चालण्यासारखे आहे. दत्ताचे तसे नाही. त्याला नोकरी मिळायलाच हवी व तशी मिळेलही. कारण तो सिव्हिल इंजिनीयर आहे. आर्किटेक्ट्सच्या मानाने इंजिनीयर्सच्या जागा जास्त असतात.

दत्ता दररोज दुपारचे जेवण झाले, की उन्हातान्हाचा नोकरीकरता वणवण हिंडत असतो. हल्ली त्यांच्याकडे मी जवळजवळ दररोज टीव्ही पाहायला म्हणून जातो. काल जरा लवकर असाच गेलो. त्याची मुलगी आणि मुलगा डायनिंग टेबलावर बसून घरचा अभ्यास करत होते. मी एका खुर्चीवर बसलो. समोर काही पांढरे कागद पडले होते. त्यांतला एक घेतला. एक रंगीत पेन्सिल घेतली व मुलीचे चित्र बनवू लागलो. माझी चित्रकला बरी आहे. ती दिसायला चांगली, मोठे डोळे व कापलेले केस. फक्त तिचे नाक वाजवीपेक्षा मोठे व ढब्ब असे आहे.

बघता बघता स्केच पूर्ण झाले. तिच्यातला नाकाचा दोष मी विशिष्ट अँगलने स्केच करून कमी केला होता. स्केच छान जमले होते. मी चित्र काढत असता दत्ताच्या बायकोने बघितले व कौतुक केले. चित्र पूर्ण झाले तशी ते मी मुलीला पाहायला दिले. तिच्यातला दोष मी झाकायचा प्रयत्न केला आहे, हे तिच्या लक्षात आले. चित्र छान आहे, फार आवडले, मी आता ते अगदी जपून ठेवीन वगैरे जरी म्हणाली तरी ती थोडी खजील वाटली. त्याचे कारण विचारता ती म्हणाली, "तुम्ही चित्रात झाकलंत म्हणून काही माझं नाक सुधारणार आहे थोडंच? ते जन्मभर मला छळत राहणार आहे."

एडवर्ड कार मोठ्या खुषीत असलेला दिसला. त्याला एक्स्टेन्शन मिळाले आहे असे परत कर्णोपकर्णीच कळले. म्हणजे त्याला आता सुट्टीवर पण जायला मिळणार. तो स्वित्झर्लंडमधे बर्फावरचे खेळ खेळायला जाणार आहे. म्हटले, चैन आहे बेट्याची.

आज मिसेस दारच्या सल्ल्यावरून अहंमद बकरी नावाच्या आमच्या जुन्या मंत्र्याच्या सल्लागाराला भेटलो. हा सुदानी आहे. काळा पण अतिशय स्मार्ट व अतिशय चांगले कपडे

करणारा.

मी माझ्या कामाचा पोर्टफोलिओ ठेवला आहे. त्यात मी डिझाइन केलेल्या इमारतीं-बरोबरच राष्ट्रपती गिरी व इंदिराजीबरोबरचा फोटो पण ठेवला आहे. मसुरीचे काम मी करत असता इंदिराजी तिथे आल्या होत्या. त्यांना मी माझी योजना समजावून सांगतो आहे असा तो फोटो आहे.

अहमद बकरीला मी कामाचे फोटो दाखवून झाल्यावर इंदिराजींबरोबरचा फोटो दाखवला व विचारले, ''इंदिराजी कोणत्याही सामान्य इमारतीच्या प्रोजेक्टकरता येणार नाहीत. आणि मी त्या प्रोजेक्टचा मुख्य असल्याशिवाय मला पंतप्रधानांना ते समजावून सांगायला देणार नाहीत. ह्यावरून तुम्हांला काय निष्कर्ष काढायचा तो काढा. मी भारत सरकारातला एक महत्त्वाचा व अनुभवी माणूस. तुमच्या मंत्रालयात आहे आणि तुम्ही त्याला कमी करताहात? तुमच्या नव्या मंत्रालयाला माझा फार फायदा होणार आहे.'' वगैरे वगैरे.

ह्या सगळ्याचा त्याच्यावर फार चांगला परिणाम झाला. तसे तो नंतर मिसेस दारला म्हणालादेखील. पण मंत्री महोदय इंग्लंडला गेले आहेत. तो स्वतःही विलायतेला चालला आहे. नव्या मिनिस्ट्रीच्या लोकांना सांगतो वगैरे तो म्हणाला पण त्यात काही अर्थ नाही.

आता मिसेस दार पण रजेवर चालली आहे. म्हणजे माझी एक एक मोहर बाद होत चालली आहे. ग्रह, ग्रह म्हणतात ते हेच का?

आता शेवटूनचा दुसरा आठवडा. आज मला एका मोठ्या हौसिंग कॉलनीचे काम दिले. त्याबाबत अब्बास जाफर माझ्याशी बोलून गेला. त्यावरून मी इथे आणखी राहावे असा निर्णय घेतला गेलेला दिसतोय. त्या कामाला आता झटून लागलो आहे.

आज एक जुलै. म्हणजे आणखी दहा दिवसांनी परत जायचे. कचेरीत आल्या आल्या मला एक्स्टेन्शन देण्याचे ठरले आहे म्हणून कारने सांगितले. अर्थात हे लगेच कोणाकडे बोलू नकोस म्हणूनही सुचवले. तो स्वतः फार गडबडीत होता. कारण ह्या आठवड्याच्या शेवटी तो रजेवर जाणार आहे. हाच कार सुरुवातीला माझ्या फार विरुद्ध होता, पण त्यानेच आता मी इथे राहावे म्हणून बरीच खटपट केल्याचे कळले.

मिसेस दारला जाऊन भेटलो. कारने सांगितलेले तिला सांगितले. तिला अर्थातच फार आनंद झाला. तिचा मिनिस्टर इथे नाही, सल्लागार पण नाही, तेव्हा तिला ऑफिशली काही चौकशी पण करता येत नाही. ते असले म्हणजे त्यांच्या नावावर वाटेल ती माहिती मिळवता येते.

मिनिस्टर इथे नाही त्यामुळे तिला काही काम पण नाही. तेव्हा ती उद्याच विलायतेला जायला निघणार आहे. जाण्याच्या आधी फार चांगली बातमी दिलीस असे म्हणून तिने फार प्रेमाने हस्तांदोलन केले. परत आल्यावर जेवायला येण्याचे निमंत्रण पण देऊन ठेवले.

कारने माझ्या एक्स्टेन्शनचे जवळजवळ पक्के झाले आहे सांगताच जानकीची प्रखरतेने आठवण झाली. काही दिवसांपूर्वी इथल्या राहण्याविषयी झालेल्या गडबडीबद्दल मी तिला पत्र लिहून सगळे कळवले होते. आता राहण्याचे ऑफिशली कळले, की तिला लगेच टेलिफोन करायचा असे मनाशी पक्के केले.

आता त्या नव्या हौसिंग कॉलनीचे काम करायला उत्साहही भरपूर आला आहे. छान मन लावून नकाशे बनवले. नकाशे काढून झाल्यावर त्यांच्या दोन प्रती काढून चांगले पोर्टफोलिओ बनवले व आमच्या विभागाच्या मुख्याकडे दिले. त्याने ते नकाशे बघितले व कधी नव्हत ते 'थँक्स' म्हणाला. एकदा वाटले, की आत्ताच "एक्स्टेन्शनचं काय ठरलं ?" म्हणून विचारावे; पण म्हटले फार पोरकटपणाचे दिसेल तेव्हा तो विचार बाद केला.

मग अब्बास जाफरलाच जाऊन भेटलो. तो मोघमपणे म्हणाला, "तुला जायला अजून चारपाच दिवस आहेत. तू जाण्याआधी काहीतरी सांगतो."

आज सरदारजी गेला. त्याचे विमान ऑफिसच्या वेळेत असल्यामुळे विमानतळावर गेलो नाही. माझ्या मनात आले, की आता हे लोक माझ्या राहण्याबद्दलचा निर्णय सांगतील. कारण जर मला एक्स्टेन्शन द्यायचे ठरले आहे हे सरदारजीला कळले असते तर त्याने थोडी आरडाओरडी केली असती.

आता चार दिवस उरले आहेत. कोणाला भेटावे म्हणावे तर सगळे सुट्टीवर. पार विलायतेला गेलेले. अब्बास जाफर जाण्याआधी काहीतरी करतोय म्हणालाय त्यामुळे वरच्या अधिकाऱ्यांना वा नव्या मंत्री महोदयांना पण भेटता येत नाही.

गेले पंधरा दिवस ह्या एक्स्टेन्शनच्या बोगद्यातून माझी गाडी चालली आहे. आगगाडी बोगद्यातून जाताना कसे तेवढ्यापुरते प्रवासी-जीवन ठप्प होऊन जाते ? म्हणजे तसा प्रवास चालू असतो, गाडी पुढे धावत असते, पण आपल्याला काही सुचत नाही. वाचणे वगैरे तर सोडाच पण काही खाणेपिणे पण सुचत नाही. तसे माझे झालेय. एकदा वाटते, उगाच ह्या एक्स्टेन्शनच्या जंजाळात पडलो. पण आता पडलो आहे तर माघार नाही घ्यायची.

घरी सगळे आवराआवरीचे वातावरण आहे. तसे फार काही सामान नाहीच आहे. फ्रीज, गॅस रेंज व बाकी सगळे फर्निचर ऑफिसनेच पुरवले होते. टीव्ही, व्हिडियो मी घेतलाच नव्हता. त्यामुळे मोठे डाग असे काही नाहीत. तरी पण वर्षभरात काही ना काही सामान जमतेच. त्याची बांधाबांध चालली आहे. दत्ताची मुलगी आणि मुलगा खूप मदत करताहेत. काचेच्या वस्तू कागदांत गुंडाळायच्या, बॅग्ज्ना नंबरांच्या व नावाच्या चिठ्ठ्या लावायच्या वगैरे.

राहणार-राहणार नाही ह्या दोलायमान मनःस्थितीत राहिलेले दोनतीन दिवस गेले. खरे म्हणजे जाण्याआधी सगळ्यांना भेटून निरोप घेऊन जायला पाहिजे. मश्रफा, इंग्लंडमधे बरोबर होता तो सुदानी हनीफ, ज्याच्याबरोबर जेवलोखाल्लो होतो तो सदाकत अल्ली, कार्ड पंच करणारा तो कोकणी मुसलमान, ती गोव्यातली मुलगी असे कितीतरी. जाण्याचे पक्के असते तर नक्कीच भेटलो असतो पण ह्या अर्धवट स्थितीमुळे भेटावेसेही वाटत नाही.

आज शेवटला दिवस. म्हणजे अकरा जुलै. नेहमीप्रमाणे आठ वाजता टॅक्सीने कचेरीत गेलो. माझ्याशी कोणी बोलत नाही व मी कुणाशी. माझ्याशी बोलणारे म्हणजे कार व अमानुल्ला. कार सुट्टीवर गेलाय व अमानुल्ला कचेरीच्या कामाकरता बाहेरगावी.

माझे विमान दुपारी चार वाजता आहे. दोन तास आधी म्हणजे दोन वाजता पोहोचायला पाहिजे. म्हणजे अजून सहा तास आहेत. आता ह्या सहा तासांत काय होते ते पाहायचे.

अब्बास जाफरची चौकशी केली पण तो अजून आलेला नाही. नेहमीच तो दहासाडेदहा वाजता येतो तसा आजही तो त्या वेळी येणार आहे. आज माझे काम असल्यामुळे त्याने असे उशिरा यायला नको असे मनात आले.

अकरा वाजता अब्बास जाफरला जाऊन भेटलो. तो आपल्या खोलीच्या बाहेर पडतच होता. "मी मीटिंगला चाललोय. तासाभरात येतो, तोपर्यंत तू इथंच थांब, जाऊ नकोस" असे त्याने सांगितले. त्यावर मी विचारले, "मी आत्ता दुपारी चारच्या विमानानं चाललोय. तुम्ही म्हणत असाल तर दोन दिवस राहतो."

"तसं कशाला ? तू इथंच थांब. मी तासाभरात परत येतोच आहे." तो घाईघाईने म्हणाला व तेवढ्याच घाईघाईने निघून गेला.

मी "बरं" म्हटले व त्याच्या सेक्रेटरीच्या पुढ्यातल्या सोफ्यावर बसलो. अब्बासची सेक्रेटरी पण मश्रफासारखी इजिप्ती. पण अगदी दुसऱ्या टोकाची. ही पण गोरी होती पण बुटकी, जाड, बेडौल.

माझी बिलकूल काही बोलायची मनःस्थिती नव्हती, तर ती माझ्यासारख्या कोणा हिंदी माणसाची वाटच पाहत होती. तिला ह्या सुट्टीत काश्मीरला जायचे होते. तिथे कसे जायचे, काय खर्च येईल वगैरे माहिती तिला हवी होती. कचेरीच्या कामाकरता मी जम्मू-श्रीनगरला पाच-सहा वेळा गेलो होतो. मी तिला हवी ती माहिती पुरवली. त्यात थोडा वेळ गेला.

एका तासात येणारा अब्बास एक वाजता आला. त्याने नंतर मला खोलीत बोलावले. त्याचा चेहरा बघताच काय झाले असेल ह्याचा मी अंदाज केला.

"तू आज ठरल्याप्रमाणे हिंदुस्थानाला जा." तो शांतपणे म्हणाला. "काही महिन्यांत मोठी कामं निघणार आहेत. ती निघाली की तुला परत बोलावणं पाठवू."

मी काय समजायचे ते समजलो. उठलो, केलेल्या मदतीबद्दल त्याचे आभार मानले. शेकहॅण्ड केला. भारतात कधी आलात तर जरूर कळवा म्हणून सांगितले. खोलीबाहेर पडलो. सेक्रेटरीचे आभार मानले व तडक इमारतीच्या बाहेर पडलो.

माझ्या इथे राहण्याबाबत कुठेतरी माशी शिंकली होती. ती माशी कोण होती ते मला त्या वेळी कळले नाही व पुढे कधी कळेल असे वाटत नाही.

घरी आलो. दत्ताची बायको व मुले माझी वाटच पाहत होती. मला बहुतेक राहायला मिळेल असे आमच्या बोलण्यातून आले होते, त्यामुळे त्यांना फार उत्सुकता होती. मी परत जाणार आहे असे सांगितल्यावर दत्ताची मुलगी रडायलाच लागली.

दत्ताकडेच जेवण होते. कपूर विमानतळावर पोहोचवायला येणार होता. तोही आला. दत्ता अजून ऑफिसमधून आला नव्हता. मी आणि कपूर जेवलो. सगळ्यांचा निरोप घेतला. मुलगी खाली गाडीपर्यंत येते म्हणाली. आम्ही तिघे इमारतीच्या बाहेर पडलो.

बाहेर ऊन रणरणत होते. गाडी काहीतरी तीसचाळीस फूट अंतरावर होती तरी पण तेवढे अंतर तोडताना जिवाची काहिली झाली.

गाडीत कपूर व मी बसलो. गाडी निघणार तोच दत्ताच्या मुलीने गुलाबांचा गुच्छ दिला. दोनतीनच फुले होती. कागदी असली तरी नाजूक व छानपैकी. ही मसकतच्या राहण्यातली जमेची बाजू.

विमानतळावर सगळे सोपस्कार झाले. विमानाच्या पायऱ्या चढू लागलो. शेवटच्या पायरीवर आल्यावर थांबून मागे वळून पाहिले. अफगाणिस्तानात असतो तर त्या देशाला व तिथल्या दोस्त लोकांना उद्देशून ''बामाने खुदा'' म्हणजे 'देव तुम्हांला साथ देवो' असे म्हटले असते; पण इथे तशी पद्धत नाही व तसे ''बामाने खुदा'' म्हणावे असे मैत्रीचे वा जिव्हाळ्याचे संबंधही इथे जुळले नव्हते.

तेवढ्यात हवाई सुंदरी बाहेर आली व शेकहॅण्ड करून तिने माझे स्वागत केले.

ग्रंथालय ठाणे
७३४८८
३/७/९२
REFBK-0026488
REFBK-0026488